श्रीः

अलंकारप्रकाश

अथवा

काव्यसंबंधी रस, गुण, वृत्ति, रीति इत्यादि,

आणि

विशेषतः अलंकार

यांचें

सलक्षण, सोदाहरण आणि सविस्तर विवरण.

हा मराठी ग्रंथ

लक्ष्मण गणेश शास्त्री लेले

यमंजरी, महाराष्ट्रभामिनीविलास, मेघदूत काव्याचें समवृत्त मराठी भाषान्तर, इत्यादि काव्यांचे कर्ते,

यांनीं रचिला.

तो

पुणें येथें

इन्दिरा छापखान्यांत छापिला.

शके १८२७—इ. स. १९०५.

Price Rs. 6-0-0

हें पुस्तक पुणें एथें त्र्यंबक हरि आवटे यांनीं आपल्या
इंदिरा छापखान्यांत छापलें,
आणि लक्ष्मण गणेश शास्त्री लेले यांनीं पुणें, पेठ सदाशिव,
घर नंबर ४४९ एथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

तद्दिव्यमव्ययं धाम सारस्वतमुपास्महे ।
यत्प्रसादात्प्रलीयन्ते मोहान्धतमसच्छटाः ॥

काव्य हा विषय अत्यंत रमणीय व उदात्त आहे. यानें मनोरंजन हो-ऊन अनायासें उपदेश होतो. या जगांत अनेक उपदेशक आहेत. शास्त्रकार कंठरवानें उपदेश करतात; शिक्षक नीतितत्वें शिकवितात; आईबाप बोध करतात. परंतु या सर्वांच्या तात्त्विक उपदेशाचें ग्रहण प्रायः मोठ्या प्रयासानें होतें. कारण तो उपदेश रुक्ष असतो; मनोरंजक नसतो. आणि मनोरंजनावांचून कोणत्याही विषयाचें ग्रहण आनंदानें व अनायासें होत नाहीं हें अनुभवसिद्ध आहे. औषध गुणावह खरें, पण त्याला रुचिकर व गोड असें अनुपान नसल्यास रोग्याला तें घ्यावयाला फार अवघड वाटतें; आणि कदाचित् त्यानें मन घट्ट करून घेतलेंच तर तें पोटांत फार वेळ ठरतही नाहीं. 'सत्यं वद,' 'धर्मं चर,' इत्यादि तीव्र शास्त्राज्ञांचा आणि शिक्षक व आईबाप यांच्या रुक्ष तात्त्विक शिक्षणाचा सामान्यतः असाच परिणाम होतो. श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ तत्वज्ञानाचें केवळ भांडार आहे. पण ज्ञानेश्वरी व यथार्थदीपिका या अनुपम काव्यग्रंथांच्या द्वारां तेंच तत्वज्ञान सर्वांस प्रिय आणि सुखग्राह्य झालें आहे. 'सत्यं वद,' 'धर्मं चर,' इत्यादि शास्त्राज्ञा सर्वथा वंद्य व मान्य आहेत. तथापि राम, युधिष्ठिर, हरिश्चंद्र इत्यादि महानुभावांच्या निर्मल व उदार चरित्रांच्या मिषानें व्यासवाल्मीकिकवीन्द्रांनीं त्याच आज्ञांचा चिरसंस्कार लक्षावधि मनुष्यांच्या मनावर केला आहे. सारांश, कवीच्या वाणींत एक प्रकारची जादू असते; आणि ती जादूच चित्ताकर्षक होऊन उपदेशरूप इष्ट कार्य सहज करते. म्हणून मनोरंजनद्वारा मनावर उत्कृष्ट संस्कार करणारा असा उपदेशक काव्याशिवाय दुसरा कोणी नाहीं हें उघड आहे.

नुसत्या रंजनाच्या दृष्टीनें पाहिलें तरी देखील काव्याची योग्यता फार मोठी आहे. या सृष्टींत अनंत चमत्कारिक वस्तु आहेत. परंतु त्यांच्या परिचयानें होणारा आनंद सुखदुःखमिश्रित असतो; त्यांचा अल्प परिचय असमाधान उत्पन्न करितो; त्यांचा अतिपरिचय वीट आणतो. शिवाय

असला आनंद प्राप्त करून घेण्याला प्रयासही फार पडतात. काव्याची गोष्ट तशी नाहीं. त्यापासून केवळ व निरतिशय असा आनंदच उत्पन्न होतो; त्याचा अल्प परिचयही समाधान देतो व अतिपरिचयही वीट आणीत नाहीं. शिवाय काव्यानंद प्राप्त करून घेण्याला महान् प्रयासही पडत नाहीं. काव्य हंसवितें, रडवितें, मोहित करितें, प्रोत्साहित करितें, चकित करितें, इत्यादि अनेक प्रकारांनीं विलास करतें; पण त्या विलासाचें फल केवल आणि अनिर्वचनीय आनंद हेंच होय ही गोष्ट सहृदय-संवेद्य आहे.

आपणास खरा आनंद प्राप्त व्हावा अशी प्रत्येक मनुष्याची मनापासून इच्छा असते; आणि तो प्राप्त करून घेण्याविषयीं त्याचे प्रयत्न निरंतर चालू असतात. काव्य जर खरी आनंद देणारी वस्तु आहे तर आनंदाच्या प्राप्तीसाठीं खटपट करणारानें त्याचें सेवन करणें हें इष्ट व योग्य आहे.

काव्याचें मर्म समजून त्याचा आस्वाद घेतां येण्याला काव्यस्वरूप व काव्यसंबंधीं इतर विषय म्हणजे रस, गुण, अलंकार इत्यादि, यांची माहिती असणें अवश्य होय. परंतु अशी माहिती ज्यांत एके ठिकाणीं सविस्तर दिली आहे असा ग्रंथ मराठी भाषेंत अद्यापि झालेला पाहण्यांत नाहीं यास्तव तशा प्रकारचा प्रयत्न करून पहावा अशा इच्छेनें प्रस्तुत ग्रंथ रचला आहे.

या ग्रंथाचें नांव **अलंकारप्रकाश** असें ठेविलें आहे. याचें कारण असें कीं यांत रसादिविषयांपेक्षां अलंकारांचेंच प्रकाशन म्हणजे विवरण अधिक विस्तारानें केलें आहे.

या ग्रंथाचे एकंदर पांच उल्लास [भाग] केले आहेत. पहिल्या उल्लासाचे पांच भाग कल्पिले आहेत. त्यांतल्या पहिल्या भागांत अभिधा, लक्षणा, आणि व्यंजना हे शब्दव्यापार यांचा विचार केला आहे. दुसऱ्या भागांत काव्यलक्षण; ध्वनि, गुणीभूतव्यंग्य व अव्यंग्य हे काव्याचे प्रकार यांचें विवेचन केलें आहे. तिसऱ्या भागांत रसलक्षण, रसप्रकार, भाव, रसाभास, व भावाभास यांचें उपपादन केलें आहे. चवथ्या भागांत माधुर्य, ओज आणि प्रसाद या काव्यगुणांचें कथन केलें आहे.

पांचव्या भागांत मधुरा, परुषा, आणि प्रौढा या काव्यवृत्ति आणि वैदर्भी गौडी व पांचाली या काव्यरीति यांचें निरूपण केलें आहे.

दुसऱ्या उल्लासांत अलंकारलक्षण व अलंकारांचे विभाग हे प्रथम सांगितले आहेत. नंतर शब्दालंकार व शब्दार्थालंकार यांचा विचार केला आहे. यांत अनुप्रास, यमक, चित्र, श्लेष, वक्रोक्ति आणि पुनरुक्तवदाभास यांचें विवेचन केलें आहे.

तिसऱ्या उल्लासाचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत काव्यप्रकाशांतील सर्व अर्थालंकार सांगितले आहेत. यांत प्रथम उपमा, उत्प्रेक्षा, अतिशयोक्ति इत्यादि सादृश्यमूलक अलंकार कथन केले आहेत; पुढें विरोध, असंगति, विभावना इत्यादि विरोधमूलक अलंकारांचा संग्रह केला आहे; व शेवटीं सूक्ष्म, सार, भाविक इत्यादि अवशिष्ट संकीर्ण अलंकारांचें निरूपण केलें आहे. प्रथमदर्शनीं सारख्या दिसणाऱ्या तथापि वस्तुतः भिन्न असणाऱ्या अलंकारांसंबंधानें अनेकस्थलीं विशेष विचार केला आहे. कांहीं अलंकारांसंबंधानें विशेष माहिती व कचित् मतान्तरेंही दिलीं आहेत. उपमा (पृ. १२२–१२३), अनन्वय (पृ. १३०), उपमेयोपमा (पृ. १३२), भ्रान्तिमान् (पृ. १३६–१३७) ससंदेह (पृ. १३९), अपन्हुति (पृ. १४०–१४१), उत्प्रेक्षा (पृ. १४४), रूपक (पृ. १४८–१४९), प्रतिवस्तूपमा (पृ. १६५), दृष्टांत (पृ. १६७), सहोक्ति (पृ. १७६), समासोक्ति (पृ. १७८), असंगति (पृ. १८१–१८६), विभावना (पृ. १८६), अर्थान्तरन्यास (पृ. २१९), समुच्चय (पृ. २३०), परिकर (पृ. २३४), व्याजोक्ति (पृ. २३७), तद्गुण (पृ. २४०) इत्यादि स्थलें वाचून पाहिली असतां ही गोष्ट अनुभवाला येईल. तिसऱ्या उल्लासाच्या दुसऱ्या भागांत अर्वाचीन अलंकारिकांनीं कांहीं नवीन अलंकार कल्पिले आहेत त्यांचा विचार केला आहे.

चवथ्या उल्लासांत रसवदादि अलंकार सांगितले आहेत. रस, भाव इत्यादि प्रधान असले ह्मणजे ध्वनिरूप असतात, आणि अप्रधान असले ह्मणजे अलंकारकोटींत येतात. यास्तव अलंकारांच्या दृष्टीनें त्यांचेंही विवेचन या उल्लासांत केलें आहे.

शेवटच्या ह्मणजे पांचव्या उल्लासांत अलंकारांचें सम्मेलन ह्मणजें संसृष्टि व संकर यांचें निरूपण केलें आहे.

काव्यप्रकाश हा संस्कृत साहित्यग्रंथ फार मान्य व प्रमाणभूत आहे. यास्तव प्रस्तुत ग्रंथ मुख्यत्वेंकरून त्याच्याच आधारानें रचिला आहे. दोष व ध्वनिप्रकार हीं प्रकरणें सोडून काव्यप्रकाशांतील बहुतेक विषयाचा यांत समावेश केला आहे.

प्रस्तुत ग्रंथांत अलंकारादिकांचीं लक्षणें गद्यरूपानें सांगितलीं आहेत. उदाहरणें प्रायः पद्यात्मक दिलीं आहेत. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, श्रीधर, वामन, तुकाराम, मोरोपंत, आनंदतनय, रामजोशी, रघुनाथपंडित इत्यादि अभियुक्त महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतुन उदाहरणांकरिता पद्यें निवडून घेतलीं आहेत. आलीकडच्यापैकीं कै. परशुरामपंत गोडबोल, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादि चार पांच कवींच्या काव्यांतूनही उदाहरणार्थ पद्यें घेतलीं आहेत. कोठें कोठें उदाहरणपद्यें नवीन रचून घातलीं आहेत. अशीं पद्यें स्वकृत या शब्दानें अंकित केलीं आहेत. शिवाय, पद्यमंजरी, महाराष्ट्रभामिनीविलास इत्यादि स्वकृत काव्यांतूनही प्रसंगविशेषीं उदाहरणें दिलीं आहेत. तेथें त्या त्या ग्रंथाचें नांव दिलें आहे. या ग्रंथांत ज्या अलंकारांचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत त्या अलंकारांच्या त्या उदाहरणांत दुसरे अलंकार किंवा अन्य चमत्कार नाहींतच असें समजूं नये. अलंकारग्रंथ वाचणाऱ्या विद्यार्थ्याचा काव्यग्रंथांशीं चांगला परिचय असतो यास्तव या ग्रंथांत उदाहरणार्थ घेतलेल्या पद्यांतील कठिण शब्दांवर अर्थबोधक टिपा दिल्या नाहींत. काव्याचें लक्षण, व्यंजनाव्यापार, रसमैत्री व रसविरोध, रसानुकूल व रसप्रतिकूल वृत्तें, प्राचीन व अर्वाचीन काव्यपद्धतींची तुलना इत्यादि विषयांचें विवेचन या ग्रंथाला परिशिष्टरूपानें जोडण्याचा विचार होता; तथापि तो स्थलाच्या अभावामुळें रहित करणें प्राप्त झालें.

याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथाचें स्वरूप आहे. या ग्रंथाचा विषय असा आहे कीं, त्यांत गणितशास्त्राचा सूक्ष्मपणा व तंतोतंतपणा आढळणें अशक्य आहे. त्याविषयीं विचार करून निर्णय करण्याला सूक्ष्मबुद्धिवैभवापेक्षां सहृदयतेची अधिक अपेक्षा असते. मनुष्य जितका अधिक सहृदय व

कल्पक असेल तितका तो प्रस्तुत विषयांत कांहीं तरी नवीन मर्म किंवा खुबी काढील. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे मार्मिक विद्वानांना या ग्रंथांत स्थलविशेषीं न्यूनाधिक आढळून येईल. शिवाय नजरचुकीनें आणि अज्ञानानें प्रस्तुत ग्रंथांत दोषस्थलें राहिलीं असतीलच. विद्वान्, रसिक व गुणग्राही जन अशा सर्व दोषांचें थोर व उदार बुद्धीनें संशोधन करून गुणलेश दिसला तर त्याचा आदर करतील अशी आशा आहे.

प्रस्तुत ग्रंथ मुख्यत्वेंकरून · काव्यप्रकाशाच्या आधारानें रचिला आहे असें वर सांगितलें. तेव्हां त्या उत्कृष्ट ग्रंथाचें प्रणयन करणारे परमपूज्य, पंडितकुलावतंस श्रीमन्मम्मटाचार्य यांसच प्रथम प्रणामांजलि अर्पण करणें उचित होय. पंडित जगन्नाथराय, विश्वनाथकविराज, व अप्पयदीक्षित यांच्या सहृदयाल्हादक साहित्यग्रंथांचीही थोडीबहुत मदत घेतली आहे; यास्तव त्या महानुभाव विद्वन्मणींसही नमस्कार असो.

श्रीजीवानंद विद्यासागर भट्टाचार्य, गंगानाथ जहा, वामनाचार्य झळकीकर व प्रो. चांदोरकर यांनीं परिश्रम करून प्रकाशित केलेल्या काव्यप्रकाशपुस्तकांचा, तसाच साहित्यशास्त्र, अलंकारमीमांसा, अलकारविकाश, रसकल्लोल इत्यादि मार्मिक व सुंदर मराठी ग्रंथांचाही प्रस्तुत ग्रंथ रचतांना बराच उपयोग झाला हें येथें कृतज्ञतापूर्वक सांगणें अवश्यक आहे.

प्रस्तुत ग्रंथाचें बाह्यांग सुंदर होऊन तो लवकर छापून तयार व्हावा अशाविषयीं आमचे मित्र रा. रा. हरि कृष्ण दामले यांनीं केवळ स्नेहभावानें उत्साहपूर्वक खटपट केली याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. तसेंच इंदिरा छापखान्याचे मालक रा. त्र्यंबक हरि आवटे यांनीं हा ग्रंथ छापण्याच्या कामीं विशेष दक्षता दाखविली हें त्यांसही भूषणास्पद आहे.

या ग्रंथाचीं प्रुफें तपासण्याच्या कामीं बरीच दक्षता ठेविली होती तथापि दोषस्थलें शेवटीं राहिलींच याबद्दल सहृदय वाचक रागावणार नाहींत अशी आशा आहे. नजरेस आलेल्या ठळक चुका शुद्धिपत्रांत· दुरुस्त केल्या आहेत. त्यावरून ग्रंथ प्रथम शुद्ध करून मग वाचावा अशी सप्रेम सूचना आहे.

पुणें, सदाशिव पेठ, घ. नं. ४४९ }
वैशाख. शुद्ध ११ · शके १८२७. }

लक्ष्मणशास्त्री लेले.

अनुक्रमणिका.

प्रथम उल्लास.

भाग पहिला.

भाग दुसरा.

भाग तिसरा.

द्वितीय उल्लास.

चतुर्थ उल्लास.

रसवदादि अलंकार.

पंचम उल्लास.

अलंकारसंमेलन.

अलंकारप्रकाश.

प्रथम उल्लास.

भाग पहिला.

वाच्यार्थ, **लक्ष्यार्थ** व **व्यंग्यार्थ** असे तीन प्रकारचे **शब्दार्थ अलंकारवेत्त्यांनीं** मानिले आहेत.

वाच्यार्थ.

शब्दाचा जो सरळ सांकेतिक अर्थ त्याला **वाच्यार्थ** म्हणतात; जसें--'पुत्र' या शब्दाचा सरळ सांकेतिक अर्थ 'मुलगा' असा आहे. 'दीप' या शब्दाचा सरळ सांकेतिक अर्थ 'दिवा' असा आहे. तेव्हां 'मुलगा' आणि 'दिवा' हे अनुक्रमें 'पुत्र' आणि 'दीप' यांचे **वाच्यार्थ** होत; आणि 'मुलगा' आणि 'दिवा' या **वाच्यार्थांचे** 'पुत्र' आणि 'दीप' हे शब्द अनुक्रमें **वाचक** होत. असा सरळ सांकेतिक अर्थ दर्शविणारी जी शक्ति तिला **अभिधा** किंवा **शक्ति** असें नांव आहे. वाच्यार्थाला **शक्यार्थ**, **मुख्यार्थ**, **स्वार्थ**, अशीं दुसरीं नांवें आहेत.

लक्ष्यार्थ.

वाक्यांतील तात्पर्यार्थाशीं वाच्यार्थ जुळत नाहीं म्हणून त्याचा वाक्यार्थाशीं जुळेल असा दुसरा अर्थ कल्पावा लागतो, त्या अर्थाला **लक्ष्यार्थ** असें म्हणतात. **लक्ष्यार्थ** दर्शविणाऱ्या शब्दाला **लक्षक** असें नांव आहे. **लक्ष्यार्थ** प्रकट करणाऱ्या शक्तीला **लक्षणा** म्हणतात.

नासिकक्षेत्रीं गोदावरीवर गोपिकाबाई यांचा मठ आहे. या वाक्यांत **गोदावरी**पदाचा **वाच्यार्थ** जो **गोदावरीप्रवाह** त्याचा वाक्या-

र्थाशीं अन्वय होत नाहीं; कारण, **गोदावरी**प्रवाहावर मठ असणें संभवत नाहीं. यास्तव **गोदावरी**शब्दानें तत्संबंधीं **तटाचें** ग्रहण करावें लागतें; म्हणजे वाक्यार्थ जुळतो. येथें **तट** हा **लक्ष्यार्थ** होय; आणि गोदावरीं-शब्द त्याचा **लक्षक** होय.

वसंतसेनेला कर्णपूरक म्हणतोः—'ते समयीं, शाबास! **कर्णपूरका**, शाबास! असें म्हणत सारी **उज्जयिनी** माझ्याभोंवतीं गोळा झाली.'

मृच्छकटिक.

येथें **उज्जयिनी** या पदाचा **वाच्यार्थ** जो 'क्षेत्रविशेष' तो वाक्यार्थाशीं जुळत नाहीं; यास्तव **उज्जयिनी** या पदानें **उज्जयिनींत राहणारे लोक** यांचें ग्रहण करावें लागतें.

पृथ्वी.

व्रजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा.

या **केकाचरणांत व्रजशब्दाचा वाच्यार्थ गोकुल** (प्रदेशविशेष) हा वाक्यार्थाच्या तात्पर्यार्थाशीं जुळत नाहीं; म्हणून **व्रजशब्दानें व्रजांतील स्त्री पुरुष, गाई** इत्यादिकांचें ग्रहण करावें लागतें. आणखी उदाहरणें—

गीति.

वाइट कैकेयीतें स्त्रैण म्हणे दशरथासही 'पुर' तें
न विटे परंतु चित्त प्रभुचें कीं शांतिसद्गुणें पुरतें.

मोरो. ष. रा.

गीति.

यमदूतशतक्रूर स्वमुखें अक्रूर म्हणवितो मेला !
आला 'गांव' वधाया, परि बाई हा न लेश कोमेला !

मोरो. कंसवध.

गीति.

कृष्णागमनश्रवणीं झाल्या स्नानाशनक्रिया शिथिला
'मिथिला' सीतोपयमावरि पाहे या सुखप्रदा तिथिला.

मोरो. कृ. वि.

पृथ्वी.

परीक्षक करी तसें जडहि सोशिते हेमही
न केवळ विरोचनात्मज तरे पदें हे ' मही. '

केकावली.

या उदाहरणांत **पुर**, **गांव**, **मिथिला** आणि **मही** यांचे **वाच्यार्थ** बाधित होऊन लक्ष्यार्थ गृहीत आहेत.

लक्षणेमध्यें **मुख्यार्थबाध**, **लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशीं संबंध** आणि **रूढि** किंवा अन्य **प्रयोजन** या गोष्टी आवश्यक होत.

रूढीवरून होणाऱ्या लक्षणेला **निरूढलक्षणा** ह्मणतात. **प्रयोजना**-वरून होणाऱ्या लक्षणेला **प्रयोजनवती** लक्षणा असें नांव आहे.

' **व्रजावन करावया** ' इत्यादि स्थलीं व्रजादिशब्दांनीं तत्संबंधी जनादिकांचें ग्रहण करावें लागतें. येथें लक्षणा रूढीवरून झाली. **कर्म-कुशल**, **शास्त्रनिष्णात** यांत **कुशल** व **निष्णात** यांचे मुख्यार्थ जे **दर्भ गोळा करणारा** आणि **पूर्ण स्नान केलेला** त्यांचा बाध झाला आहे; आणि **विवेचकत्व** व **निपुणत्व** एतद्रूप संबंध प्राप्त होऊन त्यांचे प्रच-लित अर्थ उत्पन्न झाले आहेत. येथेंही **निरूढलक्षणा** जाणावी. **कर्जांत बुडणें**, **घरावरून जाणें**, **पानावर बसणें**, **पैसे खाणें** इत्यादि ठिकाणीं **निरूढलक्षणाच** मानावी.

नासिकक्षेत्रीं गोदावरीवर गोपिकाबाई यांचा मठ आहे, या उदाहरणांत **गोदावरीचे शैत्य**, **पावनत्व** इत्यादि धर्म मठांत ध्वनित करावे हें लक्षणेचें प्रयोजन आहे. यास्तव ही **प्रयोजनवती लक्षणा** होय.

लक्षणा दोन प्रकारांनीं होते; एक **मुख्यार्थाच्या सादृश्यावरून** व दुसरी **इतरसंबंधावरून**. पहिलीला **गौणी** म्हणतात; दुसरीला **शुद्धा** असें नांव आहे.

गौणीचे सारोपा व **साध्यवसाना** असे दोन प्रकार आहेत.

जेथें **विषयी** [ज्याचा आरोप करावयाचा तो पदार्थ] व **विषय**

[ज्यावर आरोप करावयाचा तो पदार्थ] यांचा **सामानाधिकरण्यानें** [एके विभक्तींत] पृथक् निर्देश असतो तेथें **गौणी सारोपा लक्षणा** होते; जेथें **विषय विषयीमध्यें** नाहींसा होतो तेथें **गौणी साध्यवसाना लक्षणा** जाणावी.

बाळ्या शुद्ध बैल आहे हें **गौणी सारोपेचें** उदाहरण आहे. येथें **बैल विषयी** आहे व **बाळ्या विषय** आहे. **बैलाच्या** आंगचे बुद्धिमांद्यादि धर्म **बाळ्यामध्यें** असल्यामुळें **बाळ्या** बैलासारखा आहे असा याचा अर्थ होतो. येथें गुणाच्या **सादृश्यरूप संबंधावरून लक्षणा** झाली. शिवाय **बैल** हा **विषयी** व **बाळ्या** हा **विषय** यांचें येथें स्पष्टपणें एका विभक्तींत कथन आहे. यास्तव ही **गौणी सारोपा लक्षणा** होय.

अहो, हा बैल ! या उदाहरणांत वरील उदाहरणांतल्याप्रमाणें **गुणसादृश्य** हाच संबंध आहे. परंतु **बाळ्या** हा **विषय बैल** या **विषयिपदांत** प्रविष्ट झाला आहे; त्याचें वेगळें स्पष्ट कथन नाहीं; म्हणून येथें **गौणी साध्यवसाना लक्षणा** झाली.

वाच्यार्थाशीं सादृश्याहून इतर (म्हणजे **कार्यकारणभाव, स्वस्वामिभाव, अवयवावयविभाव** इत्यादि रूपानें) संबंध असला म्हणजे **शुद्धा लक्षणा** होते, असें वर सांगितलें. हिला **संबंधनिबंधना** असेंही नांव आहे. हिचे चार प्रकार आहेतः **उपादानलक्षणा, लक्षणलक्षणा, सारोपा,** आणि **साध्यवसाना.**

मुख्यार्थाचा अन्वय होण्याकरितां **लक्ष्यार्थाचें** उपादान म्हणजे ग्रहण करावें लागतें तेथें **उपादानलक्षणा** होते. हिला **अजहल्लक्षणा** किंवा **अजहत्स्वार्था (मुख्य** अर्थ न सोडणारी) असेंही म्हणतात.

त्या निर्वाणीच्या प्रसंगीं पांच हजार घोड्यानें शत्रूची फळी फोडली; आणि शेवटीं भाला व तरवार यांनीं जयश्री संपादन केली. या उदाहरणांत **शत्रूची फळी फोडणें** आणि **जयश्री संपादन करणें** यांचा अन्वय **घोडा** आणि **भाला,** व **तरवार** यांशीं योग्य रीतीनें व्हावा,

म्हणूनें घोडा या पदानें स्वार, भाला या पदानें भालेवाला व तरवार या पदानें तरवार धारण करणारा शिपाई यांचें ग्रहण करावें लागतें. यास्तव ही उपादानलक्षणा होय. येथें मुख्यार्थाचा लक्ष्यार्थाशीं स्वस्वामिभावसंबंध मानावा.

एथें दहीं ठेविलें आहे; कावळा आला तर हाक. या साहित्यशास्त्रोक्त उदाहरणामध्यें कावळा या पदानें कावळ्याबरोबर दधिनाशक अन्य प्राण्यांचाही संग्रह होतो. आणखी उदाहरण: कृष्णविजयांत पंत म्हणतात:—

गीति.

झाले प्रसन्न यास्तव हें निजधन बांधिलें तुवां पदरीं
सांचविलें वृत्ति करुनि पक्वापक्वीं उदुंबरीं बदरीं.

ही श्रीकृष्णाची श्रुतदेवब्राम्हणाप्रत उक्ति आहे. हिच्यांत उदुंबरें (उंबरें), आणि बदिरें (बोरें) हे शब्द केवळ स्वार्थी योजलेले नाहींत. वायुभक्षण, कंदमूलाशन, लोहपिष्टसेवन इत्यादिकांचाही लक्षणेनें त्यांत अंतर्भाव होतो. याप्रमाणें वरील दोन्ही उदाहरणांत मुख्यार्थ कायम राहून लक्ष्यार्थाचें ग्रहण झाल्यामुळें उपादानलक्षणा झाली.

ज्या लक्षणेमध्यें वाच्यार्थाचा त्याग करावा लागतो तिला लक्षणलक्षणा म्हणतात. जहत्स्वार्था, जहल्लक्षणा (मुख्यार्थ सोडणारी) अशींही तिला नांवें आहेत.

नासिकक्षेत्रीं गोदावरीवर गोपिकाबाई यांचा मठ आहे. या उदाहरणांत वाच्यार्थ जो गोदावरीप्रवाह त्याचा त्याग करावा लागतो; व सामीप्यरूप संबंधावरून गोदावरीपदाचा अर्थ गोदावरीचा तट असा करावा लागतो. म्हणून तेथें लक्षणलक्षणा झाली.

विषयी व विषय हे स्पष्टपणें सामानाधिकरण्यानें योजलेले असतात तेव्हां शुद्धा सारोपा लक्षणा होते. जसें—घृत हें केवळ जीवन आहे! या ठिकाणीं जीवन व घृत हे पदार्थ भेदरूपानें सामानाधिकरण्यानें योजले आहेत. येथें जीवन व घृत यांचा कार्यकारणभावरूपसंबंध आहे

अहो, हें जीवन! या उदाहरणांत **जीवनपदामध्येंच घृत** या पदाचा अंतर्भाव झाल्यामुळें **शुद्धा साध्यवसाना लक्षणा** झाली. येथेंही, **लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशीं कार्यकारणरूप संबंधच** आहे.

हा मुलगा फार अचपळ आहे. या अघोर कृत्याला काय म्हणावें! बरें आहे, रावसाहेब, आम्ही येतों आतां. फार थोर आहां आपण! दुसरें काय म्हणावयाचें? या ठिकाणीं **अचपळ, अघोर, येतो** व **थोर** या पदांच्या **विपरीत** अर्थाची विवक्षा आहे. अशा प्रकारच्या **लक्षणेला साहित्यदर्पण**कारांनीं **विपरीतलक्षणा** असें नांव दिलें आहे.

द्विरेफ या पदापासून भुंग्याचा बोध होतो तो **लक्षितलक्षणेनें** होतो असें **साहित्यशास्त्रांत** सांगितलें आहे. ' **द्विरेफ** या पदानें ज्यांत दोन रेफ आहेत असें **भ्रमर पद लक्षित** केलें व **भ्रमर** या पदानें भुंग्याचा बोध करून दिला.'—साहित्यशास्त्र.

भवति न भवति, हंच त्वंच, शिकंदर, पाटावरवंटा, आर्ष, छांदिष्ट, चलबिचल, वाटाघाट, घस्मर, तैल हे शब्द **लाक्षणिक** असून त्यांचा **वाचकांप्रमाणें** उपयोग करण्याचा प्रघात आहे. मागें सांगितलेले **कुशल** व **निष्णात** हे शब्दही कोणी **वाचकच** समजतात. वर सांगितलेल्या शब्दांपैकीं कांहीं व दुसरेही कित्येक **रूढ** शब्द यांच्या संबंधानें **साहित्यशास्त्रांत** संक्षिप्त पण मार्मिक विवेचन केलें आहे, तें जिज्ञासूंनीं पहावें. **निबंधमालाकारांनीं** याच नमुन्यावर कांहीं शब्द व रचनाविशेष या संबंधानें चमत्कारिक माहिती देण्याचा उपक्रम केला होता, तोही वाचनीय आहे.

व्यंग्यार्थ.

वाच्यार्थ आणि **लक्ष्यार्थ** यांहून भिन्न असा एक अर्थ शब्दापासून **प्रतीत** होतो, त्याला **व्यंग्यार्थ** म्हणतात. **व्यंग्यार्थ** दर्शविणाऱ्या शब्दाला **व्यंजक** ही संज्ञा आहे; आणि **व्यंग्यार्थ** व्यक्त करणाऱ्या शक्तीला **व्यंजना** असें नांव आहे.

नासिकक्षेत्रीं गोदावरीवर गोपिकाबाई यांचा मठ आहे. या उदाहरणामध्यें मठाच्या ठिकाणीं शैत्यपावनत्वादि धर्म प्रतीत होतात. ही प्रतीति गोदावरीशब्दाचा व्यंग्यार्थ होय; आणि गोदावरी हा शब्द त्या अर्थाचा व्यंजक होय.

भाग दुसरा.

काव्य.

सहृदय मनुष्याच्या अन्तःकरणाला आनंद देणारें जें वचन त्यास ' काव्य ' म्हणावें.

काव्य गद्यात्मक किंवा पद्यात्मक असतें. गद्यात्मककाव्याचीं उदाहरणें:—

हे चंद्रापीडा, तुला आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा आहेच. तर तूं प्रथम ही राज्यलक्ष्मी कशी आहे ह्याकडे विचारदृष्टीनें पहा. उत्तम योध्यांच्या खड्गमंडलरूप कमलवनामध्यें विलास करणारी केवळ भ्रमरीच, अशी ही लक्ष्मी क्षीरसागरापासून निघाली तेव्हां ती आपल्या कित्येक बांधवांचे गुण आपल्या अंगीं घेऊन आली. पारिजात वृक्षापासून लोभनीयता, चंद्रकलेपासून वक्रता, उच्चैःश्रवा अश्वापासून चंचलता, कालकूटविषापासून मोहनशक्ति, मद्यापासून मादकता, कौस्तुभमण्यापासून कठोरता इतके गुण हिच्या अंगीं त्यांच्या सहवासानें आले आहेत, असें वाटतें. या जगांत हिच्या सारखी परिचय न बाळगणारी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं. गुणरूप दृढपाशांनीं हिला बांधून ठेविलें तरी ही पळून जाते व अत्यंत शूर अशा हजारों योध्यांनीं तरवारीच्या पिंजऱ्यांत घालून ठेविली तरी ती तेथून निघून जाते ! ही वंशाकडे पहात नाहीं, शीलाकडे पहात नाहीं, शास्त्राचा बोध ऐकत नाहीं, धर्माची आज्ञा ऐकत नाहीं. ही लक्ष्मी गंधर्वनगरपंक्तीप्रमाणें 'पाहतां पाहतां नष्ट

होते. राजे राज्यपदारूढ झाले म्हणजे त्यांच्या अंगीं प्रायः सद्गुणांचा ऱ्हास होऊन दुर्गुणांची वृद्धि होते. तर अशा प्रकारें कुटिल, कष्टकारक व हजारों व्यापारांनीं भयंकर असें जें हें **राज्यतंत्र** आणि महामोहरूप अंधकारानें व्याप्त असें जें **यौवन**, यांमध्यें, हे **राजकुमारा**, तूं असा निरंतर प्रयत्न ठेव कीं लोक आपली अगदीं थट्टा करणार नाहींत, गुरुजन धिक्कार करणार नाहींत, सुहृज्जन विटंबना करणार नाहींत, कुशल पुरुष उपहास करणार नाहींत, व विषयसुख काळिमा आणणार नाहीं.

कादंबरीसार.

अहल्याबाई साठाव्या वर्षी मरण पावली. त्यावेळीं ती काळजीनें, दगदगीनें व उपवासादिकांच्या योगानें अगदीं जर्जर झाली होती. ती फार उंच नव्हती, व फार ठेंगणीही नव्हती. शरीरानें फार पातळ असे. तिच्या तोंडावर तेज चांगलें असे. तिचा रंग काळसर होता. तिची मुद्रा सर्वकाळ प्रसन्न व शान्त असे; व तिचें सौजन्य व कृपाळुपणा तिच्या चेहऱ्यावर रेखलेल्याप्रमाणें सर्वकाळ दिसत असे. तिची वृत्ति आनंदयुक्त असे; व तिला राग फार क्वचित् येई. पण कोणी अन्याय अथवा दुष्टपणा केलेला तिला कळून ती संतापली असतां, तिच्या जवळचे मोठे मोठे प्रतिष्ठित जुने कारभारी सुद्धां तिची क्रोधमुद्रा पाहून चळचळा कांपत. हिंदूंच्या साधारण स्त्रियांपेक्षां विद्यादिकांचा संस्कार तिच्या मनास अधिक झाला होता. तिला संस्कृत पुराणें वाचून त्यांचा अर्थ कळत असे; व तिच्या कामांत घोंटाळा अगदीं नसे असें सांगतात. ती विशींत यावयाच्या पूर्वीच तिचा नवरा वारला; व मुलाच्या दुष्टपणाचें व वेडेपणाचें तिला फार दुःख झालें होतें. नवरा मेल्यापासून पुढें तीं पांढरीं वस्त्रें नेसत असे. रंगीत वस्त्रास व दागिन्यांस वैधव्य प्राप्त झाल्यापासून कधीं ती शिवली नाहीं. तारुण्याची भरज्वानी, अमर्याद ऐश्वर्य व सत्ता इत्यादि अनेक मोहकारणें विद्यमान असतां त्या साध्वीच्या आचरणांत व रीतींत कधींही विपर्यास

झालेच नाहीं. असें तिचें दृढ पातिव्रत्य होतें. तिला स्तुतीचा फार कंटाळा असे. एकवेळ एका ब्राह्मणानें तिच्या स्तुतीचा एक ग्रंथ लिहून तिजकडे आणून तिला वाचून दाखविला. तो वाचीत असतां तिनें कांहीं एक भाषण केलें नाहीं. नंतर वाचणें संपल्यावर इतकेंच ह्मणाली कीं, मी यत्किंचित् पापिष्ठ स्त्री, मला हें वर्णन शोभत नाहीं. असें ह्मणून तिनें तो ग्रंथ नर्मदेंत फेंकून द्यावयास सांगितलें; व त्या ग्रंथकर्त्या ब्राह्मणास कांहींएक दिलें नाहीं. विचार करून पाहतां ही स्त्री लोकोत्तर वाटते. परस्परांस विरुद्ध जे गुण ते हिच्या अंगीं एकत्र वसत होते, असें दिसतें. जातीची बायको असून डामडौल करण्याची बुद्धि तिच्या अंगीं मुळींच नव्हती. स्वधर्मावर पराकाष्ठेची श्रद्धा असून परधर्माच्या लोकांचा द्वेष नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांवर ती पूर्ण कृपा करी. तारुण्यदशेंत वैधव्य प्राप्त झाल्यावर पूर्ण पातिव्रत्य; लक्ष्मी घरीं पाणी भरीत असतां तपस्व्याची वृत्ति; हातीं अमर्याद राजसत्ता असतां व ती अप्रतिमेय चातुर्यानें चालवीत असतां, तिच्या अंगीं अहंकाराचा लेशही नव्हता व जें जें कृत्य करावयाचें, तें परमेश्वरास भिऊन करावयाचें; व सर्वांत विशेष गुण हा कीं, आपण स्वतां इतकी शुद्ध व निर्मळ असून दुसऱ्याचे दोष व व्यंगें न काढतां व न्याय न मोडतां त्यांवर जितकें पांघरूण घालवेल, तितकें घालण्याची मोठी इच्छा. हे सर्व गुण खरोखरी पाहतां फार अमानुष दिसतात. माळव्यांतले लोक अहल्याबाईचें असें वर्णन करितात व त्या लोकांत, किंबहुना सर्व हिंदु लोकांत, तिला अहल्या म्हणून जी प्राचीन काळीं महापतिव्रता होऊन गेली, तिचाच अवतार समजतात. जात्यभिमान वगैरे सोडून तिऱ्हाइतानें जरी तिच्या गुणांचा विचार केला तरी त्यास सुद्धां असें म्हणावें लागेल कीं, या पृथ्वीवर महासज्जन, महापरोपकारी, महापापभीरु जे जे राज्यकर्ते होऊन गेले त्यांच्या माळेंत गणण्यासारखी ही स्त्री होती यांत संशय नाहीं. तसेंच मनुष्यानें चित्तांत ईश्वराचें भय बाळगून सांसारिक कृत्यें केलीं असतां त्याचें मन किती उत्तमावस्थेस पावतें, या गोष्टीचें उत्तम उदाहरण या साध्वीच्या चरि-

तांत स्पष्ट दिसून येतें. आतां अहिल्याबाईचें हें चरित फार लांब झालें हें खरें; परंतु हें सर्व लिहिल्यावांचून आमच्यानें रहवेना. जसें एकादा मनुष्य वाळूच्या मैदानांत फिरत असतां व चोहोंकडे भणभणीत व रुक्ष व ओसाड रान पाहून त्याचे डोळे त्रासले असतां, एकाएकीं त्या मनुष्यास त्या रानांत सुंदर व हिरवीगार बाग नजरेस पडून त्या मनुष्याचे डोळे समाधान पावतात व त्याच्या चित्तास आनंद होतो; मग त्यास तो बाग लवकर सोडवत नाहीं; तसे आपल्या देशाच्या इतिहासांत जिकडे पहावें तिकडे लबाड, अप्रामाणिक व दुष्ट मनुष्यांच्याच गोष्टी पुष्कळ आढळतात; कोणी चांगलीं माणसें आढळलीं तरी त्यांचीं चरितें सांपडत नाहींत. यास्तव असलें चरित सांपडलें असतां तें लौकर सोडवत नाहीं. **अहल्याबाईच्या** चरितासारखें चरित आपल्या देशाच्या इतिहासांत दुर्लभ असें नाहीं; परंतु कोणत्याही देशाच्या इतिहासांत शोधूं लागलें असतां त्यांत तें सांपडणें दुर्लभच आहे. अशी साध्वी आपल्या देशांत झाली ही गोष्ट या देशास मोठें भूषण होय; व एथील लोकांचें मोठें सुकृत होय असें समजावें, असें आम्हांस वाटतें.

अनेकविद्यामूलतत्वसंग्रह.

पूर्ण बुद्धि व तन्मूलक सर्वज्ञता हीं परमेश्वराच्या ठायीं मात्र आहेत. हे गुण मनुष्यास कदापि प्राप्त व्हावयाचे नाहींत. मनुष्याच्या ज्ञानाचा व बुद्धीचा मोठेपणा सापेक्ष आहे; म्हणजे अमका मोठा बुद्धिमान् आहे, किंवा मोठा ज्ञाता आहे; असें म्हटलें असतां त्याची बुद्धि किंवा ज्ञान हीं दुसऱ्यांच्यापेक्षां मोठीं आहेत, असा अर्थ होतो; परंतु वास्तविक तीं मोठीं आहेत असा अर्थ होत नाहीं. खरोखरीं पाहतां तीं दोन्ही फारच अल्प आहेत, आणि ती अल्पता ज्यास कळूं लागली तोच मनुष्य अत्यंत बुद्धिमान् व ज्ञाता होय. ज्या पुरुषाची बुद्धि अत्यंत विशद होते, व ज्यास अनेक विषयांची माहिती होते, त्यास कळूं लागतें कीं, या सृष्टींत जाणण्याचे जे विषय आहेत, त्यांपुढें मला जे विषय ठाऊक आहेत ते जसे मोठ्या अफाट वाळवंटापुढें राळ्याएवढा वाळूचा कण, किंवा अमर्याद सागरापुढें

जलाचा तुषार, तसे आहेत. तसेंच हजारों गोष्टी घडतांना त्यांस दिस-तात, पण त्या कशा घडतात हें त्यांस बिल्कूल समजत नाहीं. तेव्हां तेणेंकरून मनुष्यांची बुद्धि किती मंद व दुर्बल आहे व त्यांचें ज्ञान किती अल्प व अपूर्ण आहे असें त्यांच्या मनांत बिंबून गेल्यावांचून राहत नाहीं. यास्तव महाबुद्धिमान् व महाज्ञाते जे असतात ते बहुतकरून नम्र व लीन असतात. गर्व हें अल्पज्ञान व मूर्खत्व यांचें फल आहे. मनुष्याचें भूषण विद्या होय; आणि विद्येचें भूषण विनय होय. फूल स्वतां शोभायमान पदार्थ खरा, पण त्यास सुगंधानें जशी अधिक योग्यता येते, तसा विद्येस विनयानें अधिक थोरपणा येतो. नम्रता अनेक व्यंगें झांकते; व तिच्या योगानें लोकांचें लक्ष आपल्या उण्याकडे न जातां गुणांकडे मात्र वळतें. जो मनुष्य आपले गुण डौलानें पुढें पुढें आणीत नाहीं, प्रसंगच आल्यास संकोचवृत्तीनें ते प्रकट करितो, त्याचे गुण त्या संकोचानें विशेष शोभतात. कमलादि फुलें कांहीं संकुचित व कांहीं विकसित असतांना जशीं खुल-तात तशीं पूर्ण फुललीं असतां खुलत नाहींत. ह्याप्रमाणें मनुष्यांच्या गुणांची गोष्ट आहे.

अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह.

हरएक जखम बुजून बरी होण्याविषयीं आपण झटतों; हरएक हानि विसरण्याविषयीं आपण यत्न करितों; परंतु इष्ट जनाच्या मरणानें अंतः-करणास जी जखम पडते, ती बुजूं न देणें हा आपला धर्म वाटून ती आपण तशीच ठेवितो; व या हानीचा विसर पडूं न देतां एकांतीं बसून ती मनांत घोळीत असतों. ज्या आईचें केळीच्या कोंबासारखें तान्हें बाळ डोळ्यांदेखत गमावलें असतें त्याची आठवण झाली असतां तिच्या हृदयास हजारों विंचवांच्या झोंबल्यापेक्षां अधिक वेदना होतात; पण त्या वेदना होऊं नयेत, त्या बाळाचा विसर पडावा, असें कोणत्या आईच्या मनांत येणार आहे बरें ? तसेंच अत्यंत मायाळू आई मरण पावली असतां तिचें स्मरण झालें असतां मन कासावीस होतें, तर तिची आठवण बुजून जावो, असें ज्यास वाटतें, असें कोण मूल आहे बरें ? परलोकीं गेलेल्या

जिवलग स्नेह्याच्या गोष्टी वारंवार मनांत येऊन त्यांच्या योगानें अंतःकरण नेहमीं व्याकुळ होतें; ह्यास्तव या स्नेह्याची आठवण न होईल तर बरें असें कोणी इच्छील काय ? एकाद्या स्त्रीचा प्राणप्रिय भर्ता मरण पावून त्याचें शव बाहेर नेत असतां, जसें काय कोणी तापविलेल्या सांडसानें तिचें काळीजच हृदयाबाहेर ओढीत आहे, असें तिला वाटत असतें; व दुःखानें ती अगदीं कळवळत असते; तथापि त्या वेळेस नवऱ्यास मनांत आणून उपयोग काय, अशा सांत्वनाच्या गोष्टी कोणी सांगितल्या असतां त्या गोष्टी ती स्त्री क्षणभर तरी ऐकेल काय ? ज्या विषयावर प्रेम जडलें असतें तो विषय मृत्यूनें नाहींसा केला, तरी तें प्रेम जसेंच्या तसें उरतें; हा मनुष्याच्या अन्तःकरणाचा अलौकिक व सर्वोत्कृष्ट एक धर्म आहे. या गुणापासून दुःख होतें खरें; पण त्यापासून सुखही पुष्कळ होतें. जिवलग मनुष्याच्या वियोगानें जो खेद होतो तो खेद इतर खेदांसारखा रुक्ष नव्हे; त्या खेदांत कांहीं अनिर्वाच्य माधुर्य आहे; असें विचारान्तीं सर्वांस कबूल करावें लागेल. पहा, आपला कोणी इष्टमित्र किंवा नातलग, ज्याचा आपला जीवप्राण स्नेह असतो, त्यास देवाज्ञा झाली असतां, त्याक्षणीं दारूच्या भेतावर ठिणगी, त्याप्रमाणें एकदम अन्तःकरणांत शोकाग्नीचा भडका उठतो; किंवा अकस्मात् वीज डोईवर पडावी तसें होऊन डोळ्यापुढें अंधारी येऊन मूर्च्छा येते; पण कांहीं वेळानें तो आक्रोश शांत होऊन पूर्वस्थितीस आल्यावर जी तळमळ राहते, व गत मनुष्यासहवर्तमान आनंदांत घालविलेल्या दिवसांची स्मृति होऊन मनाची जी चमत्कारिक तंद्री लागत असते, ती तळमळ व ती तंद्री नाहींशी व्हावी असें कोण इच्छिणार आहे ? मनुष्य मोठ्या आनंदाच्या रसांत असतांना कांहीं प्रसंगानें कधीं कधीं मृत मित्राच्या प्रेमाच्या गत गोष्टी मनांत येऊन कांहीं वेळ त्यांचें मन विरस होतें, किंवा खिन्न असतांना आठवण झाली असतांना ती खिन्नता अधिक होते, हें खरें आहे; तथापि त्या खिन्नतेंत जी गोडी आहे, ती मोठ्या ख्यालीखुशालींत नाहीं. गत मित्राकडे सर्व अंतःकरण तल्लीन होऊन त्याशीं मानसिक समागम होऊन जें सुख होत असतें, त्यापुढें वास्तविक विषय

तुच्छ व विरस वाटतात, व त्या तंद्रींत कोणीं दुसरी कांहीं गोष्ट काढली असतां, मोठा विक्षेप झाला असें वाटून विक्षेप करणाऱ्याचा त्रास येतो. मृत्यु एका प्रकारें किती चमत्कारिक पदार्थ आहे ! शरीर चितेंत जळालें म्हणजे त्याच्या बरोबर मनुष्याचे सर्व अपराध, सर्व व्यगें, सर्व द्वेषकारणें जळून नाहींतशीं होऊन, शुद्ध धातु जसा उरावा, तसे मेल्या मनुष्याचे गुण मात्र दिसू लागतात ! मोठा शत्रु कां असेना, त्याचें प्रेत दृष्टीस पडलें असतां, पश्चात्ताप होऊन मनांत खाऊं लागतें कीं, शिवशिव ! असल्या बापुड्या दीन मार्तीशीं कायेर मीं द्वेष केला ! याच कारणानें वाली रक्तानें न्हालेला पाहून **सुग्रीवास** व **रावण** समरांगणीं पडलेला पाहून **बिभीषणास** शोक झाला, असें जें **वाल्मीकीनें रामायणांत** वर्णिलें आहे, त्याची उपपत्ति समजावी.

अनेकविधामूलतत्वसंग्रह.

मोरोपंताच्या कृत्रिम रचनेच्या तर्फेनें केवळ सामान्यतः वरील आधार दाखविण्यांत आला. वस्तुतः पाहतां त्याच्या अष्टोत्तरशत **रामायणांस** वरील तरफदारीचीही गरज नाहीं; कांकीं, वरील **रामायणें** हीं आमच्या कवीच्या वाग्देवतेची केवळ स्वतंत्र लीला आहे. **होमरच्या महाकाव्यांतील** वीर युद्ध आटपल्यानंतर जसे रंगयुद्धांत परस्पर झगडले व नाना तऱ्हेच्या कसरती करून त्यांनीं करमणूक करून घेतली, किंवा चितान्यानें मुख्य चित्र तयार झाल्यानंतर जशी भोंवताली नक्षी व वेलबुट्टी काढण्यांत आपली करामत खर्चावी, त्याप्रमाणेंच आमच्या कवीनें **भारतादि** मोठमोठ्या ग्रंथांनीं आपल्या जन्मभाषेस अलंकृत करून शेवटीं आपल्या **उपास्य देवतेच्या** प्रीत्यर्थ आपल्या **सरस्वतीचा** ओघ जलयंत्रोद्वारांप्रमाणें चित्रविचित्रतेनें प्रगट केला आहे. यास्तव राजमंदिराच्या भोंवताली कारंज्यांची शोभा केली असल्यास कारागिरास नांव ठेवणें जसें शोभणार नाहीं, व जलतुषारांचें वैचित्र्य पाहून तटस्थ राहणाऱ्या अंगींही विशेष रसिकता मानण्याची गरज नाहीं, त्याप्रमाणेंच प्रसंगवशात् कृत्रिमतेचा प्रकार केल्यानें व चाहिल्यानें **कवि** व **रसिकही** दोषास पात्र

होतो, असें आम्हांस वाटत नाहीं. सागराचा अफाट विस्तार, त्याचे उंच प्रदेशावरून दृष्टिगोचर होणारे सर्पवत् ओघ, **नायगारा** नदीचा 'रसातलास विदारणारा तटप्रपात' **हिमालयाच्या ज्येष्ठ कन्येनें** आपल्या 'प्रियपात्र **रत्नाकरा**'स जेथें सहस्र भुज प्रगट करून सरभसालिंगन केलें आहे तेथला विचित्र व भव्य देखावा, यांच्या अंगीं **कवीचें** व **रसिकाचें** मन तल्लीन करून टाकण्याची शक्ति खरी, व **वाग्देवतेची** मुख्य बिहारस्थानें हीं होत हेंही खरें. पण सागरावर दूर दूर नजर पोंचवून डोळे दुखूं लागले असतां, व **नायगारेच्या** धबधब्यांच्या प्रलयगर्जनेनें कर्णविवरें बधिर झालीं असतां, जलयंत्रावर नाचणाऱ्या तुषारांची व त्यांवर मारणाऱ्या इंद्रधनुष्यांच्या लकेरींची शोभा पाहणें व सुखस्पर्शी तुषारवृष्टींचा अनुभव घेणें हें त्याच **देवीस** केवळ तुच्छ वाटेल असें आमचें मन घेत नाहीं.

निबंधमाला.

पारिस शहराजवळ येण्यापूर्वी आगामिनयनोत्सवाच्या अपेक्षेनें आमच्या चित्तवृत्ति फारच उल्लसित झाल्या होत्या. कारण कीं या शहराच्या सौंदर्याची ख्याति व तेथील व्यवस्थेचें वर्णन फार पूर्वी ऐकल्या कारणानें त्याची प्रत्यक्ष प्रतीति घेण्याचा प्रसंग निकट आला असें वाटून कुतूहलवश झालों; व उत्कंठेची पराकाष्ठा झाली. परंतु दैवयोग कसा उलट पहा! जें **पारिस** शहर आपल्या उज्ज्वल भवनराजींनीं, प्रशस्त वीथिकांनीं व रमणीय उद्यानभूमिकांनीं प्रवासिजनांच्या श्रमाचा अपनोद करून नेत्रांचें सार्थक करण्यास कारणीभूत होईल अशी आमची पक्की समजूत होती, त्याच शहराचे उपान्तभाग जेव्हां दृग्गोचर झाले तेव्हां आमच्या चित्तवृत्ति फार उदासीन झाल्या व नैराश्यानें आम्हीं तटस्थ झालों. सर्व आकाश मेघाच्छादित होतें, व मधून मधून अल्पवृष्टीही होत होती, त्यामुळें सर्व वातावरणांत दुःखसंवेदक असें शैत्य आलें होतें. ज्या इमारती, ज्या रथ्या, ज्या उद्यानभूमिका सायंकालीन मन्द सूर्यकिरणांच्या योगानें सस्मित दिसावयाच्या त्या अल्पवृष्टिसेकाच्या योगानें आमच्यासारख्या लांबून

त्यालेल्या प्रवासिजनासमोर आपली सौंदर्यकीर्ति मलिन झाली या दुःखानेंच जणूं अश्रुपात करीत होत्या ! मेघदर्शन व अल्पवृष्टि सर्वकालीं व सर्वस्थलीं सौंदर्यविघातक होतात असें नाहीं. कांहीं वनस्थलींमध्यें या अत्यंत सौंदर्य-पोषक होतात. परंतु बहुतकरून शहरामध्यें त्यांचा परिणाम विपरीत होतो. म्हणूनच प्रस्तुत प्रसंगीं तेथें आमच्या नेत्रांस समाधानकारक असें कांहीं वाटेना म्हणून फार खेद झाला.

विलायतचा प्रवास.

वाचकहो, जुन्या इमारतींच्या या अद्भुत शक्तीचा अनुभव तुम्हांस कधीं आला आहे काय ? रात्रीच्या अंधुक चांदण्यांत एकाद्या भयंकर अरण्यांतील ओसाड किल्ल्याचे भयाण बुरूज जर तुह्मीं कधीं पाहिले असतील, किंवा मावळणाऱ्या सूर्याच्या किरणांमुळें चकचकणारे असें एखाद्या मोडकळीस आलेल्या राजवाड्याचें सोनेरी शिखर जर तुम्हीं कधीं पाहिलें असेल तर त्या किल्ल्यानें किंवा राजवाड्यानें तुमचे मनोविकार प्रक्षुब्ध केल्यावांचून तुम्हांस कधीं सोडलें नसेल, यांत अगदीं संशय नको. पुष्कळ लोकांची अशी समजूत असते कीं, या जुन्या इमारती आमच्याशीं एक अक्षर सुद्धां बोलत नाहींत. पण मित्रहो, त्यांचा स्वभावच असा आहे. सद्गुणी स्त्रियांप्रमाणें त्याही भलत्याशीं कधीं बोलत नसतात. तुह्मी इतिहास वाचल्यावांचून त्यांच्याशीं बोलावयाला जाल तर त्या तुमच्याकडे ढुंकून सुद्धां पाहणार नाहींत. तुमचें मन इतर गोष्टींत व्यग्र झालेलें आहे असें त्यांना कळलें, तर त्या आपलें रहस्यनिवेदन तुमच्यापाशीं कधींही करणार नाहींत. **इतिहासज्ञान आणि चित्ताची एकाग्रता हीं साधनें** घेऊन तुह्मी त्यांच्याजवळ जा, म्हणजे त्या आपलें हितगुज तुम्हांस सांगतील; मग किल्ल्याचा एकादा पडका बुरूजही तुमच्या बाहूंत स्फुरण उत्पन्न करील, एखादें कारंजें तुमच्या डोळ्यांतून पाणी काढील, व एखादें भुयार तुमच्या आंगावर शहारे आणील. या जुन्या इमारती. जरी सर्व दगड, विटा आणि चुना यांनीं बनविलेल्या असतात, तरी त्यांना योग्य मनुष्य भेटला म्हणजे त्याच्यापाशीं त्या हजारों तोंडांनीं बोलूं लाग-

तात आणि प्रत्येक दोन दगडांच्या सांध्यामध्यें जणूं काय एक एक जीभ त्यांना फुटते असा भास होतो; व सर्वत्र सामसूम झाल्यानंतर या ईमारती आपल्या गतवैभवाबद्दल इतका भयंकर आक्रोश करतात कीं, त्यावेळीं जवळ असणाऱ्या इसमाची छाती अगदीं फाटूनच जाते.

जुन्या इमारती.

तेव्हां समुद्राची आणि आकाशाची अपूर्व व अनिर्वचनीय शोभा आणि महत्व पाहून माझ्या मनांत किती प्रकारचे विचार येत असत हें सांगतां येत नाहीं. एकीकडे सूर्य अस्ताला जात आहे. त्याची सायंकाळीन कोमल प्रभा अनंत नीलनभोमंडलांत जिकडे तिकडे, विशेषेंकरून पश्चिमेकडे, पसरलेल्या पिंजलेल्या शुभ्र कापसाच्या ढिगासारख्या मेघराशींवर प्रतिबिंबित होऊन, आमच्या पुराणांतील काल्पनिक सुवर्णगिरि–मेरूचीं शृंगें चोहोंकडे समुद्रांतून आपलीं डोकीं उचलून आकाशाचें चुंबन घेत आहेत कीं काय अशी भ्रांति होत असे; किंवा समुद्रोदरांत कल्पिलेली कृष्णाची सुवर्णद्वारका, अथवा रावणाची लंका माझ्या समोर आहे कीं काय असें वाटत असे. सूर्यास्त झाल्यानंतर बंगल्यांतील पडदपोशी स्त्रिया जशा हळूच पडदा पलीकडे सारून लोकांस भीतभीत खिडक्यांतून डोकावून पाहतात आणि पुन्हां झटकर घरांत आपलें तोंड लपवितात, त्याप्रमाणें वायुवेगाच्या परवश होऊन आकाशांतून इकडे तिकडे फिरणाऱ्या मेघरूपी पडद्यांच्या अंतराळांतून एका पाठीमागून एक अशा पुष्कळ तारका गगनसौधावरून आमच्याकडे डोकावीत असत; आणि पुन्हां मेघांच्या आड तोंड लपवीत असत. एकाद्या वेळेस आकाश निरभ्र असलें म्हणजे असंख्य नक्षत्रें दिसूं लागत. त्या वेळेस यमुनेच्या नीलजलप्रवाहांत भक्तांनीं वाहिलेलीं शुभ्र जुईचीं पुष्पें चोहोंकडे पसरलेलीं आहेत कीं काय असें वाटत असे; आणि त्या वेळेस चंद्रोदय झाला असला तर त्या शोभेला पारावाराच नसे. खालून अगाध समुद्राचा विस्तीर्ण वर्तुळाचा एक भाग आणि वर स्वच्छ नभोमंडळाचा वर्तुळाकार दुसरा भाग असे दोन्ही जुळलेले दिसत असून त्यांत मोत्यांसारख्या

चोहोंकडे पसरलेल्या तारका जशा आकाशांत, तशींच त्यांचीं प्रतिबिंबें समुद्रजलांत दिसत असून मला असा भ्रम होई कीं हा आकाश आणि समुद्र अशा दोन भागांनीं जुळलेला एक अतिविस्तीर्ण असा मोत्यांचा शिंपला आहे; आणि याच्यामध्यें पसरलेलीं मोत्यें आणि शिंपल्याच्या आंतील झळकदार दोन्ही बाजू मला दिसत आहेत ! चंद्रप्रभेंत समुद्रांतील उसळणाऱ्या कल्लोळांकडे पाहिलें म्हणजे समुद्राचें पाणी पातळ झालेल्या चांदीप्रमाणें पांढरें व झळकदार दिसत असे. खवळलेल्या समुद्रांतील कल्लोळांच्या परस्पर संघर्षणानें उद्भवलेल्या फास्फरस नांवाच्या अग्नीच्या ठिणग्या जेव्हां झळकत तेव्हां आमच्या पूर्वकवींनीं कल्पिलेल्या वडवाग्नीचें प्रकारान्तरानें दर्शन होत असे!

इंग्लंडचा प्रवास.

पहिल्या उताऱ्यांत राज्यलक्ष्मीचें अत्यंत सरस व चमत्कारिक वर्णन आहे; दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या उताऱ्यांत अनुक्रमें अहल्याबाई, विनय व मृत्यु यांविषयीं विचार आहेत. हे उतारे अतिशय सुंदर, मोहक व सूचक आहेत. हे इंग्रजीवरून मराठींत उतरले आहेत असें सहसा लक्षांत येत नाहीं! अल्पाक्षर, बव्हर्थ आणि रमणीय अशी त्यांची रचना आहे. प्रसाद व माधुर्य हे गुण या उताऱ्यांत चांगले दृग्गोचर होतात. पांचव्या उताऱ्यांत पंतांवरील कृत्रिमकाव्यरचनेच्या आरोपाचें मोठ्या खुबीनें, सफाईनें आणि सहृदयतेनें निरसन केलें आहे. थोरले चिपळूणकर यांच्या वाणींतील प्रसाद व माधुर्य हे गुण धाकटे चिपळूणकर यांच्या कृतींत उतरले आहेतच; पण वडिलांच्या कृतींत प्रायः न आढळणारा ओज हा काव्यगुण चिरंजीवांच्या ग्रंथरचनेमध्यें योग्य प्रसंगीं आढळून येतो. सहाव्या उताऱ्यांत पारिस शहराच्या दुःखसंवेदक देखाव्याचें मनोहर वर्णन आहे. सातव्या उताऱ्यांतील जुन्या इमारतींविषयींचे उद्गार फार मार्मिक आहेत; आणि आठव्या उताऱ्यांतील निसर्ग देवतेचे रमणीय विलास आनंद, चमत्कार व कुतूहल उत्पन्न करणारे आहेत.

पद्यात्मक काव्याचीं कांहीं उदाहरणें खालीं देतों:—

श्रीकृष्णानें भारतीय युद्धाच्या आरंभीं **अर्जुनाचा** रथ **कौरव व पांडव** यांच्या सैन्यांच्या मध्यें उभा केला. **अर्जुनानें** कौरवसेनेकडे नजर फेंकली तों **भीष्म, द्रोण, कृप, कर्ण** यांच्यासारखे महावीर युद्धाला सज्ज झालेले आहेत असें त्यानें पाहिलें. अशा प्रसंगीं वीरशिरोमणि **पार्थाच्या** हृदयांत समरकर्माविषयीं उत्कट उत्साह उत्पन्न व्हावा. परंतु कांहीं विपरीतच प्रकार दृष्टीस पडला! '**भीष्मद्रोणांसारख्या** अत्यंत पूज्य महानुभावांवर शस्त्र कसें धरूं? **दुर्योधनादिक** बंधूंचा वध करून मी राज्याचा उपभोग घेऊं काय? हा तर केवळ नरकाचाच मार्ग आहे! यापेक्षां मरण पतकरलेलें काय वाईट?' इत्यादि कल्पना मनांत येऊन **अर्जुनाला** मोठा विषाद उत्पन्न झाला. त्याला काय करावें यविषयीं निश्चय होईना. अशा प्रसंगीं अत्यंत दीन होऊन तो **श्रीकृष्णाशीं** भाषण करूं लागला. ह्या प्रसंगाचें **ज्ञानेश्वर** आपल्या **भावार्थदीपिकेंत** (**ज्ञानेश्वरींत**) वर्णन करितातः—

ओंव्या.

आम्हां काय उचित, तें पाहतां न स्फुरे येथ,
जे मोहें येणें चित्त, व्याकुळ माझें १
तिमिरावरुद्ध जैसें, दृष्टीचें तेज भ्रंशे,
मग पासींच असतां न दिसे, वस्तुजात २
देवा तैसें मज जाहलें, जें मन हें भ्रान्ती ग्रासिलें,
आतां काय हित आपुलें, तेंही नेणें ३
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें, निकें तें आम्हां सांगावें,
जे सखा सर्वस्व आघवें, आम्हांसि तूं ४
तूं गुरु बंधु पिता, तूं आमुची इष्ट देवता,
तूंचि सदा रक्षिता, आपदीं आमुतें ५
जैसा शिष्यातें गुरु, सर्वथा नेणे अव्हेरूं,
कीं सरितातें सागरू; त्यजी केविं ६

ना तरी अपल्यातें मायें, सांडोनि जरी जाये,
तरी तें कैसेंनि जियें, ऐकें कृष्णा ७
तैसा सर्वांपरी आम्हांसी, देवा तूंचि आहांसि,
आणि बोलिलें जरी न मानिसी, मागिल माझें ८
तरी उचित काय आह्मां, जें व्यभिचारिना धर्मा,
तें झडकरी पुरुषोत्तमा, सांग आतां ९
ऐसें अर्जुन तेथें बोलिला, तंव क्षण एक भ्रांती सांडिला,
मग पुनरपि व्यापिला, उर्मी तेणें १०
कीं मज पाहतां उर्मी नोहे, हें अनारिसें गमत आहे,
तो ग्रासिला महामोहें, काळसर्पें ११
सवर्म हृदयकल्हारीं; तेथ कारुणवेलेच्या भरीं,
लागल्या म्हणोनि लहरी, भांजेचि ना १२
हें जाणोनि ऐसी प्रौढी, जे दृष्टिसवेंचि विष फेडी,
तो धांवया श्रीहरी गारुडी, पातला कीं १३
तैसिया पंडुकुमरा व्याकुळा, मिरवतसे श्रीकृष्ण जवळा,
तो कृपावशें अवलीला, रक्षील आतां १४
म्हणोनि तो पार्थु, मोहफणिग्रस्तु,
म्यां म्हणितला हा, हेतु जाणोनियां १५
मग देखा तेथ फाल्गुनु, घेतला असे भ्रांति कवळूनु,
जैसा घनपडळीं भानु, आच्छादिजे १६
तयापरी तो धनुर्धर, जाहालासे दुःखें जर्जर,
जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवर, वणवला कां १७
म्हणोनि सहजें सुनीळ, कृपामृतें सजळ,
तो बोलला श्रीगोपाळ, महामेघ १८
तेथ सुदर्शनांची द्युति, तेचि विद्युल्लता झळकती,
गंभीर वाचा ती आयती, गर्जनेचि १९

आतां तो उदार कैसा वर्तेल, तेणें अर्जुनाचल निवेल,
मग नवी विरूढी फुटेल, उन्मेषाची २०
ते कथा आयिका, मनाचिया आराणुका,
ज्ञानदेव ह्मणे देखा, निवृत्तिदास २१

यावर श्रीकृष्णानें अर्जुनास उत्तर दिलें तें पहा:—

ओंव्या.

मग आपुलेनि चित्तीं म्हणे, येथें हें काय आदरिलें येणें,
अर्जुन सर्वथा कांहीं नेणें, काय कीजे १
हा उमजे कवणे परी, कैसेनि धीर स्वीकारी,
जैसा ग्रहांतें पंचाक्षरी, अनुमानी कां २
नातरी असाध्य देखोनि व्याधी, अमृतासम औषधि,
वैद्य सूची निरवधि, निदानींची ३
तैसें विवरीत असे श्रीअनंत, तया दोहीं सैन्यांआंत,
जयापरी पार्थ, भ्रांति सांडी ४
तें कारण मनीं धरिलें, मग सरोष बोलों आदरिलें,
जैसें मातेच्या कोपीं थोकलें, स्नेह आथी ५
कीं औषधाच्या कडवटपणीं, जैशी अमृताची पुरवणी,
ते आहाचि न दिसे परि गुणीं, प्रगट होय ६
तैशीं वरिवरि पाहतां उदासें, अंतरीं अति सुरसें,
तियें वाक्यें हृषीकेशें, बोलों आदरिलीं ७
मग अर्जुनातें म्हणितलें, आम्हीं आजि हें नवल देखिलें,
जें तुवां येथ आदरिलें, माझारींची ८
तूं जाणता तरी म्हणविशी, परी नेणिवेतें न सांडिशी
आणि शिकवूं म्हणों तरी बोलशी, बहुसाळ नीति ९
जात्यंधा लागलें पिसें, मग तें सैरा धांवे जैसें,
तुझें शहाणपण तैसें, दिसतसे मज १०
तूं आपणापें तरी नेणसी, परि या कौरवातें शोचूं पाहसी,
हा बहु विस्मय आम्हांसी, पुढतपुढती ११

तरी सांगपां अर्जुना, तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना,
हे अनादिसिद्ध विश्वरचना, तें लटिकें काई १२
हो कां जें सांप्रत ऐसें झालें, हें जन्ममरण तुवां सृजिलें,
आणि नाश पावे नाशिलें, तुझेनि काई १३
तूं भ्रमलेपणें अहंकृती, यांसि घात न धरिशी चित्तीं,
तरी सांग काई हे होती, चिरंतनु १४
कीं तूं येक वधिता, आणि सकळ लोक हा मरता,
ऐशी भ्रांती झणीं चित्ता, येवों देशी १५
हे अनादिसिद्ध आधवें, होत जात असे स्वभावें,
तरी तुवां कां शोचावें, सांगे मज १६
परि मूर्खपणें नेणसी, न चिंतावें तें चिंतिशी,
आणि तूंचि नीती सांगसी, आम्हांप्रती १७
देखे विवेकी जे होती, ते दोहींतिही न शोचिती,
कीं होय जाय हे भ्रांति, म्हणऊनिया १८
हें उपजे आणि नासे, तें मायावशें दिसें
येऱ्हवीं तत्वतां वस्तु जें असें, तें अविनाशीच १९
जैसें पवनें तोय हलविलें आणि तरंगाकार जाहलें,
तरी कवण कें जन्मलें, म्हणों ये तेथ २०
तेंचि वायूचें स्फुरण ठेलें, आणि उदक सहज सपाटलें,
तरी आतां काय निमालें, विचारीं पां २१
आइकें शरीर तरी एक, परी वयसा भेद अनेक,
हें प्रत्यक्षचि देख, प्रमाण तूं २२
येथें कुमारत्व दिसे, मग तरुण्यीं तें भ्रंशे,
परी तो देह न नासे, एकेका सवें २३
तैशीं चैतन्याचे ठायीं, इयें शरीरें होती जाती पाहीं,
ऐसें जाणे तया नाहीं, व्यामोहदुःख २४

हा लोकत्रयाकार, तो जयाचा विस्तार,
जेथें नामवर्ण आकार, चिन्ह नाहीं २५
जो सर्वदा सर्वगत, जो जन्मक्षयातीत,
तया केलियाही घात, कदा नोहे २६
आणि शरीरजात आघवें, हें नाशिवंत स्वभावें,
ह्मणोनि तुवां झुंजावें, पंडुकुमरा २७
तूं धरोनि देहाभिमानातें, दिठी सूनि शरीरातें,
मी मारिता हे मरते, ह्मणत आहसी २८
तरी अर्जुना तूं हें नेणसी, जरी तत्वतां विचारिशी,
तरी वधिता तूं नव्हसी, ते वध्य नव्हती २९
जैसें स्वप्नामाजी देखिजे, तें स्वप्नींच साच असिजे,
मग चेऊनियां पाहिजे, तंव कांहीं नाहीं ३०
तैशी हे माया, तूं भ्रमत अससी वायां,
शस्त्रें हाणितलीया छाया, आंगीं जैशी न रूपे ३१
कीं पूर्ण कुंभ उलंडिला, तेथ बिंबाकार दिसे भ्रंशला,
परि भानू नाहीं नासला, तयासवें ३२
नातरी मठीं आकाश जैसें, मठाकृती अवतरलें असे,
तो भंगलिया आपैसें, स्वरूपचि ३३
तैसें शरीराच्या लोपीं, नाश नाहीं स्वरूपीं,
म्हणऊनि हे नारोपी, भ्रांति बापा ३४
अर्जुना हा ऐसा जाणावा, सकलात्मक देखावा,
मग सहजें शोक आघवा, हरेल तुझा ३५

या दोन उताऱ्यांत **अर्जुनाच्या** मोहग्रस्त मनाची स्थिति, त्याची **श्रीकृष्णा**वरील अनन्यगतिकत्वानें निश्चल भक्ति, आणि **श्रीकृष्णाची** **अर्जुना**विषयींची वत्सलता, या गोष्टी उत्कृष्टपणें व्यक्त झाल्या आहेत. यांतील उपमा व रूपकें किती सुंदर व समर्पक आहेत! माधुर्य व प्रसाद

हे काव्यगुण यांत पदोपदीं आढळून येतात. **ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी** हाच ग्रंथ विशेष प्रसिद्ध व मोठा आहे. यांत जुने मराठी शब्द फार आहेत. असल्या मराठी शब्दांची माहिती नसली तर हा ग्रंथ अनेक स्थलीं दुर्बोध वाटेल. पण त्यांची माहिती करून घेतल्यास प्रस्तुत ग्रंथ वाचकांस अत्यंत प्रिय होईल याविषयीं शंका नाहीं. **ज्ञानेश्वरांमध्यें** कविप्रतिभा पूर्णपणें वास करीत होती. अशा दृष्टीनें **मराठी कवींमध्यें** अग्रेसरत्वाचा मान **ज्ञानेश्वरांसच** दिला पाहिजे असें वाटतें. **ज्ञानेश्वरी** हा ग्रंथ अपूर्व आहे. तो ज्ञानाचें भांडार, भक्तीचें माहेर, काव्याचें विलासभवन व महाराष्ट्रवाग्वधूचा सौभाग्यालंकार आहे. या ग्रंथांत शेंकडों उत्कृष्ट स्थलें आहेत. वरच्या उताऱ्यांत जुने मराठी शब्द थोडे आहेत म्हणून ते येथें नमुन्यादाखल दिले आहेत. तरी त्यांवरून **ज्ञानेश्वरांच्या** कवित्वाची ओळख व्हावयास अडचण पडणार नाहीं.

समर्थांनीं साधुपुरुषाच्या स्वरूपाचें केलेलें वर्णन पहा:—

ओंव्या.

संत आनंदाचें स्थळ, संत सुखचि केवळ,
नाना संतोषाचें मूळ, ते हे संत १
संत विश्रांतीची विश्रांती, संत तृप्तीची निजतृप्ती,
नातरी भक्तीची फलश्रुति, ते हे संत २
संत धर्माचें क्षेत्र, संत स्वरूपाचें सत्पात्र,
नातरी पुण्याची पवित्र पुण्यभूमि ३
संत समाधीचें मंदिर, संत विवेकाचें भांडार,
नातरी बोलिजे माहेर, सायुज्य मुक्तींचें ४
संत सत्याचा निश्चय, संत सार्थकाचा जय,
संत प्राप्तीचा समय, सिद्ध स्वरूप ५
मोक्षश्रिया अलंकृत, ऐसे हे संत श्रीमंत,
जीव दरिद्री असंख्यात, नृपति केले ६
जे समर्थपणें उदार, जे कां अत्यंत दानशूर,
तयांचेनि हा ज्ञानविचार, दिधला न वचे ७

महाराजे चक्रवर्ती, झाले आहेत पुढें होती,
परंतु कोणी सायुज्यमुक्ति देणार नाहीं. ८
जें त्रैलोक्यीं नाहीं दान, तेंचि करिती संत सज्जन,
तया संताचें महिमान, काय ह्मणोनि वर्णावें ? ९
ऐसा संतांचा महिमा, बोलिजे तितुकी उणी उपमा,
जयाचेनि मुख्य परमात्मा, प्रगट होय. १०

दासबोध.

हें वर्णन किती सुंदर, सरस, यथार्थ व प्रसादपरिपूर्ण आहे !

तुकारामबोवांचे कांहीं अभंग पहाः—

जे कां रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले,
साधु तोचि ओळखावा, देव तेथेंचि जाणावा,
मृदु सबाह्य नवनीत, तैसें सज्जनाचें चित्त,
ज्यासि आपंगिता नाहीं, त्यांसी धरी जो हृदयीं,
दया करी जे पुत्रासी, तेचि दासा आणि दासी,
तुका म्हणे सांगूं किती, तोचि भगवंताची मूर्ती १

अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ,
त्याच्या गळां माळ, असो नसो,
आत्मा-अनुभवीं, चोखाळिल्या वाटा,
त्याचे माथां जटा, असो नसो,
परद्रव्या अंध, निंदेसी जो मुका,
तोचि संत देखा, तुका म्हणे २

जरि झाला भाग्यवंत, तरि कां भेटेल भगवंत,
उंच वाढला एरंड, तरि कां होइल इक्षुदंड,
जरी गर्दभ वेगें धांवे, तरि कां अश्वमोल पावे,
तुका म्हणे तोचि थोर, ज्याचे मुखीं रघुवीर ३

चातुर्याचे योगें कवित्व करिती
प्रसादिक रंग आणितां न ये ॥

संन्याशाचें सोंग संपादिलें सांग,
वैराग्याचें अंग आणितां न ये;
चंद्र सूर्य चित्रें लिहितात भिंतीं,
प्रकाशाचें अंग लिहितां न ये;
शिपायाचें सोंग आणितां येईल सांग,
शूरत्वाचें अंग आणितां न ये;
तुका म्हणे गाऊन नाचून करितील सीमा,
पांडुरंगीं प्रेमा आणितां न ये ४

पुण्य पर-उपकार पाप तें परपीडा, आणिक नाहीं जोडा दुजा यासी;
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म, आणिक हें वर्म नाहीं दुजें;
गति तेचि मुखीं नामाचें स्मरण, अधोगति जाण विन्मुखता;
संताचा हा संग तोचि स्वर्गवास, नरक तो उदास अनर्गळा;
तुका म्हणे उघडें आहे हित घात, जयाचें उचित करा तैसें ५

टिळे टोपी उंच दावी, जनीं मी एक गोसावी;
अवघा वर रंग सारा, पोटीं विषयाचा थारा;
मुद्रा लाविती कोरुनी, मान व्हावयासी जनीं;
तुका म्हणे ऐसे किती, नरका गेले पुढें जाती ६
ऐसे झाले संत कळी, तोंडी तमाखूची नळी;
स्नानसंध्या बुडविली, पुढें भांग वोढविली;
भांग भुर्का हें साधन, पचनीं पडे मद्यपान;
तुका म्हणे अवघे सोंग, तेथें कैचा पांडुरंग ७
आशाबद्ध वक्ता, भय श्रोतियांच्या चित्ता;
गातो नेंही नाहीं ठावें, तोंड वासी कांहीं घ्यावें;
झालें लोभाचें मांजर, भीक मागे दारोदार;
उभयतां लोभी मन, वायां गेलें तें भजन;
माप आणि गोणी, तुका म्हणे रितीं दोन्हीं ८

तुकारामबोवांची वाणी किती मधुर, प्रसन्न आणि हृदयंगम आहे ! प्रस्तुत अभंगांत संतांचें स्वरूप, परमेश्वरविषयक प्रेम, नीति आणि दांभिक लोकांची स्थिति हीं फार चातुर्यानें वर्णिलीं आहेत.

दुष्यन्तानें आपल्या घरीं प्राप्त झालेल्या **शकुंतलेचा** धिक्कार केला त्यावेळची मुनिकन्येची स्थिति **मुक्तेश्वर** वर्णन करितातः—

ऐसें बोलतां मेदिनीपाळा, क्रोधें संतापली शकुन्तला,
जैसी प्रलयाग्नीची ज्वाळा, स्पर्शों धांवे गगनातें ! १
आरक्तता लेवोनी नयनें, अंजन क्षाळिलें अश्रुजीवनें,
अधरस्फूर्ति जेविं पवनें, पद्मपत्रें थरकती ! २
म्हणे धन्य गा पुरुषोत्तमा ! उत्तम ऐसेंचि रक्षिती नेमा,
कर्मसाक्षी अंतरात्मा, तृप्त झाला या वचनीं ३
सकल ऐश्वर्य घेऊनि भेटी, पद्मा पातली पायें लोटी,
तो सभाग्य कीं अभाग्य सृष्टि, काय म्हणसिजे सांगपां ४
अचल श्री अरोग काया, सगुण पुत्र पवित्र जाया,
बहुत जन्म हरिहरांच्या पायां, भजतां हें फळ पाविजे ५

या उताऱ्यांत **रौद्ररसाचा** उत्तम पोष झाला आहे. **व्याजस्तुतीनें** आणि **शकुंतलेच्या** स्वतांच्या कुलीनत्वपवित्रत्वादि गुणांच्या दर्पोक्तीनें तर तो फारच शोभा पावत आहे. **हरिश्चंद्राख्यानांतील** आरंभींच्या कांहीं ओंव्या खालीं देतों.

मोक्षसिंहासनाची पायरी, प्रथम नाम अयोध्यापुरी,
ज्ञानस्वरूप जीमाझारीं, राज्य करी हरिश्चंद्र १
शत्रुकरीं लागी हरी, साधुसज्जना सुधाकरी,
बळी त्रासी या लागि हरि-, श्चंद्र नाम तयाचें २
सत्यसत्वाचा शिरोमणी, परोपकारी परमज्ञानी,
दुःख, दारिद्य, इच्छा कर्णी, ऐकों नेदी जगातें ३
धीर-सत्वाचा महामेरु, दानीं मेघ जैसा उदारु,
प्रजापालनीं कमलावरु, शक्रातुल्य प्रतापी ४

ऐसा राजा चक्रवर्ती, सिंहासनीं विराजमूर्ति,
जैसा इंद्र अमरावती, शोभे तसा शोभला ५
बैसला वेष्टित राजधानी, उभयभागीं वेत्रपाणी,
मंगल वाद्यांचिया ध्वनि, नाद गगनीं न समाये ६
तों अकस्मात गगनपंथें, नारदमुनि पातला तेथें,
वीणा वाजवी मधुर हस्तें, वदनीं गात हरिकथा ७
जो ज्ञानारविंदमकरंद, वैराग्यवल्लीचा मूळकंद,
विवेकसागरींचा पूर्णेंदु, तो नारद पातला ८
राय देखतांचि नयनीं, धांवोनि मस्तक ठेविला चरणीं,
जयजयकारें महा-मुनि, सिंहासनीं बैसविला ९
कनकपात्रीं शुद्धजळें, रायें चरण प्रक्षाळिले,
कस्तूरी चंदन चर्चिलें, भाळीं रेखिलें केशर १०
नानापुष्पजातिमाळा, गणित नाहीं परिमळा,
नैवेद्य तांबूलादि सोहळा, करूनि पूजिला नारद ११
देखोनि रायाची विनयभक्ति, नारद सुखावला चित्तीं,
आज्ञा मागुनी गगनपंथीं, गमन केलें मुनींद्रें. १२

या दोन उतार्‍यांवरून **मुक्तेश्वरांच्या** सहृदयाल्हादक काव्यरचनेचा प्रत्यय वाचकांस सहज येईल.

अशोकवनिकेमध्यें जानकी रामाची मूर्ति हृदयांत आणून ध्यानस्थ बसली असतां **हनुमन्त** एका दूतीबरोबर तिचा शोध करीत तेथें गेला. **जानकीला** वंदन करून **हनुमन्तानें रामानें** दिलेली मुद्रिका तिच्यापुढें ठेवली, त्या प्रसंगाचें वर्णन **श्रीधरांनीं** केलें आहे:—

तों अशोक वृक्षाचें तळीं, ध्यानस्थ बैसली मैथिली,
दूती परतली तात्काळीं, हनुमंत तेथें राहिला, १
जय जय रघुवीर अयोध्यानाथ, म्हणोनि नाचों लागला हनुमंत,
म्हणे धन्य मी आजि येथ, जगन्माता देखिली २

पुच्छ नाचवी कडेविकडी, तोंड विटावी डोळे मोडी
चक्राकार मारी उडी, रामनाम गर्जोनियां ३
चहूंकडे पाहे मारुती, तों रामनामें वृक्ष गर्जती,
पंचभूतें पक्षी घुमती, रामस्मरणें करूनियां ४
ह्मणे हे होय सीतासती, पुराणपुरुषाची चिच्छक्ति,
सुटली कर्पूराची दीप्ति, पाषाण स्मरती रामनाम ५
मृगमदाहोनि विशेष, सीतेच्या अंगींचा सुवास,
अशोकवन आसपास, दुमदुमिलें तेणेंचि ६
तेथें रक्षण असे त्रिजटा, तिणें राघवीं धरिली निष्ठा,
सत्संगाचा महिमा मोठा, दुष्ट पापिष्ठा सद्भाव ७
यावरी अंजनीहृदयरत्न, गुप्तरूपें जवळ येवोन,
जानकीचे वंदोनि चरण, मुद्रिका पुढें ठेविली, ८
ध्यानस्थ बैसली सीतासती, मानसीं चिंती रघुपती,
पुढें उभा असे मारुती, बद्धांजली करूनियां ९
इंदिरेपाशीं खगेन्द्र, कीं अपर्णसमीप नंदिकेश्वर,
कीं शचीपुढें जयंत पुत्र, उभा ठाके प्रीतिनें १०
असो कनकदंड पडे पृथ्वीवरी, तैसा जानकीसी नमस्कारी,
मग त्या अशोक वृक्षावरी, राघवप्रिय ओळंघला ११
इकडे तमालनीळ सांवळा, ध्यानीं विलोकित जनकबाळा,
तों अवतारमुद्रिका ते वेळीं, सव्यकरांगुळीं दिसेना १२
मुद्रिका न दिसे म्हणोन, श्रावणारिस्नुषा उघडी नयन,
तों मुद्रिका पुढेंचि जाण, देदीप्यमान पडली असे १३
मुद्रिका देखतां ते वेळीं, हृदयीं आलिंगी जनकबाळी,
विमलांबुधारा नेत्रकमळीं, जानकीच्या सुटल्या १४
म्हणे सांडोनि रघूत्तमातें, माये कैशी आलीस येथें,
राम आणि सौमित्रातें, त्यजोनि कोठें आलीस १५

जगद्वंद्य तो श्रीराम, जो चराचर फलांकितद्रुम,
त्याची वार्ता स्वस्तिक्षेम, सांग मुद्रिके मजपाशीं १६
पळाल्या निशाचरी, जानकी मुद्रिकेतें विचारी,
शरयूतीरविहारी, कोठें सांग मुद्रिके १७
मज आलिंगितां श्रीरामचंद्र, तेव्हां कंठीं न सोसेचि हार,
आतां गिरी कानन समुद्र, दोघांमध्यें पडियेला, १८
वाल्मीकानें भविष्य कथिलें, तें काय सर्व व्यर्थ गेलें,
एक कपि बळिया येऊन बळें, लंकानगर जाळील १९
मज देऊनि समाधान, सत्वेंचि आणिल रघुनंदन,
पाषाणीं समुद्र बुजोन, दशवदनासि मारील पैं २०
तों मुद्रिका नेदी प्रतिवचन, ह्मणे मज कळली खूण,
माझ्या विरहें करून, देह राघवें त्यागिला २१
कीं योगियांचें ध्यानीं गुंतला, कीं भक्तधावण्या धांवला,
कीं सौमित्रें माघारां नेला, म्यां छळिलें म्हणोनि २२
कृपा न करवे मजवरी, तरी नेऊन माझाच वध करी,
मी बुडालें चिंतासमुद्रीं, काढी बाहेर त्वरेनें २३
आहा रामा राजीवनेत्रा, दशकंठरिपु विषकंठमित्रा,
पुढें पाठविली कां हे मुद्रा, कोण्या विचारें करोनी २४
मृगत्वचेची कंचुकी इच्छिली, हाच अन्याय घडला मुळीं,
म्यां पापिणीनें ते वेळीं, सौमित्र वीर छळियेला २५
म्यां साधुच्छळण केलें, म्हणोनि राक्षसांहातीं सांपडलें,
मजला वियोगदुःख घडलें, त्याच दोषें करूनियां २६
जे साधुच्छलन करिती, ते मजऐसे दुःख पावती,
अंतीं जाती अधोगती, महा अनर्थी पडतील २७

रामविजय अ. १०

नारदमुनींनें श्रीकृष्णाला एकदा स्वर्गातल्या पारिजातकाचें पुष्प आणून दिलें. तें त्यानें रुक्मिणीला दिलें. हें वर्तमान सत्यभामेला

कळतांच ती **श्रीकृष्णावर** रुसली; त्या वेळचें तिच्या अवस्थेचें वर्णन **वामनपंडित** करितात.

द्रुतविलंबित.

गडबडा धरणीवरि लोळतें, वदवती न कवीसहि लोळ ते,
रडत मूर्च्छित होय घडी घडी, पवन निश्चल नेत्र न ऊघडी १
अलक हार गळ्यांतिल तोडिते, कुरळ केश मुखावर सोडिते,
करयुगें उर मस्तक ताडिते, वसन आणिक कंचुकि फाडिते २

शिखरिणी.

महा उष्णश्वासें करुनि वदते शुष्क अधरा,
धरापृष्ठीं जोडा न शठ दुसरा या गिरिधरा,
धराया माझा हा कर कपटि कैंचा जनमला,
मला जो निंदोनी कुसुम तिस देऊनि रमला ३
सख्या हो ! मेल्याही शवहि न शिवो हें यदुपति,
पती नानास्त्रींचा पतितजनही ज्यास जपती,
नका येऊं देऊं सदानें सवतीच्या प्रियकरा,
करातें लावींना मज कपटि ऐसें तुम्हि करा ४

मालिनी.

रडत रडत मूर्च्छेमाजि वृत्ती बुडाल्या,
परम विकल, मी तूं या स्मृतीही उडाल्या,
उचलुनि सखियांही मंचकीं दिव्य सेजे,
निजविलि मृततुल्या सत्यभामा दिसे जे ५

भामाविलास.

असूयायुक्त भामिनीचें यापेक्षां अधिक मोहक चित्र आमच्या तरी अन्यत्र पाहण्यांत नाहीं !

अमृततुल्य मधुर अशी आपली मुरली (वेणु) **वृंदावनविपिनांत श्रीकृष्ण** वाजवीत असतां तेथें काय चमत्कार झाला तो **पंडित** आपल्या प्रेमळ, प्रौढ, सरस व सालंकार वाणीनें वर्णितात:—

स्वागता.

अंग वक्र अधरीं धरि पांवा, गोपवेष हरि तोचि जपावा,
वामबाहुवरि गाल्हि डावा, तो ठसा स्वहृदयांत पडावा १

उपजाति.

वेणुध्वनी तो सुरगायकांनीं, त्यांच्या विमानांतहि बायकांनीं,
आश्चर्य कानीं पडतांचि केलें, न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें २

स्वागता.

मोहती व्रजपशू मृग गाई, आमुचें नवल काय अगाई,
स्तब्ध होति लिखितें जशि चित्रें, वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें ३

उपजाति.

मातृस्तनींचा रस आननांत, तो होय वेणुध्वनि काननांत,
गळे गिळेना पय वांसुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ४

स्वागता.

मल्लवेष रचिला अभिराम, श्रीधरप्रभुसवें बलराम,
मोरपत्रमुकुटीं तरुपत्रें, नेत्र सुंदर जशीं शतपत्रें ५
सये असा म्यां हरि देखिला गे, तो प्रेमरंगीं मनिं रेखिला गे,
पाचारितो वेणुरवेंचि गाई, आश्चर्य तेव्हां करितों अगाई ६

उपजाति.

आपादमाळा प्रभुकंठजीची, सुधा पिती षट्पद कृष्णजीची,
प्रदक्षिणा ते अवघे तिला हो, करोनि गुंजारव घेति लाहो ७

वसंततिलका.

गुंजारवें भ्रमर गुंजाति त्यांत देवे, वेणुध्वनी मिसळिला मृदु वासुदेवें,
आपाद कंठवनमाळ अशी विराजे, ते सेविती मधुप होऊनि देवराजे ८

भुजंगप्रयात.

वनीं राजहंसीं पिकांनीं शुकांनीं, ध्वनी गोड तो आयकोनी सुकानीं,
त्वरें येउनी सेवियेलें हरीतें, महापापही नाम ज्याचें हरीतें ९

द्रुतविलंबित.

वदन लावुनि ते सकल क्षिती, नयन झांकुनि अन्य न लक्षिती,
स्थिर मनें करुनी स्थिर आसना, करिति ते खग कृष्णउपासना १०
हळु हळू घन गर्जतसे नभीं, मुरलिहूनि चढेल म्हणोनि भी,
श्रवणभक्ति अतिक्रम वर्जितो, करित कीर्तन हा घन गर्जतो ! ११

वेणुसुधा.

अज्ञातवास आटोपल्यानंतर **पांडवांनीं श्रीकृष्णाला** सामाचें बोलणें लावण्याकरितां **धृतराष्ट्राकडे हस्तिनापुरास** पाठविलें. **हस्तिनापुरास** आपला परमभक्त **विदुर** याकडे **श्रीकृष्णानें** एक दिवस मुक्काम केला आणि दुसरे दिवशीं **कौरवसभेंत** जाऊन **पांडवांच्या** तर्फेनें शिष्टाई केली ही कथा खालील पद्यांत **पंतांनीं** आणिली आहे.

गीति.

शतसंख्य वाजवी ज्या जेववितां माय देवकी चिटक्या,
तो नित्यतृप्त भगवान् विदुरगृहीं भोजनांत दे मिटक्या १
आलें ढेंकर, दिधल्या मिटक्या बहुसाळ, मारिले फुरके,
उरके सर्वामागुनि अशन परि न ताट चाटणें उरके २
ज्याच्या चरणें स्वरजांकरवीं प्रणतासि मोक्ष देवविला,
देव शिलासमनुजतनु विदुरप्रेमें यथेष्ट जेवविला ३
मग रात्रौ एकांतीं सर्वज्ञालाहि साधुराय कवी,
पाय रगडितां दुर्जन-दुर्योधन-दुर्मतासि आयकवी ४
पंगुहि मेरुवरुनिहि न माथां धरितां यदंघ्रिरज निसरे,
त्या दीनबंधुची ती चिंता न सरे परंतु रजनि सरे ५
प्रातःकालीं सशकुनि दुर्योधन ये स्वयें बहायाला,
प्रातर्विधि करुनि प्रभु जाय प्रज्ञांबका पहायाला ६
जनदृष्टिचातकीं जी तूर्यरवें करुनि देत ओ तीतें,
प्रभुमेघदर्शनामृत दुर्लभ जें तन्मुखांत ओती तें ७
मग जी जलदश्यामा करुणा बसली नवासनावरि ती,
जीच्या उपासकजना-प्रति विषयाच्या न वासना वरिती ८

केवळ जवळ बसविला विदुर प्रेमें करोनि मापानें,
तद्यश न मोजवेल ब्रह्मांडा एवढयाहि मापानें ९
टकमक पहात होते प्रभुमुखचंद्राकडेचि चातकसे,
नसतील जोडिलें श्रवणांहि बसाया मनासि हात कसे १०
सभ्य श्रुतिवदनांतें पसरिति सेवावया भगवदुक्ति,
प्राशावयासि जेविं स्वच्छ स्वात्यंबुला जलधिशुक्ति ११
देव म्हणे धृतराष्ट्रा राया मोठी जगीं तुझी पदवी,
वद विदुर्चें तूं, परि परिस, मज बळेंचि आसता वदवी १२
जें मेळविलें चंदनसम झिजवुनि परसुखार्थ आंगातें,
केवळ कृपालुपूर्वजसद्यश मळविसि बळेंचि कां गा तें १३
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावें क्षमा न सोडावी,
जोडावी कीर्ति जनीं, कुलमर्यादा कदा न मोडावी १४
वाढिव धर्म प्रेमें वाढवि मज जेविं नंद नवनीतें,
सत्पुत्रांनीं भवनीं सुरतरुनीं न सुख नंदनवनीं तें १५
म्हणतो युधिष्ठिर नको पायें लोटूं मला अवनतातें,
वचनकरापत्याचें न करावें काय हो अवन तातें १६
क्रमिले तसेचि कथिले होते त्वां त्यांसि अब्द ते राजे,
धन्य म्हणत होते जे लाविंतिल तुलाचि शब्द ते राजे १७
सुखसंततिसुकृतर्धिप्रीतिश्रीपुण्यकीर्ति या लाभें,
साम करी साधूंशीं नाहीं तरि पावलेंचि याला भें १८
बहु सत्य बहु प्रिय बहु हित बहु मत बहु दुराप बहु रुचिर,
शुचि रम्य क्षीरधिजाननचंद्रचकोर बोलिला सुचिर १९

उद्योगपर्व.

पंतांची भाषा फार शुद्ध, प्रौढ, सरस आणि सालंकार अशी आहे, हें एवढया उताऱ्यावरून सहज लक्ष्यांत येईल. वरील पद्यांत **भगवंताची** भक्तवत्सलता व अभक्तांविषयीं अरुचि हीं सुव्यक्त झालीं आहेत.

बायकांच्या ओव्यांच्या चालीवर **पंतांनीं सावित्रीगीत** रचिलें आहे

तें अतिसुंदर आहे. त्यांत प्रसाद व माधुर्य हे गुण पूर्णपणें प्रतिबिंबित झाले आहेत. शिवाय, रस व अलंकार यांनींही प्रस्तुत गीत मंडित झालें आहे. हें गीत आबालवृद्धांनीं नित्य वाचण्याच्या योग्यतेचें आहे. समग्र गीताच्या तीनशेंसांत ओव्या आहेत. तेवढ्या येथें देण्यास अवकाश नाहीं. दोन चार प्रसंग मात्र येथें देतों. त्यांवरून प्रस्तुत काव्याची माधुरी व योग्यता हीं अंशतः तरी वाचकांच्या मनांत उतरतील.

सावित्रीची सासुरवाडची दिनचर्या पहाः—

हर्षली पाहोनी जशी सती भर्गा । वनाहूनि स्वर्गा तुच्छ मानी १
तशी ती सावित्री आनंदली मनीं । क्रीडे तपोवनीं पतीसंगें २
वांटी बहु, स्वल्प वस्त्र नग ठेवी । वल्कलें ती देवी सुखें नेसे ३
श्वशुराची आज्ञा जशीच वेदाची । तीळ ही भेदाची बुद्धि नाहीं ४
कुळदेवताची ती श्वश्रु मानिली । पूजिली वानीली सावित्रीनें ५
केवळ अतिथी अभ्यागत बाळ । करी प्रतीपाळ माता सती ६
मानीयला शाकफळमूळकंद—। रसाहूनि मंद सुधारस ७
बोलावें सस्मित मृदु परिमीत । सत्य प्रिय हित बोलवील्या ८
सर्वांच्या मागूनी तृणशय्येवरी । सुखें निद्रा करी ऊठे आधीं ९
एकांतीं पतीचें हृदय रमवी । संताप शमवी सेवाधर्में १०

सत्यवान् एके दिवशीं परशु स्कंधावर टाकून लांकडें आणण्याकरितां रानांत जाऊं लागला, त्यावेळीं तो व **सावित्री** यांमध्यें घडलेला भाषणप्रसंगः—

सत्यवंत स्कंधीं परशू वाहोनी । स्त्रीकडे पाहोनी वना निघे १
सावित्री म्हणे जी मी येत्यें वनाला । वियोग मनाला न सोसवे २
तो म्हणे त्वां केलीं उपोषणें तीन । झाला शक्तिहीन देह तूझा ३
वर्णावीं पाऊलें तुझीं नवनीतें । मग न वनीं तें कठीनाचें ४
सुखद नव्हे तें दुःखद कानन । म्हणसी कां न न आतां येतों ५
सती म्हणे मज दुःखांतचि सुख । तुमचें श्रीमुख विलोकितां ६
स्वामीसंगें मज न बाधेल ताप । जसा भवताप संतसंगें ७
सत्यवंत म्हणे कांते न रुसावें । तुवां हें पुसावें वडिलांसी ८

यीवर सावित्री सासूसासऱ्यांला विचारते व सासरा तिला वनांत जाण्यांची अनुज्ञा देतोः—

सासुसासऱ्यांतें म्हणे न कोपावें । मज हें ओपावें वरदान १
फळें आणावया जातांना वनांत । माझ्याही मनांत वाटे जावें २
वर्ष झालें आल्या सोडोनि माहेर । आश्रमा बाहेर गेलें नाहीं ३
स्वामी-समागमें तपस्वी शरण्य । पाहिन अरण्य आज्ञा द्यावी ४
राजा म्हणे बाई, वर्षांत त्वां कांहीं । मागितलें नाहीं आम्हांपाशीं ५
वन पाहावयी आज्ञा मागतीस । पायां लागतीस तरी जावें ६
वत्से उपवासी सुकुमारी बाळा । शीघ्र या, सांभाळा अन्योन्यांतें ७

सावित्री वनांत जाते व कांहीं वेळानें तिला ठाऊक असलेल्या भविष्याप्रमाणें **सत्यवान्** एकाएकीं शिरोवेदना उत्पन्न होऊन मूर्छित होतो व जामिनीवर पडतोः—

वंदोनियां सती निघे झडकरीं । धैर्य धड करी हृदयांतें १
पुष्पीत फलीत तरु मृग पक्षी । वनांतरीं लक्षी राजकन्या २
पतीच्या सुखार्थ बळें आणि हास्य । मयूराचें लास्य विलोकूनी ३
विनोदवचनें फुलीतें डोलवी । दाटोनी बोलवी पुण्यकथा ४
एके नेत्रें प्रीया एकें नेत्रें काळा । पाहे राजबाळा हृष्टा भीता ५
चित्राश्व वेंचोनी फळें पात्र भारी । मग काष्ठावरी घाव घाली ६
शक्तीहूनी बहु घडतां आयास । तयाच्या कायास घर्म आला ७
कठीणा काष्ठाच्या करीतां भेदना । उठली वेदना शिरीं भारी ८
म्हणे प्रीय शूळ ऊठिला मस्तकीं । धांवोनी हस्तकीं साध्वी धरी ९
म्हणे कधीं झाला ऐसा खेद नाहीं । शिरोवेदनांही धैर्य गेलें १०
जाणों शूलाघातें मस्तक फाटतें । मनांत वाटतें निजावेसें ११
पतीच्या मस्तकाखालीं घाली मांडी । जाणो उशी मांडी कुसुमाची १२
धरूनी मस्तक मनीं म्हणे बाला । आला ठोकताळा भविष्याचा १३

सत्यवानाचा आत्मा **यम** घेऊन चालला. तेव्हां तीही त्याच्या मागोमाग

चालली. **यमानें** तिची अनेक प्रकारांनीं समजूत करण्याचा प्रयत्न केला; पण ती कांहीं ऐकेना. ती म्हणाली:—

सावित्री म्हणे गा देहासवें छाया । जशी तैशी जाया पतीसवें १
प्राण जाऊं द्यावे पती न सोडावा । स्वधर्म जोडावा मुख्य हाचि २
गुरूंच्या तुझ्याही प्रसादें आजी या । गतीला माझिया विघ्न नाहीं ३
सात पदें गांठी जरी मार्गी पडे । तरी मैत्री घडे सज्जनाशीं ४
या न्यानें तुजशीं सख्य झालें वाटे । दोघें एके वाटे चालतसें ५
तुजशीं बोलल्यें कांहीं मित्रभावें । तें त्वां आयकावें धर्मराजा ६
इंद्रियें जिंकिल्याविना केलें कर्म । त्यासी संत धर्म न म्हणती ७
गृहस्थाश्रमांत सर्व धर्म घडे । तेणें मळ झडे अंतरींचा ८
विषयवासना-मळ जातां ज्ञान । होय समाधान आत्मलाभें ९
गृहस्थाला सोपें न तसें अन्यास । न लागे संन्यास ज्ञानासाठीं १०
असें म्यां ऐकिलें ऐसेंच कीं बाहे । विचारोनि पाहे धर्मराजा ११

साध्वीच्या भाषणानें प्रसन्न होऊन **यमानें** तिला अनेक वर देऊन शेवटीं पतिदानही केलें. **सावित्रीचें** शील, पातिव्रत्य, धर्मबुद्धि इत्यादि पाहून **यमाला** आनंदाचें भरतें येऊन त्यानें मधून मधून **सावित्रीला** उद्देशून तिचा धन्यवाद केला तो असा:—

धर्म ह्मणे बाई, मदालसा धन्या । कीं तूं; नसे अन्या आढळली १
रोमांच माझ्या देहीं उभारती । तुझी सुभारति आकर्णितां २
यम ह्मणे बाई, तूझी दिव्य दृष्टी । अमृताची वृष्टी तूवां केली ३
बोलतसि तसें श्रुतीनें बोलावें । ऐकतां डोलावें जडांनींही ४
वेधील विधीला बाई, बोल तूझा । पतिविना दूजा वर मागें ५
यम ह्मणे जशी तान्हेल्यासी सुधा । तुझी वाणी बुधा मज तशी ६
यम ह्मणे बाई, धन्या तू सुशीला । आलीस कुशीला जीच्या तीही ७
तूझ्या शब्दामृता तृषीच्या हेतूला । प्राशोनि हे तूला कर्ण गाती ८
यम ह्मणे वाणी नव्हे बोलकी तीं । बाई, बोल कीर्ति तुझे वर्णू ९
तुज वर्णावया नाहीं मज शक्ती । तुझें ठायीं भक्ति माझी झाली १०
धर्म ह्मणे बाई, प्रताप हा भला । जिंकिलें त्वां मला पातिव्रते ११

या उताऱ्यांवरून **पंतांच्या** काव्याच्या अभिनव सौंदर्याची कल्पना सहज येईल. **महीपति, अमृतराय, रामजोशी, अनंतफंदी, रघुनाथ-पंडित** इत्यादि जुन्या मराठी कवींच्या कृतिही सरस व रमणीय आहेत. परंतु विस्तरभयास्तव त्यांतून उतारे देतां येत नाहींत ! असो. वरील सर्व उताऱ्यांवरून जगांतील उत्कृष्ट कवींच्या पंक्तीला शोभण्यासारखे आमचे जुने मराठी कवि आहेत अशी मनाची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. या पुढें कै. **परशुरामपंततात्या गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे,** आणि **गणेशशास्त्री लेले** या चार विशेष नांवाजलेल्या अर्वाचीन मराठी कवींच्या ग्रंथांतून कांहीं निवडक पद्यें देऊन हा पद्यात्मक काव्याच्या उदाहरणांचा बराच विस्तृत झालेला भाग पुरा करितों. गद्यपद्यात्मिक काव्याचीं उदाहरणें येथें विस्तृतपणें देण्याचें मुख्य प्रयोजन असें आहे कीं तीं वाचलीं असतां ज्या ग्रंथांतून तीं उतरून घेतलीं आहेत ते ग्रंथ समग्र वाचण्याविषयीं विद्यार्थ्यांची प्रवृत्ति व्हावी व तिच्या योगानें त्यांच्या काव्याभिरुचीला योग्य वळण लागावें.

परशुरामपंततात्यांच्या मृच्छकटिकामध्यें विटकृत वसंतसेना-वर्णन पहाः—

शार्दूलविक्रीडित.

नाहीं पद्म करीं तरी दिसतसे प्रत्यक्ष लक्ष्मीपरी,
कामाची समशेर कामतरुची प्रत्यक्ष जी मंजरी;
पाहोनी झुरती कुलीन वनिता भाग्यास जीच्या मनीं,
ती जाते गजगामिनी प्रियकरा भेटावया भामिनी १

या पद्यांत **उपमा, रूपक, अतिशयोक्ति** व **स्वभावोक्ति** यांच्या **संसृष्टीला प्रसाद** व **माधुर्य** यांची जोड मिळून सौंदर्य व्यक्त झालें आहे.

त्याच नाटकांतील सजल नीलवनाचें वर्णनः—

शार्दूलविक्रीडित.

मेघांनीं बहु आदरें करुनि जो ये ये असा बाहिला,
वेगें जाउनि जो बलाकततिनें सोत्कंठ आलिंगिला;

हंसांनीं निजपंकजें त्यजुनियां त्रासोनि जो पाहिला
तो हा मेघ दिशांस झांकित नभीं नीलांबरें राहिला १

या पद्यांत **स्वभावोक्ति** असून त्यांत **उल्लेखाची** छटा मारते यामुळें त्याला विशेष शोभा आली आहे.

उत्तररामचरितांत रामचंद्र कुशाला पाहून विस्मयानें म्हणतोः—

वसंततिलक.

दृष्टी पहा कशि जगत्रय तुच्छ जीला,
गंभीर उद्धत गती लववी महीला;
अल्पा वयांत गिरिसा गुरुतेस घेतो,
हा मूर्त वीर रस कीं रणदर्प येतो १.

यांत **श्लेषानुप्राणित उपमा, विषम, उत्प्रेक्षा** आणि **स्वभावोक्ति** यांची **संसृष्टि** होऊन **अद्भुतरस** व्यक्त झाला आहे.

त्याच नाटकांत **जंबूकानें जनस्थानाचें** असें वर्णन केलें आहेः—

शार्दूलविक्रीडित.

कोठें शून्य भयंकर ध्वनि कुठे सत्वांचिये ऊठती
कोठे हे ज्वलन प्रसुप्तभुजगश्वासानिलें पेटती !
कोठें स्वल्प जळें दरींतहि अशा सीमा पहा दीसती
तान्हेले कर भानुचे अजगरस्वेदद्रव प्राशिती १

यांत **स्वभावोक्ति** सुंदर साधली असून **भयानक**रसाचा परिपाकही चांगला उतरला आहे.

शार्दूलविक्रीडित.

दावाग्नी खवळोनिया तरुवरां जाळावया जें बळें,
जाती सर्व पळोनि कोकिल शिखी रात्रे तसे कावळे;
भक्षायास फळें चहोंकडोनिया एकत्र जे जाहले,
येतां संकट काल होय जवळीं ऐसा न कोणीं मिळे १
नक्षत्रें परिवार ज्यास, पतिही जो ओषधींचा असे,
ज्यातें पाहुनि हर्षती जन, सुधा ज्याच्या शरीरीं वसे;

होई तेज कमी तर्याहि विधुचें येतां रवीच्या गृहीं,
ज्या येई लघुता न अन्यसदनीं ऐसा न कोणीचही २
जीमाजीं कमलें नवीं विकसुनी त्यांच्या परागें जला,
येई फार सुगंध भृंग करिती गुंजारवा मंजुला;
ऐशी सुंदर वापिका त्यजुनिया हंसा कुठें जावया,
होशी उत्सुक, सांग, लाजशि असा कां फार बोलावया ३
आंबे, चंदन, चंपकादिक तरू सारेच कां वाळले ?
पद्मांनीं भरले जलाशय लया कीं सर्वही पावले ?
झाली निर्भद आणि शुष्क करिचीं कीं सांग गंडस्थलें ?
रे मूढा भ्रमरा, करीरकुसुम त्वां आज जें चाखिलें! ४

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

हीं पद्यें प्रसन्न आणि मधुर आहेत. या सर्व **अन्योक्ति** असून त्यांत दुसरेही थोडे बहुत चमत्कार आहेत.

कृष्णशास्त्री राजवाडे यांनीं **शाकुन्तलाचें मराठी भाषान्तर** केलें आहे. त्यांतून कांहीं सुंदर स्थळें खालीं देतों.

कण्वाच्या आश्रमाचें वर्णन पहाः—

कटाव

इकडे सारे तमाल दिसती, रसालतरु हे इकडे असती, कुंदवृंद बहु चंदनपंक्ति, या अंगाला चंपक असती, नारिकेलतरु गगनीं गेले, पूगद्रुम फलभारें लवले, या बाजूला सारे कवले, अमित जांब हे पक्क जाहले, इकडे झाडें रामफळींचीं, शिताफळींचीं, गर्दजाहली छाया यांची, रम्य स्थळ हें पाहुनि माझ्या हर्ष बहुताचि झाला चित्ता ॥ १ ॥ मुनिचा हा आश्रम पाहतां श्रम हरले माझे सूता ॥ ध्रु० ॥ विमळ जळाचे पाट वाहती, त्यांनीं तरुमूळें ही भिजतीं, मुनी वल्कलें धुवोनि जाती, त्यांच्या धारा मार्गीं गळती, जागोजागीं वृक्षावरतीं, पहा वल्कलें किती वाळती, कंदमूळफळ भूमीवरती, ढीग करोनि मुनी ठेविती हिंगणबेटें दगडावरती, वांटुनियां मुनि जटांस लावुनि मार्दव आणिति,

म्हणुनि दगड हे बहु मृदु असती, तरुंचें पल्लव आणि फळें हीं हुताश्यधूमें पिंगट असतीं, मृगशिशु कोमल तृणांत चरतीं, पाहुनि मुनिचा आश्रम माझें हृदय जाहलें गारचि आतां ॥ मुनिचा० ॥ ध्रु० ॥ इकडे तरुवर परोपरींचे, वरी तयांच्या फलपुष्पांचें, सरस घोंस हे बहु मधुरस लेभें त्यांच्या वरती, भ्रमरपंक्तिचा थाट बैसला, दाट येउनी पुष्परसांचें पान करूनी, तृप्त होउनी, मंजुळ मंजुळ गुंजारव हा करी, तयांची पाहुनि दाटी, मजला वाटे जशी द्विजांची, मंत्र म्हणाया बसली पंक्ती, किंवा गायक नानापरिच्या ताना घेउनी गाना करिती, कानीं मधुर ध्वनि ऐकुनियां रानांतुनियां येउनि खगमृगपन्नग भाना विसरुनि थकित बसुनि आनंदविती माझ्या स्वांता, मुनिचा हा ॥ ध्रु० ॥ सरोवरें हीं भरलीं नीरें, मंद मंदतर अतिशय फलपुष्पांच्या भारें, नम्र जाहले तरुवर सारे, ऐसें वाटे मुनिवर्यांच्या तपःप्रभावें स्थावर देखिल आस्थापूर्वक ऋषिसंगानें स्वस्थमनानें अतिथिजनांच्या मनासि देउनि संतोषातें करूं इच्छिति भवदुःखान्ता ॥ मुनिचा हा० ॥ ध्रु० ॥ वृक्षावरती पक्षी सारे, करुनि बैसती हे कोठारे, घेउनि अपुलीं अपुलीं पोरें, भक्षण करितां तृणधान्याचें, अन्योन्यातें देती घेती, मुखीं घालिती, खातांना कण खालीं गळती, कोकिलकुल हें कलकल करितें मंजुल मंजुल अलिपुंजाचा गुंजारव हा, ठमक ठमक हे मोर नाचती, जवळि तयांच्या आहिवर बसती, गाई व्याघ्रहि जागोजागीं, निर्वैरानें बसती मार्गीं, दिसती जैसे वीतरागी, शांतमुनीचा सर्वाश्रम हा, क्रूर सत्वही धरोनि नियमा शमास धरुनि तमास टाकुनि समानवृत्ति रमावराचें चिंतन करिती, येथें पशुहृदयींही नाहीं शत्रुत्वाची तिळभरही वार्ता ॥ मुनिचा हा आश्रम पहातां श्रम हरले माझे सूता ॥ ध्रु० ॥

मूलग्रंथांतल्यापेक्षां यांत न्यूनाधिकभाव आहे हें मूलग्रंथ व प्रस्तुतचें भाषांतर ताडून पाहिलें असतां लक्षांत येईल. हा उतारा साधा, सरळ व गोड आहे.

दुष्यंत रथाच्या वेगाचें वर्णन करतोः—

शार्दूलविक्रीडित.

जें जें दृष्टिस सूक्ष्म वस्तु दिसतें भासे अकस्मात तें
मोठें; दूरुनि जें दिसे तुटक तें संयुक्तसें भासतें;
कांहीं वक्र असोनि नीट दिसतें नेत्रास माझ्या पहा,
वाटेना मज दूर हें जवळ हें वेगें रथाच्या अहा! १

दुष्यन्त आश्रमांतील हरिणांवर शरसंधान करूं लागला त्यावेळीं वैखानस त्याचा निषेध करतोः—

शार्दूलविक्रीडित.

हां हां, सोडुं नको नको शर मृदू अंगीं मृगाच्या नृपा,
कार्पासावरि दीप्त अग्निसम हा चित्तीं धरी तूं कृपा;
कोठें तीक्ष्ण तुझे कठोरहि बहू हे बाण वज्रापरी,
कोठें चंचलजीविता मृगतती ही जातिनें बावरी! १

भ्रमर शकुंतलेच्या मुखाभोंवतीं घिरट्या घालून तिला त्रास देऊं लागला त्या प्रसंगीं दुष्यन्ताची त्या भ्रमराला उद्देशून उक्तिः—

स्रग्धरा.

लोलाक्षीच्या मुखाच्या फिरफिरुनि पुढें येशि, गुंगोनि कानीं
जैसा कां सांगशी तूं गुज, अधरसुधा पीशि एकांतदानीं;
भृंगा आहेस तूं तो अतिचतुर, पहा, मी कसा भाग्यहीन!
या तत्वाच्या विचारा करकरुनि फुका जाहलों फार दीन! १

राजा विदूषकाजवळ शकुन्तलेच्या सौन्दर्याचें वर्णन करतोः—

शार्दूलविक्रीडित.

चित्रीं घालुनि जीव ती रचियली किंवा मनें कल्पिली,
सौंदर्यें सगळीं करोनि विधिनें एकत्र ही निर्मिली!
त्याच्या या विभवास आणि वपुला हीच्या मनीं आणितां,
हें स्त्रीरत्न दुजेंच सृष्टि विधिची वाटे मला भावितां! १

कंण्वऋषींच्या शार्ङ्गरवाबरोबर दुष्यन्ताला निरोपः—

स्रग्धरा.

आम्हीं आहों तपस्वी शमधन, कुलही श्रेष्ठ तूझें जगांत,
हींची प्रीती असे जी तुजवरि सहजा आणुनि हें मनांत;
ठेवी सन्मान हींचा त्वदितरललनातुल्य, याहूनि कांहीं,
दैवें होणार होवो, स्वजनिं अणिक तें सांगणें योग्य नाहीं १

कण्वाचा शकुंतलेला सासरीं जातांना उपदेशः—

शार्दूलविक्रीडित.

तूं सेवीं वडिलां, धरीं प्रियसखीवृत्ती सपत्नीवरी,
भर्त्यांनें अपमानिलें तरिहि तूं कोपूं नको अंतरीं;
होई दासजनीं उदार विभवें ताठूं नको, अंगना
ऐशा थोरपणास पावति, दुज्या अत्यंतसंभर्त्सना १

सासरीं जातांना आपला पिता कण्व याचा विरह सहन न होऊन शकुन्तला रडूं लागली त्यावेळीं तो तिचें समाधान करतोः—

स्रग्धरा.

झाली आहेस पत्नी सुकुलनृपतिची, तद्गृहीं मोठमोठे
कार्यांचे भार अंगावरि पडुनि तुला वेळ होणार कोठें ?
प्राची सूर्यास जशी प्रसवशिल तशी तूंहि पुत्रा त्वरेनें,
माझें होणार नाहीं स्मरणहि तुजला पुत्रसल्लालसेनें १

शकुंतला सासरीं जाऊं लागली त्यावेळीं तिनें पाळलेलें एक हरिणबालक तिच्या पाठीमागें लुडबुडूं लागलें. त्याचा स्पर्श झाल्याबरोबर शकुंतला दचकली आणि म्हणाली ' हें कोण बाई माझ्या अंगाशीं लगटून येतें आहे ! ' त्यावर कण्व उत्तर करितोः—

शार्दूलविक्रीडित.

खातां दर्भ तदग्र लागुनि मुखीं झाला जयाच्या व्रण,
त्यालां इंगुदितैल लावुनि तुवां केलेंसि संरोपण;
सांवे घालुनि मुष्टिनें प्रतिदिनीं ज्या वाढवीलें स्वयें,
तो त्वत्पुत्र कृतज्ञ हा मृगशिशु पाठीस लागोनि ये ! १

दुष्यंत शकुंतलेचा स्वीकार करीना आणि तिनें सांगितलेल्या खुणांवर विश्वास ठेवीना. तेव्हां शार्ङ्गरव क्रुद्ध होऊन राजास ह्मणतोः—

स्रग्धरा.

नाहीं माहीत ज्याला कपट म्हणुनिया काय आहे पदार्थ
त्याच्या वाक्यावरीही जन न भरंवसा ठेविती निश्चयार्थ !
कापट्याचीच विद्या शिकुनि करिति जे वंचना त्यांस सारे
मोठें प्रामाण्य याचें म्हणति जन असा न्याय आहे कसा रे ! १

शकुंतलेचा स्वीकार केला नाहीं याबद्दल दुष्यंताच्या मनाला हुरहुर लागली. तेव्हां तो मनाची करमणूक करण्याकरितां स्वतां काढलेली शकुंतलेची तसबीर घेऊन विदूषकासह ती पहात बसला. त्या प्रसंगीं प्रस्तुत चित्रांत आणखी कांय काय काढावयाचें राहिलें तें राजा विदूषकाला सांगत आहेः—

स्रग्धरा.

हंसांचें युग्म जीच्या पुलिनिं, बहुजला मालिनी ती लिहावी,
तेथें पंक्ती मृगांची लिहुनि हिमगिरीखालती दाखवावी;
शृंगीं कृष्णा मृगाच्या निजनयन मृगी घांसि वृक्षाग्रभागीं,
दावावीं वल्कलेंही अणिक तरुलता आश्रमीं जागजागीं १

रघुवंशकाव्याच्या मराठी पद्यात्मक भाषान्तरांतून कांहीं मनोहर स्थलें पुढें दिलीं आहेत.

वसंताचें वर्णनः—

द्रुतविलंबित.

प्रथम मोहर ये मग पल्लव, मग पिकभ्रमरावलिचे रव,
क्रम असा बहु दे जनतुष्टिला, नवलवी वन वी ऋतु सृष्टिला १
बकुलशाखिस येउनिया फुलें, अलि पिती मधु तद्भव चांगलें,
उपवनांत मिळे तरुला जेंव, सुवदनावदनार्पित आसव २
बसुनिया सहकारलतेवरी, धरुनि पल्लव चंचुपुटांतरीं,
युवंजना मदनोदय सत्वरी, पिकमनीं कमनीयरवें करी ३

गमति वन्यलता तंव नर्तकी, विमल दंतरुची सुमनें निकीं,
भ्रमरझंकृति गायन तेंचि रे, किसलयें सलयें कर ते बरे ४
बहुत शुभ्र विधूपरि जे मधू, पिउनि पाजिति तें पतितें वधू,
मदनदीपन त्या करिती मनीं, सुनयनानयनान्तविलोकनीं ५
बहुत कृष्ण अशा अलिसंहती, जंव फुलावर येउनि बैसती,
तंव वनस्थलि रम्य दिसे कशी, न तिलकें तिलकें प्रमदा जशी ६
कुसुमिता विलसे नवमालिका, मदसुगंधि सुपल्लवयुक्तका,
निरखितां युवतीपरि सत्वरी, नर तिला रतिला धरि अंतरीं ७
बहुत लाल नव्या चुनडया बऱ्या, श्रुतिसमर्पित ज्या यवमंजऱ्या,
तशिच ऐकुनि ती पिककूजितें, नरमणी रमणीजित होति ते ८
तरुचिया कुसुमांतिल धूलि ते, वनरमामुखशोभनचूर्ण तें,
अलितती तंव जाय तयाकडे, उपवनीं पवनीं वर जें उडे ९
“ न दवडा रमुनी वय साजणी, नचि मिळे जर जाय हतांतुनी, ”
पिकरवें जणुं ऐकुनिया मता, स्मरमती रमती तंव योषिता ! १०

इंदुमतीच्या स्वयंवराकरितां **भोज**राजाच्या वाड्यांतील सभामंडपांत राजसमूह जमला त्याचें व **अजा**चें वर्णन.

स्रग्धरा.

पंक्तीनें बैसलेले विलसति सुरुची ते हजारोंहि राजे
राजश्री एक ती तों बहुविध बनुनी वेगळाली विराजे;
त्यांची ती दीप्ति दिव्य प्रकट निरखुनी दीपती लोकनेत्र
मेघौघामाजि वीज स्फुट चमकुनिया दीपवी जेविं चित्र १

शार्दूलविक्रीडित.

राजव्रात सुवेषधारक महासिंहासनीं बैसला
त्या सर्वांतहि तेथ पुत्र रघुचा तो फार तै शोभला;
लोकाभीष्टपदार्थदानमृदु जे विख्यात देवद्रुम
त्या सर्वांमधिं पारिजात दिसतो, जैसा बहू उत्तम २

पुष्पांचे तरु सर्वही त्यजुनियां, भृंगी जशा कां वनीं
हत्तींच्यां मदयुक्तमस्तकिं जवें त्या बैसती जाउनी;
तैशा दृष्टि समस्तही पुरगता लोकांचिया सत्वरीं
टाकोनी सकलां नृपांस, पडल्या झाल्या अजाच्या वरी ! ३

इन्दुमतीचें वर्णनः—

शार्दूलविक्रीडित.

ती अत्यद्भुत रम्य सृष्टि विधिची कन्यास्वरूपी नवा
जी कां योग्य समस्तलोकनयनां पाहावया तेधवां;
राजांचीं हृदयें उडोनि पडलीं सारिहि तीच्यावरी
तैं सिंहासनिं देह मात्र उरले, झाली स्थिती यापरी ! १

राजांच्या शृंगारचेष्टांचें वर्णनः—

शार्दूलविक्रीडित.

होता नीट किरीट मस्तकिं जरी स्थानावरी सुस्थित
बाजूला सरला असें मिष मनीं कल्पूनिया निश्चित;
सद्रत्नान्वित मुद्रिका चमकती बोटांमधें त्या करें
लीलेनें मुकुटा जपूनि धरिलें एकें धराधीश्वरें १

स्रग्धरा.

शेला एके नृपाचा त्वरित सरकुनी स्कंधदेशावरूनी
खालीं येवोनि बैसे भुजगतविमला अंगदा आटकोनी;
लीलेनें रम्य वक्त्रांबुज फिरवुनियां बाजुला त्या नृपानें
स्वस्थानीं स्थापियेला पुनरपि धरुनी आपुल्या तो करानें २

अज व इंदुमती यांची पाणिग्रहणाच्या वेळची स्थितिः—

शार्दूलविक्रीडित.

कांटा दाट अजाचिया मनगटा तेव्हां उभा राहिला,
स्निग्ध स्वेदहि येइ इन्दुमतिच्या दिव्यांगुलीला भला;
ऐसा सात्विकभाव रम्यमदनें बांटोनि द्वोघांमधीं
या वेळीं दिधला, अशा करिति तैं तर्कास गंभीरधी १

अन्योन्यास पहावयास उभयां वाटे मनीं लालसा,
तें चोरूनि हळूच यत्न करिती पहावयाला जसा;
दृष्टादृष्ट घडे तई विरमुनी खालीं बघूं लागती,
संकोचें रमणीय फारचि दिसे तल्लोचनांची स्थिति ! २

अज इन्दुमतीला घेऊन जात असतां मार्गांत आड आलेल्या शत्रूंशीं त्याचा भयंकर संग्रामः—

स्रग्धरा

रखाराशीं स्वार तसे करिवर करिशीं, भांडती थोर वेगें,
पत्तीशीं पादगामी मिसळुनि, वहिले हाणिती शस्त्रयोगें;
अन्योन्याचे समोर प्रबलतर रथी धांवुनी भांडती ते,
तुल्याशीं तुल्य ऐसें निरखुनि करिति जाहले संयुगातें १.

शार्दूलविक्रीडित.

घोडयाचे खुर आपटोनि सहसा धूळी रणीं ऊठली,
वेगें स्पंदन धांवती म्हणुनियां मध्येंतरीं दाटली;
हत्तींचे श्रुतिताल लागुनि नभीं अत्यंत विस्तारली,
ती अन्तःपटसी बनूनि रविला आच्छादिती जाहली ! २
रक्तानें भिजुनी दबूनि बसलीं सारीं रजें खालचीं,
तेव्हां जीं उरलीं वरीं तदुपरी ही कल्पना बुद्धिची;
जें भूमीवरि लाल शोणित गमे निर्धूम अंगार तो,
धूळी जी वर तोच धूर पहिला व्योमास जो व्यापितो ! ३
बाणीं तोडियलीं शिरेंचि दिसतीं जेथें फळें चांगलीं,
डोक्यांच्या पगडया तुटोनि पडल्या तीं पानपात्रें भलीं;
बाहे शोणित तेंच मद्य गमलें, या हेतुनें केवळ
शोभे तें रण मृत्युचें तंव जणूं विस्तीर्ण पानस्थल ! ४
खड्गानें शिर कापिलें स्वरिपुनें, तें तो विमानीं बसे,
वामांकावरि ज्याचिया सुरुचिरा देवांगनाही असे;
ऐसा तो अतिहर्षनिर्भरमना पाहे रणाच्या कडे,
तों त्याचाच कबंध नृत्य करितां त्याच्याच दृष्टी पडे ! ५

अज इन्दुमतीविषयीं विलाप करतोः—

वसंततिलक.

एकांतिची सहचरी तव मेखला ही
ती ही अतां मधुर शब्द करीत नाहीं;
याचे बरोनि मज हे करभोरु, भासे
कीं ती तुझ्याचि विरहें मृत जाहलीसे ! १
त्वां मंजुळ स्वर दिला सखये पिकांस
हंसीस मंदगति, दृष्टि चला मृगास;
वातें वनांत डुलती लतिका सुरेख
त्यां हावभाव दिधले रमणीय देख २
मातें घडो सुख म्हणोनिच पाठिमागें
या या स्थळीं स्वगुण ठेवियले तुवां गे !
त्यांनीं मला सुखविजे परि तेचि प्राहीं
आतां मदीय तनुची करितात लाही ! ३

शार्दूलविक्रीडित.

देखे हीं सहकार आणि फलिनी बागामध्यें संप्रती,
या दोघांस परस्परें सुचतुरे त्वां कल्पिली दंपती;
त्यांचें मंगलकार्य हें न करितां गेलीस लोकांतरीं,
हें आहे करणें तुझें उचित कीं ? सांगे मला सुंदरी ! ४
झाली ध्वस्त रती, धृतीहि सकला अस्ताचला पावली
संपे गायन, उत्सवीहि ऋतुच्या नाहीं रुची राहिली;
तैसें कारण अल्प ही न उरलें या भूषणांचें स्वतां
शय्या शून्यचि जाहली मम अये जी जाळिते पाहतां ! ५
तूं माझ्या असशी धनीन घरची मंत्री विचारांतली
एकांतातिल मित्र शिल्पकृतिची गे पट्टशिष्या भली;
ऐशी तूं, तुजला दयारहित या दैवें बळें हारितां
नेलें सर्वहि काय शेष उरलें तें तूं वदे तत्वतां ! ६

रामचंद्रानें लोकापवादास्तव **जानकीचा** त्याग करण्याचा निश्चय करून **लक्ष्मणास** बरोबर देऊन तिला अरण्यांत पाठविलें. तेथें **रामाज्ञे**-प्रमाणें जानकीला सोडून **लक्ष्मण** परत येऊं लागला त्यावेळेस **राम**-**चंद्रास** कळविण्याकरितां **लक्ष्मणा**बरोबर तिनें निरोप पाठविला तो पहा:—

शार्दूलविक्रीडित.

माझें वाचिक हें नृपा कळविजे वत्सा, तुवां आदरें
अग्नीमाजि विशुद्ध होउनि पुन्हां बाहेर आलें बरें!
हें पाहोनि समक्षही करिसि तूं त्यागास माझ्या स्वतां
आहे हें उचित प्रभो! सुविदिता वंशास किंवा श्रुता? १
किंवा नीतिपथेंचि वर्तसि सदा केव्हां न इच्छावशें
त्यागाचा मम पाहतां तुजकडे तो दोष कांहीं नसे;
केलीं दुस्तर पातकें विविध जीं म्यां पूर्वजन्मान्तरीं
त्यांचा दुःसह पाक वज्रसम हा, ही गोष्ट आहे खरी! २
झाली प्राप्त तुला स्वयें सकलही लक्ष्मी, तरी तूं तिला
टाकोनी, विपिनांत जाशि नृपते, घेवोनि संगें मला;
आतां त्वद्भुवनीं तुझ्यासह मला देखोनियां सुस्थित
क्रोधानें बहु तप्त होउनि तिला सोसे न हें निश्चित ३
किंवा त्वद्विरहामुळें अफल हें जीवित्व झालें असे
वाटे फारचि तुच्छ यास्तव मला आशा तयाची नसे;
पोटीं त्वद्भव गर्भ हाचि अडवा येतो म्हणोनि स्वतां
सोडाया भय वाटतें प्रभुवरा! अन्नोदका तत्वतां ४
झाल्यानंतर मी प्रसूत रविच्या बिंबाकडे लावुनी
दृष्टी, दुस्तरशा तपासि करिजे आहे असें मन्मनीं;
जेणें तूंचि पती मला मिळशिल प्राणप्रिया! आणखी
भावी जन्मिहि, तेविं त्या अविरहें राहीन भूपा सुखी! ५
सद्वर्णाश्रमपालन प्रभुवरा, हा धर्म राजाप्रती
आहे वास्तव उक्त थोर मनुनें, तूं जाणशी निश्चिती;

आहे संप्रति मी जरी त्यजियली नाथा ! महाकाननीं;
तत्रापि क्षितिनायका ! मज तपस्व्यांच्या गणीं तूं गणी ! ६

गणेशशास्त्री लेले.

काव्याचे प्रकार.

काव्याचे तीन प्रकार आहेत. एक **उत्तम** म्हणजे **ध्वनिकाव्य;** दुसरें **मध्यम** किंवा **गुणीभूतव्यंग्य;** आणि तिसरें **कनिष्ठ.**

उत्तम किंवा ध्वनिकाव्य.

ज्या काव्यांत व्यंग्यार्थाला प्राधान्य असतें तें **उत्तम** किंवा **ध्वनि काव्य** ज ावें. जसें:—

गीति.

विरह तुझा सखया.मज, चिरकाल शके न ताप द्यायाला,
जरि जाशिल तरि जावें; शंकाहि नको मनांत यायाला ! १

अलंकारविकाश.

प्रवासाला निघालेल्या नायकाप्रत ही नायिकेची उक्ति आहे. येथें 'चिरकाल शके न ताप द्यायाला' या शब्दांनीं 'तूं जर गेलास तर मी वांचणार नाहीं; याकरितां जाण्याचा विचार सोडून दे.' असा **व्यंग्यार्थ** नायिकेनें सुचविला आहे. या **व्यंग्यार्थाचा उत्कर्ष** प्रस्तुत पद्यांत असल्यामुळें हें **उत्तम काव्य** होय.

परलोकवासिनी नायिकेप्रत कोणी विरही म्हणतो:—

शिखरिणी.

तुझें जाणें प्राणेश्वरि ! समजुनी स्वर्गभुवनीं,
अलापांतें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं;
निमाली चिंताही सकल कमलांची अजि अहा !
शशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि पहा ! १

पद्यरत्नावली.

'हे प्रियालापिनि प्रिये ! तुझें भाषण कोकिलेच्या संलापापेक्षां मधुर होतें; तुझे नेत्र कमलांपेक्षां प्रफुल्लित होते व तुझें मुख चंद्रापेक्षां

अधिक आल्हाद देणारें होतें.' असा या पद्यांत **व्यंग्यार्थ** आहे; व तोच विशेष चमत्काराव्रह असल्यामुळें हें **उत्तम काव्य.** शकुंतला सासरीं जाऊं लागली त्यावेळीं **काश्यपमुनीनें** दुष्यंतराजाला कळविण्याकरितां **शार्ङ्गरवाजवळ** निरोप सांगितला तो असाः—

गीति.

आम्हीं संयमधन मुनि, असे तुझें तेंवि फार उच्च कुल;
कन्येनें स्वयमेव प्रणय तुला दाविला अढळ अतुल १
याचा विचार करुनी स्वीकारावें हिला तुवां, आर्या!
संमानावें निजगृहधर्मी जेवी निजा दुज्या भार्या २
पुढच्या गोष्टी असती प्रारब्धाधीन सर्वथा, नृवरा!
त्याविषयीं कन्येच्या आम्हां आप्तांस मूकभाव बरा ३

स्वकृत.

यांतील **व्यंग्यार्थ** असा आहे: 'हे राजा, आम्ही वेदाभ्यासजड तपस्वी आहों असें समजण्याचें कारण नाहीं. दंड व प्रसाद करण्याचें सामर्थ्य आमच्यांत आहे. **शकुंतलेचा** स्वीकार न करशील तर तुझें शासन करण्याची धमक आमच्यांत आहे. तिचा स्वीकार करशील तर तुजवर प्रसाद करून तुझें कल्याण करण्यासही आम्ही समर्थ आहों. तूं कुलीन आहेस; यास्तव एकाएकीं तूं अकार्यप्रवृत्त होशील असें वाटत नाहीं. तथापि कदाचित् **शकुंतलेचा** त्याग करण्यास प्रवृत्त झालास तर त्यांत तुझ्या कुलाच्या यशाची हानि आहे, ही गोष्ट लक्ष्यांत ठेव. **शकुंतला** भावडी आहे. तिला वंचना ठाऊक नाहीं. तूं महानुभाव आहेस असें वाटल्यावरून तिच्या मनांत तुझ्याविषयीं शुद्ध प्रेम उत्पन्न झालें. त्या प्रेमाला वश होऊन आमचा कोणाचाही विचार न घेतां तुझी धर्मपत्नी होण्याकरितां पूर्ण विश्वासानें तिनें आपलें मन सर्वस्वी तुझ्या स्वाधीन केलें. यास्तव तिची वंचना करणें तुला योग्य होणार नाहीं. आमचें मागणें कांहीं फार व अयोग्य नाहीं. तूं हिचा स्वीकार करून तुझ्या दुसऱ्या चार स्त्रिया आहेत तशी ही आणखी एक समज. एवढेंच

आमचें ह्मणणें आहे. महिषीपद मिळणें न मिळणें ही गोष्ट तिच्या भाग्यावर किंवा तुमच्या परस्पर प्रेमोत्कर्षावर अवलंबून आहे. आम्हीं मुलीचे आप्त पडलों. ती पट्टराणी व्हावी अशीच आमची इच्छा असणार. पण ज्या गोष्टी आमच्या इच्छेवर अवलंबून नाहींत; किंबहुना मुलीचे पक्षपाती. पडल्यामुळें ज्या गोष्टी बोलण्याचा अधिकार लौकिकदृष्ट्या आम्हांस पोंचत नाहीं, त्या गोष्टी आम्हीं बोलून दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं.' येथेंही **व्यंग्यार्थाला प्राधान्य** असल्यामुळें **ध्वनिकाव्य** होय.

कर्पूरमंजरीसट्टकामध्यें दुसऱ्या **जवनिकेंत** विदूषक राजाला म्हणतो:

'**मरकतपुंज** म्हणून जो पांचेचा बंगला तो हाच बरें. तर येथें प्रियवयस्यानें तिची (**कर्पूरमंजरीची**) वाट पहात बसावें आतां. **संध्याकाळही होत आला आहे** !'

'संध्याकाळही होत आला आहे!' यांत **कर्पूरमंजरी**ची व तुझी भेट होण्याचा समय जवळ आला आहे असें विदूषकानें राजास ध्वनित केलें आहे. येथें **ध्वनीचें** सौंदर्य **वाच्यार्थास** तिरस्कृत करतें यास्तव **उत्तम काव्य** झालें.

मृच्छकटिकांत दुसऱ्या अंकांत **वसंतसेनेजवळ कर्णपूरक** कांहीं चमत्कारिक वृत्तांत सांगत असतां म्हणतो:–

'इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, त्या दाटींत एक पुरुष होता; त्यानें कर्ण, मणगट, कंठ इत्यादि जीं भूषणस्थानें तीं चांचपून पाहिलीं तों तेथें कांहीं नाहीं ! मग खिन्न झाल्यासारखा होऊन त्यानें आकाशाकडे पाहून दीर्घ श्वास सोडला आणि आपल्या आंगावरचा शेला काढून माझ्या आंगावर टाकून दिला ! तो हा शेला पहा !'

येथें भूषणस्थानें शून्य झालेलीं पाहून खिन्न होणें व दीर्घश्वास सोडणें इत्यादि वर्णनावरून **चारुदत्ताची** (हाच येथें वर्ण्य पुरुष आहे) दानशीलता व दानशूरता हीं **व्यंजित** झालीं आहेत. फलपुष्पादिसमृद्धि अभ्यागतास अर्पण करून शुष्क झालेल्या वृक्षाची स्थिति जशी त्याच्या दानशूरत्वाची साक्ष देऊन त्याविषयीं संभ्रम अनुकंपा उत्पन्न करिते; तद्वत् प्रस्तुतस्थलीं-

सर्वस्व दान करून गतश्रीक झालेल्या **चारुदत्ताची** चारुतर पण अनुकंप्य स्थिति सहृदयाला द्रव आणते !

'**विदूषक**–हें काय? अरे तुम्हां दोघांस येथेंच सूर्यास्त झाला काय !'

विक्रमोर्वशी.

पुरूरवा व **उर्वशी** हीं परस्परांवर अनुरक्त झालीं आहेत असें पाहून त्यांजप्रत ही विदूषकाची उक्ति आहे. या उक्तींतील **व्यंग्यार्थ** स्पष्ट आहे. **व्यंग्यार्थाला प्राधान्य** असल्यामुळें येथेंही **उत्तम काव्य** होय.

'**कपिंजल महाश्वेते**ला म्हणतोः–हे राजपुत्रि ! हा मोठाच कालातिक्रम प्राप्त झाला ! आणि सूर्यनारायणही अस्तास चालला ! '

कादंबरीसार.

पुंडरीकाची अवस्था फार कठिण आहे; आणि म्हणूनच अनुपेक्षणीय आहे; त्याला त्वरित भेटून प्राणदान करण्याचा हा समय आहे. शिवाय मुनिजनाला संसेव्य असा संध्यावंदनकाळही प्राप्त झाला आहे. तेव्हां मला गेलें पाहिजे. असे दोन्ही अर्थ **कपिंजलाच्या** वरील उक्तींत ध्वनित झाले आहेत. **ध्वन्यर्थाचा उत्कर्ष** असल्यामुळें येथें **उत्तमकाव्य** झालें.

उपजाति.

विध्युक्त संकल्प करोनि पाणी, घालू म्हणे पूजुनि चक्रपाणी;
निघे न झारींतुनि नीरबिंदु, म्लानत्व पावे बळिचा मुखेन्दु ! १

वामनचरित्र.

बळी वामनाच्या हातावर दानोदक घालूं लागला तों झारींतून पाणीच पडेना, तेव्हां **बळीला** फार वाईट वाटलें; हा या श्लोकाचा **वाच्यार्थ** आहे. परंतु **बळीची** सत्यप्रतिज्ञता व दानाविषयीं अत्युत्सुकता हीं यांत **व्यंजित** झाली आहेत. या **व्यंग्यार्थामुळें** प्रस्तुत पद्यास फारच शोभा आली आहे, तेव्हां येथेंही **उत्तमकाव्य** होय.

मध्यम काव्य

ज्यांत **वाच्यार्थापेक्षां व्यंग्यार्था**चा अधिक चमत्कार नसतो तें **मध्यम किंवा गुणीभूतव्यंग्य काव्य** होय.

साकी.

'सखे, प्रीतिच्या कलहें जणुं तूं मजवरि फार रुसोनी
बसलिस ऐसें चित्र शिळेवर रंगांनीं काढोनी १
समजावाया ठेवु लागतों जों पायावरि डोई
अश्रुभरें तों नयन भरूनी दिसेचनासें होई ! २
किती दुष्ट तरि दैव असावें न शके बदावया हें
याहि परीची, सखे, आपुली भेट जयांस न साहे !' ३

या कै० **चिपळुणकरांच्या मेघदूतांतील** साक्या आहेत. यांत **यक्षाच्या** विरहव्यथेचा अनिवारपणा **व्यंजित** झाला आहे. तरी पण दैवनिंदारूप जो **वाच्यार्थ** त्यापेक्षां प्रस्तुत **व्यंग्य** अधिक सुंदर नाहीं. ह्मणजे **व्यंग्यार्थ** व **वाच्यार्थ** येथें सारखेच चमत्कारिक आहेत. यास्तव हें **मध्यमकाव्य** होय.

शिखरिणी.

कवींद्रांचीं स्तोत्रें सुरस भरलीं ज्यांत असतीं,
अशा त्या कर्णांच्या निकट नयनें दोन असतीं;
विलोकोनी त्यांतें नयन तिसरें भालगत तें,
असूयेनें जाणों, हिमनगसुते ! लाल दिसतें १

स्वकृत सौंदर्यलहरी.

या श्लोकांत **भगवती आदिमाया** हिचें वर्णन आहे. पूर्वार्धांत **भगवतीची** अद्वितीय स्तुतिपात्रता हें **व्यंग्य** आहे. पण उत्तरार्धांत या व्यंग्यावर उभारलेली **हेतूत्प्रेक्षा** अत्यंत सरस असल्यामुळें **वाच्यार्थालाच** प्राधान्य आलें आहे व **व्यंग्य गुणीभूत झालें आहे.** यास्तव येथेंही **मध्यम** अथवा **गुणीभूतव्यंग** काव्य समजावें. या काव्याला **गुणीभूतव्यंग** असें म्हणण्याचें कारण असें कीं, यांत **व्यंग्य गुणीभूत** म्हणजे **अप्रधान** असतें; **वाच्यार्था**वर सरशी करणारें नसतें. यामुळें **मध्यम** काव्यांत **व्यंग्य वाच्यार्थाच्या** बरोबरीनें किंवा **वाच्यार्था**पेक्षां कमी चमत्कार उत्पन्न करणारें असें असतें. दोन्ही प्रकारचीं उदाहरणें वरतीं दिलीं आहेत.

अधम काव्य.

ज्यांत शब्द किंवा अर्थ किंवा शब्द आणि अर्थ हे सुंदर असतात ण व्यंग्य मुळींच नसतें तें अधम काव्य होय. याला अवर, कनिष्ठ, अव्यंग्य किंवा चित्र असेंही म्हणतात.

शार्दूलविक्रीडित.

या भूपें पण जिंकिला उभविलें कोदंड चंडाकृति,
महोद्दंड उदंड दंड करितो शाबास माझी धृती;
डोले बोलत बोल तो न धरवे गेलाचि झोलां भला,
आलें चाप अपाप त्यावरि उरीं तो भूतला पातला ?
आला भूमितळासि गर्वपुतळा पिंजारुनि कुंतला,
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उच्छृंखळा,
सर्वांगींच कळा विटे मुखकळा झाल्या भुजा पोकळा,
वाजे ऊरगळा स्वदेह सगळा झिंजाडिता आगळा ?

या पद्यांत आनंदतनयानें रावणाची शिवधनुर्भंग करतांना उडालेली तारांबळ रेखाटली आहे. यांत अर्थाच्यापेक्षां शब्दाचेंच वैचित्र्य विशेष आहे. व्यंग्य कांहींच नाहीं; यास्तव हें अधम काव्य.

शिखरिणी.

मुखाचें सौंदर्य क्षितिधरसुते ! दाटुनि तया,
नसे कोठें मार्ग त्वरित निघण्याला म्हणुनिया;
असे भांगाचा हा नहर रचिला कीं भगवति !
असें काव्यामाजी निपुण कवि निःशंक वदती ! ?

स्वकृत सौंदर्यलहरी.

येथें भगवतीच्या भांगावर नहराची उत्प्रेक्षा केली आहे, ती फार समर्पक आहे. तिच्यामुळें वाच्यार्थ फार सुंदर झाला आहे. वाच्यार्थाशिवाय येथें दुसरी सौंदर्याची सामग्री कांहीं नाहीं. यास्तव येथेंही अधम काव्य जाणावें.

शार्दूलविक्रीडित.

देहातें विसरे, न मृत्युस गणी, हांसेहि, नाचे, रडे,
लज्जा जाय, नुरेचि रीति पहिली, अन्याचि आंगीं जडे;

हें पानव्यसनीं असे सुख, तरी तें कीर्तिपानीं घडे,
पायीं विघ्न पडे, न जाय नरकीं, कां मद्यपा नावडे ? १

मोरोपंत कृष्णविजय.

यांत भगवत्कीर्तिपान व मद्यपान यांचें चमत्कारिक साम्य वर्णून शेवटीं व्यतिरेकानें भगवत्कीर्तिपानाचें अलौकिक माहात्म्य सुंदर रीतीनें व्यक्त केलें आहे. येथें व्यंग्य नाहीं व शब्दचमत्कारही म्हणण्यासारखा नाहीं. केवळ अर्थ सुंदर आहे म्हणून हें। अधम काव्य होय. अर्थसौंदर्याचीं आणखी कांहीं उदाहरणें: —

मालिनी.

तरुवर सुफलांच्या आगमें नम्र होती,
जलदहि जलभारें खालतीं शीघ्र येती;
सुपुरुष विनयातें भाग्यकालीं धरीती,
उपकृति करित्यांची जाणिजे हेचि रीति १

प. गो. कृ. शाकुंतल.

वसंततिलक.

हें पांखरूं मजसि येइल काय कामा,
ऐसें नृपा ! न वद, पूरितलोककामा;
मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारीं,
छाया करी तपनदीप्तिस ही निवारी २

नलोपाख्यान.

गीति.

क्षुद्रा पशुपक्ष्यांची काय कथा, पांचही महाभूतें,
ज्ञानवळें आकळुनी, केलें मनुजें स्वदाससम त्यांतें १
विसरोनि परस्परांचा विरोध जलवन्हि सेविती त्यांतें,
दासापरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें २
त्यांचीं वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटितीहि नौकांतें,
बहु सांगणें कशाला ? करिती तो सांगतो तयां तें तें ३

मोठे मोठे तरुवर मोडी, फोडीहि जी शिळाराशी,
विद्युल्लता, नरें ती केली संदेशहारिका दासी! ४

कृ. शा. चि. कृ. विद्याप्रशंसा.

शब्द आणि **अर्थ** हीं दोन्हीं ज्यांत **सुंदर** आहेत अशा काव्याचीं उदाहरणें:—

गीति.

ऐसें जों कर्णाशीं शल्य वदे तोंचि शीघ्र त्या सेना,
मिळतीं मारणमरणांहूनि दुजें अधिक ज्यांस भासेना १.
कुरुपांडवसेनांशीं होतां संग्राम रामशिष्यमणी,
गजयूथावरि हरिसा, धावे मारी अनेक वीरमणी २
अरि एक बाण हाणी तों हाणी कर्ण. शर तया तिपट,
निपट प्रत्युपकृतिपटु ज्यांकी रिपु पसरुनि स्वहेतिपट ३
काढी, जोडी, ओढी, सोडी शर कर्ण लाघवास्तव तें
न दिसे, दिसे शरासन, मंडलहत शत्रुबळहि त्या भवतें ४
हतनरतुरगगजांच्या, रक्ताची गुरुतरंगिणी वाहे,
साक्षात् सरस्वती ती स्वर्गजन जिच्या निमज्जनें लाहे ५
रक्तनदीच्या स्नानें पानें गंधेंहि वीर ते भुलले,
दिसती बसंतसमयीं किंशुकतरु कटककाननीं फुलले! ६

मोरो० कर्णपर्व.

येथें **शब्द** व **अर्थ** यांची, सहृदयाच्या अंतःकरणरूप किल्ल्याची तटबंदी उडवून देण्याच्या कामीं, परस्पर स्पर्धाच लागली आहे असें वाटतें! आणखी एक उदाहरण:—

शार्दूलविक्रीडित.

छाया नायकसा निदाघसमयीं छाया करी तो विधू,
वायां या हृदया श्रमासि करितो दायादसा हा मधू;
जाया जे रुचली मनीं, तिजकडे जाया न ये कीं पहा,
रायाला न गमे न जाय रजनी आयास होती महा! १

रघुनाथपंडित–नलोपाख्यान.

यांत नलाची विरहास्थिति वर्णिली आहे.

भाग तिसरा.

स्थायिभाव.

प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत **रति, हास्य, शोक, क्रोध, भय, उत्साह, जुगुप्सा** (चिळस) **विस्मय** आणि **निर्वेद** (वीट) असे नऊ विकार बीजरूपानें सिद्ध असतात; त्यांस **स्थायिभाव** असें म्हणतात. त्यांना चिरस्थायित्व असतें म्हणून त्यांना हें नांव दिलें आहे.

विभाव.

रति, हास्य इत्यादि **स्थायिभावांस** जीं **कारणें** ते **विभाव** होत. हे दोन प्रकारचे आहेत: **आलंबन विभाव** व **उद्दीपन विभाव.** जसें **हास्यरसास आलंबन** (आश्रय) **विदूषकादि;** आणि **उद्दीपन** (वाढविणारे) चित्रविचित्र वेष, भाषण, चेष्टा वगैरे.

अनुभाव.

रत्यादिकांचीं जीं **कार्यें** ते **अनुभाव** होत. यांना **सात्विकभाव** असेंही म्हणतात. ते येणेंप्रमाणें आहेत: **स्तंभ** [ताठणें], **प्रलय** [मुर्च्छा], **रोमांच** [कांटा], **स्वेद** [घाम], **अश्रु, वैस्वर्य** [स्वर बदलणें], **वैवर्ण्य** [रंग पालटणें] आणि **कंप.**

व्यभिचारिभाव.

कार्योत्पत्तीला साहाय्य करणाऱ्या विकारांना **व्यभिचारिभाव** असें म्हणतात. हे **स्थायिभावांसारखे** स्थिर नसून सर्व रसांत वाटेल तसे यथासंभव मिसळतात म्हणून यांस **व्यभिचारिभाव** किंवा **संचारिभाव** असें नांव प्राप्त झालें आहे. हे **व्यभिचारिभाव** एकंदर तेहेतीस आहेत. ते असे:—१ **निर्वेद** (हा **शांतरसांत** स्थायिभाव असतो तथापि **शृंगारादि** अन्य रसांत व्यभिचारी होतो), २ **ग्लानि,** ३ **शंका,** ४ **असूया** (**मत्सर**), ५ **मद,** ६ **श्रम,** ७ **आलस्य,** ८ **दैन्य,** ९ **चिंता,** १० **मोह,** ११ **स्मृति,** १२ **धृति,** १३ **व्रीडा** (लज्जा), १४ **चापल्य,** १५ **हर्ष,** १६ **आवेग**

[उमाळा], १७ जडता, १८ गर्व, १९ विषाद, २० औत्सुक्य, २१ निद्रा, २२ अपस्मृति [अपस्मार. विरहावस्थेंत याचा संभव असतो.], २३ सुप्ति [झोंप], २४ प्रबोध [जागेपण], २५ अमर्ष [दुसऱ्याचा अहंकार शमविण्याची उत्कट इच्छा], २६ अवहित्थ [विकार लपविणें], २७ उग्रता २८ मति [विवेकशक्ति, न्याय, विनय इ०], २९ व्याधि [मनोविकारापासून उत्पन्न होणारे रोग], ३० उन्माद [भ्रम], ३१ मरण, ३२ त्रास [भय] आणि ३३ वितर्क [विचार, तर्क.] यांशिवाय आणखीही कांहीं व्यभिचारिभाव कोणी कोणी मानले आहेत.

रस.

विभाव, अनुभाव व व्यभिचारिभाव यांनीं व्यंजनावृत्तीनें (हृद्यांत) व्यक्त केलेला जो स्थायिभाव त्याला रस म्हणतात.

शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र आणि शांत असे मुख्य नऊ रस अलंकारिकांनीं मानले आहेत. यांचे स्थायिभाव अनुक्रमें रति, उत्साह, शोक, विस्मय, हास्य, भय, जुगुप्सा [किळस], क्रोध आणि निर्वेद किंवा शम असे आहेत.

शृंगार.

तरुण आणि अनुरक्त अशा स्त्रीपुरुषांच्या परस्परांच्या प्रेमाला रति हें नांव आहे. रति हा स्थायिभाव विभादिकांनीं पुष्ट झाला ह्मणजे शृंगार रस व्यक्त होतो.

संभोगशृंगार आणि विप्रलंभशृंगार असे शृंगारांत दोन प्रकार आहेत.

संभोगशृंगार.

जेथें नायक व नायिका यांचा समागमप्रसंग वर्णिला असतो तेथें संभोगशृंगार होतो.

आपल्या बाहूचा अवलंब करून जानकीला झोंप लागली असें पाहून रामचंद्र म्हणतोः—

शिखरिणी.

गृहाची ही शोभा तशि अमृतवर्षीच नयनां,
असे ही श्रीखंडा परिस सुखदस्पर्श ललना;

हिचा कंठीं बाहू मृदु शिशिर मुक्तासर पहा,
हिचें सारें आहे प्रिय परि न साहेंचि विरहा ! १

उ. रा. च. अं. १

येथें **जानकी आलंबनविभाव,** एकान्त व उपवनशोभा **उद्दीपनविभाव,** बाहुस्पर्श **अनुभाव** व हर्ष हा **व्यभिचारिभाव** आहे. यांनीं रति हा **स्थायिभाव** परिपुष्ट होऊन **शृंगार** व्यक्त झाला. प्रस्तुत श्लोकांतील **शृंगार** किती मधुर व समर्याद आहे !

मोरोपंतांनीं कृष्णविजयामध्यें रुक्मिणीविनोद वर्णिला आहे तो प्रसंग असाच सुंदर आहे. यास्तव त्याचा उतारा खालीं देतों.

स्रग्धरा.

पर्यंकीं आपुल्या स्वप्रियतम असतां एकदा त्यास देवी
वैदर्भी चामरातें धरुनि लसदुरोहार ढाळूनि सेवी;
' मी धन्या वल्लभा कीं मजजवळि वसे नित्य ' ऐसेंचि मानी,
साक्षी तत्काळ जाणे करि कुतुकनिधि श्रीश तद्गर्वहानि १

पृथ्वी.

म्हणे विभु, नृपात्मजे ! गुणवती अशी तूं बरी,
नसें उचित मी पती, गति मतिभ्रमें ही खरी !
स्वरूप अनुरूप तूं सुमुखि ! भूप आतां तरी,
वरीं, हित चुके जरी कुशल तें पुन्हां सांवरी २

स्वदोष बहु दाखवी, गुण धराधवाचे वदे,
सतीस ' चुकलीस तूं ' म्हणुनि ताप तो देव दे;
नवीन कटु शब्द ते सकळ काळजा लागती
सुतप्त-शरसे मनीं, समजली निज त्याग ती ३

शिखरिणी.

जयीं ती श्रीमूर्ति श्रवणकटु अत्यंत वदली,
पडे जैसी वातें फलदलभराक्रान्त कंदली;

स्वयें मूर्च्छामग्ना उचलुनि सती सांत्वन करी,
जसें पंकोद्धारें करुनि करिणीचें वनकरी. ४

शार्दूलविक्रीडित.

वैदर्भीस म्हणे प्रियंवद अहो ! मच्छब्द जे हे तुतें,
झालि तापकर प्रतप्तशरसे मूर्च्छेसही हेतु ते,
कांहींही मृदुमानसे ! तव मनें नाहींच कीं साहिलें,
म्यां केला परिहास हा सति ! कसी तूं कोपसी पाहिलें ! ५

पृथ्वी

कसें वदसि पाहसी चलकटाक्षमोक्षेक्षण,
प्रिये ! भृकुटिशोभि हें मुख तुझें पहावें क्षण;
असे अधरपल्लवस्फुरण लोचनीं शोणता,
गृही जन तयास या परिस लाभ तो कोणता ! ६
विनोदरससागरीं रमति मीनसे दंपती,
अशा कलहसांत्वनीं दिवसयामिनी संपती !
म्हणोनि परिहास हा सहज आजि केला लसे
तुझें मुख न, भीतिला न धरि नाथिक लालसे !

विक्रमोर्वशीयामध्यें पुरूरव्याची उर्वशीप्रत उक्ति आहे:—

मालिनी.

शशिकर सुख माझ्या तेचि गात्रास देती,
स्मरशर अनुकूल स्वान्तरीं तेचि होती;
सुमुखि ! विरस जें जें वाटलें वस्तु मातें
प्रिय सकळहि झालें संगमानें तुझ्या तें १

वामनपंडितांच्या भामाविलासाचा मासला पहा:—

नारदानें दिलेलें **पारिजातपुष्प कृष्णानें** रुक्मिणीला दिलें तें **सत्यभामेला** सहन झालें नाहीं, म्हणून ती **कृष्णावर** रुसली. त्या रुसव्याचें वर्णन प्रस्तुतपद्यांत आहे:—

कृष्णाला भामा म्हणते:—

शिखरिणी.

वदे भामां कोपें अति विकल चावूनि अधरा,
धरापृष्ठीं नाहीं ठक तुज असा अंबुजधरा !
धरावें या अंकीं शिर अजि तिचें पक्षिगमना,
मना आलें देणें कुसुम जिस तें कंसदमना १

वसंततिलक.

तों नेत्र मोडुनि वदे ढकलूनि मांडी,
भ्रूमंडलीं भ्रमण, अंगुलिभंग मांडी;
तो कृष्णजी करुनि हास्य म्हणे अहाहा !
वेडे ! अनर्थ इतुक्यास्तव कां महा हा २

स्वागता.

अर्पितां मुनिवरें सुमनातें, वाटलें प्रथम हेंचि मनांतें
कीं असा तरु पुरींत असावा, त्यांतही स्वसदनींच वसावा ३
फूल देउनि तिला उतराई, होइ मी समज हे चतुराई;
देतसें तरुचि तो तुजला गे, खेद हा न करणें तुज लागे ४

भुजंगप्रयात.

तुतें वृक्ष देणेंचि या लागि आधीं, फुलें नाशिला जो तिला होय आधी;
न जाणोनि केलें तुवां कष्ट भारी, समाधान ऐसें करी कैटभारी ५
अशी ते बुझावोनि रंभोरु हातें, तिच्या धूतसे हो मुखांभोरुहातें;
उटी लावुनी वाटल्या केशरा जी, स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी ६

मालिनी.

कारि हरि यमुना हो मूद गंगावनाची, मिरवि धवलपुष्पीं दीप्ति गंगावनाची;
सित असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी, तशिच यदुपतीनें घातली चित्रवेणी ७

उपजाति.

मुखेंदु शोभे बहु भामिनीचा, नीचा दिसे हा पति यामिनीचा;
नक्षत्रसेना जशि सिंधुजाची, ज्याची चमू मौक्तिकसिंधुजाची ८

विप्रलंभशृंगार.

अनुरक्त नायक व नायिका यांचा **विरह** जेथें वर्णिला असतो तेथें **विप्रलंभशृंगार** होतो.

मालतीच्या दर्शनानें उत्कंठित झालेला **माधव** म्हणतो:—

शिखरिणी.

निजें सौंदर्यें ज्या सहृदयमनाला रमविती
अशा संख्यातीत क्षितितलिं दुज्या वस्तु असती;
तथापि श्यामा ती जयिं निरखिली तोच मजला,
खरा जन्मामध्यें शुभ दिन असा एक गमला १

मालतीमाधव.

येथें **मालती आलंबन, मालतीदर्शनाचें** स्मरण व उद्यान **उद्दीपन-विभाव**, विलाप **अनुभाव**, **मालतीच्या** प्राप्तीविषयीं वितर्क, चिंता, औत्सुक्य, व इतर वस्तूंविषयीं निर्वेद हे **व्यभिचारिभाव**; या सर्वांनीं **रति** हा **स्थायिभाव** पुष्ट होऊन **शृंगार** सुव्यक्त झाला.

कृष्णानें सांत्वन करण्याकरितां पाठविलेल्या **उद्धवाला कृष्णविरहानें** व्याकुळ झालेल्या **गोपिका** ह्मणतात:—

गीति.

कुब्जेच्या भाग्याचा भारी भर आजि आमुचा सरला,
सरला असोनि आम्ही वक्रा, वक्रा असोनि ते सरला! १
उद्धवजी! केली कीं ती कुब्जा पूर्णकामना सजुनी,
त्यजुनि नवी रसिकाच्या मैत्री येईल कां मनास जुनी २
जेणें माय त्यजिली, दे बहु लालन करूनि उद्धव जी,
त्या आम्ही कोण? वृथा रुसतो मुग्धा ह्मणोनि उद्धवजी! ३

मोरोपंत–गोपीप्रेमोद्गार.

मुग्ध व मधुर **विप्रलंभशृंगाराचा** हा उत्कृष्ट नमुना आहे. यांत **पंतांनीं** आपलें अप्रतिम चातुर्य खर्ची घातलें आहे!

शाकुंतलांत तिसऱ्या अंकांत **शकुंतलेचा** विरह झाल्यावर **दुष्यन्ताची** उक्ति:—

वसंततिलक.

ही शेज हें मदनलेखनपत्र साचें,
हातांतलें गलित भूषण हें बिसांचें,

पाहूनियां वरुनि दृष्टिस काढवेना,
शून्याहि वेतसगृहांतुनि जाववेना ! १

परशुरामपंत गोडबोले.

मेघदूतामध्यें विरही **यक्ष** मेघाजवळ आपल्या प्रियपत्नीच्या **स्वरूपाचें** वर्णन करतो:—

साकी.

अंग जयेचें पातळ, रंग हि चंपकफुलासमान,
दंतपंक्ति कीं कुंदकळ्यापरि दिसते विराजमान १
जेविं तोंडलें पिकलें तेवीं ओंठ खालचा लाल,
विरहें असती शुभ्र जाहले जीचे नाजुक गाल २
विशाल चंचळ काळे डोळे जे कां विलासखाणी,
मनांत झुरती हरिणबालकें बघुनि तयाचें पाणी ३
मत्तगजापरि मंद चालणें, उणें न कोठें कांहीं,
विधिच्या हातुनि दुसरें ऐसें रूप उतरलें नाहीं ! ४

यापुढें तो **यक्ष** आपल्या प्रियेची विरहामुळें कशी स्थिति झाली असेल ह्याचें चित्र रेखाटतो:—

साकी.

घना, या खुणांवरुनि ओळखी अपुल्या, बा, वहिनीला,
मुख्य साहवा प्राणाचि आहे जी या मम शरिराला १
भाषण जींचें परिमित मंजुळ सरस आणि हितकारी,
मी नसल्यानें जवळ एकटी पडुनि झुरे जी भारी २
वर्षाकाळीं मज आठवुनि क्षणोक्षणीं दुःखानें,
वाळुनि गेली असेल जी बहु, नलिनी जेविं हिमानें ३
रडुनि रडुनियां सुजले डोळे असतिल खचित तियेचे,
उष्णश्वासें कोमल ओंठहि सुकले असतिल साचे ४
गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तें, कमलीं मधुकर जैसे ५

किंवा तूंची घना, झांकिशी जेवीं शशिबिंबाला,
तोंच साजते बरवी उपमा म्लान तिच्या वदनाला ६.
पहाशील तूं तिला कदाचित् देवांतें पुजितांना,
किंवा ध्याउनि माझी मूर्ती चित्रपटीं लिहितांना ७
असेल अथवा पिंजऱ्यापाशीं उभी पुसत मैनेला,
'कां गे आठवतो तुजला तो प्राणसखा रंगेला ?' ८
घेउनि हातीं सारंगी वा कालक्रमण कराया,
स्वयें रचियलीं मजविषयींचीं लागे गीतें गाया ९
तैं डोळ्यांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजोनि तार,
स्वयें घेतला मधेंचि विसरे अलाफ वारंवार ! १०

पद्यरत्नावली.

वीर.

विभावानुभावादिकांनीं उत्साह हा **स्थायिभाव** पुष्ट झाला असतां **वीररस** व्यक्त होतो. जसें:—

स्रग्धरा

दंतीं ज्यां देवदंती धरुनि मुरडिला शैल कैलास गाढा,
घेतां हस्तीं समस्तीं कडकडति कडे काय ती काळदाढा !
येथें या कांबिटाचा गरिमगुण किती प्रौढि ही कोण येणें
माझ्या गाजोनि भुजा हाणति मज असा कायसा यास घेणें ! १

आनंदतनय.

सीतास्वयंवरप्रसंगीं शिवधनुष्यासंबंधानें हीं **रावणाची** उक्ति आहे. येथें **शिवधनुष्य आलंबनविभाव, शिवधनुष्याच्या** भंगाचा पण हा **उद्दीपनविभाव, शिवधनुष्याचा उपहास** व तें लीलेनें मोडून टाकण्याविषयींच्या **वल्गना अनुभाव,** आणि **गर्व, धृति** इत्यादि **व्यभिचारिभाव** आहेत. यांनीं **उत्साह** हा **स्थायिभाव** पुष्ट होऊन **वीररसाची** उत्पत्ति झाली.

कर्णपर्वांत **कर्णाची शल्यांप्रत** उक्ति आहे:—

गीति.

कर्ण ह्मणे गुणवद्गुण जाणे गुणवन्त अगुण नेणेची,
प्रसवे तीच अभिज्ञा, शल्या तैशी न वांझ वेणेची १
पार्थ-वधाचें साधन, आहे तें सांगतों तुला जेणें,
आज द्वैरथयुद्धीं, विजयाचे प्राण निश्चयें घेणें २
आहे अहिमयसायक, मृदुचंदनचूर्णपूर्ण भात्यांत,
त्यावांचुनि शर दुसरा, नाहींच क्षोणिवल्लभा त्यांत ३
तो अहियशरोत्तम सोडुनि मी मेरूतेंहि फोडीन,
कवचाची काय कथा, पार्थी कीं केशवींच सोडीन ४
तूं झालासि कुदेशीं संगरपांडित्य काय तुज ठावें?
शल्या कल्याणगुणा पात्र जगीं पुण्यसंग्रहें व्हावें ५
भ्यालासि मूढबुद्धे बडबडशी फार वानिशी अरिला,
भाव तुझा मज कळला, धीर तुझा मृत्यूच्या भयें हरिला ६
ते मारितील मज कीं, त्याला मारीन मी स्वबळ जाणें,
कृष्णाला कर्ण न भी, तनु टाकुनि एकदा असे जाणें! ७
दोघांची काय कथा? जरि कृष्णार्जुन सहस्र येतील,
तरि माझे शर त्यांच्या प्राणधनातें हिरोनि घेतील! ८

मोरोपंत.

उत्तररामचरित्रांत रविकुलोत्पन्न वीरशिरोमणींशीं झुंज देण्याचा **कुशा**चा **उत्साह** वर्णन केला आहे:—

शार्दूलविक्रीडित.

देवेंद्रप्रमुखामरांस अभया देवोनि सांभाळिते,
संग्रामीं अपुल्या प्रतापशिखिनें शत्रूंसही जाळिते;
जे झाले रविच्या कुलांत नृपती वैवस्वतापासुनी,
त्यांशीं युद्ध घडेल, काय दुसरें धन्यत्व तें याहुनी! १

उ. रा. च. अं. ६.

शत्रुघ्नाशीं सामना करण्याकरितां **लव** समरभूमीवर सज्ज झाला त्या-वेळची त्याची स्थिति **आनंदतनय** वर्णितात:—

स्रग्धरा.

सांभाळी बाण माझा मग रघुपतिचें नाम गर्जोनि कर्णीं,
ओढोनी सोडि तेव्हां गगन गडगडी जेंवि वीजा सुवर्णीं;
जाती झांकोनि डोळे पडति हयतळीं वीर मूर्छित जाणें,
शत्रुघ्ना थोर चिंता मृतिसमयीं म्हणे रक्षिजे राघवानें १

अभिमन्यु धर्मराजाला म्हणतो:—

गीति.

व्यूहीं शिरेन शरसा, मागें परतेन एक पदही न,
युष्मत्पदप्रसादें होतिल युष्मत्सपत्न मदहीन १

मोरोपंत-अभिमन्युवधप्रकरण.

समरसिंह पार्थपुत्राच्या मुखांत हे शब्द किती यथार्थ आहेत! अभिमन्यु आपल्या सत्वशील ज्येष्ठपित्यापाशीं आणखी उत्साह प्रकट करितो:—

गीति.

सौभद्र म्हणे शिरतों व्यूहीं, डोहीं जसा मतंगज वा,
हरिपोत दंतियूथीं, कीं दहनीं करुनिया पतंग जवा ! १

या पद्यांत **मालोपमा** अलंकार आहे. शेवटल्या **उपमेनें** ' प्रसंग आला तर धारातीर्थी देह ठेवीन ' असें ध्वनित झालें आहे. ' मारीन किंवा मरेन ' हाच एकंदर अभिप्राय वरील पद्यांत व्यक्त झाला आहे- सोळा वर्षांच्या मुलाचा कोण दर्प हा ! केवढा अहंकार हा ! किती पौरुष हें !

पुढील आर्यांत पंतांच्या चातुर्याची सीमा दृग्गोचर होत आहे:—

गीति.

ज्येष्ठपित्याला देउनि अभय म्हणे तो सुवीर सूतातें,
' हूं हांक रथ, म्हणावी माय सुभद्रा सुवीरसू तातें, ' १
तो सूत सुमित्र म्हणे ' भो आयुष्मन् कुमार आपण कीं
हांकिन हरि अरिवरि परि कुरुगुरुशीं गांठि कठिण हा पण कीं, २
हांसुनि सौभद्र म्हणे 'हटकीन हटें रणांत भीमातें,
शक्रार्जुनकृष्णांशीं करितां समर न शिवेल भी मातें ' ३

एकाकिडे अल्पवयी, सुकुमार व एकाकी **अभिमन्युबाळ;** व दुसरकिडे समर करतां करतां वृद्ध झालेले, धनुष्याशीं खेळतां खेळतां हातांला घट्टे पडून घस्मर बनलेले, आणि **कर्ण, अश्वत्थामा** इत्यादि अद्वितीय धनुर्धरांच्या श्रेणी ज्यांच्या पाठीशीं चतुरंग सेनेसह कडेकोट तयारीनें उभ्या आहेत; ते धनुर्विद्यादीक्षित कौरवसेनापति **द्रोणाचार्य** आहेत; अशी विषम स्थिति मनांत येऊन 'कठीण रे कठीण! **अभिमन्यु बालकाचें** आतां कसें होईल!' असें वाटूं लागतें व अंतःकरणांत कालवाकालव सुरू होते! परंतु या वीरपुत्राच्या वर निर्दिष्ट केलेल्या दर्पोक्तींनीं मनाला उत्साह वाटूं लागून सहृदयाच्या मुखांतून '**अभिमन्यो** शाबास! **अभिमन्यो** धन्य तुझी!' असें न कळत उद्गार निघूं लागतात. एवढेंच नव्हे तर **अभिमन्यूच्या** मागोमाग अभेद्य **चक्रव्यूहामध्यें** अकुतोभय संचार करण्यासहि तो प्रवृत्त होतो! असो. **अभिमन्युवध**-प्रकरण हें **पंतांच्या वाग्देवीचें** एक परमप्रिय विहारस्थल आहे यांत संशय नाहीं.

उत्साहाचा जो हेतु असेल त्या हेतूचेंच नांव कित्येक ग्रंथकारांनीं त्या **वीररसाला** दिलें आहे. वरील सर्व उदाहरणांत युद्धाविषयीं उत्साह वर्णिला आहे यास्तव तेथें **युद्धवीर** जाणावा.

अभंग.

देह जावो अथवा राहो, पांडुरंगीं अमुचा भावो.

तुकाराम.

येथें उत्साहाला भक्ति प्रयोजन आहे; यास्तव **भक्तिवीर.**

अभंग.

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदूं ऐसे.

तुकाराम.

या उदाहरणांत दान व युद्ध यासंबंधी उत्साह व्यक्त झाला आहे यास्तव येथें **दानवीर** व **युद्धवीर.**

गीति.

भिक्षा मागूनि तिचें ठेवीचें ऋण कसेंहि फेडीन,
परि कीर्तिविघातक जें अनृत मुखांतुनि कधीं न काढीन १.

परशुरामपंत-मृच्छकटिक अंक ३.

ही **चारुदत्ताची** उक्ति आहे. हिच्यांत सत्याचरणरूप जो धर्म तो उत्साहाचा हेतु आहे यास्तव येथें **धर्मवीर.**

उत्तररामचरित्रांत रामचंद्र म्हणतोः—

गीति.

जनरंजनाहूनि मला स्नेह दया सौख्य हें अधिक नाहीं,
किंबहुना जानकिही टाकिलिया मज नसे व्यथा कांहीं १

येथेंही **धर्मवीरच** आहे. कारण, प्रजारंजन हा राजाचा धर्म होय. हा धर्म येथें उत्साहाचें प्रयोजन आहे.

वसंततिलक.

सृष्टि-स्थिति-प्रलय जो करितो जगाचे,
तच्छासन स्फुट मला अविलंघ्य साचें;
हें अग्निहोत्रिधन सन्निध नाश पावें,
याचेंहि रक्षण मला उचित स्वभावें १

भुजंगप्रयात.

यया एक सिंहा असे रे उपाय, तुवां भक्षिजे आज माझाचि काय;
जिचा वत्स तान्हा घरीं वाट पाहे, तिला सोडण्याची करावी कृपा हे १

रघुवंश—मराठी—भाषांतर. स. २.

दिलीप राजा **वसिष्ठा**च्या धेनूची सेवा करीत असतां एके दिवशीं अरण्यामध्यें एका सिंहानें त्या धेनूवर उडी घातली. तेव्हां धेनूविषयीं दया उत्पन्न होऊन राजा सिंहाची प्रार्थना करूं लागला तो हा प्रसंग आहे. येथें दया हा उत्साहाचा हेतु आहे यास्तव **दयावीर.**

महावीरचरित्राच्या पांचव्या अंकांत **वाली रामचंद्राविषयीं** उद्गार काढीत आहेः—

गीति.

होतील नेत्र माझे सफलचि देखोनि रामदमनातें,
गर्वाची कंडूही मिळविल बहु गोडशाचि शमनातें! १

भुजंगप्रयात.

असे भार्गवातें जयें जिंकियेलें, जयें सत्यधर्में जनां रंजवीलें;
गुणांची अशी खाण तो रामराज, बघायासि आलों असें त्यास आज! १

वर **रामचंद्र वालीला** म्हणतोः—

गीति.

भेटसि आज सुदैवें बोलसि जें योग्य तें महाभाग,
परि तूं अशस्त्र असतां राम करीं शस्त्र घे, कसा योग ! १

यानंतर **वाली** व **रामचंद्र** एकदम एकाच उक्तीचा आश्रय करून परस्परांस म्हणतातः—

गीति.

वीराच्या संगतिचा उत्सव मोठाच आज अनुभविला,
परि तूं गेल्या वरतीं वीर जगीं कोणिही नसे उरला ! १

प्रस्तुत स्थलीं **वालीच्या** उक्तींत **युद्धवीर, रामचंद्राच्या** उक्तींत **युद्धवीर** व **धर्मवीर** आणि दोघांच्या उक्तीमध्यें पुन्हां **युद्धवीर** असून त्यांत थोडी **दयावीराची** लकेर आहे.

गीति.

दैवेंचि गांठ पडली आतां मी मन तुझें न मोडीन,
सोडीन प्राणांतें परि तुज शरणागता न सोडीन १

मृच्छकटिक अंक ७.

ही **चारुदत्ताची आर्यका**प्रत उक्ति आहे. क्षमा उत्साहाला हेतु असल्यामुळें येथें **क्षमावीर** आहे. इतर **वीर**ही या उदाहरणांवरून कल्पनेनें बसवावे.—

करुण.

विभावानुभावांनीं शोक हा **स्थायिभाव** पुष्ट झाला असतां **करुणरस** व्यक्त होतो.

रामानें वनवास स्वीकारावा व **भरताला** राज्याभिषेक व्हावा अशाविषयीं **कैकेयी हट्ट** धरून बसली त्यावेळीं **दशरथ** तिला म्हणतोः—

गीति.

निजसुतवियोगविव्हल सत्यच्युतिभीत तो असा विनवी,
"कैकेयि! तुझे ठायीं निर्दयता हे अशी असावि नवी ! १

वय माझें बहु गेलें, पुत्रोत्पत्यर्थ यत्न बहु केला,
त्यांशीं वियोग करितां, न कशी धरिशी मदंतशंकेला २
तुज राज्य सर्व दिधलें आणिकही माग जें अभीष्ट तुला,
गुणवदपत्यवियोगक्लेशासि जगत्त्रयीं नसेचि तुला ३
काय तुझा रामानें केला अपराध सांग गे प्रमदे,
कां माझ्या बाळावरि करिशी हा कोप सांग गे श्रमदे ४
हा राज्ञि ! पुत्र माझा सुकुमार कुमार बहु विनीत कृती,
त्वत्पदलीन तरीही याविषयीं कां तुझी अशी प्रकृती ? ५
कां मति धरिली नंदनवियोगवन्हींत कांत होमाया !
कां मज वृद्धावरली कैकेयी त्यागिली अहो माया ! ६

येथें **आलंबनविभाव रामचंद्र**, **उद्दीपनविभाव कैकेयीचा रामाला** वनवासाला पाठविण्याविषयींचा हट्ट, **अनुभाव रामाचे** गुण आठवून विलपन, **व्यभिचारिभाव** मोह, चिंता, दैन्य इत्यादि; अशा प्रकारांनीं **स्थायिभाव** जो **शोक** त्याची पुष्टि झाली आहे व **करुणरस** व्यक्त झाला आहे.

अभिमन्यु चक्रव्यूहांत सांपडून मरण पावला हें वर्तमान **पांडवांस** समजतांच त्यांच्या शिबिरांत झालेला प्रकार **श्रीधरकवि** वर्णन करितातः—

ओंव्या.

रथाखालीं पडला अर्जुन, पुत्रशोकें करी रुदन,
मग श्रीकृष्णें संबोखून, सावध केलें पार्थासी १
अर्जुन अवघ्यांसि धिक्कारित, जळो जळो तुमचा पुरुषार्थ,
इतके असतां माझा सुत, कां संग्रामा पाठविला २
उपलव्यनगरींहूनी, उत्तरा सुभद्रा धांवोनी,
त्वरें आल्या बैसोनि वहनीं, हृदय पिटीत अतिदुःखें ३
सुभद्रेतें न धरवे धीर, शरीर टाकिलें पृथ्वीवर,
माझा अभिमन्यु सुकुमर, दावा एकदा पाहीन मी ४
हे अभिमन्या कमललोचना, हे सौभद्रा चंद्रवदना,
हे कोमलांगा मधुरभाषणा, ये धांवोनि मज भेटें ५

हे घनश्यामवर्णा, हे अभिमन्या प्रति-अर्जुना,
हे महाधीरा सुहास्यवदना, ये धांवोनि मज भेटें ६
द्रौपदी म्हणे अभिमन्या, हे वत्सा सद्गुणनिधाना,
हे तरुणा तुझी अंगना, उत्तरा आतां काय करील ? ७
हे किशोरवया परम उदारा, समरधीरा प्रतापशूरा,
पांडवकुलदीपका सुंदरा, केली त्वरा सर्वां आधीं ८
बोले सुभद्रा वेल्हाळ, इतुके वीर असतां सबळ,
सांपडला व्यूहामाजी बाळ, पाठी कोणी न राखेची ९
विकळ पडतां माझें किशोर, जयद्रथें दिधला लत्ताप्रहार,
धिग् गांडीव धिक् तूणीर, धिग् यदुवीर पार्थ पैं १०

दमयंतीचा नलप्रीत्यर्थ विलापः—

वसंततिलक.

'प्राणेश्वरा ! त्यजिसी कां मज एकलीला,
होऊनिया वश तया अदया कलीला ?
गेलास, हाय ! नलराय ! कुठें ? वदान्या,
अन्या न होय भुवनीं मजशी अधन्या' १
'त्वां अश्वमेध करुनी बहु दान केलें,
वैरी तसें यशहि थोर दिगन्ति नेलें;
ऐसें असोनि दयितेविषयीं न वाटे
चित्तीं दया ! तव दयानिधि काय आटे ?' २
'जें जें समक्ष वदलासि मला, उदारा !
तें तें प्रिया ! स्मर; कशी त्यजितोस दारा ?
जें काय हंस वदले तुजला मलाही,
आणूनि तें मनिं विचार करूनि पाहीं' ३
'प्राणप्रिया सहृदया ! वद शब्द कांहीं,
प्राणप्रियेस तव रक्षक येथ नाहीं,
मंदस्मिता करुनि हर्षविलेंसि जीतें,
कां आजि मौन धरुनी छळितोसि तीतें ?' ४

‘ ज्याचें पवित्रतम नाम जगास तारी,
औदार्य अर्थिजनसंघविपत्ति वारी,
यद्वीर्य वैरितरुणीनयनांबु हारी
तो कां विपन्नवनितार्ति न दूर सारी ?’ ९

पद्यमंजरी.

अज इंदुमतीविषयीं शोक करतोः—

साकी.

‘ इंदु यामिनी; अंबुद, चपला; चक्रवाक, चक्रांगीं;
फिरुनि भेटती परस्परांतें प्रेमें, चारुतरांगि !’ १
‘ म्हणुनि तयांना सुसह वाटतो विरह, न तैसा माते
भेट न आतां अपुली पुनरपि, जातों यमसदनातें’ २
‘ कोमलपल्लवशय्याही तव मृदुतनुलागि रुपावी
तीच तनु अतां साहिल सखये ! चिताधिरोहण केवीं ?’ ३
‘ भेटशील तूं पुन्हां कदाचित ऐशी होती आस,
आजि प्राणेश्वरि ! परि गेली समूळ ती विलयास’ ४
‘ सुंदर नयनानंदकर अशा असती वस्तु अपार,
मनोविनोदनशीले ! तुजविण दिसती सकल असार’ ५
‘ ज्यातें परिमुनि मोदभरानें रसिक तुकवितो मान,
प्रियंवदे ! तव विरहें न रुचे कर्णमधुर तें गान !’ ६
‘ वसंतलक्ष्मी रम्य उपवनीं करिते विविध विलास,
कुरंगनयने ! तूं नसल्यानें रंग फिकाचि तयांस’ ७
‘ अलंकार रमणीय, मनोहर वसनें, निष्फळ झाली,
मृदुशय्येसहि आजि, विलासिनि ! काय अवकळा आली !’ ८
‘ होतिस सखये ! विश्वासाची गृहिणी चतुर हुषार,
संकटकालीं दिलीस मसलत मजला हितकर फार’ ९
‘ एकांतांतिल हितगुज करुनी रंजविलेंसि मनास,
प्रियशिष्याही होउनि शिकलिस संगीतादिकलांस !’ १०

‘ ऐशा तुजला क्रूरकृतान्तें आजि हिरावुनि नेलें,
हाय हाय ! मग काय राहिलें ! सर्वस्वचि मम गेलें ’ ११
‘ सुहास्यवदने ! सुगंध, रुचिकर, म्यां घेउनि उरलेलें,
मधु येथें आतांचि सखे ! त्वां हर्षें प्राशन केलें ’ १२
‘ त्यावरि आतां उष्णबाष्पयुत वरती पाठविलेला,
जलांजली तूं घेशिल कैसा न कळे मम चित्ताला १३
‘ गजान्तलक्ष्मी अजगेहान्तरिं फुकट नांदते, बाले !
तुझ्याबरोबर खरें तयाचें सुख अस्तंगत झालें ! ’ १४
“ आम्रवृक्ष हा सरस, असे ही नामी प्रियंगुवेल,
आइ ! जोडपें किति तरि यांचें नयनां गोड दिसेल ! ” १५
‘ असें बोललिस मात्र ! हातुनी घडलें नाहीं कांहीं,
लगिन तयांचें न लावितां तुज जाणें योग्यचि नाहीं ’ १६
‘ ज्याचे दोहद तुवां पुरविले वामचरणघातांनीं,
अशोक तो हा भरुनी जाइल, रसिके ! मधुरफुलांनीं ’ १७
‘ तत्सुमनांनीं आजवरी तव केश अलंकृत झाले,
त्यांचा आतां अंजलि कैसा देऊं तुजला, बाले ! ’ १८
‘ अखंड लक्ष्मी, दक्ष सखीजन, तनय रूपगुणवान,
पति अजही हा तुला मानितो मुख्य साहवा प्राण ’ १९
‘ असा असुनिया प्राणसखे ! हा थाटदार संसार,
काय मांडिलें असें तुवां हें मरणकार्य अनिवार ? २०
‘ कटाक्ष चंचल हरिणीमध्यें, मंद गमन हंसींत,
अभिनय पत्रें डोलविलेल्या नवकोमलवल्लींत ’ २१
‘ मधुर बोल पिकवदनीं तेवीं, ऐसे गुण हे मागें,
रमवाया मज तुवां ठेविले करुणा येउनिया गे ! ’ २२
‘ उपाय तव हे अपाय करिती तापवूनि मम काय,
हाय हाय ! पुरवेल जरी हें जीवित सोडुनि जाय ’ २३

वसंजरी

अद्भुत.

विभावानुभावादिकांनीं परिपुष्ट झालेला जो **विस्मय** स्थायिभाव त्याला **अद्भुतरस** ह्मणतात.

स्रग्धरा.

पाळाया लोक सारे धनुधर भगवान् हा धनुर्वेद झाला,
रक्षाया ब्रह्मवृंदाप्रति धरुनि तनू क्षात्र कीं धर्म आला!
सामर्थ्याचा गमे हा समुदय अथवा हा गुणांचा विसावा,
कीं हा कल्याणरूपें परिणतचि जगत्पुण्यराशी असावा!

उत्तररामचरित्र.

अत्यद्भुत पराक्रमी **लवाला** पाहून ही **रामाची** उक्ति आहे. येथें आलंबन **लव, उद्दीपन** अपूर्व क्षात्रतेज, **अनुभाव** आश्चर्यचकितपणा आणि **व्यभिचारिभाव** तर्क वगैरे; यांनीं **विस्मय** हा **स्थायिभाव** पुष्ट झाला आहे. आणखी उदाहरणें:—

स्रग्धरा.

रामें लोकाभिरामें मदनशतसमें पूर्णकल्याणधामें,
लीलाभूषलामें तुकुनि शिवधनू वोढिलें पूर्णकामें,
वोढी घेतां तडाडी निबिड दशदिशीं घोष मोठा झडाडी,
मध्यें भंगे कडाडी प्रतिनिनद नभीं मेघ जैसा गडाडी,

आनंदतनय.

रामचंद्रानें शिवधनुर्भंग केला त्यावेळचें हें आश्चर्यकारक वर्णन आहे.

वसंततिलक.

चित्रापरी तनु तिची रचिली विधीनें,
चातुर्य सर्व खरचोनि कलानिधीनें,
स्त्रीरत्नसृष्टि मज ही दिसते निराळी,
झाली नसेलचि कधीं अशि पूर्वकाळीं!

शाकुंतल-अंक २

वसंततिलक.

धाता करींच करिता मृदु हे न होती,
या कारणास्तव मनोमय मूस ओती;

तेथें भरोनि पहिला रस पूर्ण केली,
औतीव हें न घटिताकृति बोलिजेली १

या दोन्ही श्लोकांतही अद्‌भुत रसच आहे. श्रृंगार त्याच्या अंगभूत आहे.

शार्दूलविक्रीडित.

शैलांचीं शिखरेंचि येति वरतीं ! जाति मही खालती !
अंतर्लीनपणा त्यजूनि तरुच्या शाखा पहा हालती;
रेखाप्राय नद्यांत सत्वरगती पाणी कसें दाटतें,
हा भूगोल अति त्वरें मजकडे येतो असें वाटतें !

शाकुन्तल-अंक ७.

दुष्यंतराजा स्वर्गातून खालीं भूलोकावर येत असतां त्या वेळेच्या देखाव्याचें विस्मयजनक वर्णन राजा करीत आहे.

अभिमन्यूचा अद्‌भुत पराक्रम ऐकून धृतराष्ट्र संजयाला म्हणतोः—

गीति.

अंध म्हणे 'रे संजय, हें त्या पौत्रासि वर्ष सोळावें,
लोळावें मांडीवरि, तेणें द्रोणादिकांस घोळावें ! १

मोरोपंत-द्रोणपर्व.

हास्य.

विभावानुभावादिकांनीं हास्य हा स्थायिभाव पुष्ट झाला म्हणजे **हास्यरस** व्यक्त होतो.

अभंग.

भ्रताराची दाढी, कांतेची ती वेणी, एकत्र करोनी, ग्रंथी देत १
करोनी कौतुक, निघोनीया गेला, अरुणोदय झाला, तये वेळीं २
गोदोहना लागीं, गोपिका उठत, वेणी असडत, दाढी संगें ३
भ्रतारासि तेव्हां बोलते कामिनी, न धांवे अजोनी, मन कैसें ४
भ्रताराची दाढी ओढितांची ताण, सक्रोध होऊन, बोलतसे ५
मस्त होवोनीया, माजली धांगडी, करिशी ओढाओढी मजलागी ६
नामा म्हणे तेव्हां, उठोनी बैसती, आश्चर्य करिती, मनामाजी ७
गोपी गोप तेथें, पातले त्वरीत, हांसती समस्त, देखोनीयां ८

कृष्ण म्हणे केशी, बांधिशी मजला, बांधिलें तुजला, भगवंतें ॥
पायां पडताती, रडोनि बोलती, सोडवा म्हणती, आह्मांलागीं. १०

नामदेव.

येथें गोप व गोपिका हीं (नवराबायको) **आलंबन** दाढी व वेणी यांची ग्रंथी ही विलक्षण चेष्टा किंवा विपरीत क्रिया **उद्दीपन,** इतर गोप व गोपी येऊन त्यांनीं एकमेकांत हंसणें, थट्टा करणें हा **अनुभाव** आणि हर्षादि **व्यभिचारिभाव** यांनीं हास्य हा **स्थायिभाव** पुष्ट होऊन हास्य-**रसोत्पत्ति** झाली.

शार्दूलविक्रीडित.

नाहीं चोरित भूषणें युवतिचीं जशीं लतेचीं फुलें,
विप्राचें धनही कधीं न हरितों यज्ञार्थ संपादिलें;
दाईपासुनि लेंकुरें नच कधीं वित्तार्थ मी चोरितों,
कार्याकार्यविचार चौर्यसमयीं चित्तांत मी राखितों १

मृ. क. अं. ४

ही **शार्विलकाची मदनिके**प्रत उक्ति आहे. चोरी करणें हेंच कृत्य मुळीं अन्यायाचें आहे. मग ती चोरी कशाचीही असो. असें असतां आपण चोरी करतों ती फार विचारपूर्वक व कोणाचा घातपात न होईल अशा शिताफीनें करितों अशी स्वताची प्रतिष्ठा **शार्विलक मदनिके**जवळ सांगत आहे ! जणूं काय चातुर्यानें गुन्हा करणें हें भूषणच आहे असें त्यास वाटतें असें कवीनें दर्शविलें आहे. येथें हास्यरसोत्पत्ति होते. येथें हंसू गालांतल्या गालांत येण्यासारखें आहे. अशा हास्याच्या प्रकाराला **स्मित** म्हणतात. खालची गीतिही **स्मिता**चेंच उदाहरण आहे.

गीति.

ऐसें वदे कवच दे त्या श्रितकुशलावहास त्यायाला
तद्धारणीं चुके तो, कन्या पाहोनि हांसल्या त्याला ! १

विराटपर्व.

वीरांचें अवसान आणणाऱ्या **उत्तराला** कवच धारण करतां येईना हें पाहून मुली हंसू लागल्या असा अर्थ येथें **पंतांनीं** वर्णिला आहे.!

इतर जीं **हास्यरसाचीं** उदाहरणें दिलीं आहेत तीं **विकटहास्याचीं** आहेत.

वसंततिलक

आणोनि गाढव तयावरि बैसवोनी,
एकास, त्यास बुरणूसचि नेसवोनी;
डोक्यावरी धरुनि सूपाचि छत्र त्याची,
नेती वरात बहु गोजिरिया वराची
घोडे पुढें बहुत चालति कोतवाल,
मध्यें वराश्व धरितो बहु मंद चाल!
भोंतीं वऱ्हाडि जन चालति राजमार्गी,
ऐशी वरात नच पाहिल तो अभागी २

उपजाति.

कुंभारवाड्यांतिल ठाणबंदा, अश्वांत तो अश्व बहूत खंदा;
मांडी ढळेना, वरि राजबिंडा, बोले तुम्ही स्वस्थपणेंचि हिंडा ३

इन्द्रवज्रा.

झाडीत लाथा बहु आरडोनि, त्यां त्यां करीतो परि ओळखोनी
स्वारी, पहा जेरचि जेर झाला, त्या सोहळ्यानें वर फार धाला! ४

उपजाति.

पाठाड मोठें बसणार पक्का, कोठें न पावे गरदींत धक्का;
वाद्यें ठणाणा बहु वाजतातीं, बुजे न घोडा! जणुं भद्रजाती! ५
मुंडावळी बांधुनि खेटराच्या, पलांडुच्या आणिक गाजराच्या;
कंठांत घालोनिहि माळिकेला, तो सोहळा फार वरास केला ६
येतां चव्हाट्यांत वरात, टोळी, वधूवरें पाहुनि भातपोळी
ओंवाळुनी टाकिति कीं न यास, हो दृष्टि, पावोत सदा जयास ७

वसंततिलक.

तो जातिवंत जरि अश्व, तरी तयाची
हुकी बहू उपजली, क्षण लोळण्याची;

तेव्हांचि तें तुरगरत्न बहूत लोळे,
तें दंपतिद्वय धुळींत बहूत घोळे ! ८

उत्सवप्रकाश.

हें शिमग्यांतील धुळवाडीच्या प्रसंगाच्या मिरवणूकीचें वर्णन आहे.

शार्दूलविक्रीडित.

मी भीमाप्रति भाउबीज करितें, कांता हरीची ह्मणे,
माझी ही पुरवा हऊस सखया, जा त्यास आमंत्रणें;
बोले कृष्ण भरीस या पडाशि कां खादाड तो केवढा,
धान्याचा फडशा करील सखये, हेतू त्यजी एवढा १
बोले श्री न उणें अम्हांस, कितिसें खाणार तो ? पाहुं या,
मी वाढीन तयास पोट भरुनी जा बोलवा हो उद्यां;
ऐसा आग्रह पाहुनी मग हरी आमन्त्रणातें करी,
येई चालत, कांपवी धरणितें, तो भीमही लौकरी २
भीमानें उपडोनियां वटतरू मागीच पत्रावळी,
मोठी कोसभरी करोनि अणिली ! ऐसा पहा तो बळी;
जेवाया बसण्यास लौकर करी चौरंग अद्रीपरी,
बोले, रुक्मिणि, वाढ भूक मजला भारी करी घाबरी ३
न्हाऊं घालिन बंधुराज म्हणते ती रुक्मिणी त्याजला,
राहो न्हाण तुझें क्षुधें करुनियां मत्प्राण हा गांजला,
ऐकोनि मग रुक्मिणी निघतसे वाढावया सत्वर,
तो नाजूकचि राजपुत्र म्हणुनी मागेंचि येई कर ४

उपजाति.

हळू हळू वाढितसे तदा ते, मनीं बहु क्रोधचि ये तयातें,
घरांत ती वाढुनि शाक जाय, नाणी पदार्था तर तोचि खाय ५

इंद्रवज्रा.

एका पदार्थासह भेट नाहीं अन्यास, तो चाटित बोट पाही,
तोंडाकडे, तीप्रति पाठमोरी, जाऊं न देईच असा अघोरी ६

उपजाति.

भीमास भाजीस न गांठ येई, क्षणक्षणा फारचि पाठ घेई,
बाई असें चाळविता कशाला ? बोलावुनी मांडितसा हशाला ! ७

शार्दूलविक्रीडित.

मांडे, भात, वडे, खिरीहि, जिलब्या लाडू बहू झोडिले,
तेवीं पापड, लोणचें, चिकवड्या जे वारगे वाढिले;
तें सारेंचि करोनि चट्ट, तुकता जैसा बसे भोजना,
त्या श्रीची कटि वाढवाढुनि दिली होतां धरी वेदना ! ८
हा नाजूक बहूत बाळ म्हणुनी ठाऊक पूर्वी जरी
होता, भानगडींत या न पडतें कालत्रयीं मी तरी,
ऐसें बोलतसे मनांत, उदरीं याच्या शिरोनी जसा,
राहे राक्षस, पाहिलाहि न कधीं मोठा अधाशी असा ! ९

रुक्मिणीन भीमाला बोलावून एकदा भाउबीज साजरी केली तिचें वर्णन **उत्सवप्रकाशकारांनीं** वरील पद्यांत केलें आहे. आणखी उदाहरणें:—

' **शकार**—नाकांस फुलांचा वास ऐकूं येतो, परंतु अंधकारानें भरलेल्या माझ्या कानास भूषणांचा शब्द स्पष्ट दिसत नाहीं. '

परशुरामपंत-मृच्छकटिक. अंक १.

' **विदूषक**—अहो तुम्हीं दोघेही सुखासुखीं एकमेकांस नम्र होऊन शेतांतील साळीच्या लोंबराप्रमाणें एकमेकांकडे डोकीं लववितां हें काय ? '

परशुरामपंत-मृच्छकटिक. अंक १.

' **विदूषक**—अबब ! मसणांतल्या डाकिनीप्रमाणें हिच्या पोटाचा केवढा विस्तार हा ! तर काय हिला अगोदर आंत बसवून महादेवाच्या देवळाप्रमाणें मग दरवाजा बांधला काय ? '

परशुरामपंत-मृच्छकटिक. अंक ४.

' **न्यायाधीश**—काय फिर्याद आहे बोला. '

' **शकार**—मी तुमच्या कानांत सांगेन ! मी मोठ्या अगडबंब कुळांत उत्पन्न झालों आहें ! माझा बाप राजाचा सासरा आहे ! आणि राजा माझ्या बापाचा जांवई आहे ! मी राजाचा मेव्हणा आहें. राजाची बायको ती माझी सख्खी बहीण ! समजलां ! '

मृच्छकटिक.

रौद्र.

विभावानुभावादिकांनीं क्रोध हा स्थायिभाव परिपुष्ट झाला म्हणजे रौद्र रस उत्पन्न होतो.

शार्दूलविक्रीडित.

हें दुःखात्मक घोर वज्र शिवलें शश्वत् जयाच्या उरा,
त्या माझ्या भडकावया अवसर क्रोधानला हा खरा;
घ्याया योग्य करीं असे समय हा चापास शापास वा,
या काळीं मजला निवारिल बळें कोणी असा दाखवा• १ .

उत्तररामचरित्र अंक ४.

रामानें घोर अरण्यांत गर्भवती जानकीचा त्याग केला ही वार्ता समजल्यावर जनक क्रोधाविष्ट झाला त्या वेळची ही त्याची उक्ति आहे.

येथें रामचंद्र आलंबनविभाव; जानकीत्याग उद्दीपनविभाव; चापाचा किंवा शापाचा स्वीकार करावा इत्यादि संतापयुक्त वचन अनुभाव; गर्व, उग्रता, आवेश इत्यादि व्यभिचारिभाव; यांनीं क्रोध या स्थायिभावाची पुष्टि होऊन रौद्ररस व्यक्त झाला आहे.

ओवी.

विकळ पडतां माझा किशोर, जयद्रथें दिधला लत्ताप्रहार,
धिग् गांडीव धिक् तूणीर, धिग् यदुवीर पार्थ पैं २

श्रीधर–पांडवप्रताप.

अभिमन्युसंबंधानें ही सुभद्रेची उक्ति आहे.

गीति.

श्री बुडविली महेंद्रश्रीतुल्या मज नसे तिची परवा,
पर वामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलापरवा १
रे सहदेवा! सत्वर पुष्कळसा अग्नि आण जाळ कसा,
जाळूं याचे हे कर, आह्मां हा सोसवेल जाच कसा! २

कौरवसभेंत द्रौपदीची विटंबना झाली ती पाहून संतप्त झालेल्या भीमाची ही उक्ति आहे.

शार्दूलविक्रीडित.

ज्या ज्या शस्त्रधरीं तुह्मीं नृपशुंनीं दुष्कर्म आरंभिलें,
केलें वा अनुमोदिलें दुरुनियां दोषास या पाहिलें;
त्यांचीं भीमकिरीटिकृष्णसकटीं काढोनि मांसें पहा;
देतों आजि दिशांस सर्व बलि मी मत्कर्म आतां सहा! १

वेणीसंहार.

द्रोणाचार्यांच्या वधानें क्रुद्ध झालेल्या **अश्वत्थाम्या**ची ही **अर्जुनादि** वीरांस उद्देशून उक्ति आहे.

शार्दूलविक्रीडित.

चूडाबंधन मोकळें करितसें क्रोधामुळें कंप हा,
झालीं रक्त सरोजपत्रसदृशें नेत्रें कशीं हीं पहा!
यांच्या फारच नाचतात भुवया वक्त्रावरी दीसते,
चंद्रीं लांछनपंक्ति कीं सुकमळीं भृंगावली भासते! १

उत्तररामचरित्र, अंक ५.

चंद्रकेतूबरोबर युद्ध करण्यास सिद्ध झालेल्या **लवा**ची अवस्था **सुमंत्र** वर्णीत आहे तो हा प्रसंग आहे.

गीति

प्रस्फुरदधरदलप्रभु बलभद्र म्हणे 'खरेंचि सांगा रे,
कोठें तो कपटपटू? गांठितसें जो पटांत आंगारे १
कोठें रथ? मुसळ पुरे, कवच कशाला? धनुष्य राहो द्या,
वत्सेला निजधर्षणकरखलदंडोत्सवासि पाहों द्या' २
पर्वी अर्णव तैसा भगवान् बलभद्र पुष्कळ क्षोभे,
संध्यारागसुरंजितशरदभ्राहूनि फार तो शोभे. ३

मोरोपंत–कृष्णविजय.

सुभद्रेला यतिवेषानें **अर्जुना**नें पळविलें त्या वेळीं **बळरामास** अत्यंत कोप आला. त्याचें हें वर्णन **पंतांनीं** केलें आहे.

भयानक

भीति हा **स्थायिभाव विभावादिकांनीं** पुष्ट झाला म्हणजे **भयानकरस** होतो.

चांडाळ—अरे पहा हें दक्षिणश्मशान दिसत आहे. याला पाहून वध्य पुरुष भयानें प्राण सोडतात ! पहाः—

ओंवी.

अर्धे कलेवर शूलशिरीं, अर्धे लोंबतसे भूमीवरी,
कोल्हे लांडगे एकेसरी, ओढिताती खावया १

मृच्छकटिक अंक १०

चारुदत्ताला सुळावर देण्याकरितां श्मशानभूमीकडे कांहीं चांडाल घेऊन गेले. त्या श्मशानाचें वर्णन एक चांडाळ करीत आहे; तो हा प्रसंग होय.

येथें **श्मशान आलंबन** त्यांतील **देखाव्याचें वर्णन उद्दीपन**; (गम्यमान) **कंप, रोमांच** इत्यादि **अनुभाव** व **शंका दैन्य** वगैरे **व्यभिचारिभाव.** यांनीं भीति हा **स्थायिभाव** पुष्ट होऊन **भयानकरस** निष्पन्न झाला.

आणखी उदाहरणें:—

गीति.

अशनिहतशिळातळ जळ रक्त तसें खड्गभग्न तें उर वी,
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित न लेशही उरवी १
मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया बिरुद कापी,
देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका पी २
जे जे लोकीं असती रस त्यांची ती न माधुरी थोडी,
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्याहूनि लागली गोडी ३
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनः पुन्हां चाटी,
अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची घाटी ४
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती,
किति पडती किति दडती कितिएकांचीं धृतायुधें गळती ५

मोरोपंत–दुःशासनवध.

शार्दूलविक्रीडित.

लंकानायकं सायकासनगुणीं सज्जावया सज्जला,
तों सीता भयकंपिता जन महा चिंतांबुधीं मज्जला;
झाल्या म्लानमुखी मनोरम सखी तो जों भुजा सांवरी,
तों आकार विकार देखुनि उठे हाकार माडीवरी १

*आनंदतनय.

रावणानें शिवधनुष्याला हात घातल्याबरोबर **सीता**, तिच्या सख्या आणि इतर जनही गर्भगळित झाले, त्या वेळचें हें वर्णन आहे.

ओंवी.

मांस खाऊनि माजल्या घारी, चोंचींत धरूनि जाती दुरीं,
सुटोनि पडतां भूमीवरी, मांसखंडें आंतडीं
वाहती रक्ताचे पाट, मांसवसांचा चिखल दाट,
त्यांमध्यें भालूंचे थाट, ओरडती चहूंकडे २

नागानंद.

बीभत्स.

जुगुप्सा (चिळस) हा **स्थायिभाव विभावादिकांनीं** पुष्ट झाला असतां **बीभत्सरस** होतो.

शार्दूलविक्रीडित.

जेव्हां फार पशू कुजोनि पडती होती तयांना किडे,
तेव्हां ओढुनि कातडीं चघळितीं कुत्रीं तयांचीं हडें,
आल्या वेंचुनि कावळे गिळिति त्या घाणीस जे पाहतीं,
कांटा येउनि देहिं त्या मग कशी वांती न होईल ती ! १

साहित्यशास्त्र.

येथें **कुजलेले पशु आलंबनविभाव**, त्यांच्या ठिकाणीं **आल्या किडे उत्पन्न होणें उद्दीपन विभाव, ओकणें** वगैरे **अनुभाव** आणि **आवेग, मूर्च्छा** इत्यादि **व्यभिचारी भाव** होत. या सर्वांनीं **जुगुप्सा** हा **स्थायिभाव पुष्ट** केला आहे.

अभंग.

नाक शेंबुडाचें घर । मुखीं लाळेचे पाझर १
रक्त मांस वसा हाडें । आंत बाहेरी कांतडें २
मळ मूत्र खत पोटीं । ज्यास घाण चाले मोठी ३
त्यांत जंत आणि किडे । देह ऐसे घाणेरडे ४
साधु पाहोनी थुंकती । अंगीं त्यांच्या कांटे येती ५

येथेंही बीभत्सरसाचाच पोष झाला आहे. आणखी उदाहरणः—

शार्दूलविक्रीडित.

बाहूचा तुकडा तुटोनि पडला त्यांच्या तईं बाजुला,
चोंची मारिति पाक्षि त्यां हुसकुनी कोल्ही धरी त्यांजला;
लागे खाउं तदंगदाग्र खुपलें तीच्या मृदू ताळुला,
त्रासोनी पिशितप्रिया तरिहि ती फेंकी दुरी त्याजला ५

रघुवंश–मराठी–भाषांतर

शांत.

निर्वेद (विषयसुखांविषयीं वीट) हा स्थायिभाव विभावादिकांनीं पुष्ट झाला म्हणजे शांतरस निष्पन्न होतो.

अभंग.

कवणाचें घर कवणाचें दार, सोडोनी संसार जाणें लागे १
जाणें लागे अंतीं एकला एकट, व्यर्थ खटपट जन्मवरी २
जन्मवरी जाण संसारीं गोंविलें, नाहीं कांहीं केलें आत्महीत ३
आत्महीत गेलें संसाराचे ओढीं, अंतीं कोण सोडी रामावीण ४
घातकचि आहे लोकांचा तो संग, म्हणोनी निःसंग तुका राहे ५

तुकाराम.

येथें संसार आलंबन; त्याची निःसारता, सत्संगाची अपेक्षा इ. उद्दीपन, (गर्भित) कंठ सद्गदित होणें, रोमांच येणें वगैरे अनुभाव आणि चिंता, औत्सुक्य इत्यादि व्यभिचारिभाव होत. यांनी निर्वेद-स्वरूप व्यक्त झालें आहे.

ओंवी.

संसार हें दीर्घ स्वप्न, जाजावती मी माझें म्हणोन,
सावध व्हा उघडा नयन, निजसदन विचारा १

श्रीधर-अभिमन्युवध.

पृथ्वी.

न जाणतहि ये मुखा हरि तथापि पापें हरी,
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींच नामें जरी;
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुणनामसंकीर्तनें १

वामन-नामसुधा.

अनुष्टुभ्.

शोणीं न्हाऊनियां तारी यत्कीर्ति स्थिरजंगमा,
तो गेला देव सेवाया गंगासागरसंगमा १
महेंद्रपर्वतीं होता भगवान् भृगुनंदन,
त्या रामाकारणें रामें केलें साष्टांग वंदन २
तो दासाचा कल्पशाखी मोदामृतपयोनिधि,
गोदावरीस जाऊनी गोदानें दे यथाविधि ३
शंपाचलायु न वृथा संपावें म्हणुनी कृती,
संपादिती यद्गुणा तो पंपा पावे जगत्पती ४
मंदही पावती भास्वच्छंद यत्पदवंदनें;
स्कंद तो नमिला विद्याकंद श्रीयदुनंदनें ५

मोरोपंत-कृष्णविजय.

शार्दूलविक्रीडित.

गंगेनें स्वतरंगसुंदरकणीं जीं भोंवतीं शिंपिलीं,
जीं कां चारुशिलातलीं बसुनियां विद्याधरीं सेविलीं;
स्थानें काय हिमाद्रिचीं क्षयदशा तीं सर्वही पावलीं,
जीं पोटें अपमानपूर्वक नरीं अन्यालयीं पोशिलीं ! १

काांहीं द्रव्य असेल कीं उकरिलीं म्यां या भ्रमें हे मही,
राजेही बहु सेविलेचि गिरिचे म्यां जाळिले धातुही;
रात्रीं मंत्रजपें श्मशान धरिलें, पाथोधि उल्लंघिला,
झाली प्राप्ति कपर्दिका न मज तों सोडीं दुराशे मला २
ध्याती ब्रह्म सदैव धन्य नर ते राहूनियां कंदरीं,
ज्यांचीं बाष्पजळें विहंगम पिती बैसोनि मांडीवरी;
एकांतीं स्वमनोरथींचि रचितों उद्यानवापीगृहें,
स्त्रीसौख्यादिक आमुचें सरतसें, हा हंत आयुष्य हें! ३

वसंततिलक.

ते कंद काय अवघेचि जळोनि गेले!
किंवा प्रवाह नदिचे अति शुष्क झाले!
कीं वाण आजि विपिनीं तरुवल्कलांची!
कां पाहताति वदनें न कळे खलांचीं! ४

उपजाति.

फळें श्रमा वांचुनि भूरुहांचीं, पदोपदीं शीत जळें नदींचीं;
असोनियां कोमळ पत्रशय्या, द्वारीं प्रभूच्या शमतात कां या ५

पृथ्वी.

हिमाचलशिलेवरी सुरनदीतटीं बैसुनी,
त्यजूनि जन संगती सुदृढबद्धपद्मासनीं;
सुखें करुनि डोलतां प्रचुरयोगनिद्राभरें,
कधीं डवरिती मला हरिणपोत शृंगांकुरें ६

शार्दूलविक्रीडित.

माते मेदिनि, मारता स्वजनका, तेजा सख्या सोदरा,
तोया आणि नभा, तुह्मां नमितसें जोडोनि भावें करा;
झालें ज्ञान भवत्कृपेस्तव मला आतां पहा सत्वरी,
ब्रह्मीं मी मिळतों जलीं समरसें वर्षोपलाचे परी ७

वामन—वैराग्यशतक.

शार्दूलविक्रीडित.

पाताळीं अथवा सुरेंद्रनगरीं जा मेरुच्या वा शिरीं,
लंघीं सातहि सागरांप्रत तुझी आशा न संपे तरी;
चिंतारोगपराहता जरि नरा, कल्याण व्हावें तुझें,
श्रीकृष्णाख्यरसायना भज तरी निःसार सारें दुजें ८

द्राक्षे चाखिलिं, सेविली बहु सिता, स्वच्छोदक प्राशिलें,
पीयूष त्रिदिवीं पिऊनि कितिदा रंभाधरां खंडिलें;
जीवा! सांग खरोखरीच फिरतां संसारचक्रावरी,
गोडी आढळली कुठें तरि तुला श्रीकृष्णशब्दांतली १

शिखरिणी.

मदांतें प्राशोनी अलि मधुर झंकार करिती,
सभोंतीं ज्यांच्या ते करिवर गृहद्वारिं झुलती;
नको ऐशी लक्ष्मी मज, तिजवरी यन्मति जडे,
अनायासें त्याला न कधि हरिचें सेवन घडे २

महाराष्ट्रभामिनीविलास.

मंदारमाला.

सारी महा पाप, वारी तमस्ताप, हारी तुझें आप सर्वा जना;
रंगे यशीं सर्व, भंगे द्विपद्गर्व, गंगे! गमे खर्व मेरू मना;
माते तुझे पाय दाते दुजें काय यातें नको हाय देतां धना;
गावें सदा तीर भावें, सुखें नीर प्यावें, म्हणे धीरगा ते नना १

अमृतध्वनि.

आगा विलोकुनि न रागासि येसि अनुरागा त्यजोनि सदये;
'यागादि सर्व फल मागा,' असें ह्मणसि भागासि भव्यपद ये;
कागाहि विष्णुपदिं जागा मिळे, भजक जागा स्वयेंचि करिशी,
नागास्यसेंचि तुजला गाति ते, दुरित आगामि तेंहि हरिशी २

• मोरोपंत—गंगास्तव.

हीं सर्व शांतरसाचीं उदाहरणें होत.

अनुरक्त तरुण स्त्रीपुरुषांची परस्पर **रति** (प्रेम) **शृंगाराचा स्थायिभाव** होय हें मागें आलेंच आहे. तद्व्यतिरिक्त जी **रति** ती **भावरूप** आहे. हें मत प्रायः सर्वसंमत आहे. **परमेश्वर** व **गुरु यांवरील प्रेमाला भक्ति** हें नांव देऊन **भक्ति**नामक एक रस **साहित्यसारकारांनीं** कल्पिला आहे. **मातापितर** व **अपत्यें यांच्यामधील** व **बंधुभगिनीसंबंधानें** जी **प्रीति** तिला **वत्सलता** म्हणतात. या **वत्सलतेचा** अवलंब करून **साहित्यदर्पणकारांनीं वत्सल** या नांवाचा एक रस सांगितला आहे. **मित्रावरील** प्रेमाला **स्थायिभाव धरून काव्यालंकारकर्त्यांनीं** प्रेयान् नामक एक रस कथन केला आहे. प्रत्येक रसाला **स्थायिभाव** असतो हें वरील विवेचनावरून उघड झालें आहे. **रति** हाच **स्थायिभाव** वरील तिन्हीं रसांत आहे. **आलंबनामध्यें** मात्र भेद आहे हें सहज लक्ष्यांत येईल. या **रतीला** कोणी **स्नेह**, कोणी **प्रेम**, कोणी **प्रीति**, कोणी वात्सल्य अशीं वेगळीं वेगळीं नांवें देतात. पुराणादि ग्रंथांत व **ज्ञानेश्वरादिसंतांनीं** केलेल्या मराठी ग्रंथांतून **भक्तिरस** ओतप्रोत भरलेला आहे. जुन्या मराठी वाङ्मयांत **भक्तिरस**-प्रधान काव्यांचा मोठा भरणा आहे. **वत्सल** व **प्रेयान्** हे रस **भारत-रामायणादि** ग्रंथांत प्रसंगाप्रसंगानें आढळतात. असो. वर निर्दिष्ट केलेल्या तीन रसांचाही सलक्षण व सोदाहरण येथें थोडक्यांत विचार करतों.

भक्तिरस.

देव किंवा **गुरु** यांविषयीं जी **रति** ती **विभावादिकांनीं** पुष्ट झाली म्हणजे **भक्तिरस** व्यक्त होतो.

अभंग.

काय माझा आतां, पाहतोसि अंत, येई बा धांवत देवराया, ! १
माझ्या जीवा होय, तुजवांण आकांत, येई बा धांवत, देवराया, २
जरी असे काम, भेटुनि जाय मातें, येई बा धावत, देवराया, ३
रुणझुण रुणझुण, वाजताति वाळे, दावीं तीं पाऊलें, दयानिधे' ४
अडखळोनी पडशी, घालूं नको जोडा, धांवत दुडदुडा, येई आतां ५

ये रे ये रे देवा, देईन तुज पेढा, त्याला वाहे वेडा, नामदेव, ६
ये रे ये रे देवा, नामा तुज बाहत, येई बा धांवत, देवराया ७

नामदेव.

येथें भगवान् **पांडुरंग आलंबन; दीनदयालुत्वादि गुणांचें वैभव उद्दीपन; रोमांचित होऊन धांवा करणें, शरण जाणें** इत्यादि **अनुभाव; चिंता औत्सुक्य** इत्यादि **व्यभिचारिभाव,** यांनीं **देवविषयक रति** पुष्ट होऊन **भक्तिरस** सुव्यक्त झाला. **ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, श्रीधर, महीपति, वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत,** इत्यादिकांच्या काव्यांत **भक्तिरसांची** स्थलें अनेक आहेत; आणखी उदाहरणें;

अभंग.

हाकेसरशीं उडी घालोनीया स्तंभ फोडी १
ऐशी कृपावंत कोण माझे विठाई वांचोन? २
करितां आठव, धांवोनीयां घाली कव; ३
तुका म्हणे भक्तकाजा, उडी घाली स्वामी माझा ४

हेचि माझी आस, जन्मोजन्मीं तुझा दास १
पंढरीचा वारकरी, वारी चुकों न दे हरी २
संतसंग सर्वकाळ, सदा प्रेमाचा कवळ, ३
चंद्रभागे स्नान, तुका म्हणे हेंचि दान ४

सदा माझ्या डोळां, जडो तुझी मूर्ती, रुक्मिणीच्या पति सोयरीया १
गोड तुझें रूप, गोड तुझें नाम, देई मज प्रेम, सर्वकाळ २
विठो माउलिये, हाचि वर देईं; येउनीयां राहीं, हृदयामाजीं ३
तुका म्हणे कांहीं, न मागें आणीक, तुझें पायीं सूख, सर्व राहे. ४

तुकाराम.

वत्सल.

पुत्र, **बंधु** इत्यादिकांविषयीं जी **रति** (स्नेह) ती **विभावादिकांनीं** पुष्ट झाली असतां **वत्सल रस** उत्पन्न होतो.

गीति.

बाळें जेव्हां पाहे पान्हा श्रीदेवकीस्तनां दाटे,
आटे शोकांभोधि स्वान्ताला हायसें तिच्या वाटे १
भेटे त्या पुत्रांतें, पाजी, चुंबी, रडे, सुखें हांसे,
जाणों ते मायेनें मोहाचे घातले गळां फांसे ! २

मोरोपंत-कृष्णविजय.

देवकीला कृष्णप्रसादानें आपल्या मृतबालकांचें दर्शन झालें त्यावेळेची तिची स्थिति पंतांनीं या पद्यांत वर्णिली आहे.

येथें आलंबनविभाव बालकें; उद्दीपनविभाव त्यांचें दर्शन; पान्हा फुटणें, चुंबन घेणें इत्यादि अनुभाव, हर्षवगैरे व्यभिचारिभाव. यांनीं स्थायिभाव जो स्नेह तो परिपुष्ट होऊन वत्सलरस निष्पन्न झाला.

स्रग्धरा.

वैदर्भी यास पाहे द्रव हृदयिं धरी तत्क्षणीं स्तन्य वाहे,
कीं ते आनंद लाहे जरि तनुज असें ज्ञात होणेंचि आहे;
बाष्पानें कंठ दाटे सकल तनुवरी क्षिप्र रोमांच थाटे,
शोकाचा सिंधु आटे त्वरित परम तद्दर्शनीं लोभ वाटे १

मोरोपंत-कृष्णविजय.

रुक्मिणीचा पुत्र प्रद्युम्न याला लहानपणींच शंबरासुरानें पळविलें होतें. कांहीं वर्षांनीं प्रद्युम्न बंधमुक्त होऊन द्वारकेला परत आला. त्याला पाहिल्याबरोबर रुक्मिणीची जी अवस्था झाली, ती पंतांनीं वरील पद्यांत मार्मिकपणें रेखाटली आहे.

शिष्टाई करण्याकरतां कृष्ण कौरवांकडे गेले तेव्हां कुंतीच्या व कृष्णाच्या भेटीचें पंत वर्णन करतातः—

गीति.

वैकुंठाच्या कंठीं घालोनि मिठी रडे पृथा आर्या,
ब्रह्मासहि गहिंवरवी महिवरवीरेन्द्रपांडुची भार्या ! १

रामचंद्राला परत आणण्याकरितां **भरत** त्याच्या मागोमाग वनांत गेला. दर्शनि झाल्याबरोबर परस्परांस अनिर्वचनीय आनंद झाला त्याचें वर्णन **वामनपंडित** करतातः—

उपजाति.

रडे फुंदफुंदे शिरीं पादपद्मा, धरी सद्म मानीतसे नित्य पद्मा;
बळें क्षेम घे त्यासि ओढोनि राम, स्वभक्तप्रिय स्वामिभक्ताभिराम १

स्वागता.

मांडिये-उपरि बैसविला हो, अश्रुनीर पुसि हें सुख लाहो;
वासरा, न रड सांग सुवार्ता, शब्द हा निववि दुःखदवार्ता २

चंद्रकेतूला पाहून **राम** सद्गदित होतो आणि म्हणतोः—

वसंततिलक.

दिनकरकुलचंद्रा, चंद्रकेतो कुमारा !
दृढतर परिरंभा देइ मातें उदारा;
तुहिनशकलशीतें कोमळें जीं त्वदंगें,
मम हृदय निवो हें त्यांचिया पूर्णसंगें १

उत्तररामचरित्र-अंक ६.

प्रेयान् रस.

मित्राविषयीं जी रति (स्नेह) ती विभावादिकांनीं पुष्ट झाली असतां **प्रेयान् रस** प्रकट होतो.

गीति.

सदनांगणांत दुरुनि पाहुन सन्मित्र बंधुला सहसा,
सहसात्विकभाव प्रभु धावे तो होय मूर्तसन्महसा १
राहे हर्षी न मना नमनाचें भान बंधु पाहोनी,
बाहूनि प्रेमानें मानें आलिंगिलाच बाहूंनीं २
दोघांचेंही होतां आलिंगन हृत्प्रमोदकारि गळे,
दाटति, दोघांच्याही नेत्रांतूनि प्रभूत वारि गळे, ३

मोरोपंत—कृष्णविजय.

आपला बाळपणचा परम मित्र **सुदामा** हा आपणाला भेटावयाला आला असें दुरून पाहतांच **कृष्णाला** प्रेमाचें भरतें आलें व त्यानें त्याला प्रेमालिंगन दिलें हा प्रसंग प्रस्तुत पद्यांत **पंतांनीं** वर्णिला आहे.

भाव.

देवता, ऋषि, गुरु, विप्र, राजा, बंधु, मित्र, पुत्र इत्यादिकांविषयीं जी रति (प्रेम, भक्ति किंवा स्नेह) ती आणि पूर्वोक्त **व्यभिचारिभाव** हे, **विभाव अनुभाव** आणि **व्यभिचारिभाव** यांच्या योगानें पुष्ट झाले असतां त्यांस **भाव** असें म्हणतात.

देवता, बंधु, मित्र, पुत्र इत्यादिकांच्या रतीविषयीं मागें **भक्तिरस, वत्सलरस** व **प्रेयान् रस** यांतच विचार झाला. तेव्हां त्यांचीं उदाहरणें इकडे त्या त्या भावांचीं उदाहरणें म्हणून समजण्याला हरकत नाहीं. ऋषि गुरु, विप्र आणि राजा यांविषयींच्या रतीचीं उदाहरणें क्रमानें खालीं दिलीं आहेत.

शार्दूलविक्रीडित.

प्रेमें पुजूनि, हस्त जोडुनि म्हणे ' आम्हांस हीं पावलें,
दावाया अजि ! विश्वतारक ! तुम्हां स्वामी बरें फावलें;
झाला धन्य कृतार्थ वंश यदुचा, केली दया वासरा,
जोडा नाहिंच, भेटली बहु दिसां हे गाय या वासरा ' १

देवर्षि **नारद** हे द्वारकेस **कृष्ण**दर्शनार्थ प्राप्त झाले त्यावेळीं **कृष्णानें** त्यांचा सत्कार केला त्याचें हें वर्णन आहे. येथें **नारद आलंबन**; त्यांचे **विश्वतारकत्व, तपःसंपन्नता** इत्यादि **उद्दीपन; दर्शन करून कृतार्थ झालों** इत्यादि उक्ति **अनुभाव; हर्षरोमांचादि व्यभिचारिभाव;** यांनीं **ऋषिविषयक रतिभाव** व्यक्त झाला.

ओवी.

सद्गुरूस म्हणों लक्ष्मीवंत, तरी ते लक्ष्मी नाशवंत,
जयाचे द्वारीं असे तिष्ठत, मोक्षलक्ष्मी १
स्वर्गलोक इंद्रसंपत्ती, हे काळांतरीं विटंबती,

सद्गुरुकृपेची प्राप्ती, कल्पांतींही चळेना,
हरिहरब्रह्मादिक, नाश पावती सकळिक,
सर्वदा अविनाश एक, सद्गुरुपद ३
तयास उपमा काय द्यावी, नाशवंत सृष्टि आघवी,
पांचभौतिक उठाठेवी, न चले तेथें ४
म्हणोनि सद्गुरु वर्णवेना, हेंग हेचि माझी वर्णना,
अंतर स्थितीचिया खुणा, अंतर्निष्ठ जाणती ५

दासबोध-दशक पहिला-समास ४.

येथें गुरुविषयक रति व्यक्त झाली आहे.

गीति

वर्णगुरु ब्राह्मण हा श्रुतदेव प्रथम सर्वथा पूज्य,
जनसंग्रहधर्मपथीं घालावें यासि लंघितां पूज्य १

मोरोपंत-कृष्णविजय.

ही **श्रुतदेव-ब्राह्मणासंबंधानें कृष्णाची** उक्ति आहे. हिच्यांत **ब्राह्मणाविषयीं रतिभाव** प्रकट झाला आहे.

मालिनी.

फलमधुकुसुमांनीं वृक्ष पूजोत सारे,
स्फुटकमलसुगंधी मंद वाहोत वारे;
मधुरतर करावा शब्द येथें शकुंतीं,
फिरुनि सहज आला राम कीं या वनांतीं १

उत्तररामचरित्र.

ही **वासंती**ची वनदेवतांप्रत उक्ति आहे. राजा **रामचंद्रा**विषयीं येथें **रतिभाव** व्यक्त झाला आहे.

साकी.

पांडुरवदना वरुन सारुनी मागें केश करानें,
पथिककामिनी गगनीं तुजला भेटतिल प्रेमानें ! १

गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक शोभती मुखावरी तें कमळीं मधुकर जैसे ! २

मेघदूत.

पहिल्या साकींत उत्कंठा व हर्ष हे **व्यभिचारिभाव**; करानें केश मार्गे सारणें, मेघाकडे प्रेमपूर्वक अवलोकन करणें या **अनुभावांनीं** पुष्ट झाले आहेत. दुसऱ्या साकींत दैन्य, मोह, औत्सुक्य इत्यादि **व्यभिचारिभाव** हस्ततलावर गाल टेकणें, चिंतातुर बसणें, अलक मुखावर विखुरणें या **अनुभावांनीं** पुष्ट झाले आहेत.

ज्या रसाचा जो स्थायिभाव तो इतररसप्रसंगीं यथासंभव व्यभिचारिभाव होतो.

शिखरिणी.

तुझें जाणें प्राणेश्वरि ! समजुनी स्वर्गभुवनीं,
अलाफांतें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं;
निमाली चिंता ती सकल कमलांची आजि पहा,
तशी चंद्रा कैशी अतुल सुषमा लाधलि अहा ! १

विलाप-पद्यरत्नावली.

या पद्यांत **विस्मय, रति** व **शोक** हे तीनही **स्थायिभाव** प्रतीत होतात; तथापि **शोक** हा **स्थायिभाव** परिपुष्ट झाल्यामुळें **करुणरस** व्यक्त झाला आहे. **विस्मय** व **रति** हीं **शोकाचीं** पोषक झालीं आहेत. यास्तव हीं येथें **व्यभिचारिभाव** होत.

शार्दूलविक्रीडित.

वाटे देउनियां हिला स्वरुचितें निर्मी शशी कीं स्मर,
शृंगारैकवपू हिला उपजवी, कीं रम्य पुष्पाकर !
कां कीं वेदजडास ज्यास विषयीं गोडी कशाची, असा
निर्मायास शकेल वृद्ध मुनि तो ऐशा स्वरूपा कसा ? १

विक्रमोर्वशीय.

येथें **विस्मय** व **रति** असे दोन **स्थायिभाव** गम्यमान आहेत. तथापि

विस्मय परिपुष्ट झाल्यामुळें अद्‌भुतरस निष्पन्न झाला आहे. **रति** अगत्यानें आल्यामुळें तिला **व्यभिचारिभावाचें** स्वरूप आलें आहे.

रसाभास व भावाभास.

रस आणि **भाव** यांचा योग्य रीतीनें परिपोष झाला नाहीं तर त्यांस अनुक्रमें **रसाभास** व **भावाभास** असें म्हणतात.

शृंगाराभास;

गीति.

सुंदरि विशालनेत्रे, हा मस्तक तव पदींच म्यां नेला,
दशनखचंद्रविभूषित हस्तांजलिही तुझ्यापुढें केला १
जो म्यां पूर्वी केला अपराध तुझा धरोनि कामास,
त्याची क्षमा करावी आतां झालों प्रिये ! तुझा दास २

मृच्छकटिक-अंक ८.

ही **शकाराची** **वसंतसेनेप्रत** प्रणयोक्ति आहे. येथें **शृंगाराचा** आभास आहे. कारण **शकाराची** जरी **वसंतसेनेवर** प्रेमदृष्टि होती तरी तिला उलट त्याच्याविषयीं अनुराग नव्हता. यामुळें **रति** हा स्थायिभाव येथें पुष्ट झाला नाहीं. यास्तव येथें **शृंगाराभास** होय.

ओंवी.

गौरजानु कटिमंडल, विलसे सुंदर वदनकमल,
नयनघ्राण अधरप्रवाल, सुकोमल साजिरे,

मुक्तेश्वर-सभापर्व.

दुःशासनानें **द्रौपदीला** सभेंत ओढीत आणिलें, तिला पाहून हर्षभरित व कामोद्दीपित झालेल्या **दुर्योधनाची** ही उक्ति आहे. या ठिकाणीं **दुर्योधनाचा** प्रणय परदाराभिलाषरूप असल्यामुळें अनुचित होय. यास्तव **रतिभाव** हा **स्थायिभाव** यथ **पुष्ट** **झाला** **नाहीं**. म्हणून हेंही **शृंगाराभासाचें** उदाहरण होय.

उपजाति.

श्रांता स्वकांता निरखूनि सत्वरी, करी करानें जलसेक तीव्ररी;
छत्रापरी पुष्कर पत्रही धरी, स्नेहें प्रियेचा श्रमखेद तो हरी १

प्रहर्षिणी.

लीलेनें उपडुनि अब्जनालखंडें, दांतांनीं चघळुनि काढितो. स्वतुंडें;
भक्षाया कवळ तिला करोनि देतो, कांतेचें मन रमवी कसें पहा तो २

उत्तररामचरित्र–अंक ३.

यांतील **रति** हा **स्थायिभाव** पशुविषयक असल्यामुळें अनुचित आणि म्हणूनच **शृंगाररस**कोटीप्रत् जात नाहीं. तो तसाच अपुष्ट राहिल्यामुळें येथेंही **शृंगाराभासच** आहे. देवतांचा, वृद्धांचा व पूज्यांचा शृंगार वर्णन करणें हें अनुचित आहे. असें वर्णन कोठें आढळल्यास तेथें **शृंगाराभास** जाणावा.

शांतरसाभास.

गीति.

मौन सदा एकांतास्थिति, साधुसमाधियोग, सुविरक्ति,
सक्ति न लोकसमाजीं लागे पौरास पार्थयतिभक्ति १

मोरोपंत-कृष्णविजय.

सुभद्राहरणाकरितां **रैवतक**गिरीवर कपटानें यतिवेष धारण करून राहिलेल्या **अर्जुनाचें** हें वर्णन आहे. **अर्जुन** हा खरा यति नसल्यामुळें **शम** किंवा **निर्वेद** हा **स्थायिभाव पुष्ट होत नाहीं**. यास्तव येथें **शांतरसाभास** झाला.

हास्याभास.

'**खाई माषवडे गुरू**' इत्यादि **साहित्यशास्त्रोक्त** श्लोक **हास्यरसाभासाचें** उदाहरण होय. कारण, गुरूची थट्टा त्यांत व्यक्त झाल्यामुळें **हास** हा **स्थायिभाव तेथें पुष्ट होत नाहीं.**

वीररसाभास.

गीति.

म्हणती हाणा मारा पाडा घ्या काय पाहतां तोंडा,
कोंडा प्राणव्यसनीं बाळ बुडो कर्दमीं जसा घोंडा १

मोरोपंत-अभिमन्युवध

या.पद्यांत एकट्या, विरथ, **अभिमन्यु**बालकावर अनेक, रणधुरंधर, रथी वीर गर्दी करूं लागले असें वर्णन आहे. असमांमध्यें युद्ध हा अधर्मयुद्धाचा प्रकार होय. यामुळें येथें अनौचित्य उत्पन्न होऊन **उत्साहरूप स्थायिभाव** पुष्ट झाला नाहीं; यास्तव येथें **वीररसा**चा आभास आहे.

असेंच **इतर रसांचें आभास**ही जाणावे.

भावाभास.

गीति.

स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि काकांनीं,
हर्षभरें नभ भरिलें का का का का अशा स्वहाकांनीं ! १
अप्रिय बोलति पुष्कळ हांसति बहु हेळसोनि हंसातें,
अवमानिती अमंगळ खळ ते खगकुलशिरोवतंसातें २
मृदुपातें हंस उडे काकाहूनि हीनशक्तिसा भासे,
ऐसें मुहूर्तभरि तो दावी तों काकमंडळी हांसे ! ३

मोरोपंत-हंसकाकीयकथानक.

या आर्यांत **काकगत हर्ष, गर्व, असूया** इत्यादि **भाव** व्यक्त झाले आहेत. प्रस्तुत पद्यांत काक या नीच पक्ष्यांनीं हंस या पक्षिश्रेष्ठाची अपमानपूर्वक स्पर्धा केली असें वर्णन आहे. थोरांची स्पर्धा नीचांनीं करणें अनुचित होय. असा अनुचितपणा व्यक्त झाल्यामुळें येथें वर निर्दिष्ट केलेले **हर्ष, गर्व, असूया** इत्यादि **भाव पुष्ट** झाले **नाहींत**; यास्तव येथें भावाभास झाला.

भाग चवथा.

गुण.

रसाला पुष्ट करणारे जे धर्म त्यांना **गुण** असें म्हणतात. **माधुर्य, ओज** आणि **प्रसाद** हे तीन **मुख्य गुण** आहेत.

माधुर्य.

मनाला द्रव उत्पन्न करून आल्हाद देणारा जो धर्म त्याला माधुर्य ह्मणतात. संभोगशृंगार, करुण, विप्रलंभशृंगार, आणि शांत या रसांत माधुर्य हा गुण उत्तरोत्तर अधिक असतो. उदाहरणें:—

मालिनी.

अलसललितमार्गी चालतां श्रांत झाली,
दृढतर परिरंभा देउनी सांवरीली;
मृदुलकमलतंतूतुल्य होतां त्वदंगें,
पडुनि हृदयिं माझ्या घेतली झोंप संगें १

उत्तररामचरित्र.

शार्दूलविक्रीडित.

कालिंदीतटवाळुवंट गगनीं संपूर्ण तारापति,
कल्हारीं कुमुदोत्पलीं अलि शरत्कालीं जळीं गुंजती;
वारा मंद सुगंध शीतल फुलें नाना तरू शोभती,
ऐशा यामिनि गोपिका हरिसवें रासोत्सवीं क्रीडती १

वामन–रासक्रीडा.

स्वागता.

शुक म्हणे स्त्रवली नयनांबुजीं, धुकधुकी मनिं कंप हृदंबुजीं;
स्वपवनें निजबिंब फलाधरा, करुनि शुष्क पदें उकरी धरा १

वामन–रुक्मिणीविलास.

साकी.

सुंदर नयनानंदकर अशा असती वस्तु अपार,
मनोविदोदनशीले ! तुजविण दिसती सकल असार १

पद्ममंजरी.

शार्दूलविक्रीडित.

गेलें कुंकुम भाळिचें न कळतां घर्मांबुनें ही जरी,
शोभे फार ललाट अंकरहिता त्या चंद्रखंडापरी;

भूषाहीनाहि कर्ण रम्य सुरुची गालांवरी ज्यास ते,
गे माझ्या नयनापुढें मुख तुझें प्राणप्रिये दीसतें १

उत्तररामचरित्र अंक १

शिखरिणी.

बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवधिया,
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां;
जिचें डोळे काळे बघुनि मृगबाळेंहि झुरती,
बसे चित्तीं देवी परि सतत ती मात्र सुदती १
सुधास्पर्शे जेवीं निवति नयनें जीस बघुनी,
जिचा कंठीं वाटे कर कमलहारापरि मनीं;
करी जी उल्लासा अतुल कविता सुंदर जशी,
तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तिजशीं २

पद्यरत्नावली.

साकी.

घना ! विरहिणींची ती वेणी मळली असेल फार,
रूक्षहि झाली असेल नसतां तैलादिक उपचार १
नाहीं न्हाणहि जेथें, तेथें भूषणगोष्टि कशास,
सुखकर विषयहि विरस वाटती होतां चित्त उदास २
ऐसें पाहुनि दुःख सतीचें वाहतील जलधारा,
निश्चित तुझिया नयनांतुनि, बा, जलदा, जगदाधारा ! ३
तुझ्या सारखें हृदय जयांचें असते आर्द्र तयांतें,
नवनीतापरि पाझर सुटती देखुनी परतापातें ४

कृ. शा. चि. कृत-मेघदूतभाषांतर.

अमृतध्वनि.

मंदारवृक्षयुतवृंदावनीं रमुनि नंदास नंदित करी,
वृंदारकां सुजनवृंदासही परमनंदा सदैव वितरी;

मंदा ! दुजा त्यजुनि धंदा असा वळवि वंदारुवंदित हरी,
छंदासि या धरिशि खंदा तरी न नरवृंदांतरीं तुजपरी १
पद्यमंजरी.

अनुष्टुभ्.

मंदही पावती भाग्यछंद यत्पदवंदनें,
स्कंद तो नमिला विद्याकंद श्रीयदुनंदनें १
मोरोपंत–कृष्णविजय.

अनुष्टुभ्.

कांतातें कांचनातेंही निंदती संत संतत,
अनंतीं सच्चिदानंदीं जे प्रमोदें सदा रत १
साहित्यशास्त्र.

वरच्यापैकीं पहिल्या तीन पद्यांत **संभोगशृंगार** आहे; त्यांच्या पुढील चार पद्यांत **करुणरस** आहे; त्यांच्या पुढच्या चार पद्यांत **विप्रलंभशृंगार** आहे; आणि शेवटल्या तीन पद्यांत **शांतरस** आहे.

ओज.

अंतःकरणाचें दीपन करणारा म्हणजे त्याचा विस्तार करणारा जो धर्म त्याला **ओज** ह्मणतात.

वीर, बीभत्स आणि **रौद्र** या रसांस हा **उत्तरोत्तर अधिक पुष्ट** करतो.

गीति.

तो खड्गचर्म घेउनि अवलंबी वीरनायक विहाय,
संकट पडतां सोडुनि धैर्यासि ह्मणेल काय कवि हाय ! १
शत्रुमुखींचें क्षितिवरि उतरुनि घेऊनि चक्रपाणी हरी,
वाटे साक्षात् शिरला असुरसमूहांत चक्रपाणि हरी ! २
मोरोपंत–अभिमन्युवध.

अनुष्टुभ्.

ज्यानें त्रिनेत्रदोर्दंडमंडिकोदंड खंडिलें,
दशवक्त्रक्षयासाठीं त्यानें अस्त्रास घेतलें १

प्रेतें नाचति मस्तिष्कभेदस्नाय्वंत्रतृप्तिनें,
श्मशानीं जर्जरीमांसभुक्कोष्टुक्रूरगर्जनें २

साहित्यशास्त्र.

स्रग्धरा.

वृष्णींचा शक्र चक्र त्वरित मग नगच्छेदना जेविं पाक,
द्वेषी वज्र स्वकर्मद्रुमफळततिचा भोगवी जो विपाक;
सोडी, तोडी, क्षणांत क्षितिवरि सहसा लोळवी चैद्यमस्ता,
हस्ता जोडोनि वंदी, स्तवि सदभयदा त्या सभा ती समस्ता १

कृष्णविजय.

अनुष्टुभ्.

नखवज्राग्रविच्छिन्नदैत्यवक्षा नृसिंह हा,
ज्वलत्कल्पाग्निवन्नेत्रयुक्तवक्त्र दिसे पहा १

ग. शा. लळे.

वरच्यापैकीं पहिल्या तीन पद्यांत **वीर रस** आहे. चवथ्यांत **बीभत्स रस** आहे आणि शेवटल्या दोन पद्यांत **रौद्र रस** आहे.

प्रसाद

ऐकल्याबरोबर अर्थबोध करून देऊन अंतःकरणाला व्यापून टाकणारा जो धर्म त्याला **प्रसाद** म्हणतात. हा **सर्व रसांस साधारण आहे.** उदाहरणें:—

शार्दूलविक्रीडित.

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला,
व्याधाचे चुकवूनि बाणहि महावेगें पुढें चालला;
तों घाईंत उडी फसोनि पडला आडामध्यें बापडा,
होती सर्वहि यत्न निष्फळ जरी होई विधी वांकडा १

दिंडी.

नवें कोमल उगवलें गवत दाट, स्वच्छ सुंदर वाहतो त्यांत पाट;
मृगी ठायीं त्या एक देखियेली, जिच्या अंगीं तारुण्य करित केली २

पद्यरत्नावली.

शार्दूलविक्रीडित.

या कुंजांतचि वाट पाहत तिची होतास तीं गोमटी,
होती हंसविलास देखत उभी गोदावरीच्या तटीं;
येतां खिन्न तुला विलोकुनि तिच्या शंका मनीं वाटली,
भीतीनें तुज हात जोडुनि तिनें केला प्रणामांजली १

उत्तररामचरित्र.

शार्दूलविक्रीडित.

रात्रीला दिव्यलीच लाज कृतिनें निद्रेसही जिंकिलें,
राजाचे बहु दक्ष रक्षक तयां जिंकोनि म्यां टाकिलें;
हीं कर्मे करितां सरोनि अवघी गेली निशा सत्वरी,
झालों मी सहसा रवी उगवतां निस्तेज चंद्रापरी १

मृच्छकटिक अंक ४.

वसंततिलक.

वीरासनीं कनककार्मुक बाणपाणी,
टेंकोनि ढाल कर घालुनिया कृपाणीं;
जो बैसला द्विजगणांत कलानिधी तो,
म्यां आपण प्रणयिला गुणवारिधी तो! १

आनंदतनय.

भाग पांचवा.

वृत्ति आणि रीति.

रसाला अनुकूल अशी जी वर्णरचना तिला वृत्ति ह्मणतात. **मधुरा, परुषा,** आणि **प्रौढा** असे वृत्तीचे तीन प्रकार आहेत. हे अनुक्रमें **माधुर्य, ओज** आणि **प्रसाद** यांचे व्यंजक आहेत.

मधुरा.

ट, ठ, ड व **ढ** या वर्णांशिवाय **क**पासून **म**पर्यंत आपापल्या अनुनासिकांनीं युक्त असे वर्ण, ऱ्हस्व स्वरान्वित **रेफ** आणि **णकार,** हे वर्ण

माधुर्याचे व्यंजक आहेत. असे मधुर वर्ण ज्या रचनेमध्यें विशेष असतात तिला **मधुरा वृत्ति** असें म्हणतात. हिला **कैशिकी** असेंही नांव आहे. उदाहरणें:—

वसंततिलक

हे मंदमंद पदसुंदर कुंददंती,
चाले जसा मदधुरंधर इंद्रदंती;
हंसा धरु जवळि जाय कशो दरी ते,
निष्कंपकंकणकरासि पुढें करी ते १
गंगातरंगसम जो निजदेहवर्णी,
भृंगापरी रुचिर कान्ति जयासि कर्णी;
जंघाल जो पवनसंगतिची सवें घे,
शृंगारिला हय तयावरि भूप बैंघे २
पीता मरंद उदरंबर भ्रमरांचें,
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें;

नलोपाख्यान.

वसंततिलक.

स्वेदांबुनें रुचिर फार कपोल झाले,
त्यांच्यावरी श्रवणकुंडलयुग्म हाले;
येतां अशी स्मृतिपथाप्रति सुंदरांगी,
आनंद अंकुरित होय मदंतरंगीं १

महाराष्ट्रभामिनीविलास.

उपजाति.

अनंगरंगांबुधिच्या तरंगीं, रंगीं शुभांगी जडि अंतरंगीं;
भंगील हा हो धनु केविं रंगीं, म्हणे कुरंगीनयनी सुरंगी १

वामन.

परुषा.

वर्गाचे प्रथमतृतीय वर्ण यांचा द्वितीयचतुर्थ वर्णांशीं, रेफाशीं किंवा वतांशींच योग, णकारवर्ज्य टवर्ग, श ष षँ हे वर्ण, **विसर्ग** किंवा **संयोग**

पुढें आहे असे ऱ्हस्व वर्ण हे ओज या गुणाचे व्यंजक आहेत. हे वर्ण ज्या रचनेंत विशेष येतात तिला परुषा वृत्ति ह्मणतात. आरभटी असेंही हिला नांव आहे.

शार्दूलविक्रीडित.

गर्वे पर्वतमस्तकीं जलधरा धारा वृथा वर्षसी,
पीडा कष्ट करोनि नाविकजनां दुष्टापरी हर्षसी;
पाण्यावीण लता तरू सुकति हे वृष्टी जरी यावरी,
रे मेघा करितासि कीर्ति भुवनीं होती तुझी, वा, खरी !

पद्यरत्नावली.

स्रग्धरा.

मध्यथीं वीर अठ्ठाविस दिवस निशा ते अविश्रांत बोटें
त्याला पाहोनि वक्त्रीं धरिति सुरवधूवर्ग अत्यंत मोठें;
श्येन क्रव्यार्थ जैसे झगडति विजया कारणें मत्त मल्ल,
स्वर्वासिस्वान्तगर्वापह करिति भुजायुद्ध गोविंदभल्ल १

मोरोपंत–स्यमंतकोपाख्यान.

शार्दूलविक्रीडित.

ऐशी ते वदतां वधू मग पुढें कैशी कथा वर्तली,
जैशीं चंडमरुद्वरें बनतटी तैशी सभा नर्तली;
शंकाहीन मदें मदोद्धत महाहंकार ज्याचा भला,
डंका दुंदुभि वाजवीतचि सभे लंकापती पातला १

आनंदतनय.

शार्दूलविक्रीडित.

दखोनी उदया तुझ्या द्विजकुलें गातीं अती हर्षुनी,
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यन्तरीं जाउनी;
देशी ताप परी जसा वरि वरी येशी नभीं भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा २

पद्यरत्नावली.

प्रौढा.

य, र, ल, व, स; आणि ह हे कोमल वर्ण व पूर्वोक्त **मधुरवर्ण** आणि **परुषवर्ण** यांचें मिश्रण **प्रसादगुणाचें** व्यंजक आहे. ज्या रचनेंत **कोमल, मधुर** आणि **पुरुष** वर्ण यांचें योग्य संमेलन होतें तिला **प्रौढावृत्ति** म्हणतात. हिला **सात्वती** असें दुसरें नांव आहे. उदाहरणें:—

मालिनी.

सदय हृदय याचें भूप हा ताप हारी;
ह्मणुनि परिसतां मी होय येथें विहारी;
मजहि वध कराया पातकी पातला जो,
वरुनि पति असा ही भूमि कैसी न लाजो ? १

वसंततिलक.

ऐशीं खगेंन्द्र वचनें वदतां तयाला,
विश्रांतिही विरहखेदहि फार झाला;
आधार हा मज म्हणोनि गणोनि डोले,
झाला सवेंचि विरही नलराज बोले २

नलोपाख्यान.

स्रग्धरा.

गेला लोकांतरातें दिनकर सकला द्योतवी जो जगातें,
अस्तातें जाय तोही हिमकिरण जया सौख्यदा विश्व गातें;
मेघांनीं व्याप्त ऐशा गगनिं नचि दिसे एक ताराहि कोठें,
रे खद्योता ! अतां तू चमक बहु, तुझें दैव बा फार मोठें ? १

कृ.शा. चिपळूणकर.

रीति.

रसाला अनुकूल अशी जी पदांची रचना तिला **रीति** म्हणतात. **वैदर्भी, गौडी** आणि **पांचाली** अशा तीन रीति आहेत. **वैदर्भी** आणि **पांचाली** यांच्या मध्यें **लाटी** या नांवाची एक **रीति साहित्यदर्पणकारांनीं** सांगितली आहे. **वैदर्भी, गौडी, लाटी** आणि **पांचाली** हीं नांवें **विदर्भ,**

गौड, लाट आणि पांचाल या देशांत त्या त्या रीति प्रचलित असल्यामुळें पडलीं असा तर्क आहे.

वैदर्भी.

ज्या रचनेंत समास बहुधा असत नाहीं, आणि असला तर अगदीं अल्प असतो ती **वैदर्भी** रीति होय. ही **माधुर्याची व्यंजक** आहे. जसें:-

पृथ्वी.

घरीं दशरथाचिया वसत होति लक्ष्मीपरी,
कशास उपमा तिची उघड हीच लक्ष्मी खरी;
परंतु परकी जशी तशिच भासते ही मला,
दशा कशि दिली पहा कठिण दैवयोगें हिला ! १

उ.रा. च. अं. ४

गौडी.

ज्या रचनेमध्यें चार शब्दांपेक्षां अधिक शब्दांचा समास येतो **ती गौडी रीति.** ही **ओज** या गुणाची व्यंजक आहे.

गीति.

पवीं अर्णव तैसा भगवान् बलभद्र पुष्कळ क्षोभे,
संध्यारागसुरंजितशरदभ्राहूनि फार तो शोभे १

मोरोपंत-कृष्णविजय.

गीति.

वरविक्रममंडितभुजदंडनिहितचंडचापदंडाचा,
मी दूत राघवाचा, त्वद्विधदुष्टैककालदंडाचा १

मोरोपंत

पांचाली.

ज्या रचनेमध्यें चार शब्दाच्या आंतच समासघटक शब्द असतात तिला **पांचाली रीति** म्हणतात. ही **प्रसादगुणाची व्यंजक** आहे. जसें:-

गीति.

यद्रसनाग्रीं नाचसि होउनि तूं सुप्रसन्न नटसा रे,
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे !

मोरो-नामार्या.

साकी.

शिखिपिच्छांचा मुकुट शिरावरि घालुनि यदुपति जैसा,
वृंदावनपरिसरीं शोभला, घना, शोभशिल तैसा १

मेघदूत–चिपळुणकर.

वरील रचनाविशेषांमध्यें **वक्ता, वाच्य** व **प्रबंध** यांच्या अनुरोधानें कोठें कोठें फेरफारही करावे लागतात. उदाहरणार्थ, **शृंगाररस** प्रस्तुत आहे तर सामान्यपणें **माधुर्यगुणद्योतक** अशीच तेथें रचना पाहिजे. परंतु नायक जर कोपयुक्त असेल किंवा **भीमासारखा** स्वभावतः उद्धत असेल अथवा राक्षसादिकांपैकीं कोणी असेल तर **ओज हा गुण तेथें शोभादायक होईल. तो शृंगाराला विरुद्ध होणार नाहीं.** असेंच अन्यत्रही तर्कानें जाणावें.

द्वितीय उल्लास.

शब्दालंकार आणि शब्दार्थालंकार.

शब्द आणि अर्थ एतद्रूप काव्याचा देह आहे; या देहाला अलंकृत करणारे जे धर्म त्यांना **अलंकार** असें म्हणतात.

अलंकाराचे तीन प्रकार आहेत. ते असेः **शब्दालंकार, अर्थालंकार,** आणि **शब्दार्थालंकार.**

शब्दद्वारा काव्यास शोभा देणारे जे धर्म त्यांना **शब्दालंकार,** अर्थद्वारा काव्यास शोभा देणारे जे धर्म त्यांस **अर्थालंकार.** आणि शब्दार्थांनीं काव्यास शोभा देणारे जे धर्म त्यांस **शब्दार्थालंकार** असें म्हणतात.

शब्दालंकार व **शब्दार्थालंकार** हे अप्रधान आणि अल्प आहेत यास्तव सूचीकटाहन्यायानें त्यांचेंच प्रथमतः प्रस्तुत उल्लासांत विवेचन केलें आहे. **अर्थालंकार** विशेष महत्वाचे असून पुष्कळ आहेत म्हणून त्यांचें विवरण पुढें तिसऱ्या उल्लासांत केलें आहे.

शब्दालंकाराचे सहा भेद आहेत. ते असेः—

१ अनुप्रास, २ यमक, ३ चित्र, ४ श्लेष, ५ वक्रोक्ति . आणि६ पुनरुक्तवदाभास. यांतील शेवटले तीन अर्थालंकारही होतात हें पुढें सांगितलें आहे.

अनुप्रास.

वर्णांच्या साम्याला **अनुप्रास** म्हणतात.

येथें वर्णशब्दानें व्यंजनांचेंच ग्रहण इष्ट आहे; कारण स्वरसादृश्य नसलें तरी व्यंजनसादृश्याचें सौन्दर्य कमी होत नाहीं. 'रसाद्यनुगतः प्रकृष्टो-न्यासः,' अशी **काव्यप्रकाशांत अनुप्रास** ह्या शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. रसादिकांना अनुकूल अशी वर्णांची विशेष रचना असा तिचा अर्थ आहे.

वृत्त्यनुप्रास, छेकानुप्रास, व **लाटानुप्रास** असे **अनुप्रासाचे** तीन भेद आहेत.

एक किंवा अनेक वर्णांची एकवार किंवा अनेकवार आवृत्ति आली असतां **वृत्त्यनुप्रास** होतो.

'वृत्तिर्नियतवर्णगतो रसविषयो व्यापारः,' अशी **वृत्तिशब्दाची** व्याख्या **काव्यप्रकाशांत** दिली आहे. रसानुकूल अशा कांहीं नियत वर्णांच्या व्यापाराला **वृत्ति** हें नांव आहे असा तिचा अर्थ आहे.

शार्दूलविक्रीडित.

बापाच्या उजवेकडेस बसली ग्यां पाहिली नोवरी,
व्यापारान्तर टाकुनी तव कथालापांसि जे आदरी;
तापातें हरि । करोनि मधुरालापासि जे सुंदरी,
ज्या पावे जगदीशसांगसुमनश्चापा नृपा त्या वरी १

र. पं. कृ. नलोपाख्यान.

शार्दूलविक्रीडित.

जो कल्याणगुणी गुणीच अगुणी भूतें मणी ज्यागुणीं,
ज्याच्या रूपगुणीं सदा गुणगुणी शंभू रिघे निर्गुणीं;
सृष्टी चित्तगुणीं जयास्तव गुणीं माया जया ठेंगणी,
तो कोणा न गणी असे ऋषिगणीं श्रीराम रंगांगणीं. १

आनंदतनय.

पहिल्या श्लोकांत **प** या वर्णाची व दुसऱ्या श्लोकांत **ण** या वर्णाची अनेकवार आवृत्ति आली आहे म्हणून तेथें **वृत्त्यनुप्रास** झाला. आणखी उदाहरणः

शार्दूलविक्रीडित.

सीतेला स्मरसा धनूसि हरसा राजां दिसे वरिसा,
मूढांला नरसा जनां नृवरसा भक्तांसि माहेरसा;
देवां ईश्वरसा रिपूंसि गरसा ज्ञात्यांसि चित्सारसा,
ऐसा सर्व रसांसि हेतु परिसा जो सूर्य हृत्सारसा १

आनंदतनय.

येथें र आणि स या वर्णांची अनेकवार आवृत्ति आली आहे.

छेकानुप्रास.

अनेक व्यंजनांचें एकवार सादृश्य असलें ह्मणजे तेथें **छेकानुप्रास** जाणावा. **छेक** ह्मणजे **विदग्ध** किंवा **सहृदय**; त्यांना प्रिय असल्यामुळें प्रस्तुत अनुप्रासाचें **छेकानुप्रास** असें नांव पडलें आहे.

स्रग्धरा.

या चापा ऐक बापा चढविल गुण जो पूर्ण आकर्ण राजा,
हे कन्या त्याचि धन्या कृतिस निरविली साच त्याचीच भाजा;
लंकालंकार तेव्हां दशवदन वदे ऐक एकैक माजा
लीलेचा खेळ राया न पुरति सुर ते चंडदोर्दंड काजा १

आनंदतनय.

या पद्यांत **र्ण, न्य,** आणि **ण्ड** या संयुक्त वर्णांची एकवार आवृत्ति आली आहे, आणि **लं** आणि **क, व** आणि **द**, आणि **र** आणि **त** या व्यवहित (मध्यें दुसरे वर्ण आल्यामुळें दूर असलेल्या) वर्णांची एकवार आवृत्ति आली आहे.

लाटानुप्रास.

शब्दार्थ तेच असून अन्वय मात्र भिन्न असला म्हणजे **लाटानुप्रास** होतो. याला **पदानुप्रास** असेंही नांव आहे. लाटदेशांतील लोकांना हा

अनुप्रास फार प्रिय यास्तव याला **लाटानुप्रास** असें म्हणतात. **दक्षिण-हिंदुस्थानाच्या** उत्तरप्रदेशाला **लाट** ही संज्ञा होती. **नर्मदेच्या** पश्चिमेकडील प्रांत म्हणजे सांप्रतचे **अमदाबाद, बडोदे, खेडा** इत्यादि प्रांत यांना **लाट** हें नांव होतें असेंही आढळतें.

गीति.

ज्याची जवळीं दयिता दवदहन तयासि तुहिनकर होय,
ज्याची जवळि न दयिता दवदहन तयासि तुहिनकर होय १

स्वकृत.

या पद्यांत शब्दार्थ अभिन्न असून अन्वय मात्र भिन्न आहे. यास्तव येथें **लाटानुप्रास** अलंकार झाला. आणखी उदाहरणें:—

द्रुतविलंबित.

फिरवितें हरिणाक्षि निजाक्षितें;

साहित्यशास्त्र.

या चरणांत अक्षिपदाची अर्थसहित आवृत्ति आली असून ती वेगळ्या पदांशीं अन्वित आहे.

गीति.

कुंडांतोनि निघोनी प्रभु धरि त्या शस्त्रपाणिचा पाणी,
प्राणी मरो ह्मणे त्या साधु निवारी अघें मनीं नाणी १

मोरो. कृष्णविजय.

येथें **पाणि** या शब्दाची आवृत्ति अर्थसहित आली आहे; परंतु तिचा अन्वय भिन्न आहे.

साहित्यदर्पणकारांनीं श्रुत्यनुप्रास व **अंत्यानुप्रास** असे दोन **अनुप्रास** अधिक सांगितले आहेत.

श्रुत्यनुप्रास.

एकाच स्थानाच्या व्यंजनांची आवृत्ती आल्यास **श्रुत्यनुप्रास** जाणावा. जसें:—

मालिनी.

अलसलुलित, मार्गी चालतां श्रांत झाली,
दृढतर परिरंभा देउनी सावरीली;

मृदुलकमलतंतूतुल्य होतां त्वदंगें,
पडुनिं हृदयिं माझ्या घेतली झोंप संगें १

उत्तररामचरित्र.

या पद्यांत त, द, ल आणि स या दंत्य वर्णांची आवृत्ति आली आहे त्यामुळें हें पद्य कानाला फार गोड लागतें. श्रुति म्हणजे कान त्याला मधुर लागणारा; ह्मणून या अनुप्रासाला श्रुत्यनुप्रास असें ह्मणतात.

अन्त्यानुप्रासः

आद्यस्वरासह पुढच्या व्यंजनाची जशीची तशीच आवृत्ति आल्यास **अन्त्यानुप्रास** होतो.

हा पादान्तीं किंवा पदान्तीं विशेषेंकरून येतो यास्तव याला हें नांव दिलें आहे.

पादाकुलक.

बाल तोंवरी क्रीडनिं दंग, तरुण तोंवरी अनंगरंग;
वृद्धपणीं मग चिंतादीन, ब्रह्मपदीं नचि कोणी लीन १

पद्यमंजरी.

या श्लोकांत पादान्तीं **ग** आणि **न** आद्यस्वरांसह आवृत्त झाले आहेत.

उपजाति.

आनंदधामा नयनीं सुदामा, पूर्णाप्तकामा सकलाभिरामा;
पाहोनि धाला गतशोक झाला, ह्मणे भवार्तिश्रम तो निवाला १

या पद्यांत **म** आणि **ल** यांची आद्यस्वरांसह पदान्तीं आवृत्ति आली आहे.

यमक.

ज्या क्रमानें एकवार वर्ण आले असतील त्याच क्रमानें त्यांची आवृत्ति आल्यास **यमक**नामक अलंकार होतो.

द्रुतविलंबित.

गजगती जगतीप्रति दाविते, वसुमती सुमती सुख भाविते;
स्वतनुजा तनु जाणतसे धरा, नवरि ते वरिते मणिकंधरा १

वामन.

येथें पहिल्या चरणांत **जगत**, दुसऱ्यांत **समत**, तिसऱ्यांत **तनज** व चवथ्यांत **वरत** या वर्णांची पूर्वक्रमानेंच आवृत्ति आली आहे. शिवाय प्रथमद्वितीय पादांच्या अंतीं **वत** यांची व तृतीयचतुर्थ पादांच्या अंतीं **धर** या वर्णांची आवृत्ति पहिल्या क्रमानेंच आली आहे.

यमकामध्यें संयुतावृत्ति व **असंयुतावृत्ति** असे दोन मुख्य प्रकार आहेत.

जेथें **यमका**च्या मध्यें दुसरे वर्ण येत नाहींत तेथें **संयुतावृत्ति यमक.** वरील उदाहरणांत **पादांतीं यमक** आहेत. त्यांशिवाय बाकीचे **संयुतावृत्ति यमकच** आहेत. आणखी उदाहरणें:—

द्रुतविलंबित.

करिति विठ्ठलभक्त कथा बरी, सुदृढ बाळहि जीस मनीं धरी;
वश जयासि सदा भगवान् हरी, कुतुक या तुकया परि भूवरी १

मोरोपंत—विठ्ठलभक्त—स्तुति.

द्रुतविलंबित.

अनृत नित्य धरी वदनांतरीं, परधनीं अपहारमती करी;
प्रियतमा अधिदैवत बाइल, न नर कां नरकाप्रति जाइल ? १

पद्यमंजरी.

वरील श्लोकांत **कतक** आणि **नरक** यांची आवृत्ति साधली आहे. या **यमकां**च्या मध्यें दुसरे वर्ण आले नाहींत.

जेथें यमकांमध्यें दुसरे वर्ण येतात तेथें **असंयुतावृत्ति यमक.** जसें:

गीति

राधापुत्र बहु करी बाधा पार्थासि; तेधवां त्याला;
राधाह्वचोर ह्मणे, बा, धाक प्राप्त कां तुला झाला १

मोरोपंत-कर्णपर्व.

येथें राधा व बाधा यांच्या आवृत्तीच्या दरम्यान यमकामध्यें अन्य वर्ण आले आहेत.

पद्यामध्यें स्थानपरत्वें व स्वरूपपरत्वें **यमका**चें अनेक प्रकार होतात. मराठीमध्यें पद्यरचना प्रायः यमकयुक्त आहे. **श्लोक** व **दिंड्या** यां-

मध्यें पहिल्या व दुसऱ्या चरणांच्या अंतीं व तिसऱ्या व चवथ्या चरणांच्या अंतीं **यमक** साधलेलें असतें. **आर्या, अनुष्टुभ्** व **साकी** यांत प्रथमार्ध व द्वितीयार्ध यांना धरून किंवा द्वितीयचतुर्थ चरणांना धरून अंत्य **यमक** असतें. **चारचरणी अभंगांत** दुसऱ्या व तिसऱ्या चरणांना धरून **अंत्य यमक** असतें. **दोनचरणी अभंगांत** दोन्ही चरणांच्या अंतीं यमक असतें. हा **अंत्ययमका**चाच प्रकार मराठींत विशेषें करून प्रचलित आहे; खालीं अगदीं **साध्या यमका**पासून तों **पांच वर्णांच्या अंत्य यमका**पर्यंतचीं उदाहरणें दिलीं आहेत.

शार्दूलविक्रीडित.

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला
व्याधाचे चुकवूनि बाणहि महा वेगें पुढें चालला;

पद्यरत्नावली.

येथें लकाराचा **अंत्य यमक** आहे.

शिखरिणी.

कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी,
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी;

पद्यरत्नावली.

येथें **रन** या दोन वर्णांचें **अंत्य यमक** साधलें आहे.

स्वागता.

निद्रितासि चरणीं तुडवीतो,
लेंकुरें उठवुनी रडवीतो;

वामन.

येथें **ड, व, त** या तीन वर्णांचें **अंत्य यमक** साधलें आहे.

भुजंगप्रयात.

करी तीस काकूळती सारसाक्षी,
ह्मणे भेटवी सर्वसंसारसाक्षी;

वामन.

येथें **स, र, स, क्ष** या चार वर्णांचें **अंत्ययमक** आहे.

भुजंगप्रयात.

सदानंद जो सर्व्वदा मोदराशी,
तया भेटवीं आजि दामोदराशीं;

वामन.

येथें द, म, द, र, श, या पांच वर्णांचें **अंत्ययमक** आहे.

महाराष्ट्रकवितावधूला यमकालंकारांनीं विशेष मंडित करण्याचें श्रेय विशेषतः **वामन** व **मोरोपंत** यांसच दिलें पाहिजे. त्यांतही **पंतांनीं यमकाच्या** कामांत **पंडितांना** मागें टाकलें आहे ही गोष्ट उभयतांचीं काव्यें पाहिलीं असतां सहज दिसून येण्यासारखी आहे. **आनंदतनय, रामजोशी, अनंतफंदी, रघुनाथपंडित** इत्यादिकांच्या काव्यांतूनही **यमकांची** मधून मधून गर्दी झालेली आहे. असो. वर सांगितलेल्या **अंत्ययमकाशिवाय** इतरही कांहीं **यमकांचे** प्रकार मराठी काव्यांत, विशेषतः **पंतांच्या** काव्यांत, आढळतात. त्यांतून ठळक ठळक खालीं सांगतों.

वृत्तांत येणाऱ्या **यतीवर यमक** साधला असल्यास त्याला **पुष्पयमक** म्हणतात.

पृथ्वी.

‘ सुसंगति सदा घडो सुजन वाक्य कानीं पडो ’

केकावली.

येथें यतीवर **ड** या वर्णाची आवृत्ति आली आहे.

पृथ्वी.

‘ अहो अतुललक्षणीं अमृत वर्षसी ईक्षणीं ’

स्यमंतकोपाख्यान.

येथें **क्षण** या वर्णांचें **यमक यतीवर** साधलें आहे.

मागें व पुढें भिन्न व्यंजन असल्यामुळें प्रत्येक व्यंजनावर **यमक घोड्यासारखी दौड करीत चाललें आहे कीं काय** असा भास होतो तेथें **अश्वधाटी यमक** होतें.

गीति.

'वाजत गाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो.'

मोरोपंत.

येथें जत हें यमक ग, स, ज या पुढच्या वर्णांवर उड्या मारीत चालल्याचा भास होतो. यमकाच्या पाठीमागें व, ग, स, ज हीं भिन्न व्यंजनें आलीं आहेत.

जवळच्या दोन चरणांस जोडणारें **यमक दामयमक** होय.

गीति.

श्री बुडविली महेंद्रश्रींतुल्या मज नसे तिची परवा,
पर वामलोचनेच्या ऐकों न शकेची या विलापरवा;

मोरोपंत-सभापर्व.

येथें दुसऱ्या पदाचा शेवट व तिसऱ्याचा आरंभ हीं **परवा** या **यमकानें** जोडलीं आहेत.

शिखरिणी.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी,
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी;

वामन.

येथें प्रथम चरणाचा शेवट व दुसऱ्या चरणाचा आरंभ हीं **हरी** या **यमकानें** जोडलेलीं आहेत.

गीति.

सेवुनि संतत पाला संत तपाला यदर्थ करितात.

भी. भ.

येथें पहिल्या पादाचा शेवट व दुसऱ्या पादाचा आरंभ हीं **संततपाला** या **यमकानें** जोडलीं आहेत.

वंशस्थ.

करूनिया मज्जन विश्वपावनीं वनीं प्रवेशे मग जानकी वनीं;
सचिंत पाहे मग देवरास ती, सती म्हणे आश्रम कां न दीसती ?

येथेंही प्रथमद्वितीय चरणांचे अंत आणि आद्य व तृतीयचतुर्थीचें अंत व आद्य अनुक्रमें **वनीं** व **सती** या **यमकांनीं** जोडले आहेत.

प्रथमार्धाची द्वितीयार्धांत आवृत्ति आल्यास **समुद्गक यमक** जाणावें.

गीति.

अनलसमीहित साधी राया ! वारा महीवरा कामा
अनलस मीहि तसा धीरा ! यावा रामही वरा का मा !

वनपर्व.

प्रथमपादाचें तृतीयपादाशीं **यमक** जुळलें असल्यास तेथें **संदंश यमक** होतें.

गीति

हार, विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं,
हारविला सवतीनें क्षितिनें पुजिला सुरप्रसून कीं ?

स्त्रीपर्व.

येथें पहिला व तिसरा पाद यांचें **समग्र यमक** जुळलें आहे.

दुसऱ्या पादाचें चवथ्या पादाशीं यमक जुळल्यास तें **संदष्टक यमक** होय.

गीति.

कुरुसैन्यांत गमे ज्या परि रंभाकाननांत वारा हो,
त्या विजयश्री देउनि परिरंभा कां न नातवा राहो ?

द्रोणपर्व.

येथें दुसऱ्या पादाचें चवथ्या पादाशीं **यमक** जुळलें आहे.

चित्र.

पद्म, **चक्र**, **खड्ग**, **छत्र** इत्यादि वस्तूंच्या आकाराप्रमाणें वर्णरचना असल्यास तेथें **चित्रसंज्ञक** काव्य जाणावें.

ज्या पदार्थाच्या आकाराची रचना असते त्या पदार्थाचें नांव त्या बंधाला प्राप्त होतें. असा बंधप्रकार संस्कृत काव्यांतून कोठें कोठें आढळतो; परंतु मराठींत आढळत नाहीं ह्मटलें तरी चालेल. एखादा मंत्र किंवा एखादें नांव अर्वाचीन मराठी काव्यांत क्वचित् बंधरूपानें सांपडतें. **पद्मबंधादि चित्रकाव्य** कवीला व वाचणारालाही अर्थात् क्लेशदायक असतें. याचा एक नमुना खालीं देतों.

पद्मबंध.

अनुष्टुभ्.

भासते नृप भासार रसाभागस्थिता विभा,
भावितात्मन् शुभा वादिं दिवाभास्वर ते सभा १

स्वकृत.

याचा अन्वय, '(हे) भावितात्मन् भासार नृप ! रसाभागस्थिता विभा वादिं शुभा ते (ती) सभा भासते ' असा आहे. त्याचा अर्थ असा: ' हे शुद्धान्तःकरणी आणि कान्तिमान् राजा, पृथ्वीच्या एका भागावर रचलेली, अत्यंत देदीप्यमान, वादामध्यें कुशल आणि स्वर्गाप्रमाणें दिव्य अशी ती सभा विराजत आहे. ' ह्या श्लोकाची खालीं **पद्माकार रचना** केली आहे.

उत्तर. ईशान्य.

वायव्य. पूर्व.

पश्चिम. आग्नेय.



नैर्ऋत्य. दक्षिण.

येथें वर्णाचें निर्गम व प्रवेश चमत्कारिक आहेत. ते असे: या अष्टदल पद्माच्या टोंकांना आठ दिशांचीं नांवें दिलीं आहेत. या पद्माचा मध्य-

बिंदु आहे त्याला **कर्णिका** म्हणतात. या कर्णिकेंत वरील पद्याचा आद्य **भा** हा वर्ण प्रथम लिहिला. पुढें कर्णिकेंतून पूर्वेच्या बाजूनें बाहेर पडून **सते** हे वर्ण दळांत लिहिले. पुढें **आग्नेय**दिशेकडील दळांत प्रवेश करून **नृप** हे वर्ण लिहून कर्णिकेंत प्रवेश केला. पुन्हां कर्णिकेंतून बाहेर पडून **दक्षिण**दळांत **सार** हे वर्ण लिहले. पुन्हां **दक्षिण**दळानें उलट कर्णिकेंत प्रवेश केला. तिच्यांतून पुढें **नैर्ऋत**दळांत निर्गम करून **गस्थि** हे वर्ण दळांत प्रविष्ट केले. नंतर **पश्चिम**दळांत प्रवेश करून **तावि** हे वर्ण दळांत लिहिले, आणि कर्णिकेंत प्रवेश केला. पुन्हां कर्णिकेंतून बाहेर पडून **पश्चिम**दळांतील वर्ण उलटे घेऊन **वायव्य**दळांत प्रवेश केला व त्यांत **त्मन् शु** हे वर्ण लिहून फिरून कर्णिकेंत प्रवेश केला. पुन्हां कर्णिकेंतून **उत्तर**दळांत बाहेर पडून **बादि** हे वर्ण लिहिले. पुन्हां या वर्णावरूनच उलट कर्णिकेंत प्रवेश केला. कर्णिकेंतून पुढें **ईशान्य**दळांत बाहेर पडून **स्वर** हे वर्ण ठेविले. शेवटीं **पूर्व**दळांत प्रवेश करून वर्णवैपरीत्यानें कर्णिकेंत विराम केला ! अशा रीतीनें वर्ण वाचले म्हणजे वरील श्लोक उपलब्ध होतो !

श्लेष.

वाक्यांत एका शब्दाचे अनेक अर्थ विवक्षित असले म्हणजे तेथें **श्लेष** हा अलंकार होतो.

श्लिष्ट पदांच्या ठिकाणीं पर्यायशब्द योजले असतां श्लेषहानि होते तेथें **शब्दश्लेष** हा अलंकार समजावा.

स्रग्धरा.

कोकां शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो,
कारागारें करींहीं उघडुनि कमलें भृंगही सोडवी जो;
जेणें अंधार सारा पळवुनि हरिले सृष्टिच्या दृष्टिदोषा,
त्या मित्राचा बघोनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा १

पद्यरत्नावली.

येथें **कर** व **मित्र** हे शब्द श्लिष्ट आहेत.त्याचे **हात** व **किरण** व **स्नेही** व **सूर्य** असे दोन दोन अर्थ असून ते दोन्ही विवक्षित आहेत. **कर** व **मित्र**

यांबद्दल त्यांचें वाचक शब्द योजलें असतां श्लेष कायम राहत नाहीं यास्तव हे **शब्दश्लेषांचें** उदाहरण होय.

गीति.

गाळांत तळीं लोळति रत्नें, धरिशी तृणें शिरीं नित्य,
तुज तारतम्य कुठलें ? जडधी हें नांव, रे, तुझें सत्य १

पद्यरत्न व[illegible].

शार्दूलविक्रीडित.

पावोनी तव आश्रया द्विजकुळें लक्षावधी पोसतीं,
सारेही वनिंचे तरू तुजपुढें क्षुद्रापरी भासती;
ऐसा तूं गुणवंत, बा, असुनिया, आम्रा ! पिकांवायसां-
मध्यें जाणसि तारतम्य न मनीं; हा मोह बा कायसा ! १

पद्यरत्नावली.

गीति.

शुकभाषणानुकार प्रेमें करितो मयूर हें चित्र,
श्रवण करितील सज्जनरसिक मनीं धरुनि जिष्णुचें मित्र;

मोरोपंत-भीष्मपर्व.

वरील पद्यांपैकीं पहिल्या पद्यांत **जडधी** दुसऱ्यांत **द्विज**, आणि तिसऱ्यांत '**शुक**' आणि '**मयूर**' हे शब्द श्लिष्ट आहेत. **जडधी** येथें **ड** व **ल** यांच्या **सावर्ण्यानें** श्लेष झालेला आहे. वरील श्लिष्ट पदांचे दोन दोन अर्थ त्या त्या स्थलीं विवक्षित आहेत. प्रस्तुत श्लिष्ट पदांच्या जागीं दुसरीं तद्वाचक पदें योजलीं तर श्लेष कायम राहात नाहीं यास्तव हीं सर्व **शब्दश्लेषाचीं** उदाहरणें समजावीं.

शब्दश्लेषाचे अभंगश्लेष आणि **सभंगश्लेष** असे दोन प्रकार आहेत. जेथें एकच शब्दाचे अनेक अर्थ होतात तेथें **अभंगश्लेष** होतो. वरतीं दिलेलीं सगळीं **अभंगश्लेषाचींच** उदाहरणें आहेत.

प्रत्येक अर्थाच्या वेळीं वेगळ्या वेगळ्या रीतीनें श्लिष्टपदाचे अवयव घ्यावे लागतात किंवा त्यांचीं पदें पाडावीं लागतात तेथें **सभंगश्लेष** होतो.

गीति.

ते शीतळोपचारीं जागी झाली हळूंची मग बोले,
नलगे औषध मजला, परिसुनि जननी बरें ह्मणुनि डोले १

रघुनाथपंडित.

या आर्येत **नलगे** हें पद एकदा **नको** या अर्थी क्रियापद आहे; व दुसऱ्या अर्थी **नल गे** ! अशीं पदें पाडून **अगे, नल** ! असा त्याचा अर्थ **भंगश्लेषानें** करावा लागतो.

अर्थश्लेषाचा विचार अर्थात् **अर्थालंकारप्रकरणीं** होईल.

वक्रोक्ति.

बोलणाराचा अर्थ एक असावा व दुसऱ्यानें **शब्द-श्लेषानें** दुसराच अर्थ उत्पन्न करावा असें असलें म्हणजे **वक्रोक्ति** हा **शब्दालंकार** होतो.

गीत्यर्ध.

'हे सुतनु जावयाला पाहे; कुठचा असेल जावाई' !

अलंकारादर्श.

येथें **जावयाला** म्हणजे **गमन करावयाला** अशा अर्थानें प्रथम बोलणारानें योजना केली. त्यावर दुसरा **जावयाला** ह्मणजे 'जावईबोवाला' असा दुसरा अर्थ **शब्दश्लेषानें** करून म्हणतो **कुठचा जावाई असेल** ! येथें **अभंगश्लेष** आहे.

शिखरिणी

घडे कीं रंभोरु त्रिदशवदनग्लानिच खरी,
सबंधू त्वद्भर्ता नच अचल राहील समरीं;
निघाले हे जाया विपदिं अजि सेनागत कपी,
म्हणे दुष्टा षष्ठाक्षरपरविलोपें पुनरपि १

हनूमन्नाटक.

येथें **त्रिदशवदनग्लानि** या पदांतील **त्रि** हें अक्षर लुप्त करून **दशवदनग्लानि** म्हणजे **रावणाची ग्लानि** असा अर्थ करावा लागतो. हा **भंगश्लेष** होय.

अर्थश्लेषमूलक व **काकुमूलक वक्रोक्ति अर्थालंकार** होय. यास्तव तिचा विचार **अर्थालंकारप्रकरणीं** केला आहे.

पुनरुक्तवदाभास.

दिसण्यांत मात्र एका अर्थाचे अशा शब्दांची आवृत्ति आल्यास तेथें **पुनरुक्तवदाभास** अलंकार होतो.

जरि म्हणाति कवि क्षितिला अचला, सर्वसहा, क्षमा, उर्वी,
तरि कुरुपांडवयुद्धारंभसमय यश तिचें न तें उर्वी १

मोरोपंत–वनपर्व.

येथें **अचला, सर्वसहा, क्षमा** आणि **उर्वी** असे **क्षितीचेच** पर्याय आल्यानें **पुनरुक्तत्वाचा भास** होतो. वरच्या चार शब्दांबद्दल **मही, जगती, मेदिनी** इत्यादि शब्द योजले तर अर्थनिर्वाह होत नाहीं. **अचलादि** शब्द **सहेतुक** आहेत. म्हणून येथें **शब्दश्लेषमूलक पुनरुक्तवदाभास** झाला.

गीति.

तनु तनु तरि हरि जिष्णु प्रबल न चालाति तयापुढें नखरे
अणुही अन्यमृगांचे, करिकुंजररुधिररक्त तन्नखरें १

स्वकृत.

येथ **तनु** (अल्प व शरीर), **हरि** (सिंह), **जिष्णु** (जयनशील) **करि** (हत्ती), **कुंजर** (श्रेष्ठ), **रुधिर** (रक्त) आणि **रक्त** (लाल) हे शब्द समानार्थ आहेत असें प्रथमदर्शनीं वाटतें.

येथं अल्पार्थक **तनु** हा शब्द, **कुंजर, रक्त, हरि** आणि **जिष्णु** हीं पदें बदलून त्यांचे वाचकशब्द योजिले असतां निर्वाह होत नाहीं; म्हणून या पदांसंबंधानें हा **शब्दश्लेषमूलक पुनरुक्तवदाभास** झाला. **करि, रुधिर** इत्यादि पदांबद्दल तदर्थक दुसरे शब्द घातले तरी चालतील. यास्तव त्या शब्दांसंबधानें हा **अर्थश्लेषमूलक पुनरुक्तवदाभास** झाला. तेव्हां **प्रस्तुत** अलंकार **श्लेष** व **वक्रोक्ति** यांच्याप्रमाणें उभयविध **आहे** असें **झालें. अर्थश्लेषमूलक पुनरुक्तवदाभासाचें** उदाहरण येथें सांगितलें यास्तव या अलंकाराचा **अर्थालंकारप्रकरणीं** पुनः विचार करणें **नको.**

तृतीय उल्लास.

अर्थालंकार.

भाग पहिला.

उपमा.

एका वाक्यांत दोन वस्तूंचें केवळ सुंदर सादृश्य स्पष्ट वर्णिलें असतें तेथें **उपमा** हा अलंकार होतो.

उपमेयोपमालंकारांत दोन स्वतंत्र वाक्यांची अवश्यकता असते. त्या पासून प्रस्तुत अलंकाराची व्यावृत्ति व्हावी म्हणून **एका वाक्यांत** असे शब्द लक्षणांत योजले आहेत. **उपमेमध्यें उपमानवाक्य** व **उपमेय**-वाक्य अशीं दोन भिन्न वाक्यें बोलून किंवा लिहून दाखवितां येतात; किंबहुना **जसें, जेवीं** हीं **वाचकपदें** असतां दोन्ही वाक्यार्थ स्पष्टपणें वेगळे उक्त असतात. तथापि अशीं दोन वाक्यें परस्परांशीं इतकीं संबद्ध असतात कीं, एका शिवाय दुसऱ्याचा अर्थ पूर्ण होतच नाहीं. अशा दृष्टीनें लक्षणांत **एका वाक्यांत** असें म्हटलें आहे. **अनन्वय** अलंकारा-मध्यें **उपमेयाचें** अनुपमत्व द्योतित करण्याकरितां त्याची त्यालाच **उपमा** दिलेली असते; म्हणजे **उपमेयाहून उपमान** हें तेथें भिन्न नसतें. **अनन्वयाहून** प्रस्तुत अलंकार भिन्न आहे हें दर्शविण्या-करितां **दोन वस्तूंचें** अशीं पदें लक्षणांत घातलीं आहेत. **केवळ सादृश्य** असेंही लक्षणांत म्हटलें आहे याचें कारण असें कीं, **व्यतिरेका-लंकारांत वैधर्म्यही** उक्त असतें; तसें यांत नसतें. सादृश्य सुंदर नसेल तर चमत्कार उत्पन्न होत नाहीं; आणि चमत्कार नसेल तर अलंकारही संभवत नाहीं. यास्तव **सुंदर** शब्द लक्षणांत ग्रथित केला आहे. रूप-कादिक अलंकारांत सादृश्य असतेंच; पण तें अस्पष्ट असतें. तें मुख्यत्वें-

करून **उपमानाच्या** चारुतेचा उत्कर्ष असतो. **उपमेमध्यें** सादृश्याचाच काय तो मोठा चमत्कार असतो. मग तें क्वचित् उक्त नसलें तरी सहज मनांत येण्या इतकें स्पष्ट असतें. याकरितां लक्षणांत **स्पष्ट** या शब्दाची योजना केली आहे. **उपमा** हा प्रधान **अर्थालंकार** आहे म्हणून त्याच्या-पासूनच या भागाला आरंभ केला आहे.

उपमेय, **उपमान**, **सामान्यधर्म** आणि **वाचकपद** अशीं **उपमेचीं** चार अंगें आहेत. ज्याला **उपमा** द्यावयाची तो पदार्थ **उपमेय** होय. हा पदार्थ कवीच्या इच्छेप्रमाणें कोणताही असूं शकेल. याला **प्रकृत**, **प्रस्तुत**, **वर्ण्य** इत्यादि नांवें आहेत. ज्याची **उपमा** द्यावयाची तो पदार्थ **उपमान** होय. **उपमान**पदें कविसंकेतानें बहुतेक ठरलेलीं आहेत. जसें: **चंद्र**, **कमल**, **मेघ** इ०. **अप्रकृत**, **अप्रस्तुत**, **अवर्ण्य** इत्यादि पदें **उपमा-नाचे** वाचक शब्द आहेत. **उपमेय** आणि **उपमान** यांचें ज्या गुणासं-बंधानें सादृश्य वर्णिलें असतें तो गुण **सामान्यधर्म** होय. सादृश्य दाखविणारा जो शब्द त्याला **वाचक** असें म्हणतात. **द्योतक**, **प्रयोजक** अशीं दुसरींही नांवें त्याला आहेत. **सें**, **सारखें**, **परि**, **प्रमाणें**, **जेवीं**, **जसें**, **वाणी**, इत्यादि अगदीं मराठी शब्द **उपमेचे वाचक आहेत. सम**, **समान**, **सदृश**, **तुल्य**, **वत्** आणि समानार्थक आणखी दुसरे संस्कृत शब्द मराठींत योजलेले अनेकस्थलीं आढळतात. तेही **वाचकशब्द** होत. **वाणी** हा **वाचक** शब्द अंमळ **ग्राम्य** आहे. तथापि अभियुक्त कवींनीं त्याचा कोठें कोठें आदर केला आहे यास्तव त्याचा येथेंही **वाचक-**पदांत संग्रह केला आहे. **सें**, **सारखें**, **परी**, **प्रमाणें**, **वाणी** आणि वर दिलेले तुल्यार्थक संस्कृत शब्द प्रायः **उपमान**पदाशीं संयुक्त असतात हें पुढील उदाहरणांवरून व्यक्त होईल.

उदाहरणें.

साकी.

रघुवर, हेमनगावर घनसा, सिंहासनीं विराजे,
सेवक मयूर नाचति चातक सैवें भासती राजे ? १

मोरोपंत-साकीरामायण-युद्धकांड.

या साकीचें प्रथमार्ध **एक वाक्य** आहे. - त्यांत **रघुवर** (रामचंद्र), आणि घन (मेघ), या **दोन वस्तूंचें केवळ सुंदर सादृश्य स्पष्टपणें** वर्णिलें आहे. यास्तव येथें **उपमा** हा अलंकार झाला. प्रस्तुत वाक्यांत **रघुवर** हें **उपमेय, घन** हें **उपमान, विराजणें** हा **सामान्यधर्म** आणि **सा** हा **वाचक** शब्द आहे.

तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्करसें,
शोभे विजयोत्साहें अभिमन्युमुख प्रफुल्ल पुष्करसें १

अभिमन्युवध.

या पंक्तींच्या गर्तीत **मुख** हें **उपमेय; प्रफुल्लपुष्कर** हें **उपमान, शोभणें** हा **सामान्य धर्म,** आणि **सें** हा **वाचक** शब्द आहे. येथें **मुख** आणि **प्रफुल्लपुष्कर** (उमललेलें कमल) यांचें सुंदर सादृश्य वर्णिलें आहे.

शार्दूलविक्रीडित.

भासे मंदिर काननासम, सखीसंघात जाळ्यापरी,
श्वासांनीं तनुदाह तीव्र गमतो दावाग्निसा अंतरीं;
कृष्णा ! त्वद्विरहें प्रिया तव दिसे दीना मृगी जेविं ती,
क्रीडे मन्मथ ! हाय हाय ! सखया शार्दूलवत् संप्रति १

स्वकृत.

ही **राधिकेसंबंधानें श्रीकृष्णा**प्रत त्याच्या मित्राची उक्ति आहे. हिच्यांत पांच वेगळ्या वेगळ्या **उपमा** कल्पिल्या आहेत आणि **भिन्न भिन्न वाचकपदें** योजिलीं आहेत.

आपल्या अनुरागाचा विषय **दुष्यन्त** आहे असें **शकुंतला** आपल्या सख्यांजवळ एकांतांत बोलली तें जाळीच्या आडून ऐकल्यानंतर **दुष्यंत** म्हणतोः—

गीति.

कामचि तापप्रद मज झाला जो तोचि देतसे शांती,
मेघावृत दिवस जसा तापद शमदहि जनास घर्मान्तीं १

राजवाडेकृत शाकुंतल–अंक ३

वर्षाकालाच्या आरंभाचे मेघ जसे प्रथम ताप उत्पन्न करून मग वृष्टीनें शांति उत्पन्न करितात तसा शकुन्तलाविषयक अनुराग प्रथम ताप देणारा होऊन आतां कृतार्थ होण्याचा प्रसंग आल्यामुळें मनाला शांतिप्रद झाला आहे असा राजाच्या बोलण्याचा आशय प्रस्तुत आर्येंत व्यक्त झाला आहे. प्रस्तुत उदाहरणामध्यें विरोधाचाही चमत्कार आहे. पण तो सहाय होऊन उपमाच अधिक हृदयंगम झाली आहे. येथें मेघावृत दिवस हें उपमान, काम हें उपमेय, तापशमप्रदत्व हा सामान्यधर्म आणि जसा हें वाचक पद आहे.

पाण्डु स्वर्गवासी झाल्यामुळें त्याचे धर्मादिक पुत्र उघडे पडले. हिमालयावरील गुह्यक नांवाच्या अरण्यांतील महर्षिजनानें त्यांचा या वेळीं समाचार घेतला. या प्रसंगाला उद्देशून पंत सभापर्वांत आपल्या प्रिय छंदाचा अवलंब करून म्हणतातः

गीति.

त्या पांडुकुटुंबातें ते साधु महर्षि गुह्यकवनांत,
उघडें पडों न देती; सुकवि जसे वेदगुह्य कवनांत ?

या पद्यांतील उपमेमध्यें उघडें पडों न देणें हा सामान्य धर्म आहे. जसें हें वाचक पद आहे. महर्षि उपमेय व सुकवि उपमान आहे. वरील उदाहरणांतल्यापेक्षां यांत विशेष इतकेंच आहे कीं येथें उपमानोपमेय यांच्या सामान्यधर्मामध्यें बिंबप्रतिबिंबभावानें एकरूपता आहे. उघडे पडों न देती याचा वाच्यार्थ झांकणें असा असून तो उपमानाकडे सुसंगत होतो. परंतु उघडे पडों न देणें याचा रक्षण करणें असा लाक्षणिक अर्थ केल्याशिवाय तो उपमेयाकडे अन्वित होत नाहीं.

पूर्णोपमा.

उपमान, उपमेय, साधारणधर्म आणि वाचकपद हीं सर्व अंगें उक्त असलीं म्हणजे तेथें पूर्णोपमा होते. पूर्वोक्त सर्व उदाहरणांमध्यें पूर्णोपमाच आहे. आणखी उदाहरणेंः—

साकी.

गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तें कमलीं मधुकर जैसे १

पद्यरत्नावली.

मेघदूतांत यक्ष आपल्या विरहिणी प्रियेचें वर्णन मेघाजवळ करीत आहे त्या प्रसंगाची ही साकी आहे. येथें **अलक** व **मुख** हीं **उपमेयपदें**, **मधुकर** व **कमल** हीं **उपमानपदें**, **लोंबणें** हा **सामान्यधर्म** आणि **जैसें** हा **वाचक** शब्द हीं सर्व उपमांगें व्यक्त आहेत.

'कांतेशीं रममाण झालास तर मृत्यु येईल,' असा **किंदमऋषीनें पंडूला** शाप दिला; त्या प्रसंगाची पंतांची उक्ति पहाः—

गीति.

शापवचन मलिन तया करि कज्जल जेविं पांडुर-मणींतें,
मुनि गेल्यावरि येउनि तें कळवी साश्रु पांडु-रमणींतें १

या पद्यांत **शापवचन** हें **उपमेय**, **कज्जल** हें **उपमान**, **मलिन करणें** हा **सामान्यधर्म** आणि **जेविं** हें **वाचक** पद हीं उक्त आहेत.

लुप्तोपमा.

उपमेय, **उपमान**, **सामान्यधर्म** व **वाचक** या **उपमेच्या** चार अंगांपैकीं एक, दोन किंवा तीन अंगें लुप्त असलीं म्हणजे **लुप्तोपमा** होते. लुप्त असलेल्या अंगाच्या किंवा अंगांच्या नांवानें ती प्रसिद्ध असते. महाराष्ट्र काव्यांत **लुप्तोपमेचे** पुढील प्रकार प्रायः आढळतातः—

वाचकलुप्ता.

जेथें **वाचक** पद उक्त नसतें तेथें **वाचकलुप्ता**. जसें:—

भुजंगप्रयात.

अरे राघवें व्यापिले लोक सारे, तरी नावरे शोक माझा कसा रे !
तृषाक्रांत डोळे घनश्याम रामा, पहायास रे सर्वलोकाभिरामा १

वामन—भरतभाव.

रामचंद्र वनवासास गेल्यानंतर **भरत** मामाच्या घराहून परत **अयो-**

घ्येला आला. तेथें कैकेयीच्या भेटीनंतर त्यांनें कौसल्येची भेट घेतली. त्या प्रसंगीं कौसल्येची ही रामाप्रत उक्ति आहे. या पद्यांत घनश्याम रामा अशीं पदें आहेत. त्यांचा अर्थ घनाप्रमाणें श्याम अशा रामाला असा आहे. यांत प्रमाणें [संस्कृत इव किंवा वत्] हा वाचक शब्द लुप्त आहे.

धर्मलुप्ता.

जेथें सामान्य धर्म लुप्त असतो तेथें धर्मलुप्ता जाणावी. जसें:—

गीति.

श्री बुडविली महेंद्रश्रीतुल्या मज नसे तिची परवा.
पर वामलोचनेच्या ऐकों न शकेंचि या विलापरवा १

मोरोपंत-सभापर्व.

द्रौपदीची सभेंत विटंबना झालेली पाहून भीमास अत्यंत क्रोध आला त्यावेळची त्याची ही धर्माप्रत उक्ति आहे. या आर्येत [पांडव-] श्री हें उपमेय, महेंद्रश्री हें उपमान, व तुल्य हें वाचक पद, हीं उक्त आहेत. अखंडपणा किंवा अपरिमितपणा हा सामान्यधर्म लुप्त आहे.

धर्मवाचकलुप्ता.

जेथें साधारण धर्म आणि वाचक हीं लुप्त असतात तेथें धर्मवाचक लुप्ता होते. जसें:—

शार्दूलविक्रीडित.

' राजीवाक्ष असा विलोकुनि वधू धांवे जशी बावरी.

आनंदतनय.

येथें राजीव (कमल) हें उपमान आहे, प्रभु रामचंद्र हें उपमेय आहे. शोभाशालित्वादि सामान्यधर्म आणि परिवगैरे वाचक पद येथें लुप्त आहे.

शिखरिणी.

' न सोडी चित्तातें क्षणभरिहि ती कुंदरदना. '

पद्यरत्नावली.

कुंदरदना या सामासिक पदांत **कुंद** हें **उपमान** व **रदन** हें **उपमेय** आहे. वाचकपद सें वगैरे, आणि सामान्यधर्म शुभ्रपणा, अणकुचीदारपणा इत्यादि, हे लुप्त आहेत.

श्रौती व आर्थी उपमा.

उपमेच्या स्वरूपावरून तिचे **श्रौती** व **आर्थी** असे दोन प्रकार आहेत. जेथें **सें, परी, जेवीं, जैसा** हीं पदें वाचकें असतात तेथें **उपमा** स्पष्ट श्रुत होत असल्याकारणानें **श्रौती उपमा** होते. जेथें **तुल्यता-दर्शक वाचक** पदें योजिलेलीं असल्यामुळें अर्थबोधावरून 'उपमा 'मनांत येते तेथें **आर्थी** उपमा होते. वर दोन्हीं प्रकारचीं उदाहरणें आलीं आहेत.

याशिवाय उपमेचे **मालोपमा** व **रशनोपमा** असे दोन भेद आहेत.

मालोपमा.

एकच उपमेय असून उपमानपदें अनेक असलीं म्हणजे **मालोपमा** होते. जसें:—

'तेव्हां ती गौरी मदनाच्या योगानें जशी रति, किंवा शरत्समयाच्या योगानें जशी कमलिनी, तशी हंसाच्या समागमानें फार आनंद पावली.'

कादंबरी पूर्वार्ध.

यांत **गौरी** हें एकच उपमेय असून **रति** आणि **कमलिनी** अशीं अनेक उपमानें आहेत. तसेंच,

गीति.

सौभद्र म्हणे शिरतां व्यूहीं, डोहीं जसा मतंगज, वा,
हरिपोत दंतियूथीं, कीं दहनीं करुनिया पतंग जवा १

मोरोपंत-अभिमन्युवध.

आणखी एक **पंतांची गीतिः**—

तो शर गरधरखरसा, पविसा, रविसा, स्मरारिसायकसा,
पार्थभुजांतरि शिरला वल्मीकामाजि नागनायकसा १

कर्णार्जुनयुद्ध.

अथवा,

साकी.

अविनयसंगें राजश्री, दवभारें नलिनी जेवीं,
म्लान जाहली नरमणिरमणी विषाद पावुनि तेवीं १

स्वकृत.

या तीन पद्यांत अनुक्रमें **मी [सौभद्र], शर** आणि **नरमणिरमणी** असें एक एकच **उपमेय** आहे आणि **उपमानें** मात्र **अनेक** आहेत. वरील प्रत्येक उदाहरणांत **उपमानें अनेक** आहेत तरी **सामान्य धर्म** एकच आहे.

गीति.

गुरुपरि उपदेश करी, संकटसमयीं उपायही सुचवी,
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी १
कांतिपरि एकांतीं स्वांतातें हर्षवूनियां रिझवी,
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरास ती विझवी २

कृ. शा. चिपळूणकर–विद्याप्रशंसा.

या पद्यांत **गुरु, कल्पतरु** आणि **कांता** हीं तीन **उपमानपदें** आहेत व **विद्या** हें एकच उपमेयपद आहे. **उपदेश करणें, मनोरथ पुरविणें, हर्षोत्पादन करणें** असे भिन्न भिन्न **सामान्यधर्म** आहेत.

उपमेय व **उपमान** यांमध्यें **लिंगवचनसादृश्य** असलें तर उपमा विशेष सुंदर दिसते. वरील उदाहरणांत **कांता** हें **उपमान** लिंगवचन-सादृश्यामुळें जसें हृदयंगम वाटतें तशीं **गुरु** व **कल्पतरु** हीं पदें लिंगाचें सादृश्य नसल्यामुळें वाटत नाहींत.

रशनोपमा.

पूर्ववाक्यांतील **उपमेय** पुढच्या वाक्यांत **उपमान** कल्पिलें असता **रशनोपमा** अलंकार होतो. जसें:—

गीति.

वाणीपरि मति; मतिपरि कृति, कृतिपरि कीर्ति त्या नृपालाची,
विमला; जगतीवरती सुकृती ऐसा न अन्य झालाची १

स्वकृत.

येथें प्रथमार्धांत पहिल्या वाक्यांत **मति** हें **उपमेय** आहे, तें दुसऱ्या वाक्यांत **उपमान** झालें आहे. दुसऱ्या वाक्यांतील **उपमेय** जी कृति ती त्याच्या पुढील वाक्यांत **उपमान** झाली आहे. **सामान्यधर्म विमलता** हा **एकच** आहे. कोठें तो भिन्न असतोः—

गीति.

मतिसम सुंदर मूर्ति प्रभावयुक्ता सभाहि मूर्ति जशी,
त्याची सभेपरी जयलक्ष्मी अगदीं परां अजिंक्य अशी १

स्वकृत.

येथें पहिल्या वाक्यांत **सौंदर्य**, दुसऱ्यांत **प्रभावयुक्तता** आणि तिसऱ्यांत **अजिंक्यपणा** असे **भिन्नभिन्न सामान्यधर्म** आहेत.

अनन्वय.

उपमानत्व आणि उपमेयत्व हीं दोन्हीं एकाच पदार्थाच्या ठिकाणीं वर्णिलीं असतां म्हणजे ज्याची त्यालाच उपमा दिली असतां **अनन्वय** अलंकार होतो.

उपमेयोपमालंकारांतल्याप्रमाणें यांत दोन भिन्न वाक्यांची अवश्यकता नसते. उपमेय अनुपम आहे, त्याच्या जोडीचा दुसरा पदार्थच नाहीं, अशा अर्थाची विवक्षा असतां कवि या अलंकाराचा उपयोग करतात. सदृशी वस्तूच्या अभावामुळें तिच्याशीं उपमेयाचा अन्वय म्हणजे संबंध जुळत नाहीं ह्मणून या अलंकाराला **अनन्वय** असें अन्वर्थक नांव मिळालें आहे. यांत उपमेय व उपमान हीं अभिन्न असतात तरी तीं एकाच शब्दानें उक्त असणें उचित आहे. जसें, ‘ मदनासारखा सुंदर मदनच. ’ या उदाहरणांत थोडा बदल करून ‘ मदना सारखा सुंदर रतिपतीच, असें म्हटलें तर अर्थहानि तादृश होत नाहीं परंतु सौंदर्यहानि मोठी होते, यास्तव **अनन्वयांत** उपमानोपमेयें भिन्न शब्दांनीं उक्त नसावीं.

अनन्वयाचीं उदाहरणें:—

वसंततिलक.

कर्णासमान जनि कर्ण वदान्य थोर,
पार्थी परी रणधुरंधर पार्थ वीर;

वाल्मीकितुल्य कवि वाल्मिकि, रामचंद्र
तो रामचंद्रनिभ धर्मरत क्षितींद्र १

स्वकृत.

या पद्यांत **अनन्वयाचीं** चार उदाहरणें आहेत. त्यांत **कर्ण, पार्थ, वाल्मीकि** आणि **रामचंद्र** हीं उपमेयें असून थोर **वदान्यत्व, रणधुरंधरत्व, कवित्व** आणि **धर्मरतक्षितींद्रत्व** हे अनुक्रमें **सामान्यधर्म** आहेत. कोठें कोठं सामान्यधर्म उक्त नसतो.

गीति.

गगनास तुल्य गगनचि, सिंधूची होय सिंधुलाचि सरी,
श्रीरामरावणांचें युद्ध श्रीरामरावणांचि परी १

अलंकारविकाश.

या आर्येंत **विशालपणा, अगाधपणा, अद्भुतपणा,** इत्यादि **सामान्यधर्म अनुक्त** आहेत. आणखी उदाहरणें:—

शिखरिणी.

घडे दैवें किंचित् कलुष परि संतापति मनीं,
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं;
जयां प्रायश्चित्तें नसति कुनरां दे गति असी,
समर्था या लोकीं तुजसम अये! तूंचि जननी १

वामन-गंगालहरी.

प्रहर्षिणी.

जे कोणी चुरिति तुझ्या तनूसि हातें,
गंधानें सुखविशि त्यांहि तूं जनांतें;
हा ऐसा तव परिपाठ लोकमान्य,
पाटीरा! तुजसम तूंचि वा वदान्य १

पृथमंजरी.

पंचचामर.

होय रामराज्य रामराज्यसेंचि तोखद,
व्याधि जो भवाख्य उग्र हें तयासि ओखद;

मोरोपंत–पंचचामररामायण.

गीति.

आशी साधु साधुपतिशीं गांठ पडे ती जशी अघा परिसा,
या परि साचा हाचि प्रेमळ याच्याचि या जया परिसा १

मोरोपंत-उद्योगपर्व.

श्रीरामरावणसमर होय श्री-रामरावणसमरसा;

मो. पं.-मंत्ररामायण.

झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु या सम हा;

मो. पं. विराटपर्व.

या सम हाचि धनुर्धर म्हणतां उपमन्युसुरतरु रुसेना;

मो. पं.-कर्णपर्व.

शार्दूलविक्रीडित.

होशी त्वत्सम तूं दयालु मजसा मी-मत्त देवेश्वरा;

म. भा. विलास.

' या शाळेंत बाळ्यासारखा कोडगा बाळ्याच ! '

साहित्यशास्त्र.

उपमेयोपमा.

दोन भिन्न वाक्यें असून प्रथमवाक्यांतील उपमान आणि उपमेय —हीं द्वितीय वाक्यांत उलट म्हणजे उपमेय आणि उपमान अशीं होतात तेथें **उपमेयोपमा** अलंकार जाणावा.

उपमान आणि उपमेय यांच्या सारखा तिसरा पदार्थ नाहीं असें दर्शविण्याकरितां प्रस्तुत अलंकाराचा उपयोग करितात. **रशनोपमे**मध्यें उपमेय उपमान होतें. परंतु उपमान उपमेय होत नाहीं. **वाणी मतिपरि** इ. पूर्वोक्त उदाहरण पहा. उपमान व उपमेय यांची अदलाबदल एका वाक्यांत संभवत नाहीं; यास्तव या अलंकाराला दोन वाक्यें लागतात. तीं प्रायः स्पष्ट असतात; कचित्, गर्भित असतात. प्रथमवाक्यांतील उपमेयाशीं त्यांतील उपमानाची द्वितीय वाक्यांत तुलना होते. या कारणास्तव प्रस्तुत अलंकाराला **उपमेयोपमा** असें म्हणतात. यांतही उपमान व उपमेय यांची अदलाबदल त्याच शब्दांनीं करणें उचित होय. तथापि या नियमाला कांहीं अपवाद आढळतात.

गीत्यर्ध.

'गांभीर्यानें राघव अब्धिसदृश, अब्धि राघवासदृश'

या गीत्यर्धांत दोन वाक्यें आहेत. पहिल्यांत **राघव** हें **उपमेय** आहे आणि **अब्धि** हें **उपमान** आहे. यांचीच अदलाबदल दुसऱ्या वाक्यांत केली आहे; म्हणजे **अब्धि** हें **उपमेय** केलें आहे आणि **राघव** हें **उपमान** केलें आहे. येथें **गांभीर्य** हा **सामान्यधर्म** उक्त आहे. कोठें तो **उक्त न-सतो**. जसें:---

गीति.

जल नभसें, नभ जलसें, हंसापरि चंद्र, चंद्रसा हंस,
नव कुमुदासम तारा, तारासम कुमुदवृंद सुविकास १

अलंकारविकाश.

यांत **निर्मलत्व**, **शुभ्रत्व**, आणि **विकसितत्व** हें **सामान्यधर्म** **अनुक्त** आहेत. वरील दोन्हीं उदाहरणांत दोन वाक्यें स्पष्ट आहेत. तीं गर्भित असल्याचें उदाहरण:--भीम आणि जरासंध हे बलानें परस्पर तुल्य होते. हें वाक्य एक दिसतें. तथापि त्यांत दोन वाक्यें गर्भित आहेत. तीं अशीं: 'बलानें भीम जरासंधतुल्य होता; आणि जरासंध भीमतुल्य होता.' येथें ही **उपमेयोपमा** जाणावी.

प्रतीप.

उपमानाचा तिरस्कार केला असतां किंवा तिरस्कार करण्याकरितां उ-पमेयाच्या पायरीला त्याला आणून ठेविलें असतां **प्रतीप** अलंकार होतो.

उपमानाला प्रतिकूल असें उपमेय असल्यामुळें प्रस्तुत अलंकाराला **प्रतीप** असें नांव आहे. **व्यतिरेकालंकारामध्यें** उपमेयाचें उत्कर्षाधिक्य जरी वर्णिलें असतें तरी उपमान व उपमेय यांतील तुलना ही गृहीत असते.

शार्दूलविक्रीडित.

तूं लावण्यनिधि, प्रतापसदन, प्रख्यात दाता वर,
होशी शक्त वहावया नरवरा या मेदिनीचा भर;
निर्मोनी तुज ऐशिया गुणयुता चंद्रार्कचिंतामणी,
तेवीं शैल किमर्थ तो विधि रची हें गूढ माझ्या मनीं ! १

ही एका राजाप्रत कोणा एकाची उक्ति आहे. येथें चंद्र, अर्क [सूर्य], चिंतामणि [चिंतिलेलें देणारा मणि] आणि शैल हीं उपमानपदें आहेत. 'तूं' [राजा] हें उपमेय आहे. 'हे राजा ! तूं जिवंत असतां ब्रह्मदेवानें चंद्र, सूर्य, चिंतामणि आणि शैल हे पदार्थ कशासाठीं निर्माण केले हें समजत नाहीं. कारण तूं आपल्या आल्हादकत्वानें व तेजस्वितेनें रात्रंदिवस एकसारखा विराजमान असल्यामुळें रात्रीं प्रकाशणारा चंद्र व दिवसां उदय पावणारा सूर्य यांची तुझ्यापुढें काय प्रतिष्ठा ! तुझ्या दानशूरपणानें चिंतामणीला लाज आणली आहे आणि तुझ्या उन्नतीनें उन्नत शैलास अवनत करून सोडलें आहे !' असा या पद्याचा अर्थ आहे. येथें चंद्रादि उपमानांचें निष्फलत्व दर्शवून तिरस्कार केला आहे. आणखी उदाहरणः—

द्रुतविलंबित.

जगिं नलद्युतिकीर्ति असे तरी, विफल हें द्वय मानुनि अंतरीं;
सुपरिवेषमिषें रविमंडलीं, विधि करी विधुबिंबिहि कुंडली ! १

अलंकारविकाश.

यांत 'नलद्युति' व 'नलकीर्ति' हीं उपमेयें आहेत. 'रविमंडल' आणि 'विधुबिंब' हीं उपमानपदें आहेत.

'नळाचें तेज व नळाचें यश हीं जगांत असतां रविमंडल व विधुमंडल यांचें वैफल्य आहे असें मनांत आणून विधात्यानें रविमंडल व विधुबिंब यांच्या भोंवतीं खळ्याच्या रूपानें कुंडली करून ठेविली आहे !' असा या श्लोकाचा भावार्थ आहे. येथेंही उपमानांचा तिरस्कार दाखविला आहे.

गीति.

निज लोचनद्वयाचा वाहसि कां गर्वभार हें न कळे,
ऐशीं असति चहूंकडे सरोवरीं नील, कांत, नव कमलें १

स्वकृत.

येथें 'कमलें' या उपमानाला 'लोचनद्वय' या उपमेयाच्या पायरीला आणून ठेवून त्याचा तिरस्कार द्योतित केला आहे.

अनुपम गुणांनीं युक्त असल्यामुळें उपमानाप्रमाणें ज्याचा कधीं उप-

योग केलेला नसतो अशा पदार्थाला उपमान कल्पिलें असतांही प्रतीप अलंकार होतो.

वसंततिलक.

हालाहला ! गुरुचि मी अतिदारुणांचा,
आहें असा न धरिं बा मनिं गर्व साचा;
कीं त्वत्समान भुवनांत अनंत साचीं,
आहेत तीक्ष्ण वचनें अजि दुर्जनांचीं ! १

अलंकारविकाश.

येथें ' हालाहला 'ला पूर्वी कधीं न दिलेलें उपमानपद दिलें आहे व त्याला दुर्जनवचनरूप उपमेयाच्या जोडीला आणून बसवून तिरस्कृत केलें आहे. आणखी उदाहरणः—

शार्दूलविक्रीडित.

चाफ्याची कलिका नको, हळदिची मोठी प्रतिष्ठा पुरे,
सोनें उत्तम तेंहि हीन दिसतें, तीं व्यर्थ कीं केसरें;
उद्यच्चंद्रसमान कांति बघुनी त्या सुंदरीची खरी,
वस्तू या अवघ्याहि तुच्छ ह्मणुनी धिक्कार त्यांचा करी ! १

ग. शा. लेले.

गीति.

सखि ! तुझिया नयनासम कमलमुखासम शशी खरेंचि दिसे,
दशनासम कुंदकळ्या चांपेकळि नासिकेपरी विलसे १

स्वकृत.

येथें उपमानोपमेयभाव अगदीं स्पष्टपणें उलट वर्णिला आहे. म्हणजे प्रसिद्ध उपमानें उपमेयें कल्पिलीं आहेत आणि उपमेयें उपमानें कल्पिलीं आहेत.

मदिरा.

जें तुझिया नयनासम सुंदर पंकज तें जळिं मग्नचि झालें,
त्वन्मुखतुल्य सुधाकरबिंबहि तें दयिते जलदांतरिं गेलें;
सुंदरि मंद तुझ्या परि चालति तेहि मराळ निजालयिं गेले;
त्वत्सम वस्तुविनोदहि साहि न दैव सदैव प्रतीपचि ठेलें ! १

अ. वि.

यांतही उपमानोपमेय भाव उलट कल्पिला आहे.

भ्रांतिमान्.

एकाद्या वस्तूच्या दर्शनादिकेंकरून तत्सदृश अन्य वस्तूची भ्रांति वर्णिली असते तेथें **भ्रांतिमान** अलंकार होतो.

गीति.

पळसाची कळिका या भ्रान्तीनें भ्रमर शुकमुखीं पडतो,
तोहि तया भृंगातें जंबूफल समजुनी धरूं बघतो ! १

वामनशास्त्री केमकर.

येथें आकाराच्या व वर्णाच्या सादृश्यामुळें शुकमुखावर पळसाच्या कळीची भ्रान्ति वर्णिली आहे; आणि भ्रमरावर नीलत्व व आकृतिसाम्य या गुणांच्या सादृश्यास्तव जंबूफलाची (जांभळाची) भ्रांति वर्णिली आहे.

वसंततिलक.

तीरीं बघोनि तरुणीमुख रम्यहास,
नीरीं सरोज विलसे, बहु यद्विकास;
दोन्हींकडे अलिकिशोरकसंघ मुग्ध,
धांवोनि जाति सहसा मकरन्दलुब्ध. १

मराठीभामिनीविलास.

येथें तरुणीमुखावर सरोजभ्रांति वर्णिली आहे.

वसंततिलक.

भृंगें विराजित नवीं अरविन्दपत्रें,
पाहोनि मानुनि तिचींच विशाल नेत्रें;
घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं,
आहा! वृथा उतरलों भिजलों विलोकीं ! १

रघुनाथपंडित-नलोपाख्यान.

येथें अरविंदावर नेत्राची भ्रांति कल्पिली आहे. **रूपकांत** व पहिल्या प्रकारच्या **अतिशयोक्तींत** उपमान व उपमेय यांचा अभेद कल्पित असतो; व तो तसा असतो याचें भानही असतें. प्रस्तुत अलंकारांत सा-

दृश्यावरून एका वस्तूच्या ठिकाणीं ती दुसरी वस्तु आहे अशी मिथ्या कल्पना उत्पन्न होते. पण ही कल्पना मिथ्या आहे असें ज्ञान नसतें. मिथ्यात्व-ज्ञानाचा अभाव कविप्रतिभानिर्मित पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर रजतावर **शुक्ती**ची भ्रांति कल्पितात तेथेंही या अलंकाराची व्याप्ति येईल. ' तापस जलभ्रमानें वधिला मीं शब्दपाति बाणानें, ' या **पंतकृत मंत्ररामायणां**तील **दशरथोक्तीं**त कविप्रतिभानिर्मित भ्रांति नाहीं. म्हणून येथें-ही **भ्रांतिमान्** अलंकार समजण्याचें कारण नाहीं. **संदेहालंकारां**त सादृश्यामुळें वस्तुनिर्णयाविषयीं संशय उत्पन्न होतो. प्रस्तुत अलंकारांत प्रस्तुतावर अप्रस्तुताची भ्रांति होत असते. म्हणजे प्रस्तुताचें यांत ज्ञानच होत नाहीं. सादृश्यावरून अप्रस्तुताचेंच केवळ ज्ञान होतें. या कारणानें **मीलित, सामान्य** आणि **तद्गुण** यांपासून प्रस्तुत अलंकाराची व्यावृत्ति झाली. कारण **मीलिता**मध्यें अप्रस्तुत वस्तूचा अभाव असतो **सामान्या**मध्यें प्रस्तुत व अप्रस्तुत हीं एकरूप असलीं तरी त्या उभयतांचें ज्ञान असतें. **तद्गुणा**मध्यें केवळ गुणैकरूपता वर्णिली असते; व ज्या पदार्थांतील ऐक्य वर्णिलें असतें त्याचें स्पष्ट ज्ञान असतें.

ससन्देह.

चमत्कारिक सादृश्यामुळें उपमेय हें उपमान आहे कीं काय असा संशय वर्णिला असतो तेथें **ससंदेहालंकार** जाणावा. जसें:—

पुष्पिताग्रा.

मरकतमणिबद्ध होय शैल, तरु अथवा परिपुष्ट हा तमाल;
दुरुनि रघुपतीस पाहुनीयां, मुनिजन चित्तिं करीति कल्पना या ? १

महाराष्ट्र भामिनीविलास.

यांत ' रघुपति ' उपमेय आहे. ' शैल ' व ' तमाल ' हीं उपमानपदें आहेत. ' स्निग्धत्वनीलत्वादिकां 'च्या रमणीय सादृश्यामुळें ' रघुपती ' संबंधानें ' हा काय मरकताचा शैल आहे किंवा तमाल वृक्ष आहे ' असा संदेह मुनिजनास प्राप्त झाला असें येथें वर्णन आहे.

गीति.

हें कमल कीं सुधाकर हा निर्णय आमुचा नसे ठरला,
अतिफुल्ल निष्कलंकें तद्वदनें हृदयिं संशयाचि भरला १

वा. शा. केमकर.

येथें 'वदन' हें उपमेय व 'कमल' व 'सुधाकर' हीं उपमानपदें आहेत. 'प्रफुल्लता,' 'निष्कलंकता' इत्यादि गुणांच्या सुंदर सादृश्यामुळें वदनासंबंधानें हें 'सुधाकर कीं कमल' अशी शंका आली, असें येथें वर्णन आहे.

वरील दोन्हीं उदाहरणांत उपमान व उपमेय यांतील भेद दर्शविणारा विशेष धर्म उक्त नाहीं यास्तव हीं **अनुक्तभेदसंदेह** किंवा **शुद्धसंदेह** याचीं उदाहरणें होत.

जेथें भेददर्शक धर्म उक्त असतो तेथें **उक्तभेदसंदेह** जाणावा. यांत **निश्चयगर्भ** व **निश्चयान्त** असे दोन प्रकार आहेत.

उक्तभेद निश्चयगर्भसंदेहाचें उदाहरण.

गीति.

हा काय सूर्य? त्याच्या लागति हय सात नेहमिं रथाला,
कीं हा कृतान्त आहे? महिष तया लागतो बसायाला १
राया! यापरि करि अरि समरीं तुज पाहुनी मनीं शंका,
वाजो सतत त्रिभुवनिं मोठ्यानें कीर्तिचा तुझ्या डंका २

स्वकृत.

येथें 'राजा' हें उपमेय, व 'सूर्य' व 'कृतांत' हीं उपमानपदें आहेत. पहिल्या आर्येच्या प्रथमार्धांत राजासंबंधानें एक शंका आहे, द्वितीयार्धांत दुसरी शंका आहे. आपण ज्यास पाहतो तो सूर्य किंवा कृतान्त (यम) नव्हे एवढा मात्र निश्चय राजशत्रूंच्या मतीला झाला आहे व तो प्रथमार्धांत 'त्याच्या लागति हय सात नेहमिं रथाला' या, व उत्तरार्धांत 'महिष तया लागतो बसायाला' या, उपमानगत विशेष धर्मांनीं व्यक्त झाला आहे. उपमेयाविषयीं मात्र निर्णय झालेला नाहीं. निश्चय गर्भांतच

राहिला. उपमेयाच्या निर्णयाचें शेवटचें स्वरूप त्यास आलें नाहीं म्हणून यास **उक्तभेदनिश्चयगर्भसंदेह** म्हणतात. यांत 'प्रभाशालित्व' व 'मारणसामर्थ्य' या सादृश्यसूचक रम्यधर्मावरून शंकोदय झाला.

निश्चयान्त उक्तभेदसंदेह.

वसंततिलक.

इंदू म्हणों तरि तदीय कलंक कोठें,
मानूं सरोज तरि अंबु दिसे न कोठें;
हां हां अतां समजलों मुख हें सखीचें,
यांतोनिया निघति मंजुळ शब्द साचे ! १

स्वकृत.

यांत 'सखीचें मुख' हें उपमेय आहे. त्यासंबंधानें 'इंदु' व 'सरोज' यांच्या एकामागून एक शंका आल्या व शेवटीं उपमेयासंबंधानें निर्णय झाला आहे. तो ' यांतूनिया ' इ. चरणांत उपमेयाचा भेददर्शक धर्म सांगितला त्यावरून झालेला आहे. ' आल्हादकत्वादि ' व ' प्रफुल्लत्वादि ' धर्मांच्या रमणीय सादृश्यास्तव येथें शंका उत्पन्न झाल्याचें वर्णन आहे.

प्रस्तुत अलंकारांत उपमेय व उपमान हीं समकक्ष असतात. उत्प्रेक्षेमध्यें उपमान उत्कर्षकोटींत असतें. जेथें रमणीय सादृश्य नसेल तेथें नुसता संशय होय. ' हा काय स्थाणु आहे कीं अजगर आहे,' या वाक्यांत ' निश्चलत्व ' रूप सादृश्य आल्हादजनक नाहीं यास्तव येथें केवळ संशय आहे; **संदेहालंकार** नव्हे. **उक्तभेदसंदेहा**च्या उदाहरणांत उपमेय हें उपमानापेक्षां अधिक गुणसंपन्न असा भास होतो आणि त्यामुळें **व्यतिरेक** अलंकार तेथें मनांत येऊं लागतो. तथापि **संदेहांत** रमणीय सादृश्यमूलक संशयावरच विशेष कटाक्ष असतो त्यामुळें तो संशयच चमत्कारजनक होतो. व्यतिरेकामध्यें उपमेयाचें आधिक्य व्यक्त होऊन त्याचाच केवळ उत्कर्ष असतो.

अपन्हुति.

उपमेयावर उपमानाचा आरोप करण्याकरितां जेथें उपमेयाच्या स्वरूपाचा अपलाप केलेला असतो तेथें **अपन्हुति** अलंकार होतो. जसें:—

शार्दूलविक्रीडित.

आहे हा नव मेघ उत्थित, नव्हे उन्मत्त रात्रिंचर,
हें आकृष्ट न तच्छरासन, धनू वृत्रारिचें हें वर;
या धाराच. परंपरा मजवरी येती न बाणांचिया,
ही विद्युत् कनकापरी चमकते, नाहींच ती मत्प्रिया.

विक्रमोर्वशीय अंक ४.

उर्वशीविरहानें व्यथित झालेल्या पुरूरव्याची ही उक्ति आहे. येथें 'रात्रिंचर' [राक्षस], 'शरासंन' [धनुष्य], 'बाणांचिया परंपरा' आणि 'प्रिया' या प्रकृत पदार्थांचा म्हणजे उपमेयांचा अपलाप करून म्हणजे ते ते पदार्थ नव्हत असें सांगून ते अनुक्रमें 'नवमेघ,' वृत्रारिचें [इंद्राचें] धनु,' 'धारा' आणि 'विद्युत [वीज]' हे अप्रकृत अथवा उपमानपदार्थ आहेत असें स्थापन केलें आहे.

शार्दूलविक्रीडित.

झाडें पेटुनि वाजती कडकडा त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा ! पळे रे घरा ! १

पद्यरत्नावली.

येथें विद्युल्लता, मेघ व वर्षाकाळ यांच्या स्वरूपाचा अपलाप करून ज्वाला, धूर, आणि दवानल यांचें स्थापन केलें आहे.

गीति.

राय असें आयकतां हाय म्हणे बायको नव्हे कृत्या,
काय करूं जाय वना बा यश जोडीं करोनि सत्कृत्या १

मोरोपंत.

या दशरथोक्तींत प्रकृत पदार्थ 'बायको' आहे; त्याचा अपलाप होऊन त्याच्यावर 'कृत्या' या अप्रकृत पदार्थाचा आरोप स्थापित झाला आहे.

रूपकामध्यें प्रकृताचा निषेध किंवा असद्रूपानें कथन नसतें. आक्षेपा-

लंकारांत एकाचा अपलाप असला तरी दुसऱ्याचें स्थापन नसतें. एका वस्तूच्या स्वरूपाचें गोपन व दुसऱ्या वस्तूच्या स्वरूपाचें प्रकटीकरण हेंच सामान्यपणें **अपन्हुतीचें** लक्षण होय. कारण क्वचित् उपमानवस्तूच्या स्वरूपाचाही अपलाप केलेला असतो. **अपन्हुतीमध्यें** उपमेयावर उपमानाचा आरोप कल्पित असतो.

वर दिलेल्या उदाहरणांत वर्णनीय वस्तूंचा निषेध स्पष्ट आहे. त्याचेंच आणखी उदाहरणः—

उपेंद्रवज्रा.

न हें नभोमंडल वारिराशी, न तारका फेनचि हा तयासी;
न चंद्र हा वर्तुल शेष झाला, न अंक तो विष्णु गमे निजेला १

केकावलीटीका.

यांत ' नभोमंडल, ' ' तारका, ' ' चंद्र. ' आणि ' अंक ' या वर्ण्य वस्तूंचा निषेध स्पष्ट आहे. या अपन्हुतीला **शुद्धापन्हुति** ह्मणतात.

वर्ण्य वस्तूच्या धर्माचा निषेध सहेतुकपणें केला तर तेथें **हेत्वपन्हुति** होते.

उपजाति.

संताप दे यास्तव चंद्र नोहे, रवी ह्मणावा तरि रात्र आहे;
हा सागरांतोनि निघोनि गेला, आकाशमार्गी वडवाग्नि ठेला १

अलंकारविकाश.

या ठिकाणीं चंद्रावर वडवानलाचा आरोप करण्याकरितां ' संतापदत्व ' आणि ' रात्रिभवत्व ' या दोन हेतूंनीं ' चंद्रत्व ' व ' रवित्व ' या दोन धर्मांचा निषेध स्पष्ट केला आहे.

एका पदार्थावरील धर्माचा निषेध अन्य वर्ण्य पदार्थाच्या ठिकाणीं त्याचा आरोप करण्याकरितां केला असतो तेथें **पर्यस्तापन्हुति** होत.

गीति.

जो हा गगनीं भासे सकलंक अपूर्ण तो नव्हे चंद्र,
तरि सुंदरीमुखाचि विधु होय खरा अधरमधुसुधासांद्र १

वा. शा. के.

येथें 'चंद्राच्या' ठिकाणीं 'चंद्रत्वा'चा अपलाप केला आहे तो प्रस्तुत प-

दार्थ जें 'स्त्रीमुख' त्यावर चंद्रत्वाचा आरोप करण्याकरितां केलेला आहे. यांत आरोपहेतु उक्त नाहीं. कोठें तो उक्त असतो. जसें:—

वसंतिलक.

लक्ष्मी खरें विष हलाहल वीष नोहे,
लोकांत मात्र उलटी समजूत आहे;
त्यातें पिऊनि शिव जागृत नित्य राहे,
स्पर्शोनि हींस मधुसूदन भूल लाहे १

येथें 'हलाहालाच्या' मारकत्वाचा अपन्हव करून त्याचा आरोप वर्ण्यपदार्थ जो 'लक्ष्मी' त्याच्या ठिकाणीं केला आहे; याचा हेतु असा कीं केवळ स्पर्शानेंच व्याकुल करून टाकण्याचें सामर्थ्य लक्ष्मींत आहे.

प्रकृताविषयीं शंका आली असतां खरी गोष्ट सांगून तिचें निवारण केलें असतें तेथें **भ्रान्तापन्हुति** जाणावी.

दिंडी.

येथ नागरिका, फार उंच पाहें,
उभयपुच्छी हा कवण महिष आहे !
नाहिं नाहीं गजशाव हा लहान,
पुच्छ नोहे शुंडाचि असे जाण १

बा. शा. केमकर.

येथें हत्तीच्या छाव्यावर जी अत्युच्च उभयपुच्छी महिषाची **भ्रान्ति** उत्पन्न झाली तिचें, 'हा हत्तीचा छावा आहे,' अशी खरी गोष्ट सांगून, निवारण केलें आहे.

शिखरिणी.

जटा नोहे वेणी, गरळ न गळां जें तुज दिसें,
असे कस्तूरी ही, शिरिं कुसुम आहे, विधु नसे;
विभूती ही नोहे, तनुधवलता कान्तविरहें;
शिवभ्रान्तीनें कां छळिशि मज? कामा! विफळ हें!! ६

येथें 'जटा नोहे' इ० निषेधावरून कविकल्पित **भ्रान्ति** शंकित होते.

इतराला शंका उत्पन्न झाली असतां खरी गोष्ट छपवून तिचा धूर्तपणानें निषेध केला असतो तेथें **छेकापन्हुति** समजावी.

गीति.

सखि ! जल्पना करीताचि चरणीं संलग्न माझिया झाला,
अजि काय कान्त सुंदरि ? छे छे ! नूपुर; तुला तुजा गमला ? १

येथें नायिकेनें प्रकृत कांतवृत्तांताचें मोठ्या चातुर्यानें निवारण केलें आहे, आणि अप्रकृत नूपरवृत्तांताचें स्थापन केलें आहे.

येथें 'जल्पना' व 'चरणसंलग्नता' हे धर्म 'कांत' व 'नूपुर' यांकडे सारखे लागू पडतात, म्हणूनच वरील चमत्कार उत्पन्न झाला आहे. आणखी:—

लावणी.

बांकडी दिसे परि बहिर निर्मळा;
ती काय राधिका? नव्हे; इंदुची कळा.
अधरचुंबिनी वंशसंभवा लालसमधुरध्वनि,
अवडते फारच हृदयांतुनी.
वृषभानूची सुता ? नव्हे; रे !
मुरली मनमोहिनी.

रामजोशी.

येथें कृष्णानें धूर्तपणानें प्रकृत राधावर्णनाचा निषेध करून 'इंदुकला' व 'मुरली' या अप्रकृत पदार्थांचा वृत्तांत स्थापित केला आहे. ही **अपन्हुति श्लेषोत्थापित** असते हें वरील उदाहरणांवरून व्यक्त झालें आहे. वरील सर्व प्रकारच्या **अपन्हुतींमध्यें** निषेध उक्त आहे. कोठें कोठें तो 'कपट,' 'निमित्त,' 'छल,' 'मिष,' 'रूप,' 'परिणाम,' 'व्याज' इत्यादि शब्दांनीं किंवा विशिष्ट वाक्यरचनारूपानें अथवा अन्य कांहीं प्रकारानें प्रतीत होतो. उदाहरणें:—

गीत्यर्ध.

धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि कोपली वाटे.

मोरोपंत-धेनुहरण.

पृथ्वी.

निसर्गरमणीय हा नवविकास, नोहे स्मित,
ह्मणेल मुख कोण या? सुम सुगंधि हें निश्चित;

महाराष्ट्र भामिनीविलास.

उत्प्रेक्षा.

उपमेयावर हें उपमानच कीं काय अशी अभेदरूपानें कल्पना केलेली असते तेथें **उत्प्रेक्षा** हा अलंकार होतो.

' कीं, ' ' कीं काय, ' ' जणों, ' जणूं, ' ' जणूं काय, ' ' जसा काय, ' ' गमे, ' ' वाटे, ' ' भासे, ' इत्यादि शब्द **उत्प्रेक्षेचे वाचक** होत.

या अलंकारांत **उपमेय** नेहमीं खरी वस्तु असतें. उपमान मात्र कधीं खरें किंवा कधीं कविकल्पनानिर्मित असतें. प्रस्तुत अलंकारांत उपमेयापेक्षां उपमानच विशेषरूपानें मनांत येतें. **संदेहालंकारांत** उपमान व उपमेय हीं सारख्याच महत्वाचीं असतात. **उत्प्रेक्षेत** अभेदाची जी संभावना करितात ती उपमान व उपमेय यांच्यामधील रमणीय सादृश्यसंबंधावर केलेली असते. अशी संभावना मिथ्या दृष्टीनें असते. वस्तुतः उपमेय हें उपमान होऊं शकत नाहीं.

' राजाच्या भोंवतालीं बसलेल्या मांडलिक राजाच्या मुकुटावरील रत्नांत चांडालकन्येचीं प्रतिबिंबें पडलीं होतीं. त्यामुळें असें वाटें कीं, राजाची मूर्तिमंत आज्ञाच सर्वांनीं मस्तकीं धरली आहे काय ! '

कादंबरी.

येथें चांडालकन्यकेच्या प्रतिबिंबावर मूर्तिमंत राजाज्ञेची संभावना केली आहे. चांडालकन्यका आणि राजाज्ञा यांच्या मधील सुंदर सादृश्यावर ही अवलंबून आहे. 'कीं काय ! ' हे शब्द उत्प्रेक्षेचे **वाचक** होत.

उत्प्रेक्षा मुख्यत्वें तीन प्रकारची आहे. एक **स्वरूपोत्प्रेक्षा** दुसरी **हेतूत्प्रेक्षा** आणि तिसरी **फलोत्प्रेक्षा**.

स्वरूपोत्प्रेक्षा.

एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूची अभेदानें संभावना केली म्हणजे ती **स्वरूपोत्प्रेक्षा** झाली. हिला **वस्तूत्प्रेक्षा** असेंही ह्मणतात.

वर दिलेल्या उत्प्रेक्षेच्या उदाहरणांत चांडालकन्याप्रतिबिंबरूप वस्तूवर राजाज्ञारूपवस्तूचा अभेदानें आरोप केला आहे.

गीति.

ते श्री काय पुरीची, सीताव्याजें रघूत्तमा सहित,
जाणोनिया निघाली, निवारितांही प्रियोत्तमास हित १

रामचंद्र वनवासार्थ अयोध्या सोडून जाऊं लागला, त्यावेळीं सीता ही नको नको म्हणतां त्याच्याबरोबर जावयाला निघाली त्यावेळचें हें तिचें वर्णन पंतांनीं केलें आहे. येथें सीतेवर 'ती अयोध्या नगरीची लक्ष्मीच काय !' अशी कल्पना केली आहे. सीतारूप वस्तूवर अयोध्यालक्ष्मीरूप वस्तूचा अभेदानें आरोप केल्यामुळें ही स्वरूपोत्प्रेक्षाच होय. आणखी उदाहरणः—

वसंततिलक.

होवोनि शैलशिखरावरि लंबमान,
हे गर्जतात घन दुंदुभिच्या समान;
ऐकोनि शब्द उडती शिखि, पक्षत्रातें
कीं वीजिती मणिमयव्यजनीं नभातें ! १

मृच्छकटिक ५.

हेतूत्प्रेक्षा.

अहेतूवर हेतूची संभावना केली असते तेथें हेतूत्प्रेक्षा जाणावी.

वसंततिलक.

दोरे सईल पडतां हय सू निघाले,
हाले न चामरशिखा श्रव उच्च झाले;
टाकोनि हे पवन धूलिस दूर मागें,
ईर्ष्या धरोनि जणु धांवति फार वेगें १

शाकुंतल–अंक १

ही दुष्यन्ताप्रत सूताची उक्ति आहे. घोड्यांच्या धांवण्याला हेतु (हरिणांच्या) वेगाविषयीं असहिष्णुता किंवा ईर्ष्या हा वस्तुतः नाहीं.

तथापि तो हेतुत्वानें येथें कल्पिला आहे यास्तव येथें **हेतूत्प्रेक्षा.** आणखी उदाहरणः—

गत्यर्ध.

स्मरतां प्रियसुतगति रवि होउनियां म्लान सागरीं बुडतो !

कर्णपर्व.

' कर्णाचा वध ' ' सूर्याच्या समुद्रपतनाचें कारण ' नसून तें येथें ' कारणत्वानें ' वर्णिलें आहे.

फलोत्प्रेक्षा.

अफलावर फलाची संभावना असतां तेथें **फलोत्प्रेक्षा** जाणावी.

गीति.

श्रीरामबाण भेदुनि दशवदनाच्या उरःस्थलासि रणीं,
प्रविशे भूमितलीं जणुं घालाया वृत्त तें अहिश्रवणीं ! १.

स्वकृत.

या आर्येत ' बाणाच्या भूमितलप्रवेशाचें फल ' ' अहिश्रवणीं वार्ता घालणें ' हें नव्हे. तरी पण ' अहिश्रवणीं वार्ता घालणें ' यावर ' फलत्वाची ' संभावना केली आहे यास्तव येथें **फलोत्प्रेक्षा. स्वरूपोत्प्रेक्षेचे** दोन प्रकार आहेत. एक **उक्तपदार्था** व दुसरी **अनुक्तपदार्था.** ' पदार्थ ' म्हणजे ' वर्णवस्तु ' अर्थात् ' उपमेय. ' हें जेथें उक्त असतें तेथें **उक्तपदार्थस्वरूपोत्प्रेक्षा** होते व जेथें तें उक्त नसतें तेथें **अनुक्तपदार्था स्वरूपोत्प्रेक्षा** होते. **फलोत्प्रेक्षा** व **हेतूत्प्रेक्षा** यांचेही प्रत्येकीं **सिद्धाश्रया** व **असिद्धाश्रया** असे दोन प्रकार आहेत. ' सिद्ध ' याचा अर्थ ' प्रसिद्ध ' व ' आश्रय ' याचा अर्थ ' विषय ' होय. याप्रमाणें उत्प्रेक्षेचे साहा प्रकार आधुनिक अलंकारिक मानतात.

उत्प्रेक्षावाचक उक्त असले म्हणजे ती **वाच्योत्प्रेक्षा** होय. व तें अनुक्त असलें म्हणजे ती **गम्योत्प्रेक्षा** होय.

वरील सर्व उदाहरणें **वाच्योत्प्रेक्षेचीं** आहेत; कारण त्यांत वाचकें उक्त आहेत.

गीति.

तृणराजफळें पडलीं त्वद्रिपुंचीं जीं रणांगणांत शिरें,
भुवनीं भ्रमतां श्रमुनी कीर्ति तुझी सुरतरंगिणींत शिरे १

स्वकृत.

येथें प्रथमार्धांत 'तृणराजफळें' याच्या पुढें 'जणुं काय,' आणि श्रमुनी' शब्दापुढें 'कीं काय' अशीं वाचकें अध्याहृत आहेत. यास्तव ही गम्योत्प्रेक्षा आहे.

गीति.

शत्रूंच्या हृदयीं तूं शल्य म्हणुनि शल्य म्हणति तुज राया,
कुब्जेसि कृष्णसा तूं पटु मज्जयसिद्धिलागि उजराया १

मोरोपंत–शल्यपर्व.

ही दुर्योधनाची शल्याप्रत उक्ति आहे. हिच्यामध्यें पहिल्या 'शल्य' पदापुढें उत्प्रेक्षावाचक शब्द अध्याहृत आहे.

अंतरीं पेटला हुताशन, म्हणोन श्वासोश्वास उष्ण,
अश्रुधारा उभयनयन, शांतविती सिंचनें १

मुक्तेश्वर–वनपर्व.

या ओवींतही 'उत्प्रेक्षावाचक' लुप्त आहे.

रूपक.

उपमेय आणि उपमान यांचा अभेद वर्णिला असतां रूपक अलंकार होतो.

गीति.

पार्थपयोधर गर्जे स्पर्धा मंडूक तूं वृथा धरिशी,
त्याच्या पुढें टुरुटुरू टरों टरों शब्द हे किती करिशी ! १

मोरोपंत–कर्णपर्व.

ही शल्याची कर्णाप्रत उक्ति आहे. हिच्यांत पार्थावर पयोधराचा (मेघाचा) व 'तूं' या सर्वनामानें बोधित होणाऱ्या कर्णावर मंडूकाचा (बेडकाचा) आरोप केला आहे.

मालिनी.

नलराजकथा सुधाच साजे, दमयंती वरवर्णिनी विराजे;
मिळणी उभयासि होय जेथें, अधिकारी अधिकानुराग तेथें १

रघुनाथपंडित.

येथें **नलराजकथेवर** सुधेची व **दमयंतीवर** वरवर्णिनीची (हळदीची) अभेदरूपानें कल्पना केली आहे.

वसंततिलक.

निषधपतिकथा हे जे सुधेतें जयन्ती;
परिसुनि दमयंती रंजली रंजयंती;
नवल मज न भासे चंद्रवंशैकशाली,
नल तरि वनमाळी, भीमकी हेचि झाली १

रघुनाथपंडित.

येथें **नलावर वनमालीची** [कृष्णाची] **व दमयंतीवर भीमकीची** [रुक्मिणीची] अभेदानें कल्पना केली आहे.

अभंग.

विठ्ठलमात्रा जेणें घ्यावीं, तेणें पथ्यें सांभाळावीं;
काम क्रोध मीठ मिरची, यांची घेऊं नये रुची;
आशा मनसा तेलकट, यांचा येऊं द्यावा वीट;
मद अहंकार ताक दहीं, यांतें सेवूं नये कांहीं;
क्षमा दया तूप पोळी, सावध राहोनीयां गिळीं;
तुका स्वीकारी हरिकथा, सांडी भवरोगाची व्यथा १

तुकाराम.

या अलंकारांत अभेद हा अत्यंत सादृश्यामुळें मानलेला असतो; वास्तवार्थानें नसतो. **अपन्हुति** अलंकारामध्यें उपमेयाच्या स्वरूपाचें गोपन होतें. यांत तसें होत नाहीं; उपमान आणि उपमेय हीं प्रस्तुत अलंकारांत भिन्न पदांनीं उक्त असतात; तशीं **अतिशयोक्तींत** नसतात. **अतिशयोक्तीमध्यें** एकच शब्दानें उपमान व उपमेय यांचें ग्रहण होतें. **भ्रान्तिमान्**

अलंकार सादृश्यमूलक जरी असतो तरी तें सादृश्य कल्पित आहे असें तेथें भान असत नाहीं. प्रस्तुत अलंकारांत कल्पित सादृश्याचें भान कायम असतें; यद्यपि उपमानोपमेयांमध्यें अभेद मानिला असतो तरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं तो अभेद कार्यकारणरूप संबंधावरून कधींही मानलेला नसतो. 'घृत जीवन आहे.' या वाक्यांत जीवन व घृत यांचा संबंध कार्यकारणरूप आहे. यास्तव तेथें **रूपकालंकार** मानीत नाहींत.

रूपकांत दोन प्रकार आहेतः एक **सांग** अथवा **सावयव**; व दुसरें **निरंग** अथवा **निरवयव** अथवा **शुद्ध**.

भुजंगप्रयात.

हरीचा वियोगाग्निसंताप राधा,
न सोसूनियां आठवी स्वापराधा;
सखी एक दूती प्रिया फार तीची,
बहू शाहणी मूर्ति जे भारतीची १

वामन-राधाभुजंग.

यांत वियोगाग्नि व प्रियाभारती अशीं दोन रूपकें आहेत. पण तीं परस्पर सापेक्ष नसून वेगवेगळीं, अंगें किंवा अवयव यांनीं रहित, अशीं आहेत. यास्तव हें **शुद्धरूपकाचें** उदाहरण होय.

सांगरूपकांत दोन प्रकार आहेत. एक **समस्तवस्तुविषय** व दुसरें **एकदेशविवर्ति.**

समस्तवस्तुविषयसांगरूपक.

परस्पर सापेक्ष व ज्यांत उपमेयांप्रमाणें सर्व उपमानेंही उक्त आहेत अशीं अनेक रूपकें एकत्र होऊन एक समग्र रूपक तयार होतें त्याला **समस्तवस्तुविषय** (सगळ्या वस्तु म्हणजे उपमेयोपमानें आहेत विषय ज्याचा असें) **सांग** (अंगांनीं किंवा अवयवांनीं युक्त) **रूपक** म्हणतात.

शार्दूलविक्रीडित.

शाखा सद्गुण, पालवी विनयही, विश्रंभ मूळें, दया,
छाया, स्वाचरण प्रकांड, फुललीं चारित्रपुष्पें जया;

सुत्कारोपकृती फळें, रस सुधातुल्या गिरा वाहती,
ऐशा सज्जनपादपा वरि सुहृत्पक्षी सुखें राहती १

मृच्छकटिक अं. ४.

येथें 'शाखारूप सद्गुण' 'विनयरूप पालवी,' इत्यादि अनेक रूपकें आहेत. तीं परस्पर सापेक्ष आहेत; स्वतंत्र नाहींत. यांत सर्व उपमानपदें उपमेयांप्रमाणेंच उक्त आहेत. सर्व रूपकें मिळून 'सज्जनपादप' हें 'समग्ररूपक' सिद्ध झालें आहे. यास्तव येथें **समस्तवस्तुविषय सांगरूपक** झालें. आणखी उदाहरणः—

शार्दूलविक्रीडित.

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय, वीची तृषा,
स्त्रीपुत्राद्यनुराग हे जलचरें जे पूर्ण कूलंकषा;
संसारश्रम भोंवरा गरगरी चिंताच जीचीं तटें,
तीतें जे तरले मुनीश न कधीं ते पावती संकटें १

वा. पं. वैराग्यशतक.

येथें 'आशानदी' हें 'समग्ररूपक' अवयवभूत इतर अनेक रूपकांनीं सिद्ध झालें आहे.

एकदेशविवर्ति सांगरूपक.

कांहीं उपमानपदें उक्त नसल्यामुळें अर्थबलानें त्यांचें ग्रहण करावें लागतें आणि इतर सर्व गोष्टी **समस्तवस्तुविषयांतल्या**प्रमाणेंच कायम असतात तेथें **एकदेशविवर्ति** (एका अवयवावर विशेषेंकरून अवलंबून राहणारें) **रूपक** होतें.

गीति.

समरान्तःपुरिं करिं धरि खड्गलता नरमणी तया कालीं,
रससंमुखी असुनियां रिपुसेना त्या पराङ्मुखी झाली १

स्वकृत.

येथें 'समरा'वर 'अंतःपुरा'चा आरोप आहे तो उक्त आहे. 'खड्गलतेचें नायिकात्व' व 'रिपुसेनेचें प्रतिनायिकात्व' मात्र अर्थसामर्थ्यावरून

मनांत येतें. समरान्तःपुर या एकदेशावर म्हणजे अवयवभूत किंवा अप्रधान रूपकावर समग्र रूपक या ठिकाणीं अवलंबून आहे यास्तव येथें **एकदेश-विवर्ति रूपक** झालें.

मालारूपक.

एकाच उपमेयावर अभेदरूपानें अनेक उपमानें कल्पिलीं असतां तेथें **मालारूपक** अलंकार होतो.

ओंवी.

कवि सृष्टीचा अलंकार, कवि लक्ष्मीचा शृंगार,
सकलसिद्धींचा निर्धार, ते हे कवि १
कवि सभेचें मंडन, कवि भाग्याचें भूषण,
नाना सुखांचें संरक्षण, ते हे कवि २

दासबोध १-७

यांत ' कवि ' हें एकच उपमेय आहे. त्यावर ' सृष्टीचा अलंकार, ' ' लक्ष्मीचा शृंगार, ' अशीं अनेक उपमानें अभेदरूपानें कल्पिलीं आहेत; यास्तव येथें **मालारूपक** होय.

साकी.

सौंदर्याची तरंगिणी, नव विकास तारुण्याचा,
ललितकलांचें मंदिर, दयिता उदय महापुण्याचा ! १

स्वकृत.

या साकीमध्यें 'दयिता' हें एकच उपमेय असून त्यावर ' सौंदर्याची तरंगिणी,' 'ललितकलांचें मंदिर' इत्यादि अनेक आरोप अभेदरूपानें केले आहेत. ह्मणून येथेंही **मालारूपक**च. आणखी उदाहरणें:—

दिंडी.

दिग्वधूंचा जो मस्तकावतंस,
अंतरिक्षीं फिरणार राजहंस;
सुरतकेलीचा मूळकंद पाहे,
चंद्रमा तो गगनांत विलसताहे १

गणेशशास्त्री लेले.

पृथ्वी

अकंकण अकुंडल क्षितिवधूटिचें भूषण,
अकुंकुम अचंदन स्फुट दिशावधूमंडन;
अशोषण अमोहन स्मरखरास्त्र जी कीं असे,
सुदिव्य किरणावली गगनिं हो अतां ती दिसे ! १

कर्पूरमंजरी.

परंपरितरूपक.

जेथें अप्रधानरूपक प्रधानरूपकास कारणीभूत होतें तेथें **परंपरित-रूपक** जाणावें. हें **श्लिष्ट** पदांनीं किंवा **भिन्न** पदांनीं उक्त असतें.

श्लिष्टपरंपरित रूपकोदाहरण.

गीति.

ज्यानें निज प्रभेनें भुवनान्तर भरुनि टाकिलें सारें,
सद्वंशमौक्तिका त्या तुज वानील न नृपा ! जन कसा रे १

स्वकृत.

या आर्येंत 'सद्वंश' [चांगलें कुल] हाच 'सद्वंश' (चांगला वेळू) असें अप्रधान रूपक केलें आहे; आणि या रूपकाच्या साधनानें राजावर मौक्तिकाचा आरोप केला आहे. 'राजावर मौक्तिकाचा आरोप' हें येथें प्रधान रूपक आहे. याची सिद्धि पहिल्या अप्रधान रूपकानें झाली व ती 'सद्वंश' या पदांतील श्लेषामुळें झाली. कोठें कोठें अशा रूप-कांची मालाच गुंफलेली असते. ती फार चमत्कारिक असते; पण मराठी काव्यांतून ती प्रायः आढळत नाहीं.

भिन्नपदोक्त-परंपरित-रूपकोदाहरण.

जो ज्ञानारविंदमकरंदू, वैराग्यवल्लीचा मूळकंदू,
विवेकसागरींचा पूर्णेन्दू, तो नारदू पातला ! १

मुक्तेश्वर-वनपर्व.

येथें 'ज्ञान' आणि 'अरविंद' [कमल] यांचें अभेदानें वर्णन झाल्यामुळें रूपक सिद्ध झालें. हें रूपक नारदावर 'मकरंदाचा' आरोप कर-

ण्यास साधनीभूत झालें; तसेंच 'वैराग्यवल्ली' हें रूपक नारदावर 'कंदाचा' आरोप करण्याच्या उपयोगीं पडलें; 'विवेकसागर' हें रूपक नारदावर 'पूर्णेन्दूचा' आरोप करण्यास सहाय झालें. ही सर्व रूपकें 'ज्ञान' व 'अरविंद,' 'वैराग्य' व 'वल्ली,' 'विवेक' व 'सागर.' अशा भिन्न शब्दांनीं उक्त आहेत. यास्तव वरच्यांपैकीं कोणतेंही रूपक **भिन्नपदोक्त परंपरित रूपकाचें** उदाहरण होय. हीं सगळीं रूपकें मिळून **भिन्नपदोक्तपरंपरित मालारूपक** झालें..

अतिशयोक्ति.

जेथें उपमेय उक्त नसतें, त्याचा उपमानानेंच बोध होतो तेथें अतिशयोक्ति नामक अलंकार होतो. अतिशयोक्तीला **रूपकातिशयोक्ति** असही म्हणतात.

शार्दूलविक्रीडित.

येथें एक असे सुवर्णलतिका, जी चालते बोलते,
आलें पद्म तिच्यावरी अतिशयें जें कांतिनें शोभतें;
त्या पद्मींच विराजतीं कुवलयें हीं दोन कैसीं पहा,
ऐसी अद्भुत सृष्टि देखुनि मला आश्चर्य वाटे महा १

गणेशशास्त्री लेले.

येथें 'तरुणी,' तिचें 'मुख' व तिचे नेत्र' हीं उपमेयें उक्त नाहींत. 'सुवर्णलतिका', 'पद्म' व 'कुवलय' या उपमानपदांनींच त्यांचा अनुक्रम बोध होतो.

गीति.

सुटला दाव्यापासुनि वत्स स्तन्यार्थ जेविं गाईला,
धांवे अक्रूर तसा भेटाया कडकडोनि आईला १

मोरोपंत—कंसवध.

यांत 'आई' या उपमानपदानें **श्रीकृष्ण** या उपमेयाचा बोध झाला. तें उक्त नाहीं. आणखी उदाहरणें:—

पृथ्वी.

कलिंदतनयातटावरिल काननें भासवी,
लतावलिविभूषणीं रुचिर फार ज्यांची छवी;
सदा श्रमति जे पथीं शमवि त्या जनांचें श्रम;
मम श्रमहि संहरो त्वरित तो तमालद्रुम १

महाराष्ट्रभामिनीविलास.

येथें **श्रीकृष्ण** हें उपमेय अनुक्त आहे. 'तमालद्रुम'या उपमानावरून त्याची प्रतीति होते.

शिखरिणी.

चकोरांनीं रानीं अमृतअशना लागि वरिली,
अशी ज्योत्स्ना ज्यानें विमलतर लोकीं पसरिली;
अनाकाशीं ऐसा गलित मृगसा शीतकर हा,
जरा प्राकाराग्रीं नजर तरि फेकूनिच पहा ! १

अ. दर्श.

यांत 'शीतकर' या उपमानानेंच 'मुख' या उपमेयाचें ग्रहण झालें.

' विदूषकः—अरे वयस्या, हा पहा पूर्णिमेचा चंद्रमा ! '

कर्पूरमंजरी.

येथें कर्पूरमंजरीचें 'मुख' हें उपमेय उक्त नाहीं. 'चंद्रमा' या उपमानपदानें तें सूचित केलें आहे.

रूपकामध्यें उपमान व उपमेय यांचें अभेदानें वर्णन असतें खरें; तथापि त्यांत उपमान व उपमेय हीं दोन्हीं उक्त असतात. **सांग एकदेशविवार्ति रूपकामध्यें** कांहीं उपमानपदें उक्त नसतात. **रूपकातिशयोक्तीमध्यें** उपमेय उक्त नसतें. उपमानांत त्याचा अंतर्भाव होतो व उपमानावरूनच त्याचा बोध होतो.

भेदकातिशयोक्ति.

वस्तुतः उपमानोपमेयांत अभेद असूनही लोकोत्तरत्व दर्शविण्याकरितां क्वचित् उपमेयाचें भेदरूपानें वर्णन असतें. या अतिशयोक्तीला' **भेदकातिशयोक्ति** ह्मणतात.

वसंततिलक.

लोकोपकारमति होय विचित्र साची,
कांहीं विलक्षणचि पद्धति भाषणाची;
अत्यद्भुता कृतिहि आकृति फार रम्य,
विद्वच्चरित्र सगळें वचना अगम्य ! १

म. भा. विलास.

येथें लोकप्रसिद्ध ' लोकोपकारमति ' इत्यादि प्रस्तुत पदार्थांचें लोकोत्तरत्व वेगळ्या वेगळ्या प्रकारांनीं भिन्नत्वानें दाखविलें आहे.

शालिनी.

सौंदर्याची संपदा हे विभिन्ना, चातुर्याची पद्धती तीहि भिन्ना;
लोकीं वाटे पद्मपत्रेक्षणा हे, स्रष्टयाची कीं सृष्टि सामान्य नोहे १

येथेंही **भेदकातिशयोक्तिच** आहे.

संबंधातिशयोक्ति.

उपमेयाचा उत्कर्ष सूचित करण्याकरितां संबंध नसतांही तो वर्णिला असतो तेथें **संबंधातिशयोक्ति** होते.

गीति.

गंभीर श्रुतिसुंदर रव तव जलदा पुरे पुरे साचा,
मत्तकरिभ्रांतीनें स्फुरतो मम गर्भ एक मासाचा ! १

स्वकृत.

ही एका सिंहीची मेघाप्रत उक्ति आहे. मेघगर्जनेनें सिंहीच्या गर्भाचें स्फुरण असंभाव्य आहे. तेव्हां मेघगर्जनेचा व सिंहीगर्भस्फुरणाचा कांहीं संबंध नाहीं. तथापि गर्भगत सिंहशिशूचा शौर्यातिशय ध्वनित करण्याकरितां असा संबंध जुळविला आहे.

वसंततिलक.

जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे,
तो चंद्रमा निजतनूवरि डाग वाहे;
जो या यशास्तव कसें धवलत्व नेघे,
शृंगारिला हय तयावरि भूप वेघे १

रघुनाथपंडित.

वसंततिलक.

पद्मावली मिटविली निज पाणपोई,
या कारणें भ्रमरसंघ सकोप होई;
चालेनि जाउनि विधूवरि अंबरीं तो,
तद्बिंब आक्रमुनि अंकित त्या करीतो ! २

स्वकृत.

वरील दोन्हीं पद्यांत संबंधातिशयोक्ति जाणावी. दुसऱ्या पद्यांतील 'अंकित' हा शब्द श्लिष्ट आहे.

असंबंधातिशयोक्ति.

संबंध असून असंबंध वर्णिला असतां **असंबंधातिशयोक्तिनामा** अलंकार होतो. जसें:—

'असतां नृपा वरद तूं न आदरूं सुरतरूचिया स्कंधा'

या आर्यार्धांत कल्पवृक्षाच्या आदराचा संबंध असूनही त्याचा असंबंध वर्णिला आहे.

'जर, तर'; 'जेव्हां, तेव्हां'; 'जई, तई'; हे शब्द योजून असंभवी अर्थाची योजना केली तर तेथेंही **अतिशयोक्ति** समजावी. जसें:—

वसंततिलक.

राया ! तिचें मुख सुधाकर या द्वयाला,
नाहींच वेगळिक हें गमतें मनाला;
संपूर्ण नित्य असता नसता कलंकी
हा चंद्र हें मुख असें मग कोण शंकी ! १

रघुनाथपंडित.

येथें चंद्राची 'नित्यसंपूर्णता' व 'अकलंकिता' या असंभवि अर्थाची कल्पना करून **दमयंती**च्या मुखाचा उत्कर्ष वर्णिला आहे. येथें 'जर, तर;' हे शब्द अध्याहृत आहेत.

रूपकातिशयोक्ति व ही **अतिशयोक्ति** हे **अतिशयोक्ति**प्रकार **सादृश्यमूलक** आहेत. बाकीचे सर्व **विरोधमूलक** आहेत.

अत्यंतातिशयोक्ति.

जेथें कारण आणि कार्य यांचा व्युत्क्रम होतो, म्हणजे अगोदर कार्य होऊन मग कारण झालें असें वर्णिलें असतें तेथें **अत्यंतातिशयोक्ति** होते.

वसंततिलक.

आधीं फुलें मग फळें तरुलागि येतीं,
होतो घनोदय अधीं मग वृष्टि होती;
ऐसा असे क्रमचि कारण कार्य यांचा,
तुझ्या कृपें आधिंच आगम संपदांचा १

प. गो. कृ. शाकुं. अं. ७

ही **दुष्यंताची मारीचऋषी**प्रत उक्ति आहे. येथें ' मनोरथासिद्धि'रूप कार्य **अगोदर** झालें असें वर्णिलें आहे व ' दर्शन'रूप कारण **मागाहून** झालें असें सुचविलें आहे. आणखी उदाहरणें:

गीति.

काढी जोडी आढी सोडी शर कर्ण लाघवास्तव तें,
न दिसे दिसे शरासन मंडळहत शत्रुबलहि त्या भवतें १

मोरोपंत–कर्णपर्व.

शिखरिणी.

कदा नेणों वोढी शरधितुनि काढी शर कदा,
कदा धन्वी जोडी धरिवरिहि सोडी शर कदा;
विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणीं,
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधानकरणी १

रघुनाथपंडित.

शार्दूलविक्रीडित.

शोभे दक्षिण हस्त तूणिवदनीं तो घालतां काढतां,
केव्हां बाण शरासनीं चढवितो हे ना दिसे पाहतां;
जे लागोनि सवेग ठार मरती तें शत्रु भूमीप्रती,
ते सारे शर तों गमे जनमनां मौर्वीतुनी नीघती १

रघुवंश–मराठी–भाषांतर.

अक्रमातिशयोक्ति.

कार्य व कारण हीं दोन्हीं एकदम घडलीं असें वर्णन असल्यास तेथें **अक्रमातियशोक्ति** होते.

वंशस्थ.

एकेचि काळीं नृप तो पराक्रमी,
स्वपित्र्य राज्या रिपुलाहि आक्रमी;

रघुवंश–सर्ग. ४

गीति.

शल्य बसे मग बैसे वैकर्तन निंजरथीं जसा तरणी,
पाहुनि शोभा मानिति जन कीं केलाचि पार्थघात रणीं १

मोरो. कर्णपर्व.

पहिल्या श्लोकार्धात ' राज्यासनावर बसणें ' व ' रिपूचें कंदन करणें; ' व दुसऱ्या पद्यांत 'कर्ण रथारूढ होणें ' व ' पार्थघात होणें ' असा कारण आणि कार्य यांचा एकाच काळीं योग वर्णिला आहे. यास्तव येथें **अक्रमातिशयोक्ति.** येथें क्रम लक्ष्यांत येत नाहीं यास्तव या **आतिशयोक्तीला** हें नांव दिलें आहे असें दिसतें.

शार्दूलविक्रीडित.

लंकानायक सायकासनगुणीं सज्जावया सज्जला,
तों सीता भयकंपिता, जन महाचिंतांबुधीं मज्जला;
झाल्या म्लानमुखी मनोरमसखी तो जों भुजा सांवरी,
तों आकार विकार देखुनि उठे हाकार माडांवरी १

आनंदतनय.

सीतास्वयंवरप्रसंगीं रावण शिवधनुष्याचा भंग करण्याकरितां सज्ज झाला तेव्हांचें हें वर्णन आहे.

येथें ' **रावणानें** धनुष्य सज्ज करणें ' हें '**कारण**' व '**सीतेला सुट**लेला कंप, जनाची चिंता' इत्यादि ' कार्यें ' यांचा योग एकसमयावच्छेदानें आला असें वर्णन आहे म्हणून येथेंही **अक्रमातिशयोक्ति.**

चपलातिशयोक्ति.

हेतूची उत्पत्ति होते न होते तोंच कार्य घडतें असें वर्णन असतां तेथें **चपलातिशयोक्तिनामक** अलंकार होतो.

इंद्रवज्रा.

' जातों, ' ' न जातों, ' पति जें वदे तो, कांतेस तें खेदहि मोद देतो;
पूर्वी तियेचीं वलयें गळालीं, जीं राहिलीं तीं मग भग्न झालीं ! १

वामनशास्त्री केमकर.

ही प्रकारची आपल्या कांतेविषयीं मित्राजवळ उक्ति आहे. ' जातों असें म्हणतों न म्हणतों तों वलयें गळालीं व न जातों असें म्हणतों न म्हणतों तों वलयें भग्न झालीं ' असा या श्लोकांतील भावार्थ आहे. 'जातों' आणि 'न जातों' या हेतूंची उत्पत्ति होते न होते तोंच ' वलयें गळालीं' आणि ' वलयें भग्न झालीं, ' अशीं कार्यें अनुक्रमें येथें वर्णिलीं आहेत यास्तव येथें **चपलातिशयोक्ति** अलंकार झाला.

तुल्ययोगिता.

प्रस्तुत किंवा अप्रस्तुत पदार्थांचा एकवार उक्त अशा गुणरूप किंवा क्रियारूप एकधर्माच्या ठिकाणीं अन्वय होतो तेथें **तुल्ययोगिता** जाणावी.

गीति.

हा चंद्र चकोरकुळें उल्लासवि तेविं तीं कुमुदमुकुलें;
परि संकोचाति कमळें तैशीं तीं स्वैरिणीमुखें विमळें १

यांत प्रस्तुत पदार्थ ' कमळें ' आणि ' स्वैरिणीमुखें ' होत. त्यांचा ' संकोचति ' या एकवार उक्त अशा क्रियारूप एका धर्माच्या ठिकाणीं अन्वय झाला.

वसंततिलक.

चंद्रासि लागति कळा उपराग येतो,
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो;
जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला,
नाहीं समान नलराजमहायशाला १

र. पं. नलोपाख्यान.

यांत ' **नलराज**यश ' प्रस्तुत आहे. ' चंद्र, ' ' गंगा ' आणि ' मौक्तिक ' या अप्रस्तुत वस्तूंचा एकवार उक्त अशा ' असमत्व'रूप एकगुणाच्या ठिकाणीं अन्वय झाला आहे.

गीति.

त्वत्तनुची मृदुता जरि अनुभविली तरि गमे न कोणास,
त्या माल्ती शशिकला कदलींचीही कठोरता खास १

वा. शा. केमकर.

येथें ' माल्ती, ' ' शशिकला ' आणि ' कदली ' या ' अप्रस्तुत ' पदार्थांचा ' कठोरता'रूप एकगुणाच्या ठिकाणीं अन्वय केला आहे.

आणखीं उदाहरणें:—

गीति.

ऐसा श्रीमदगुरुनें केला आम्हांवरी प्रसाद बुधा,
तन्मधुरता न जननीस्तन्यास न कामधेनुच्याहि दुधा. १

येथें जननीस्तन्य व कामधेनुदुग्ध या अप्रस्तुत पदार्थांचा एकवार माधुर्ययुक्तता अशा गुणाच्या ठिकाणीं अन्वय केला आहे.

वसंततिलक.

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें,
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें;
जाणोनि हें सुजन ज्या दुबळीक आली,
त्याशीं कधीं न करिती सहसा टवाळी १

वामनपंडित.

येथें ' तरु ' व ' विधु ' या अप्रस्तुत पदार्थांचा वर्धनरूप क्रियाधर्मांत अन्वय झाला आहे. येथें क्रियारूपधर्म दोनदां उक्त आहे एवढाच विशेष आहे.

शत्रुमित्रांच्या ठायीं समभाव वर्णिला असतो तेथेंही **तुल्ययोगिता** होते असें **सरस्वतीकंठाभरणकार** म्हणतात.

मत्ता.

निंबा छेदी नर परशूनें, जो कीं सिंची सघृत मधूनें;
कीं जो अर्पी सुमनिं सुगंध, सर्वांना तो कडुचि संबंध १

वा. शा. केमकर.

'कुऱ्हाडीनें मारणाराला' व 'घृतमधूंनीं पुष्टी देणाराला' **निंब** समतांच दर्शवितो म्हणजे कटुभावच प्रकट करितो असा यांत अर्थ आहे. येथें अर्थाचें निंदेवर पर्यवसान आहे.

कां गाईची तृषा हरूं, कीं व्याघ्रा विष होऊनि मारूं,
हें नेणेचि गा करूं, तोय जैसें?

ज्ञानेश्वर.

या ओवींत दुग्ध देणारी गाय व प्राण घेणारा वाघ या दोहोंविषयीं तोयाची समवृत्ति वर्णिली आहे. तोय दोघांचीही तृषा हरून त्यांस संतुष्ट करितें असा भावार्थ. येथें अर्थाचें स्तुतीवर पर्यवसान झालें आहे.

दीपक.

प्रस्तुत आणि अप्रस्तुत पदार्थांचा एकवार उक्त अशा धर्मामध्यें अन्वय झाला असतां **दीपक** अलंकार होतो.

गीति.

कृपणाचें धन, अहिचा मणि, सिंहाच्या सटा, पदार्थ या;
ते जीवमान असतां कवण क्षम सांग हात लावाया?

स्वकृत.

येथें सिंह व सटा प्रस्तुत पदार्थ आहेत; कृपणधन आणि अहिमणि अप्रस्तुत आहेत. हात लावण्याला समर्थ असणें हा क्रियारूप धर्म एकवारच उक्त आहे; आणि यांत प्रस्तुत आणि अप्रस्तुत पदार्थांचा अन्वय झाला आहे.

दारांत लावलेला दिवा जसा घरांतल्या पदार्थांस प्रकाशित करून बाहेरच्याही पदार्थांस प्रकाशित करितो तसा प्रस्तुत अलंकारांत क्रियादिरूप धर्म प्रस्तुत व अप्रस्तुत या उभयतांना प्रकाशित करतो म्हणून यांस दीपक हें नांव प्राप्त झालें आहे. आणखी उदाहरणें:

गीति.

त्या राघवें पुरीला वियोग दिधला नृपेंहि धरणीला,
ईर्ष्या पुत्रासह ही केली कीं दाखवूनि करणीला.

मोरोपंत-मंत्ररामायण.

गीति.

ऐसें वदूनि पार्थें ओढुनिया सगुण बाण कर्णान्त,
पाठविला काळें निज दूत तसा व्हावयासि कर्णान्त ! १

मोरोपंत-कर्णपर्व.

मालादीपक.

वर सांगितलेल्या **दीपकाचा** **मालादीपक** म्हणून एक प्रकार आहे. त्यांत पहिली वस्तु दुसरीला, दुसरी तिसरीला, तिसरी चवथीला अशी उपकारक होऊन दीपक होतो.

गीति.

समरीं निजधनु करुनी सज्ज नृपा त्वां तयासि वांकविलें,
कवणें कवणें सहसा परिसें तें काय काय मेळविलें ? १
कोदंडानें शर, अरिशिरें शरीं, अरिशिरीं धरावलय,
त्यानें तुज, कीर्ति तुवां, भुवनांचें कीर्तिनेंहि तें त्रितय २

स्वकृत.

पहिल्या आर्येंत 'मेळविलें' हा 'क्रियारूप धर्म' एकवारच उक्त आहे. दुसऱ्या आर्येंतील 'शर,' 'अरिवर' इत्यादि पदें त्यांत अन्वित झालीं आहेत. येथें 'कोदंड' या पहिल्या वस्तूनें 'अरिशिरें' प्राप्त करून देऊन 'शर' या दुसऱ्या वस्तूस उपकृत केलें; 'शर' या दुसऱ्या वस्तूनें 'धरावलय' प्राप्त करून देऊन 'अरिशिरें' या तिसऱ्या वस्तूला उपकृत केलें. या प्रमाणेंच पुढें समजावें.

आणखी एक उदाहरणः—

गीति.

दशशतभुजार्जुनाचें रामें, त्याचें तुवां, तुझें आजी,
सर्व यश हराया मीं आलों तुजशीं कराया आजी १

मोरोपंत-भीष्मपर्व.

हे दीपकप्रकार **सादृश्यमूलक** आहेत. यापुढें येणारे **संकीर्ण-कोटींत** येतात.

कारकदीपक.

क्रियापदें अनेक असून जेथें कारक एकच असतें तेथें **कारकदीपक** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित.

मालाकार परस्परें कर गळां घालोनि गोपांगना,
गाती नाचति पाहती अवधिया एका जगज्जीवना
वामन-रासक्रीडा.

येथें ' गाती, ' ' नाचति, ' इत्यादि अनेक क्रिया असून गोपांगना हें एकच कारक आहे.

गीति.

पायीं श्रमली, श्रमली, निजली, भिजली, निजाश्रुनीरांनीं,
धार्मिक न पाहिला तो जो जाय अशीस टाकुनी रानीं १
मोरो-वनपर्व.

येथेंही अनेक क्रिया व एक कारक अशीच स्थिति आहे.

गीति

उतरे, चढेहि वर्षे गर्जे, पाडी घनांधकारातें,
प्राप्तनवश्रीपुरुषा परि मेघ धरी अनेक रूपातें १
मृच्छकटिक-अं. ६

हेंही **कारकदीपकच.** आणखी उदाहरणः—

वसंततिलक.

वित्तामुळें रडति हांसति या नराला,
विश्वास दाखवुनि नागविती भल्याला;
तस्मात् सुशील कुलजें नच ह्या भजाव्या,
वेश्या श्मशानकुसुमापरि त्या त्यजाव्या १
मृच्छकटिक-अं ४.

प्रतिवस्तूपमा.

उपमानवाक्यांत आणि उपमेयवाक्यांत एकच समानधर्म भिन्न शब्दांनीं उक्त असतो तेथें **प्रतिवस्तूपमा** अलंकार समजावा.

गीति.

शोभे रवि नाभीं तापें साजे नरवीर समरिं चापानें,
विद्यामृतपानें द्विज तोषे हर्षेहि भृंग मधुपानें १

स्वकृत.

या आर्येच्या प्रथमार्धांत ' शोभे , व ' साजे ' या पदांनीं ' शोभणें ' हा एकच ' समानधर्म ' भिन्न पदांनीं दर्शविला आहे. द्वितीयार्धांत ' तोषे ' व ' हर्षे ' यांत ' तुष्ट होणें ' हा एकच समानधर्म उपमानोपमेयवाक्यांत भिन्न पदांनीं उपात्त आहे.

गीति.

शैली गुणी जनांची स्थिर खलमतीनें न बाध ते पावे,
रत्नमया दीपाची ज्वाला वात्येस ही न झेंपावे १

वा. शा. केमकर.

या आर्येंत ' बाध पावणें, ' व ' झेंपणें ' हे नाशार्थक क्रियावाची भिन्न शब्द आहेत. तद्वारा ' सामान्यधर्म ' उक्त आहे.

मालिनी.

तव चरणसरोजीं लीन आत्मा जहाला,
तरि मग दुसऱ्याची त्यास इच्छा कशाला;
सरसिजमकरंदीं भृंग जो लुब्ध झाला,
कधि तरि मग इच्छी इक्षुच्या तो रसाला ! १

अ. दर्श.

येथें उपमानोपमेयवाक्यांत अनिच्छारूप सामान्यधर्माचें ऐक्य आहे. हा अलंकार कधीं कधीं वैधर्म्यानेंही संभवतो. जसें:—

गीति.

विद्वानाचि जाणतसे जानीं विद्वज्जनपरिश्रम स्पष्ट,
वंध्या कधीं न जाणे सुदुःसह प्रसवसमयिंचे कष्ट १
जरि आहेत गुण नरीं तरि येतील स्वयें विकाशाला,
कस्तूरिच्या सुगंधा सिद्ध करायासि शपथ काशाला ?

वामनशास्त्री केमकर.

'प्रतिवस्तु' म्हणजे 'प्रतिवाक्य' आणि 'उपमा' म्हणजे 'सामान्यधर्म.' प्रतिवाक्यांत सामान्यधर्म भिन्न पदांनीं उक्त असतो म्हणून **प्रतिवस्तूपमा** हें नांव प्रस्तुत अलंकाराला मिळालें आहे. **प्रतिवस्तूपमा** प्रस्तुत व अप्रस्तुत यांची होते. **अर्थावृत्तिदीपक** (पुढें दुसऱ्या भागांत सांगितलें आहे) अप्रस्तुतांचेंच होतें. **आवृत्तिदीपक** वैधर्म्यानें संभवत नाहीं. **निदर्शना** आणि **दृष्टांत** यांत समानधर्म बिंबप्रतिबिंबभावरूपानें उक्त असल्यामुळें वस्तुतः भिन्न असतात; तसेंते **प्रतिवस्तूपमें**त असत नाहींत. म्हणून 'एकच समानधर्म' असें वर लक्षणांत म्हटलें आहे.

दिंडी.

आग्नि जाळी यांत तें नवल कैंचें ?
सलिल लवणचि सर्वदा अंबुधीचें;
गिरिंत गुरुता राहते काय त्याचें ?
खेदविरहित मन नित्य सज्जनाचें १

स्वकृत.

येथें 'नवल कैंचें' इत्यादिकांनीं चारी चरणांतील चारी वाक्यार्थांत 'नवलाचा अभाव' हा 'एकच सामान्य धर्म' भिन्न शब्दांनीं सांगितला आहे. चवथ्या चरणांत उपमेयवाक्य आहे. येथें उपमानवाक्यें अनेक आहेत; यास्तव **मालाप्रतिवस्तूपमा** जाणावी.

औपच्छंदसिक.

सतत विषधरां पटीर सेवी, धरि शिरिं दीपक कज्जलास तेवीं;
वरि तनुवरती कलंक चंद्र, पिशुनजना गृहिं पाळिती नरेंद्र. १

महाराष्ट्रभामिनीविलास.

यांत सेवन, धारण, वरण आणि पालन हे भिन्नपदोक्त धर्म वस्तुतः एकरूप आहेत. येथेंही उपमानवाक्यें अनेक आहेत, यास्तव मालाप्रतिवस्तूपमाच अलंकार होय.

दृष्टांत.

प्रस्तुत विशेष वाक्यार्थाच्या बोधासाठीं अप्रस्तुत विशेष वाक्यार्थाचा दाखला देणें यास दृष्टांत म्हणतात.

वसंततिलक.

हें पाखरूं मजसि येइल काय कामा
ऐसें नृपा ! न वद पूरितलोककामा;
मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारीं,
छाया करी तपनदीप्तिस ही निवारी २

रघुनाथपंडित.

ही **नलाच्या** करपंजरांत बद्ध झालेल्या हंसाची **नलाप्रत** उक्ति आहे. '**दमयंती** मिळवून देण्याचें काम मी क्षुद्र पक्षी कसें करीन?' या प्रस्तुत विशेष वाक्यार्थाच्या बोधाकरितां ' पंखा मोलानें उणा असला तरी छाया करून उन्हाचा तापही निवारण करितो' या अप्रकृत विशेष वाक्याचा दाखला येथें दिला आहे. येथें पांखरूं आणि व्यजन, कार्यकरणसामर्थ्य आणि तपन-दीप्तिनिवारकत्वादि, यांच्यांत बिंबप्रतिबिंबभाव आहे. आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

होतात भृत्य कृतकृत्य महाजनाचे,
ते जाण सत्य गुण त्या महदाश्रयाचे;
कैसा स्वयें अरुण तो हरिता तयाला ?
भानू जरी न करितां पुढती तयाला १

शकुंतल-अं ७

वंशस्थ.

असोत लक्षावधि अन्य भूपती, राजन्वती याच नरेश्वरें क्षिती;
नक्षत्रताराग्रहसंकुला तरी, ज्योतिष्मती चंद्रवशेंचि शर्वरी १

रघुवंश-सर्ग ६

वसंततिलक.

कष्टें जना कुलधनें अनुरंजवावें,
जें मी दुरुक्त वदलों तुज तें नसावें;
जें नित्य सुंदर सुगंधि शिरीं धरावें,
तें पुष्प काय चतुरें चरणें चुरावें ! १

उत्तररामचरित्र-अंक १.

मंदाक्रान्ता.

वाग्देवीचे भजक असती भूतलीं या अनेक
जाणे तींचें हृदय सगळें बाण तो मात्र एक;
सिंधू गेले तरुनि कपि ते घेउनि रामनामा,
मंथाद्रीला परि समजली सिंधुगांभीर्यसीमा ! १

स्वकृत.

गीति.

उद्यमनिरत असावें त्वां सतत स्वीय कार्य साधाया,
न पडति निद्रितहरिमुखिं मृग हें ठावें असे तुला राया ! १

स्वकृत.

गीति.

भूप म्हणे न वरावा वत्से जरि सुगुणसागर लवायु,
शीतल मंद सुगंधहि वद सेवावा कसा गरलवायु ! १

मोरोपंत—वनपर्व.

वरील उदाहरणांत ' असोत लक्षावधि ' इ० आणि ' वाग्देवीचे भजक असती' इ० श्लोक साधर्म्यमूलक दृष्टान्ताचीं उदाहरणें होत. ' उद्यमनिरत' इत्यादि पद्यें वैधर्म्यमूलक दृष्टान्ताचीं उदाहरणें आहेत.

प्रस्तुत अलंकारांत **अर्थांतरन्यासांत**ल्याप्रमाणें सामान्यविशेषभाव नसतो. **प्रतिवस्तूपमेंत** सामान्य धर्माचें ऐक्य असतें. उपमानादिकांचा बिंबप्रतिबिंबभाव **दृष्टान्त** व **निदर्शना** या उभयांतही असतो; पण **निदर्शनें**तल्याप्रमाणें **दृष्टान्तांत** वाक्यांचें उपमेंत पर्यवसान होत नाहीं. शिवाय **दृष्टान्तामध्यें** वाक्यार्थ स्वतंत्र असतात; **निदर्शनें**तल्याप्रमाणें सापेक्ष नसतात. दृष्टान्तवाक्यांतील अर्थ दार्ष्टान्तवाक्यांतील अर्थाला अधिक विशद करतो.

निदर्शना.

दोन भिन्न वाक्यार्थांचें उपमेमध्यें पर्यवसान झालें असतां तेथें **निदर्शना** अलंकार होतो.

भुजंगप्रयात.

रवीचा महान् कीर्तिमान् वंश कोठें;
तशी ही मदीया जडा बुद्धि कोठें !

तराया महा दुस्तरा सागरातें
प्लवें इच्छितों केवढा मोह मातें १

रघुवंश–मराठी–भाषांतर–सर्ग १

कविकुलावतंस **कालिदास** यानें आपल्या **रघुवंश**काव्याच्या आरंभीं अत्यंत शालीनतेनें वरील उद्गार काढले आहेत. या पद्यांत 'रघुवंश-वर्णन' व 'प्लवाच्या [लहान होडीच्या] साहाय्यानें दुस्तरसागराचें तरण' हे दोन अगदीं भिन्न वाक्यार्थ आहेत. तथापि 'रघुवंशवर्णन करणें हें कार्य दुस्तर सागराला तरून जाण्यासारखें आहे', असें दोन्हीं वाक्यार्थांचें उपमेमध्यें पर्यवसान झालें.

साकी.

तनू हिची ही स्वभावसुंदर तपें कराया जोगी,
व्हावी बहु दृढ म्हणुनि योजितो श्रमांत जो मुनि योगी १
हरहर! नीलोत्पलपत्राच्या धारेनें समिधेतें
तोडायाला इच्छी मुनि तो आर्ष असें मज गमतें २

शा. अं. १

दुष्यंतराजानें शकुंतलेला आश्रमांतील श्रमाचीं कामें करितांना पाहिलें तेव्हां तिला तसलीं कामें सांगणारा तिचा पिता जो **कण्व** त्या संबंधानें ही राजाची उक्ति आहे. 'शकुंतलेसारख्या सुकुमार कन्येला आश्रमांतील कष्टांचीं कामें सांगणें' आणि 'कमलपत्राच्या धारेनें समिधा तोडणें' हे दोन अगदीं भिन्न वाक्यार्थ आहेत. तथापि त्यांच्या अर्थाचें पर्यवसान उपमेमध्यें झालें आहे.

एका वाक्यार्थाचें अनेक वाक्यार्थांशीं उपमेमध्यें पर्यवसान झालें म्हणजे **मालानिदर्शना** होते.

वसंततिलक.

इच्छा करी प्रलयपावकचुंबनाची,
वांछा धरी खचित चित्तिं हलाहलाची;
भेटावयासि करि यत्न भुजंगराया,
जो दुर्जनासि वश इच्छितसे कराया १

महाराष्ट्रभामिनीविलास.

येथें शेवटल्या चरणांतील वाक्यार्थ ' जो दुर्जनाला वश करूं पहातो, ' असा आहे. या वाक्यार्थाचा इतर चरणांतील वाक्यार्थांशीं उपमेच्या रूपानें संबंध कल्पिला आहे. आणखी:—

गीति.

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे १
तातादिक मानीं म्हणती सुमति खळाला अचक्षुला रत्न
शूद्रास श्रुति देतो राम न चाले तयापुढें यत्न २

मोरोपंत–कृष्णविजय.

या पद्यांत ' हलधर तीतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे. ' या वाक्यार्थाचा ' खला सुमति देतो, ' ' अचक्षुला रत्न देतो ' आणि ' शूद्रासि श्रुति देतो, ' या वाक्यार्थांशीं उपमेच्या रूपानें संबंध कल्पिला आहे.

त्वद्रत्नतस्कराला केला मीं बोध फार आरडलों,
अंधभसितबधिरीं तें दीप हवन गीत कीं वनीं रडलों १

मोरोपंत–रामायण.

ही **बिभीषणा**ची **रामचंद्रा**प्रत उक्ति आहे. ' त्वद्रत्नतस्कर (सीतारूप रत्न चोरून नेणाऱ्या) **रावणा**ला बोध करणें, ' या वाक्यार्थाचा ' अंधाला दीप दाखविणें, ' ' भस्मांत हवन करणें, ' ' बहिऱ्याला गान ऐकविणें ' आणि ' वनांत रडणें ' यां वाक्यार्थांशीं **उपमा**रूपानें अन्वय झाला आहे.

निदर्शनेचीं अन्य उदाहरणें:—

शार्दूलविक्रीडित.

सर्पातें बिसतंतुंनीं सुदृढ तो बांधावया इच्छितो,
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया धांवतो;
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षीराब्धिसी आणितो,
जो मूर्खास सुभाषितें वश करूं ऐसें मनीं बोलतो १

वामनपंडित.

'**चंदनक**:–**चारुदत्ता**ला आणि **बसंतसेने**ला जाणत नाहींस तर आकाशांतील चंद्रिकेसहित चंद्रालाही तूं जाणत नाहींस यांत संशय नाहीं. '

मृच्छकटिक–अंक ६

'**श्रेष्ठी कायस्थ**:—आपल्या आंगीं जे गुण आहेत त्यांस जर दोष म्हणावें तर मग चंद्राच्या प्रकाशालाही अंधकार म्हटलें पाहिजे.'

मृच्छकटिक—अंक ९

वसंततिलक.

अंत:पुरांत असणार अशा स्त्रियांचें
सौंदर्य हें जरि असे विपिनांगनांचें;
बागेतल्या मृदुलता अपुल्या गुणांनीं
केल्याचिं तुच्छ वनिंच्याहि पहा लतांनीं !

शाकुंतल.

सदर्थनिदर्शना.

आपल्या सद्व्यापारानें दुसऱ्यास तशा व्यापाराची सूचना किंवा बोध करणें तेथें **सदर्थ**निदर्शना होते. जसें:—

अनुष्टुभ्.

सविता उदया येतां पंकजा बहु शोभवी,
संपत्तीचें हेंचि फल आप्तपोषण सूचवी १

गीति.

चूडामणिस्थलीं जो धरितो उदयाद्रिचंडकिरणांला,
दावीतसे सतांचा आतिथ्याचार त्या गृहस्थाला १

अ. दर्श.

ह्या उदाहरणांत '**सूर्य** व **उदयाद्रि** हे आपल्या चांगल्या व्यापारानें इतरांस चांगल्या व्यापाराचा बोध करितात,' असें वर्णन आहे.

असदर्थनिदर्शना.

असद्व्यापारानें असद्व्यापाराचा बोध किंवा सूचना होत असेल तेथें **असदर्थनिदर्शना** होते.

अनुष्टुभ्.

चंद्रमा उदया येतां क्षीणता तम पावतें,
एणें सुचवि तें लोकां राजद्रोह नव्हे निको १

साहित्यशास्त्र.

येथें '.तम हें चंद्रोदयीं आपल्या क्षणित्वानें राजद्रोह या असद्व्यापाराचें फल असत् आहे असें सुचवितें, ' असा अर्थ वर्णिला आहे.

व्यतिरेक.

गुणसंबंधानें उपमेयाचें उपमानापेक्षां आधिक्य वर्णिलें असतें तेथें **व्यतिरेक** अलंकार होतो.

पृथ्वी.

कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती,
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती;
दुहोत भलते सदा परि न लेशही आटती,
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा वाटती १

केकावली.

येथें कथासुरभि उपमेय व स्वजननी उपमान आहे. शेवटल्या तीन चरणांत उपमेयाचें गुणाधिक्य वर्णिलें आहे.

वसंततिलक.

चद्रासि लागति कळा उपराग येतो,
गंगेसि भंग बहु पाणउतार होतो;
जें होय चूर्ण तरि मौक्तिक तें कशाला,
नाहीं समान नलराजमहायशाला १

रघुनाथपंडित.

प्रस्तुत स्थलीं **नलराजमहायश** हें उपमेय आहे. चंद्र, गंगा व मौक्तिक हीं पदें उपमानें होत. उपमानगत अपकर्ष दाखवून येथें उपमेयाचा उत्कर्ष वर्णिला आहे.

गीति.

दारिद्र्यमरण यांतुनि मरण बरें बा दरिद्रता खोटी,
मरणींत दुःख थोडें दारिद्र्यांत व्यथा असे मोठी १

मृच्छकटिक-अंक १

येथें दारिद्र्य उपमेय आहे; मरण उपमान आहे. व्यथाकरत्व या गुणाचें आधिक्य दारिद्र्याच्या ठायीं वर्णिलें आहे.

दिंडी.

कल्पतरुच्या पल्लवाहूनि धीरा !
दिसे त्वत्करिं हें अधिक दानशूरा;
एक भूषवि कर्णासि रम्य भारी,
दुजा स्वगुणें कर्णास तिरस्कारी १

वा. शा. केमकर.

यांत कर्णशब्दांतील श्लेषानें कर या उपमेयाचें कल्पतरुपल्लव या उपमानाहून गुणाधिक्य वर्णिलें आहे.

श्रीरामानें एक क्रतु करुनी एक रक्षिला विप्र,
नामा ! नेले नेशी अमित क्रतु सांग सिद्धिला क्षिप्र १

मोरोपंत—नामार्या.

येथें **श्रीराम** उपमान आहे. **तूं** या अध्याहृत पदानें सूचित होणारें **नाम** हें उपमेय आहे. यांत उपमानाचें अपकर्षकारण व उपमेयाचें उत्कर्षकारण हीं दोन्हीं उक्त आहेत.

आणखी उदाहरणें:—

गीति.

या पुष्करापरीसहि सीतेचें नेत्रयुग्म बहु रुचिर,
दैवें तिजशीं मजशीं योग न राहूं दिला सख्या सुचिर १

मोरोपंत—मंत्ररामायण.

गीति.

उत्तम गुण मिळवाया यत्न करावा नरें झटोनि सदा,
निर्धन गुणवंताचें निर्गुण धनवंत साम्य करि न कदा १
सर्वांत मित्र वनिता दोन्हीं प्रिय वाटती नराला हो,
वनिताशताधिक मला मित्राचा आज वाटतो लाहो २

मृच्छकटिक—अंक ४

उपमान व उपमेय यांचें साधर्म्य दाखवून शेवटीं वैधर्म्यही दाखविलें असत तेथेंही कोणी कोणी **व्यतिरेक**च मानतात. जसें:—

वसंततिलक.

तूं रक्तता धरिशि नूतनपल्लवांनीं,
मी वर्णनीय दयितागत सद्गुणांनीं;
येती तुझ्यावरि शिलीमुख जेंवि बा तें,
येती तसे मदनचापविमुक्त मातें १
आनंद तूज वनितापदघात दे हा,
तैसाचि तो सुखद होय मदीय देहा;
हें आपुलें सकलही.सम कीं अशोका!
धाता मलाच करि पात्र सदैव शोका २

कोणी **विरही** मनुष्य **अशोकाला** उद्देशून वरील उद्गार काढीत आहे. येथें रक्तता, शिलीमुख, वनितापदघात या श्लिष्टपदांनीं **विरही** व **अशोक** यांचें साम्य वर्णिलें आहे; व शेवटीं **अशोक** हा **शोकरहित** व **विरही** सशोक (शोकयुक्त) असें वैधर्म्य व्यक्त केलें आहे.

मालाव्यतिरेक.

एकच उपमेय असून अनेक उपमानांशीं व्यतिरेक वर्णिला असतो तेथें **मालाव्यतिरेक** अलंकार होतो.

वसंततिलक.

नोहे तुझी विषम दृष्टि जशी शिवाची,
ठावी तुला न हरिशी वृषहानि साची;
सूर्यापरी स्वकरताप रसातलाला
देशी न, हें तुजशि भूषण भूमिपाला १

स्वकृत.

येथें भूमिपाल हें एकच उपमेय असून शिव, हरि व सूर्य अशीं अनेक उपमानपदें आहेत. विषमदृष्टि (शिवपक्षीं त्रिनेत्रत्व, व भूपालपक्षीं असमदृष्टि), वृषहानि (हरिपक्षीं वृषनामक दैत्याचा वध, व भूपालपक्षीं धर्महानि), करताप (सूर्यपक्षीं किरणांची उष्णता, व भूपालपक्षीं कराचा जुलूम), अशा श्लिष्ट पदार्थांनीं **व्यतिरेकमाला** झाली आहे.

सहोक्ति.

दोन वस्तू एकाच काळीं एकच क्रिया करितात असें चमत्कार उत्पन्न करणारें वर्णन **सह** किंवा **तदर्थक शब्द** योजून केलें असतें तेथें **सहोक्ति** अलंकार जाणावा.

गीति.

सास्राश्रु शिर वृषाचें प्रथम क्षोणितलीं गळालें हो;
मग सकुसुम वृष्टि तनू सधर्मभय शत्रुबळ पळालें हो १

कर्णार्जुनयुद्ध.

'आप्तांचें अश्रु' आणि 'वृषाचें (कर्णाचें) शिर' हीं एकदाच गळालीं; 'कुसुमवृष्टी'बरोबर तनू पडली; आणि 'धर्माच्या भया'बरोबर 'शत्रु सैन्य' पळालें; असें चमत्कारिक वर्णन **पंतांनीं** प्रस्तुत आर्येत केलें आहे. येथें अश्रु आणि शिर, कुसुमवृष्टि आणि तनू, आणि धर्मभय आणि शत्रुबळ या दोन दोन वस्तु अनुक्रमें गळणें, पडणें आणि पळणें एतद्रूप क्रिया करितात असें सांगितलें आहे. **स** हा येथें सहार्थक शब्द उक्त आहे.

पृथ्वी.

तुझे कथिति गोपिका विविध तीस बोभाट ते,
सुखप्रद गुणस्तवापरिस जाहले वाटते;
क्षमा न करि एकदा तरिहि फार खोडी करां,
न देचि भय ताडनोद्यत समेत सोडी करां १

केकावली.

यांत '**यशोदेनें भगवंताचे** हात त्याला ताडन करण्याच्या प्रयत्नासह सोडून दिले,' असा चमत्कारिक सहभाव वर्णिला आहे. येथें **समेत** हा शब्द सहवाची आहे.

गीति.

भयशोकांसह हृदयीं रामासि धरोनि माय फार रडे,
बाष्पोदकें सचैल स्नपन तदा त्या रघूत्तमासि घडे १

मोरोपंत–मंत्ररामायण.

वनवासाला जातांना **रामचंद्र कौसल्येला** भेटला त्या वेळेस त्या माउलीची जी हृदयद्रावक स्थिति झाली तिचें वर्णन प्रस्तुत पद्यांत आहे. भय आणि शोक यांसह **रामचंद्राला कौसल्येनें** हृदयीं धरलें असा सुंदर सहभाव येथें वर्णिला आहे. येथें **सह** हें पदच प्रत्यक्ष उक्त आहे.

उपजाति.

त्या नंतरें तो मधुपर्क दिव्य, तसें दुकूलद्वय देइ भव्य;
स्वीकारिलें सर्वहि तें अजानें, कांताकटाक्षां समवेत त्यानें ! १

रघुवंश-सर्ग. ७.

अज हा **इंदुमतीपाणिग्रहणार्थ भोजराजाच्या** प्रासादांत प्राप्त झाला. त्यावेळीं मधुपर्क व रेशमी वस्त्रांची जोडी भोजानें जांवयाला दिली. 'हे पदार्थ कांताकटाक्षांसह अजानें ग्रहण केले,' असा मनोरंजक सहभाव या पद्यांत वर्णिला आहे. येथें **समवेत** हा शब्द सहार्थक आहे.

आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

बाल्यासवें गमन मन्थरतेस गेलें,
चित्तासवें अधरबिंब सुरक्त झालें;
तैसा नितंब मृगशावकलोचनेचा
कामासवें अखिलगौरव दावि साचा १

महाराष्ट्रभामिनीविलास.

मालिनी.

दिनरजनिसमेत श्वास ते दीर्घ झाले,
कनकवलयसंगें बाष्पबिंदू गळाले;
सह तनुलतिकेच्या जीवित क्षीण झालें,
तव चिरविरहानें प्राण कंठांत आले ! १

स्वकृत.

पहिल्यांत नवयौवनांकित वधूचें वर्णन आहे आणि दुसऱ्यांत एका विरहिणीचीं अवस्था व्यक्त केली आहे.

गीति.

गुण जोडूनि सलील प्रभुनें आकर्षितांच भंगे तें,
तद्रव जनकसभेसह कंपवि विभुमूर्धगाहि गंगेतें ! १

मोरोपंत.

खालच्या पद्यांत **सहोक्तीं**ची माला गुंफिली आहे:—

गीति.

वरि करि गुरुपुलकांसह, नृपतिमुखांसहित नमवि जनकाच्या
संशयबुद्धिस..त स्फालित करि करुनि निजकरें काच्या १
वैदेहीच्या चितासवेंचि ओढी धनुष्य करि भग्नं
भार्गवगुरुगर्वासह, कीर्ति तदीया दिगन्तसंलग्न २

स्वकृत.

येथें **रामचंद्रानें शिवधनुष्या**चा भंग केला त्या वेळचें सहभावानें चमत्कारिक वर्णन केलें आहे.

प्रस्तुत अलंकारांत प्रथमान्त पद प्रधान असतें. **सह** किंवा तदर्थक शब्द ज्याच्याशीं संयुक्त असतो तें पद अप्रधान होय. प्रथमान्त पदाचा क्रियेशीं अन्वय स्पष्ट असतो. सह किंवा सहार्थक अव्यय याशीं संयुक्त असलेल्या अप्रधान पदाचा क्रियेशीं अन्वय गर्भित असतो. एकसमयावच्छेदानें क्रियैक्य होणें हें या अलंकाराचें बीज आहे. यांत धर्म वस्तुत: भिन्न असतात. **समुच्चयालंकारां**त दोन्हीं पदें प्रधान असतात; व त्यांचा क्रियेशीं अन्वय स्पष्ट असतो.

गीत्यर्ध.

राजा मूर्च्छित पडतां गांधारीसह तिच्या सुना रडती.

मोरोपंत-कर्णपर्व.

येथें रडणें हा धर्म अभिन्न नाहीं व सहभावांत चारुताही नाहीं, यास्तव येथें **सहोक्ति अलंकार** होत नाहीं.

समासोक्ति.

श्लिष्ट विशेषणाच्या सामर्थ्यानें प्रस्तुताबरोबर अप्रस्तुतांचेंही संक्षेपानें कथन होतें तेंथ **समासोक्ति** हा अलंकार जाणावा.

गीति.

पीयूषमधुर पय तव सेवुनि मोदें पुनः पुन्हां, गंगे !
विगतश्रम उत्संगीं निद्रित होईन मी कधीं सांगें ! १

स्वकृत.

या गीतींत 'पुनः पुनः पयःसेवन,' 'उत्संगीं विगतश्रम होऊन निद्रित होणें,' या विशेषणपदसामर्थ्यानें तान्हें मूल आणि आई यांचा अप्रस्तुत वृत्तांत थोडक्यांत कथित झाला. समासानें (संक्षेपानें) अप्रस्तुत पदार्थाची उक्ति म्हणजे कथन, या व्युत्पत्तीवरून या अलंकाराला हें नांव पडलें आहे.

'ऐन्द्रीमुखा कसा हा रक्त नभी चंद्र चुंबितो पाहीं;

या गीत्यर्धांत रक्त व चुंबनव्यापार इत्यादि विशेषणसामर्थ्यानें अनुरक्त नायिकानायक यांचा अप्रस्तुत वृत्तांतही प्रस्तुत अशा चंद्रोदयवृत्तांताबरोबर सूचित झाला. विशेष्य म्हणजे प्रस्तुत हें जर श्लिष्ट असलें तर श्लेष हा अलंकार होतो. म्हणून 'श्लिष्ट विशेषणाच्या' असें वर लक्षणांत शब्द घातले आहेत. अप्रस्तुत वस्तु **समासोक्तींत** सूचित होते. परंतु वस्तुतः तेथें अप्रस्तुतव्यवहाराचा आरोपच प्रस्तुतव्यवहारावर होत असतो. **रूपकामध्यें** प्रस्तुताच्या रूपावर अप्रस्तुताचा केवळ रूपानेंच आरोप असतो. **अप्रस्तुतप्रशंसा** हा अलंकार प्रस्तुत अलंकाराच्या उलट आहे, म्हणजे त्यांत अप्रस्तुतव्यवहारकथनावरून प्रस्तुतव्यवहाराचें ग्रहण होतें.

सामान्य.

प्रस्तुत व अप्रस्तुत यांत सादृश्य असल्यामुळें दोहोंतील भेद लक्ष्यांत येत नाहीं असें वर्णन असलें म्हणजे तेथें **सामान्य** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

कमलाकरांत शिरतां सुदतीचें मुख दिसे न नयनाला.

अथवा,

गीति.

रत्नस्तंभीं पडुनी प्रतिबिंबशतेंहि वेष्टिती ज्याला,
तो लंकेश सभागत वालिसुता ये न ओळखायाला १

अ. वि.

पहिल्या उदाहरणांत कमल व मुख व दुसऱ्यांत बिंब व प्रतिबिंब यांतील भेद सादृश्यामुळें लक्ष्यांत येत नाहीं असें वर्णन आहे.

मीलित.

स्वभावसिद्ध किंवा आगंतुक अशा कांहीं तरी उभयसाधारण धर्मानें एकादी वस्तु दुसरीवर आपलें वर्चस्व स्थापित करते असें वर्णिलें असतां **मीलित** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

राहजारुण तवचरणीं लाखेचा रस न लक्षिला साचा;

येथें, अरुणत्व हा स्वभावसिद्ध धर्म चरण व लाक्षा यांना साधारण आहे. या धर्माच्या सामर्थ्यानें चरणानें लक्षारसावर आपलें वर्चस्व स्थापन केलें आहे, असें वर्णन आहे.

स्रग्विणी.

मल्लिकामालिका बालिका घालिती,
सर्व अंगीं द्रवचंदना लेपिती;
नेसती ज्या सितक्षौम त्या चांदणी-
माजि कीं ओळखूं येति ना भामिनी ! १

अ. वि.

यांत 'चांदणें' व 'पांढरा शालू नेसलेल्या तरुणी' यांचा 'श्वेतत्व' हा धर्म समान आहे. या गुणाच्या बलानें चंद्रिकेनें श्वेतांबरतरुणींवर आपला पगडा बसविला असें वर्णिलें आहे. चंद्रिकेचें श्वेतत्व साहजिक आहे, भामिनीचें आगंतुक आहे.

गीति.

उडुसा उडुपें धर्मौदार्या लाजूनि अभ्र मुरडे हो !
सावित्रीच्या सुयशीं न दिसे पति म्हणुनि अभ्रमु रडे हो !

मोरोपंत.

कविसंकेताप्रमाणें यशाचा रंग शुभ्र आहे. ऐरावताचाहि रंग शुभ्र असल्याची पुराणांत प्रसिद्धि आहे. प्रस्तुत आर्येंत शुभ्रत्व हा धर्म यश व

पति (ऐरावत) या उभयास सारखाच आहे. या धर्माच्या जोरावर यशानें **ऐरावतावर** वर्चस्व संपादन केलें असें वर्णिलें आहे. **सावित्रीचें** यश पांढरें व ऐरावतही पांढरा. पण **सावित्रीच्या** लोकोत्तर यशोधवलतेमध्यें **ऐरावताचा** पत्ता लागेना म्हणून त्याची स्त्री रडूं लागली! असा उत्तरार्धाचा भाव आहे.

या अलंकारांत एक वस्तु दुसरीवर आपल्या गुणाचा पगडा बसविते— तिचें तेज पडूं देत नाहीं—यामुळें ती दुसरी वस्तु लक्षांत येत नाहीं असें वर्णन असतें. **व्याजस्तुति** किंवा **अपन्हुति** या अलंकारांत वस्तूचा निषेध जाणून बुजून केलेला असतो.

अप्रस्तुतप्रशंसा.

प्रस्तुत गोष्ट समजावून देण्याकरितां जेथें अप्रस्तुत गोष्ट सांगितली असते तेथं **अप्रस्तुतप्रशंसा** अलंकार होतो.

अप्रस्तुतप्रशंसा या पदाचा अर्थ ' अप्रस्तुताचें कथन ' एवढाच आहे. **अन्योक्ति** हा याच अलंकाराचा पर्यायशब्द आहे. यांत अन्यशब्दाचा अर्थ अप्रस्तुत व उक्ति याचा अर्थ कथन असा आहे; तेव्हां एकंदर अन्योक्ति शब्दाचा अर्थ अन्यसंबंधानें वचन असा होतो. **समासोक्तीमध्यें** प्रस्तुतावरून अप्रस्तुताचें भान होतें.

पृथ्वी.

फळें मधुर खावया असति नित्य मेवे तसे,
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरींही वसे;
अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे,
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे १

पद्यरत्नावली.

यांत अप्रस्तुत शुकवृत्तांत वर्णिला आहे. त्यावरून शुकसदृश कोणा तरी प्रस्तुत पुरुषाचा वृत्तांत कथित झाला.

शार्दूलविक्रीडित.

जन्म स्वच्छजलान्तरीं, मधुरता रामामुखा लाजवी,
वास श्रीहरिच्या करीं सुरगणां सौगन्ध्य आल्हादवी;

कामाचें कविवाणिचेंहि असशी सर्वस्व अंभोरुहा!
ऐसा तूं अतिलुब्ध होशि मधुपीं, मोठा चमत्कार हा ! १

महाराष्ट्र—भा. वि.

येथें अंभोरुहाच्या (कमळाच्या) अप्रस्तुत वृत्तांतानें त्याच्या सारख्या बहुगुणसंपन्न परंतु एका मोठ्या दोषानें ग्रस्त अशा पुरुषाचा वृत्तांत प्रस्तुत्वानें उपस्थित झाला. या व वरील उदाहरणांतही सादृश्यमूलक (सादृश्यनिबंधना) अन्योक्ति आहे. प्रस्तुत उदाहरणांत 'मधुप' या श्लिष्ट पदाची योजना केली आहे एवढेंच विशेष आहे. संस्कृत सुभाषितग्रंथांत सादृश्यनिबंधना या **अन्योक्ती**चा मोठा भरणा आहे.

कोठें **प्रस्तुत** वस्तु **कार्यरूपानें** असतेः—

शार्दूलविक्रीडित.

जाती दूर, न काय ते पुनरपि प्राणप्रिये भेटती !
चिंता मद्विषयीं नको, तनु तुझी झाली कृशा ही किती !
बोलें हें तंव अश्रु लोटति ! तयां वारोनि हांसोनिया
लज्जामंथरदृष्टि भाविमरणीं उत्साह दावी प्रिया !

स्वकृत.

ही एका नायकाची आपल्या प्रियमित्राजवळ नायिकेसंबंधानें उक्ति आहे. प्रवासविषयीं नायिकेची अनुमति विचारतांच तिची जी स्थिति झाली तिचें वर्णन यांत नायक करीत आहे.

येथें ' प्रवास रहित कां केला ? ' हा मित्राचा प्रश्न प्रस्तुत वस्तु आहे; आणि ती कार्यरूप आहे. पण ' प्रियेचा मरणाविषयींचा निश्चय ' हें जें कारण त्याचाच येथें अप्रस्तुतत्वानें उपन्यास केला आहे.

कोठें **प्रस्तुतवस्तु कारणरूप** असतेः—

गीति.

' पढविति न कन्यका मज, राजा ! महिषी मुळीं न शब्द वदे,
कुब्जे ! दाणापाणी खायाला लवकरींच आणुनि दे; ' १
सोडविला पथिकांनीं बंधांतुनि कीर तो अशी वाणी
बोले, रिपुशून्यगृहीं भित्तिस्थां बघुनि चित्रकां नयनीं २

स्वकृत.

'तुझ्या प्रस्थानाची तयारी झाली हें ऐकून तुझे वैरी पळाले' हें कारण येथें प्रस्तुत आहे. हें शुकभाषणरूप जें अप्रस्तुत कार्य त्याच्या रूपानें कथित आहे.

कोठें **प्रस्तुतवस्तु विशेषरूपानें** असतेः—

साकी.

सूड उगवुनी सुत्हद्वधूचें नयननीर जो हारी,
तोच पुरुष बहु थोर, तयाचें धन्यं जिणें संसारीं! १

स्वकृत.

विष्णूनें **नरकासुराला** मारलें असतां त्याच्या एका मंत्र्याची ही **नरकासुराच्या** एका मित्राप्रत उक्ति आहे.

'कृष्णाला मारून आपल्या मित्रांच्या बायकांचें दुःख दूर करशील तर तूं थोर खरा,' हा विशेष अर्थ येथें प्रस्तुत आहे. पण त्याचें अप्रस्तुत सामान्य अर्थानें येथें कथन केलें आहे.

कोठें **प्रस्तुतवस्तु सामान्य** असतेः—

साकी.

कोणा एका मूढें वानरकंठिं घातला हार,
चाटुनि हुंगुनि करि तो त्याचें आसन उन्नत फार १

स्वकृत-म. भा. वि.

यांत वानराचा वृत्तांत हा अप्रस्तुत विशेष अर्थ कथन केला आहे. 'अनभिज्ञाला रमणीय वस्तु दिली असतां तिचा नाश होतो,' हा सामान्य अर्थ येथें प्रस्तुत आहे.

सम.

दोन वस्तूंचा अनुरूप संयोग झाला असें वर्णन असलें म्हणजे **सम** अलंकार होतो.

रथोद्धता.

चंद्रिका जशि भजे निशाकरा, जान्हवीहि जशि चंद्रशेखरा;
कीर्ति पाहि तुज तेवि सेविते, योग्य जाणुनि नृसिंह भूपते! १

बा. शा. केमकर.

येथें 'कीर्ति' आणि 'नृसिंहभूपति,' 'चंद्रिका' आणि 'निशाकर,' आणि 'जान्हवी' आणि 'चंद्रशेखर,' यांचा अनुरूप संयोगें वर्णिला आहे. या पद्यांत चांगल्या चांगल्यांचा योग्य संयोग कल्पिला आहे. पुढील पद्यांत वाइटा वाइटांचा अनुरूप संयोग वर्णिला आहेः—

मंदाक्रांता.

आहा, कैसें नवल घडलें फार आश्चर्य आहे !
केलीं दैवें उचित रचना धातयानें कशी हे;
निंबोळ्यांचा भरींहि भरला पक्व हा निंबवृक्षीं,
हा काकांचा रसिक गणही-आदरें त्यास भक्षी १

अ वि.

आणखी उदाहरणेंः—

शार्दूलविक्रीडित.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी;
गंधें युक्त फळें फुलेंहि असतीं ज्याचीं सुधेच्या परी;
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचें मुखींचें भला,
आम्रा त्या पिक सेवितां समसमा संयोग कीं जाहला ! १

अन्योक्तिकलाप.

गीति.

श्रीकृष्ण रुक्मिणीला श्रीकृष्णा रुक्मिणी जशी, आतां,
दमयंतीस नल, नला दमयंती, आइके जनें गातां १
योग्या तीच तयाला, तोचि तिला योग्य, जेविं कामरती,
अनुरूप योग सन्मत; साधूत्कर्षे असाधु कां मरती २

विरोध.

वस्तुतः विरोध नसून विरोधानें वर्णन केलें असतें तेथें **विरोध** अलंकार जाणावा. यालाच **विरोधाभास** असें म्हणतात.

शार्दूलविक्रीडित.

त्याला वन्हि जळापरी, जलधि हा कीं ओहळाचे परी,
मेरु स्वल्प शिळेपरी, मृगपती तो ही कुरंगापरी;

कीं तो सर्प फुलापरी, विषजळें पीयूषवृष्टीपरी,
होतें सर्वहि यापरी वसतसे सच्छील ज्याचे घरीं १

वामनपंडित.

'अग्नि जलाप्रमाणें वाटतो,' इत्यादि विरोधात्मक वर्णनानें येथं विरोधं भासमान होतो. त्या विरोधाचा सच्छीलानें परिहार होतो. प्रस्तुत श्लोकांत वन्हित्व आणि जलत्व या **जातिवाचकांत विरोध कल्पिला** आहे.

साकी.

गिरिवरही तुज पुढति नृपाळा नीच भासती मातें,
मंद पवनही सागर सगळे उथळ दिसाति नयनातें १

स्वकृत.

येथें गिरित्व वगैरे **जातिवाचकांचा** नीचत्व वगैरे **गुणवाचकांशीं** विरोध वर्णिला आहे. वर्णनातिशयाची विवक्षा ही विरोधपरिहारक होय. क्वचित् **विरोध श्लेषमूलक** असतो.

गीति.

वाचाळा पांडित्य प्रकटुनि साहाय्य करिशि कां असतां,
नसतासि विकर्ण तरी कर्ण तुझा उपटुनी दिला असता ! १

स्वकृत.

सभेमध्यें **द्रौपदीची** विटंबना झाली ती सहन न होऊन **विकर्ण**-नामक योद्धा **द्रौपदीच्या** बाजूनें बोलूं लागला, त्यावेळेस ही **कर्णाची** त्याजप्रत उक्ति आहे. येथें **विकर्णशब्दावर** श्लेष आहे. ज्याला कर्ण नाहीं त्याचा कर्ण कसा उपटावयाचा, हा विरोध भासमान होतो. **विकर्ण** ही संज्ञा मानली म्हणजे विरोधपरिहार होतो.

आणखी उदाहरणें:—

पृथ्वी.

सुपात्र न रमाहि यद्रतिसुखास दारा परी
असा प्रभुहि सेवकां भजसि खासदारापरी

केकावली.

पृथ्वी.

नता करुनि मुक्तही ह्मणसि मी बुडालों ऋणें,
अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें १

केकावली.

वसंततिलक.

जी दूषणान्वितहि शून्यचि दूषणांनीं,
तेवीं खरांकितहि कोमलवर्णखाणि;
ऐशी अपूर्व कृति ज्या कविराजयाची,
त्या वाल्मीकीप्रति असो नति आजि याची १

पद्यमंजरी.

वसंततिलक.

जो अग्रगण्य असतांहि अकिंचनांत,
मोठी ' समर्थ ' पदवी मिरवी जगांत;
' स्वामी ' जयास ह्मणती असुनीहि ' दास, '
तो साधुवर्य नमिला गुरु रामदास ! १

पद्यमंजरी.

शार्दूलविक्रीडित.

ज्याचा शत्रुकुळीं अकुंठ परशू त्याचाहि जेता जरी,
पंडूच्या कुमरीं शरीं निजविला बाधा न झाली तरी;
प्रौढांनीं बहुतीं अशस्त्र समरीं जो श्रांतही जाहला,
एकाकी अभिमन्यु बाल वधितां राजा सुखा पावला १

अ. वि.

शिखरिणी.

कळेना हें मातें सकल सुख कीं दुःखचि असे,
असे निद्रा किंवा मद विष चढे मोहचि असे;
तुझ्या स्पर्शीं स्पर्शीं विकल करितो इंद्रियगणां,
विकार प्राणांतें भ्रमहि अणि देई स्थिरपणा ! १

उत्तररामचरित.

अभंग.

जरी शिव शूलधारी निरामय आहे तरी १

साहित्यशास्त्र.

असंगति.

कार्य आणि कारण हीं अगदीं भिन्नस्थलीं घडून आलीं असें वर्णिलें असतां **असंगति** अलंकार होतो.

गीति

यां पिशुनभुजंगाची वररीति विचित्र भासते कांहीं
कीं एकाच्या कर्णी दंश करी तों मरे दुजा पाहीं ! १

येथें दंशरूप कारण एका मनुष्याच्या कर्णाच्या ठिकाणीं घडलें, आणि मरणरूप कार्य दुसऱ्याच कोणा मनुष्याच्या ठिकाणीं घडून आलें, असें वर्णिलें आहे; यास्तव **असंगति** हा अलंकार झाला.

गीति

पांडव जेवुनि आधीं, मग राक्षस जीवितासि आंचवला,
सन्मणि न कोटि लक्षा ये, येतो काय राक्षसा चवला १

आदिपर्व.

येथें जेवणरूप कारण पांडव -(भीम -) निष्ठ आहे; आणि आंचवणें हें कार्य राक्षस-(बक-)निष्ठ आहे असें वर्णन आहे. वस्तुतः जो जेवतो तो आंचवतो असें वर्णन सुसंगत होय.

' जिभेत चहाडी आणि पायांत बिडी, ' हें **अलंकारदर्पणांत असंगतीचें** उदाहरण दिलें आहे. कार्यकारणें हीं अगदीं भिन्न स्थळीं घडलीं असतां तेथें **असंगति** होते. जीभ व पाय हे एकाच शरीराचे अवयव असल्यामुळें बिडी आणि चहाडी या कार्यकारणांना. अगदीं भिन्न स्थल मिळालें नाहीं. यास्तव येथें **असंगति** अलंकार मानतां येत नाहीं.

' राम्यास गळूं आणि लम्यास अवघणा, ' ' घटका पाणी पिते आणि घड्याळ टोले खातें, ' हीं **साहित्यशास्त्रोक्त असंगतीचीं** उदाहरणें समर्पक आहेत. कारण, येथें कार्यकारणांचें आधार अत्यंत भिन्न आहेत.

अतिशयोक्तीमध्यें कार्यकारण यांचा क्रम उलट दाखविला असतो. प्रस्तुत अलंकारांत कार्यकारणांचा अत्यंत स्थानभेद मात्र वर्णिला असतो. **असंगती**मध्यें विरोध दिसतो तो स्वभावतः एकत्र असणाऱ्या कार्यकारणांच्या स्थानभेदामुळें दिसतो. **विरोधालंकारांत** विरोध असतो तो स्वभावतः निरनिराळ्या ठिकाणीं राहणारे विरुद्ध धर्म एके ठिकाणीं राहतात असें वर्णिल्यामुळें उत्पन्न होतो. तेव्हां **असंगति विरोधा**चा अपवाद आहे असें झालें.

विभावना.

कारणाचा निषेध असूनही कार्योत्पत्ति वर्णिली असते तेथें **विभावना** अलंकार होतो.

प्रस्तुत अलंकारांत प्रसिद्ध कारणाचा निषेध गृहीत असतो. ह्या वरून स्वभावसिद्ध विशेषानें किंवा अन्य कांहीं तरी गूढ कारणानें कार्योत्पत्ति झाली असली पाहिजे असें अनुमान होतें. या अलंकारांत **अतिशयोक्ति** अप्रधानत्वानें सूचित होते. कारणाशिवाय कार्य होणें यांत **विरोध** भासमान होतो; आणि अप्रसिद्ध कांहीं कारण मानून त्याचा परिहारही संभवतो. तथापि एवढ्यावरून हा **विरोधालंकार** असें समजूं नये. कारण विरोधांत दोन समबल वस्तूंचा परस्पर विरोध स्पष्ट दिसून येतो. प्रस्तुत अलंकारांत केवळ कारणाभाव असूनही कार्यज्ञान होतें एवढेंच विरोधात्मक विधान असतें. कार्यज्ञानानें कारणाच्या अभावाचें ज्ञान होतें असें उलट विरोधात्मक विधान नसतें.

शिखरिणी.

पिशांच्या सांगातीं पितृवनिं हरा! तूं विहरशी,
कपालांच्या माला तनुवरि चिताभस्म धरिशी;
अशाही तूतें जो मनुज वरदा बा! भजतसे,
तयाचें मांगल्य त्रिभुवनिं तुलातीत विलसे १

स्वकृत.

येथें **वरद हरा**च्या ठिकाणीं मांगल्यरूप कारणाचा निषेध असून त्याच्या भंजकाला त्या पासून अपरिमित मंगलाचा लाभ होतो असें कार्यकथन केलें आहे. यांत **वरदहरा**चा अलौकिक प्रकृतिविशेष सूचित होऊन विरोधपरिहार होतो.

गीति.

ते राजसुता सीता सेवितसे प्रेमयुक्त कमलाक्षा,
जीचे वनसंचारें दिसती पद रक्त जरि नसे लाक्षा १

मोरोपंत-मंत्ररामायण.

येथें लाक्षारस लावला नसतांही **सीते**चे चरण रक्त दिसत, असें वर्णन आहे. यांत लालीचें कारण निषिद्ध आहे. तथापि **सीते**चे चरण स्वभावतांच रक्त आहेत असा अर्थ सूचित होऊन विरोधपरिहार झाला. **कुवलयानंदकारांनीं** या अलंकाराचे आणखी दुसरे प्रकार सांगितले आहेत त्यांपैकीं कांहीं खालीं देतों.

कारण पुरें नसतां कार्योत्पत्ति झाली असें वर्णिलें असतां **विभावना** होते.

शिखरिणी.

करी मालाकार प्रकट समदृष्टी तरुकुलीं,
न दावी तो येथें विपुल करुणा बालबकुलीं;
परी हा एकाकी निजकुसुमगंधास बिखरी,
दिशा दाही पाहीं अलिकुलरवें संकुल करी ! १

म. भा. वि.

मालाकाराची पूर्ण करुणा ही कुसुमोद्गमाला कारण असते. ती अपूर्ण असतांही येथें बकुलपुष्पोत्पत्ति वर्णिली आहे. येथें बकुलाचा स्वयंसिद्ध उत्कर्ष द्योतित होऊन **विरोधपरिहार** होतो. अथवा:—

शिखरिणी.

फुलांचें कोदंड, भ्रमरमय मौर्वी, शर तसे,
सरोजादी पंच स्फुट, सुरभि साह्यप्रद असे;

सुखस्पर्शी भारी रथ मलयजोद्भूत पवन,
अशा सामग्रीनें रतिरमण जिंकी त्रिभुवन १

स्वकृत

त्रिभुवन जिंकण्याला फार कठोर सामग्री पाहिजे. तितकी कठोर सामग्री कारणरूपानें सिद्ध नसतांही ' त्रिभुवनविजय ' हें कार्य मदनानें साधिलें असें या पद्यांत वर्णन आहे. **मदनाचें** अलौकिक बल सूचित होऊन येथील **विरोधा**चा परिहार होतो.

प्रतिबंधक सामग्री तयार असतांही कार्योत्पत्ति वर्णिली असते तेथेंही विभावना जाणावी.

गीति.

राया, गमे तुझा हा आश्चर्यकर प्रतापमय रवि, तो
छत्ररहित रिपु सोडुनि छत्रधरांतेंचि फार तापवितो १

येथें 'छत्रधरत्व' ही तापप्रतिबंधक सामग्री तयार असतांही तापक्रियारूप कार्याची उत्पत्ति वर्णिली आहे.

जें कारण नव्हे त्यापासून कार्योत्पत्ति वर्णिली असतां **विभावना** होते.

गीत्यर्ध.

नीलकमलयुगलांतुनि निघति शिलीमुख असेंचि हें नवल.

नीलकमलांतून बाण निघणें संभवत नाहीं. तथापि तसें वर्णन इथें आहे. येथें सादृश्यामुळें नीलकमलद्वयानें नेत्रद्वय प्रतीत होतें; त्यानें **विरोधपरिहार** होतो.

कोठें विरुद्ध कारणांपासून कार्यसिद्धि कल्पिली असल्यामुळें **विभावना** होते.

साकी.

मदना त्वच्छरकोमलकुसुमें कठिण वज्रसम होतीं,
शीतल असतां चंद्राचे कर संतापातें देती १

शाकुंतल—अंक ३.

कोमलकुसुमें आणि चंद्रकर हीं वस्तुतः तापनिवारक आहेत असें विरुद्ध कारण असतां तापोत्पत्ति वर्णिली आहे. मदनबाधा ही वस्तुतः वरील तापाचें कारण आहे. तिनें **विरोधपरिहार** होतो.

कोठें कार्यापासून कारणोत्पत्ति वर्णिली असते; तेथेंही **विभावनाच** होते.

'त्वत्करसुरतरुपासुनि सुयशोमय सिंधु निपजला राया;'

पारिजाताची उत्पत्ति वस्तुतः सिंधूपासून आहे. चतुर्दश रत्नांपैकीं **पारिजात** हा एक रत्न आहे. असें असतां सिंधूची उत्पत्ति पारिजातापासून झाली असें या गीत्यर्धांत वर्णिलें आहे!

अन्य उदाहरणें:—

गीति.

आला प्रकाश नेत्रीं, अंधत्वाचा वरें नुरे गंध,
परि भूप पुत्रमोहें केला पहिल्यापरीसही अंध! १

मोरोपंत–वनपर्व.

ओंवी.

गेलें अंधपण, नूमजला तो हें, झाला पुत्रमोहें, पुन्हां अंध १

सावित्रीगीत.

विशेषोक्ति.

कारणसामग्री पूर्ण असतांही कार्योत्पत्ति होत नाहीं असें वर्णिलें असतां तेथें **विशेषोक्ति** अलंकार होतो.

पृथ्वी.

कथासुरभि या भल्या स्वजननीहूनी बाटती,
शिशूंसि जरठांसही निरखितां रसें दाटती;
दुहोत भलते सदा तरि न लेशही आटती,
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती १

केकावली.

येथें 'मलभक्षण' हें बाटण्याचें कारण प्रसिद्ध आहे. तथापि 'बाटणें' हें कार्य त्यापासून सिद्ध होत नाहीं असें प्रस्तुत श्लोकांत वर्णन आहे. येथें खरें कारण 'कथासुरभीचें असामान्य पावित्र्य' हें होय. हें अनुक्त आहे.

शिखरिणी.

तुझ्यापाशीं ऐशी विपुल जललक्ष्मी असुनिया,
तडागा! येईना अणुहि तृषितांची तुज दया;

निदाघीं चण्डांशु प्रखरकिरणीं आग पसरी,
तदां कां तत्तृष्णा करिशिल कृशाङ्गा ! वद दुरी १

म. भा. वि.

विपुल जललक्ष्मीरूप प्रसिद्ध कारण सिद्ध असून तृषिततृप्तिरूप कार्य होत नाहीं असें या पद्यांत वर्णन आहे. येथें खरें कारण अतर्क्य आहे.

प्रहर्षिणी.

मानोनी मनिं गजराज तुंगगंड,
फोडी जो खरनखरीं शिला प्रचंड;
त्या सिंहावरि विपरीत काळ आला,
मांसाचा कवलहि त्या अलभ्य झाला ! १

म. भा. वि.

यांत 'सिंहाचें वीर्यशालित्व' हें प्रसिद्ध कारण असून 'मांसकवलप्राप्ति' हें कार्य घडत नाहीं असें वर्णन आहे. येथें 'विपरीत काल' हें खरें कारण दर्शविलें आहे; त्यामुळें विरोधपरिहार होतो.

गीति.

सहदेवासि ह्मणे त्वां कां रे जीव न दिला परवश स्त्री,
कशि देखिली ? सहाता दासीचाहिन विलापरव शस्त्री १

'स्त्री परवश झालेली पाहणें' एवढें पतीला जीव देण्याला अगदीं पुरेसें प्रसिद्ध कारण आहे. असें असून जीव देण्याचें कार्य घडलें नाहीं असें येथें सांगितलें आहे. '**सहदेवाचें** सत्यप्रतिज्ञत्व' हें येथें खरें कारण आहे. व तें अनुक्त आहे.

विषम.

दोन अननुरूप वस्तूंचा संबंध वर्णिला असतो तेथें **विषमालंकार** होतो.

शार्दूलविक्रीडित.

हां हां सोडु नको नको शर मृदू अंगीं मृगाच्या नृपा,
कार्पासावरि दीत अग्निसम हा चित्तीं धरी तूं कृपा;

कोठें तीक्ष्ण तुझे कठोरहि बहू हे बाण वज्रापरी,
कोठें चंचलजीविता मृगतती ही जातिनें घाबरी ?

राजवाडे–शाकुंतल–अंक १

ही तपस्व्यांची **दुष्यंता**प्रत उक्ति आहे. येथें तीक्ष्णत्वामुळें व मृदुत्वामुळें परस्परांशीं अत्यंत अननुरूप अशा बाणांचा व मृगतनूचा संबंध वर्णिला आहे.

भुजंगप्रयात.

रवीचा महान् कीर्तिमान् वंश कोठें,
तशी ही मदीया जडा बुद्धि कोठें !

रघुवंश–सर्ग. १

येथें **'महान् व कीर्तिमान् वंश'** आणि **'जडबुद्धि'** यांचा अननुरूप संबंध वर्णिला आहे.

मन्दाक्रांता.

कांतावक्त्रच्छविजरि मनीं वांच्छिसी बा मृगांका,
अब्धीमाजी पुनरपि बुडी मारुनी धू कलंका ;
स्वच्छीं बिंबीं सुरतरुसुमीं जोडिं सौगंध्य मोठें,
सांगें नाहीं तरि मुख तिचें तें कुठें तूंहि कोठें !

बा. शा. केमकर.

यांत चंद्र व मुखश्री यांचा अननुरूप संबंध वर्णिला आहे.

आणखी उदाहरणें:—

द्रुतविलंबित.

मंदनशत्रु शरासन हें महा, मदनमूर्तिच केवळ राम हा;
करिल सज्ज कसा धनु आपण, अहह दारुण तात तुझा पण ?

वामन.

गीति.

कोठें दरिद्र हा मी कोठें लक्ष्मीनिवास तो स्वामी,
आलिंगिलें भुजांहीं प्रेमें वक्षस्थलीं रमाधामीं ?

मोरोपंत–कृष्णविजय.

इष्टार्थ साधायाला जावें तों तो न साधतां उलट अनिष्ट मात्र उत्पन्न होते तेथेंही **विषम** जाणावा.

गीत्यर्ध.

' भक्ष्यार्थ सर्प पेटकिं शिरतां मूषक तयासि अहि खाय! '

अ. वि.

' भक्ष्याच्या आशेनें उंदीर पेटींत शिरला तों भक्ष्य तर दूरच राहिलें; उलट सापानें मात्र त्याला गिळून टाकलें; ' असा येथें अर्थ आहे. यांत अर्थहानि आणि अनिष्टापत्ति दोन्हीं व्यक्त आहेत.

कार्यकारणांत गुणवैषम्य असलें तरी **विषमालंकार** होतो.

गीत्यर्ध.

'श्यामा ही खड्गलता प्रसवे अतिधवल कीर्ति जगतींत. '

येथें कारण खड्गलता आहे. तिचा श्याम गुण उक्त आहे. कार्य कीर्ति आहे. तिचा गुण कारणाच्या गुणाच्या उलट ह्मणजे धवल असा वर्णिला आहे. तेव्हां येथें कार्यकारणगुणवैषम्य स्पष्ट झालें.

कार्यकारणांत क्रियावैषम्य असलें तर तेथेंही **विषम** समजावा.

गीति.

हे मित्रा देशी तूं आनंद मनासि दर्शनें मातें,
परि विरह तुझाचि गड्या! संतापवि तनु तुला कळेना तें ? १

स्वकृत.

येथें 'मित्रानें आनंद देणें' ही क्रिया हें कारण आहे; आणि 'विरहानें शरीर संतप्त करणें' ही क्रिया कार्य आहे. तेव्हां कार्यकारणांत येथें क्रियावैषम्य प्राप्त झालें.

कुवलयानंदांत आणखीही कांहीं **विषमाचे** प्रकार सांगितले आहेत. त्यांतून कांहीं खालीं देतो:—

दुसऱ्याचें अनिष्ट करायला पाहावें तों आपलेंच अनिष्ट घडून येतें येतें असें वर्णिलें असतांही **विषम** होतो.

दिंडी.

इच्छि जाळाया पुच्छ मारुतीचें, ह्मणुनि पेटवि दशकंठ त्यासि साचें;
परी तत्क्षणीं विपरीत होय त्याचें, तोचि अनुभवि कीं दहन निजपुराचें १

लक्षणसमन्वय उघड आहे.

अनिष्टाची प्राप्ति झाली असतांही इष्टप्राप्ति समजून समाधान मानणें हाही **विषमाचाच** प्रकार आहे:—

गीति.

पडला शल्यशस्त्रें समरांत स्यमंतपंचकीं काय,
कां करितां शोक उगे? पडलों रोगार्त मंचकीं काय? १

मोरोपंत–गदापर्व.

समरभूमीवर पडणें ही अनिष्ट गोष्ट असून ती इष्ट समजून येथें समाधान मानल्याचें वर्णन आहे.

दुसऱ्याचें अनिष्ट करण्याच्या मनोरथाची अप्राप्ति वर्णिली तरी **विषम** होतो:—

वसंततिलक.

अद्यापि पुत्रमुखपंकज जो न पाहे,
त्वच्छाप त्या मज अनुग्रह सत्य आहे;
कीं क्षेत्रभूमि जरि पेटुनि अग्नि जाळी,
बीजांकुरोद्भवकरी करि तेचि काळीं १

रघुवंश–सर्ग ९.

'पुत्रशोकानें तू मजसारखाच मरशील,' असा शाप एका मुनीनें **दशरथाला** दिला. त्यावर ही **दशरथाची** त्या मुनीप्रत उक्ति आहे. **दशरथाला** पुत्र नसल्यामुळें या शापापासून पुत्रप्राप्तीचा लाभ झाला यामुळें मुनीच्या अनिष्ट मनोरथाची अप्राप्ति या ठिकाणीं दृष्ट झाली.

कोणी आपल्या इष्टार्थसिद्धीकरितां दुसऱ्याची योजना केली असून तो नियुक्त योजकाच्या इष्टार्थाची उपेक्षा करून आपलेंच इष्ट साधतो असें वर्णन असल्यासही **विषम** होतो.

गीति.

क्लीब म्हणुनि पाठविलें मन माराया प्रियेस हाकेला,
तों तेंच तेथ रतलें पाणिनिनें सत्य घात हा केला! १

पाणिनीनें मन हा शब्द **नपुंसकलिंगी** सांगितला आहे त्यावर ही कोटी आहे.

अनिष्टपरिहार करावयाचा प्रयत्न केला तरी अनिष्ट कायमच अशी स्थिति वर्णिली असतां **विषम** होतो.

वसंततिलक.

जावा कलंक म्हणुनी मृगलांछनानें,
त्वद्वक्त्ररूप धरिलें, तिलकच्छलानें;
तेथेंहि लाविशि कलंक तयास तन्वी,
नारी समाश्रितजनासि कलंक लावी ! १

चंद्रानें आपला कलंक जावा म्हणून सुंदर स्त्रीमुखाचा आश्रय केला. पण तेथें त्या स्त्रीनें आपला मुखचंद्र सुशोभित करण्याकरितां त्यावर कस्तूरीचा तिलक लाविला. त्यामुळें चंद्राचा कलंक आपला कायमचा कायमच राहिला ! असें वर्णन या पद्यांत आहे.

अन्योन्य.

क्रियेच्या द्वारा दोन वस्तु परस्परांवर उपकार करितात असें वर्णन असतें तेथें **अन्योन्य** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

शोभे रजनी चंद्रें रजनीनें चंद्रही तसा शोभे;

अ. वि.

येथें चंद्र आणि रजनी परस्परांस शोभवून उपकारक झालीं आहेत असें वर्णन आहे.

साकी.

कंठ तियेचा तशीच त्यांतिल वर्तुल मुक्तामाला,
परस्परांतें शोभवितीं तो योग मनोहर झाला १

कु. संभव.

येथें कंठ व मोत्यांचा हार यांनीं परस्परांना शोभा आणून परस्परांस उपकृत केलें आहे. आणखी उदाहरणः—

उपजाति.

आरोहणें रुद्रनृपाधिपाचे, शोभे नृपालासन फार साचें;
तल्लग्न तेजाळ मणिप्रभावें, अतीव शोभा नरवीर पावे १

विशेष.

प्रसिद्ध आधाराशिवाय आधेयाची स्थिति वर्णिली असतां तेथें **विशेषअलंकार** होतो.

गीत्यर्ध.

जातांहि सूर्य दीपस्थित तत्कर हरिति तिमिर निःशेष.

अ. वि.

येथें कर म्हणजे किरण यांचा प्रसिद्ध आधार जो सूर्य त्याचा अभाव वर्णिला आहे व करांना दीप हा अन्य आधार कल्पिला आहे.

गीति.

स्वर्गासहि गेले तरि ज्यांच्या कल्पान्तवरि अनल्पगुणा
वाणी रमविति जगतां कविवर होती न वंद्य ते कवणा ? १

अ. वि.

या पद्यांत कवि हा प्रसिद्ध आधार नसूनही त्यांच्या वाणींची आधाराशिवाय प्रलयकालपर्यंत स्थिति वर्णिली आहे. या दोन्हीं उदाहरणांत आधार कविसंकेतित आहेत. आणखी उदाहरणः—

गीति.

कमल जळाविण कमलीं कुवलय हींही सुवर्णलतिकेशीं,
ती सुभगा सुकुमारी उत्पातपरंपराच हे कैशी ! २

एकच वस्तु एकाच रूपानें एकाच वेळीं अनेक स्थलीं असल्याचें वर्णन असतां **विशेष** अलंकारच होतो.

गीति.

हृदयांतुनी न निघसी सर्व दिशांमाजि दिससि सुखधामा,
वत्सा, गेलास असें संतापावरुनि वाटतें रामा ! १

अ. वि.

राम वनवासास जात असतां ही **कौसल्येची** त्याजप्रत उक्ति आहे. येथें **रामाची** एकाच रूपानें एकाच काळीं हृदय व सर्व दिशा अशा अनेक स्थलीं स्थिति वर्णिली आहे.

. **पर्याय** अलंकारांत क्रमाची विवक्षा असते यास्तव त्याची व्यावृत्ति होण्याकरितां येथें लक्षणांत ' एकाच वेळीं, ' असें म्हटलें आहे.

एखादें कार्य करीत असतां त्यांतच कर्त्याच्या हातून अशक्य अशी दुसरी गोष्ट घडून येते असें वर्णन असतांही **विशेष** अलंकार होतो.

औपच्छंदसिक.

अति अद्भुतरूप सुप्रतापा, तुज विद्यारसिका रचोनि भूपा,
रचिला स्मर सूर्यही तयानें, नव भूलोकिं गुरूहि धातयानें १

ब्रह्मदेव राजाला निर्माण करीत असतां त्याच्या हातून स्मर (मदन) व गुरु (बृहस्पति) या अनुद्दिष्ट व अशक्य वस्तूही निर्माण झाल्या, असें या पद्यांत वर्णन आहे.

शार्दूलविक्रीडित.

तूं माझ्या असती धनीण घरची, मंत्री विचारांतली,
एकांतांतिल मित्र, शिल्पकृतिची गे पट्टशिष्या भली;
ऐसी तू तुजला दयारहित या दैवें बलें हारितां,
नेलें सर्वहि ! काय शेष उरलें तें तूं वदे तत्वतां १

रघुवंश-सर्ग ८

यांत 'काय शेष उरलें ' या शब्दांनीं मंत्री, मित्र इत्यादिकांचें हरण, एतद्रूप अशक्य कार्यही घडून आलें असा ध्वनि आहे.

या **विशेषालंकाराच्या** प्रकारांत दोन गोष्टी करण्याचा कर्त्याचा मुळींच उद्देश नसतो. एक काम करीत असतां दुसरें त्यांत सहज अकल्पित सिद्ध होतें. त्याला अन्य किंवा स्वतंत्र प्रयत्न करावा लागत नाहीं. म्हणून लक्षणांत 'त्यांतच' असे शब्द घातले आहेत.

व्याघात.

ज्या साधनानें एक मनुष्य एखादें कार्य साधतो त्याच साधनानें दुसरा त्या कार्याचा विघात करतो असें वर्णन असतें तेथें **व्याघात** अलंकार होतो.

गीति.

शिव दृष्टीनें जाळी त्या मदना दृष्टिनेंचि जीवविती,
त्या श्रीत्र्यंबकजयिनी सुलोचनांलागि मन्मति स्तविती १
अ. वि.

येथें, **शिवानें** दृष्टीनं ज्या **मदनाला** जाळलें त्या मदनाला स्त्रियांनीं दृष्टीनच जिवंत केलें, असें वर्णन आहे. लक्षणांत 'त्याच साधनानें' असें म्हटलें आहे त्याचा अर्थ 'तत्सदृश साधनानें' इतका घ्यावा लागतो. प्रस्तुत उदाहरणांत **शिवाची** व सुलोचनांची दृष्टि भिन्न आहे.

एकवार साधलेल्या वस्तूचा विघात यांत वर्णिला असतो म्हणून या अलंकाराला **व्याघात** असें नांव आहे. साधित वस्तूचा विघात जिगीषामूलक असतो.

जें ज्या क्रियेचें प्रसिद्ध साधन आहे त्या साधनानेंच कोणी विरुद्ध क्रिया केली असें वर्णन असतांही **व्याघात** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' ज्यांहीं जग संतोषे त्यांहींच जगासि मदन पीडि कृती. '

यांत संतोषाचें प्रसिद्ध साधन ' फुलें ' हें असून त्यांनींच **मदन** जगाला पिडा देतो असें वर्णन आहे.

एका कार्यास साधक असा हेतु विरुद्ध कार्य साधण्यास अधिक अनुकूल असें एकाद्यानें प्रतिपादिलें असतां तेथेंही **व्याघात** अलंकारच मानतात.

गीति.

लोभी नर अर्थातें दारिद्र्यभयें कधींहि न त्यजितो,
दाताहि त्याच शंकेस्तव अर्थिजनास पाहतां स्तवितो ! १

या पद्यांत प्रथमार्धांत दारिद्र्यभय हा हेतु द्रव्यसंग्रहरूप कार्यसाधनाकडे लावला आहे. दुसऱ्या अर्धांत तोच हेतु अर्थदान करण्याकडे विशेष अनुकूल म्हणून वर्णिला आहे !

अधिक.

आधार आणि आधेय यांच्यांपैकीं एकाचा अतिविस्तृतपणा दाखविण्या-

करितां दुसऱ्याला अतिन्यूनत्व दिलें असतें असें वर्णन असतां अधिक अलंकार जाणावा.

गीति.

फार विशाल नृपाला! भुवनोदर हें गमे विचाराशीं,
जेथें अशक्य माया राया मावे तुझा यशोराशि! १

अ. बि.

येथें यशोराशी हें आधेय आहे. हें प्रस्तुत असून याचें अतिविस्तृतत्व विवक्षित आहे. यशोराशीचा विस्तार वर्णन करण्याकरितां आधारभूत जें भुवनत्रय तें लहान असतांही, त्यांत यशोराशि मावला पाहिजे म्हणून, फार मोठें आहे असें वर्णिलें आहे.

गीत्यर्ध.

'तद्यश न मोजवेल ब्रह्मांडा एवढ्याहि मापानें.'

मोरोपंत.

यांत ब्रह्मांड आधार आहे. यश त्यांत राहणारी वस्तु म्हणजे आधेय होय. येथें आधेय जें यश तें ब्रह्मांड या आधारापेक्षां मोठें असें वर्णन आहे.

वसंततिलक.

कल्पांतकालिं उपसंहरि जीवजात,
तें सावकाशचि जगें वसतीं जयेंत;
माती न त्या तनुमधें अजि माधवाचे,
श्रीनारदागमसमुद्भव हर्ष साचे! १

गीति.

ज्या उदरांत सकलही लोकत्रय सावकाश राहतसे,
त्यांतचि मुनिवरदर्शन होतां आनंद तो न मावतसे १

या दोन्हीं पद्यांचा तात्पर्यार्थ एकच आहे. यांत आनंद या आधेयाचा उदर किंवा तनु या आधारापेक्षां अधिक विस्तार वर्णिला आहे. आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

मुक्तेशकाव्य बघुनी हृदयीं न मावे
आनंद, आजि न तयासि कसें नमावें ?

पद्यमंजरी.

गीति.

गीतध्वनि स्तुतिध्वनि वाद्यध्वनि पुष्पवृष्टि-लक्षाया,
न पुरे ब्रह्मांड प्रभुरुचिरसहि शक्रादि दृष्टि लक्षाया १

मोरोपंत.

प्रहर्षिणी.

साधूचें मन इतुकें उदार, त्यांत
ब्रह्मांडोदर हरिही वसे निवांत;

अ. द.

शेवटल्या पद्यांत साधूचें मन हा आधार होय; आणि त्यांत राहणारा **हरि** हा आधेय होय. येथें मन वास्तविक अल्प असतांही **हरि** या आधेयापेक्षां अधिक विस्तृत आहे असें वर्णन आहे.

अतद्गुण.

एकादी वस्तु, दुसऱ्या विशेष उज्वल वस्तूंचें सांनिध्य असूनही, आपला गुण टाकून तिच्या गुणाचा स्वीकार करीत नाहीं असें वर्णिलें असतां, तेथें **अतद्गुण** अलंकार होतो.

गीति.

गंगेच्या शुभ्रसलिलिं यमुनेच्या कृष्णसलिलिंही हंसा,
करिशी स्नान तरि न तव शुभ्रपणा अधिक ऊन होय कसा ?

स्वकृत.

यांत **गंगेचें शुभ्रसलिल व यमुनेचें कृष्णसलिल** या दुसऱ्या वस्तूंचें विशेष उज्ज्वल सांनिध्य असून हंसानें त्यांचा रंगरूप गुण घेतला नाहीं असें वर्णन आहे.

गीत्यर्ध.

' चिरकाल रक्त ऐशा हृदयीं धरिलासि रंगशी न तरी. '

यांत हृदयाच्या उज्ज्वल अशा रक्तत्वाशीं सान्निध्य असतांही तूं रंगत नाहींस असें कोणा एका नायिकेचें नायकाप्रत वचन आहे.

स्रग्धरा.

खेळे जी दिग्गजांच्या मदमलिन अशा चंड गंडस्थळांशीं,
तैशी वैरिस्त्रियांच्या नयनकमलिंच्या धूतसे कज्जलांसीं;
बा ! हे तथापि चित्रा सितकरकिरणां तुल्य शुभ्राचि कीं ती
त्वत्कीर्ति श्रीनृसिंहा! क्षितिपतितिलका शोभताहे दिगन्तीं १

येथें कीर्तीचा, उज्ज्वल अशा मदमलिनगंजगंडांशीं व वैरिस्त्रियांच्या कज्जलाशीं, निकट संबंध आहे. तथापि कीर्ति आपली धवलता टाकून त्यांचे गुण स्वीकारीत नाहीं असें वर्णन आहे.

आणखी उदाहरणें:---

गीति.

पंकांत पद्म न मळे; काकाच्या दुर्गुणा शिकें न पिक;
चंदन परगंध न घे, होय तृणामाजि तृणच काय पिक १

मोरोपंत–कर्णपर्व.

उल्लास व **अवज्ञा** यांत ' गुण ' हा शब्द 'दोष ' या शब्दाचा विरोधी आहे. **तद्गुण** व **अतद्गुण** यांत 'गुण' शब्द रूप, रस, गंध इत्यादिकांचा वाचक आहे. **उल्लास** व **अवज्ञा** या अलंकारांत एकाच्या गुणाचा दुसऱ्याच्या ठायीं उदय किंवा अनुदय वर्णित नसतो. **तद्गुण** व **अतद्गुण** यांत तो वर्णित असतो.

अभंग.

निंबाचिया झाडा साकरेचें आळें, आपलीं तीं फळें न संडीच १
परीसाचें अंगीं लाविलं खापर, पालट अंतर न घे त्याचें २

तुकाराम.

विनोक्ति.

अमक्याविना अमुक सुंदर किंवा असुंदर असें वर्णन असतां **विनोक्ति** हा अलंकार होतो.

प्रस्तुत अलंकारांत प्रत्यक्ष 'विना' हाच शब्द यावयाला पाहिजे असें नाहीं. तदर्थक शब्द असला म्हणजे झालें.

शार्दूलविक्रीडित.

राहो जाति रसातळीं सुगुण हे राहोत ती खालतें
शैलाग्राहुनि शील सत्वर पडो सौजन्य अग्नींत तें;
शूरत्वावरि आदळो अशनिका हें सर्वही नावडे
अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें बापुडें ! १

वामन–नीतिशतक.

यांत अर्थप्राप्ती शिवाय सर्व गोष्टी असुंदर म्हणजे व्यर्थ असें वर्णन आहे. येथें **वीण** (विना याचें अपभ्रष्टरूप) हा शब्द उक्त आहे.

वसंततिलक.

तीं इंद्रियें, सकल कर्महि, धी तशी हे,
अव्याहता वचन तें, नर तोचि आहे;
उष्मा नरा जरि धनोद्भव एक नाहीं,
अन्य क्षणांत तरि होय विचित्र पाहीं ! १

वामन–नीतिशतक.

द्रव्य असतां ज्या गोष्टी सुंदर दिसतात त्याच द्रव्याची ऊब गेली कीं असुंदर होतात म्हणजे फिक्या पडतात असें यांत वर्णन आहे. येथें **विना-शब्दार्थानें विनोक्ति** आहे.

गीति.

जो रामास्ति न पाहे कीं पाहेनाचि रामहि जयास
तो निंद्य सकललोकीं त्याचा आत्माहि निंदितो त्यास १

अ. वि.

यांत **रामदर्शना शिवाय** निंद्यपणा वर्णिला आहे तो **विनार्थानें** सिद्ध झाला आहे.

अमक्यावीण सुंदर याचें उदाहरण:—

शिखरिणी.

कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता,
विराजे सिंदूरें धवलवसनें भूपवनिता;

वामन.

कनकमणिभूषणा शिवाय भूपवनिता शोभते असें यांत वर्णन आहे.

साकी.

उदया येतां विधु तिमिरें जशि विरहित रात्री दिसती,
जैशी विधूम अग्निज्वाला रात्रीं तेजें स्फुरति;
तैशी वरतनु मोहानें ही त्यजितां प्रसन्न आहे,
प्रथम कलुष तटपातें मग जशि गंगा निर्मल वाहे १

विक्रमोर्वशीय.

येथें अंधकार वगैरे वाचून रात्रि वगैरेचें रमणीयत्व वर्णिलें आहे.

उपेंद्रवज्रा.

तडाग पंकाविण होय काम्य, सभा खलांनीं रहिता सुरम्य;
कृती कवीची कटुवर्णहीन, बघोनि होई मन मोदलीन १

स्वकृत.

गीति.

रागाविणें विलसतो मुनिजन, परि मणि न तेंवि रुचिसार,
कौटिल्यरहित शोभे नर, परि न कधींच हो अलकभार १

स्वकृत.

'तडाग' इत्यादि पद्यांत 'विनारमणीयत्व' वर्णिलें आहे. 'रागाविणें' इत्यादि पद्यांत 'विना सुंदर' व 'विना असुंदर' हीं दोन्हीं वर्णिलीं आहेत.

दिंडी.

जन्म नलिनींचा व्यर्थ खचित गेला,
तिनें न जरी चंद्रमा देखियेला;
चंद्र निष्फल तो होय जनीं जाणें,
सुप्त नलिनीतें हंसविलें न जेणें ! १

स्वकृत.

येथें **विनोक्तीचा** ध्वनि आहे. **परस्परविनोक्तीनें** यांत विशेष शोभा आली आहे.

प्रहर्षिणी.

ज्या नेत्रीं तव सुतनू न देखियेली,
त्यांची या जनिं जनि ती फुकाचि गेली!
नोहे त्वल्लहरिरवप्रकर्ष ठावा,
धिक्कार श्रवणयुगास त्या असावा! १

स्वकृत.

ही **भागीरथी**ला उद्देशून तिच्या एका भक्ताची उक्ति आहे. तुझ्या दर्शना शिवाय नयनांचें आणि तरंगाचा शब्द ऐकल्याशिवाय कर्णाचें वैफल्य या पद्यांत 'फुकट गेलीं' आणि 'धिक्कार असावा' या पदांनीं व्यंजित झालें आहे.

परिसंख्या.

अनेक सारख्या वस्तूंमधून एकाचें ग्रहण करून बाकीच्यांचा स्पष्ट किंवा गर्भित त्याग केला असतो तेथें **परिसंख्या** अलंकार होतो.

यांत कचित् प्रश्न असतो कचित् नसतो.

गीति.

सुकृती कोण? जयाचें परोपकारीं शरीर नित्य झिजे,
पापी कोण म्हणावा? जो पीडा देउनि परास रिझे. १

पद्यरत्नावली.

गीति.

शास्त्र असे काय बरें! यच्छ्रवणें द्वैत नाशुनी जाय,
पीडाकुशल रिपु असे कवण! मनांतिल कुवासनानिचय १

महाराष्ट्र भामिनीविलास.

प्रस्तुत पद्यांत ज्या वस्तूचें ग्रहण कर्तव्य आहे ती प्रश्नरूपानें विचारली आहे. ही **प्रश्नपूर्विका परिसंख्या** होय. यांत अन्य सदृश वस्तूंचा त्याग गर्भित आहे.

साकी.

कचीं कुटिलता, करचरणावरि राग, आणि नयनांत,
चंचलता हे गुण प्रियेच्या सतत वास करितात. १

स्वकृत.

'त्याच्या राज्यांत परलोकाचें मात्र भय असे; स्त्रियांच्या केशांच्या ठायीं मात्र वक्रता दिसे; पादभूषणांच्या ठिकाणीं मात्र मुखरता आढळून येई; विवाहाचे प्रसंगीं मात्र करग्रहण नजरेस येई!'

कादंबरी.

वसंततिलक.

दानार्थमात्र धन जे बहु सांचवीती,
सत्यार्थ भाषण मित स्फुट जे करीती;
कीर्त्यर्थ इच्छिति रिपूंसि जिणावयातें,
जे कां प्रजार्थ वरिती कुलजांगनांतें १

रघुवंश—मराठी—भाषान्तर. सर्ग १.

यांत प्रश्न नसून अन्य सदृश वस्तूंचें निवारण ध्वनित आहे. कोठें प्रश्न असून त्याज्य वस्तूंचा निषेध स्पष्ट असतो.

गीति.

भूषण काय नराचें? यश विमल; नव्हे महार्घ सद्रत्न,
कर्तव्य काय त्याचें? सुचरित; परपीडनीं नव्हे यत्न १

स्वकृत.

कोठें प्रश्न नसून निषेध स्पष्ट असतोः—

द्रुतविलंबित.

परम भक्ति भवींच न वैभवीं,
न विषयीं परमार्थिंच ती चवी;
सतत लोभ बहू मानिं कीर्तिचा,
न तनुचा, पथ हाचि सुबुद्धिचा १

स्वकृत.

पूर्वोक्त 'कचीं कुटिलता' इत्यादि स्थलीं श्लेषचमत्कार आहे. आणखी उदाहरणेंः—

गीति.

शूर भुजांनीं क्षत्रिय, शब्दांनीं विप्र, पार्थ चापानें;
केवळ मनोरथांनीं, कर्णा ! तूं शूर, न प्रतापानें १

मोरोपंत—द्रोणपर्व.

गीति.

नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न, उदंड आडनांवाचीं,
बुडविति न वा न तारिति चित्रें बरवींहि आडनांवाचीं ! १

मोरोपंत.

अभंग.

तोच साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा १

तुकाराम.

दिंडी.

हस्तचरणाधरिं रक्तपणा राहे,
अलकनिचयीं कुटिलता राहताहे;
नयनिं सखिच्या चांचल्य करी वास,
तींत न मिळे स्थल ल्वाहि दुर्गुणास !

स्वकृत.

गीति.

कुमुदांसचि चंद्र करी विकसित, पद्मांप्रतीच चण्डकर,
स्वीय परिग्रह टाकुनि अन्या स्पर्शी कधीं न आर्यकर १

स्वकृत.

गीति.

हरिभक्तमंदिरीं त्या केवळ मणिदीपमात्र अस्नेह,
शान्त, तमःक्षयपटु, शुचि याचि गुणें स्वजठरीं भरी गेह १

मोरोपंत.

गीति.

स्नेहक्षय दीपांतचि होय न हृदयान्तरांत सुंदरिचा.

अ. वि.

वंशस्थ.

विलासिनींचीं नयनोत्पलेंचि तीं, जियेमधील श्रुतिमार्ग लंघिती,
जियेमधें एकचि तोहि वक्रिमा, धरी महाकालशिरःस्थ चंद्रमा १

अ. वि.

उत्तर.

उत्तरावरून प्रश्नाची उपस्थिति होते तेथें **उत्तरालंकार** जाणावा.

पृथ्वी.

तरेन तुमच्या बळें भवमहानदीनाविका !
तुह्मीच मग आतरास्तव मला सुदीना विका;
असे विदित वासही मज सदाश्रमींचा, करा
दया, गुण पहा, सवे मज सदा श्रमीं चाकरा १

केकावली.

यांत तृतीय चरणांत 'असे विदित वासही मज सदाश्रमींचा' या उत्तरावरून परमेश्वराचा 'तुला विकत घेतो कोण?' हा प्रश्न उपस्थित होतो.

अनेक प्रश्नांना अनेक दुर्बोध उत्तरें असतांही **उत्तरालंकार** होतो.

दिंडी.

कुशल आहे कीं प्रिया? वांचताहे;
कुशल पुसतों; कथियलें तेंचि पाहें;
पुन्हां सांगसि गे तेंचि सखे! कैसें?
श्वास असतां कशि वदूं मृता ऐसें? १

यांत ईर्ष्या व मान गेल्यावर पश्चात्ताप पावलेल्या नायिकेची सखी आपणाकडे आलेली पाहून नायक तिला नायिकेचें कुशल विचारीत आहे. येथें नायकाच्या अनेक प्रश्नांना नायिकेची अनेक दुर्बोध उत्तरें आहेत. तुझ्या विरहानें नायिका अतिशय व्याकुल झाली आहे हें सखीच्या उत्तरांचें सार आहे. पण तें तिच्या उत्तरांवरून लवकर नीट लक्ष्यांत येत नाहीं.

एक प्रश्न व एक उत्तर यांत तादृश सौंदर्य नसतें म्हणून प्रश्नोत्तरें अनेक असण्याची विवक्षा आहे. तथापि अर्वाचीन अलंकारिकांनीं हा नियम पाळलाच आहे असें नाहीं.

एक प्रश्न व एकच उत्तर असून त्या उभयतांत किंवा त्यांतून एकांत विशेष चमत्कार असला म्हणजे उत्तर अलंकारच मानतात.

गीत्यर्ध.

'स्वर्गापेक्षां सुखकर अधिक असे काय ? काव्य रसयुक्त.'

एक प्रश्न असून अनेक उत्तरें असतांही उत्तरालंकारः—

गीति.

स्वर्गापेक्षां सुखकर अधिक असे काय ? काव्य रसयुक्त,
बंधु, सुहृत्, पंडित यां सर्वांशीं संग, तोहि अविभक्त १

प्रश्न आणि उत्तर हीं त्याच शब्दांतून निष्पन्न होतात तेथेंही हाच अलंकारः—

शिखरिणी.

'असे या लोकीं हो कवण मनुज क्षेत्रनिरत ?' १

येथें "क्षेत्र 'पदस्थ श्लेषामुळें प्रश्न आणि उत्तर हीं 'क्षेत्रनिरत 'पदांतच साधलीं आहेत.

दोन प्रश्नांचें एक उत्तर असतांही हाच अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'गगनांत कोण फिरतो ? नित्य क्षय पावतो कवण ? वायु.'

येथें दोन प्रश्नांना वायु (वारा; पक्षीं वा–आयु=आयुष्य) हें एकच उत्तर आहे.

अनुमानालंकारांत साध्य आणि साधन हीं एकाच पक्षाचे ठायीं असावीं लागतात. प्रस्तुत अलंकारांत साध्य म्हणजे प्रश्न तो एकाचा असतो आणि साधन म्हणजे उत्तर हें दुसऱ्याचें असतें.

प्रश्नपरिसंख्येमध्यें उत्तर प्रसिद्ध आणि सुंदर असून मुख्य कटाक्ष अन्य सदृश वस्तूचें निवारण करण्यावर असतो. उत्तरालंकारांत उत्तर सामान्यपणें अज्ञेय व म्हणूनच अहृद्य असल्यामुळें तसेंच राहतें; व आपली अज्ञेयता मात्र अधिक व्यक्त करितें. या अलंकाराचा पहिला प्रकार संकीर्णप्रकरणांत प्रविष्ट होतो. इतर प्रकार विरोधमूलकच मानिले आहेत.

सूक्ष्म.

दुसऱ्याचा गूढ अभिप्राय जाणून कोणी स्वमतसूचक व्यापार केला असें वर्णन असल्यास तेथें **सूक्ष्म** अलंकार होतो.

दुसऱ्याचा गूढ अभिप्राय जाणण्याचें साधन मुद्रा किंवा नेत्रहस्तादिकांचे व्यापार हें होय.

गीति.

नाटोपे मगधनृपति धर्मानुज मानसांत फार जळे;
तद्दृष्टिमधुकरी मग कृष्णमुखाब्जाकडे सकाम वळे १
प्रभु आशय जाणुनियां शाखा धरुनी करान्तरीं चिरि ती;
सुचवी कीं रिपुहननीं अमोघ आणि प्रशस्त हेचि रिती १

स्वकृत.

येथें **भीमाच्या** चिंताग्रस्त मुद्रेवरून साहाय्याची अपेक्षा **श्रीकृष्णाला** कळली; आणि त्यानें झाडाची ढाळी चिरून **भीमाला जरासंधवधाचा** प्रकार सुचविला असें वर्णन आहे.

गीत्यर्थ

मी पाहत असतां ती केशांनीं निज शिरोमणी झांकी.

अ. बि.

येथें प्रियकराच्या दर्शनाविषयींचा संकेत त्याच्या मुद्रेवरून जाणून नायिकेनें आपल्या मस्तकावरील रत्न आच्छादित केलें आणि त्यावरून सूर्यास्त हा संकेतकाल व्यक्त केला.

स्मरण.

एकाद्या वस्तूच्या दर्शनादिकांवरून तत्सदृश पूर्वपरिचित अन्य वस्तूचें स्मरण वर्णिलें असतें तेथें **स्मरणालंकार** होतो. याला **स्मृति** असेंही नांव आहे.

शार्दूलविक्रीडित.

वृक्षाच्या तळिं लक्ष्मणा! चल बसूं चण्डांशु हा जाळितो;
चंडांशु प्रकटे कसा निशिं? शशी हा अंबरीं राजतो;

वत्सा! हें कळलें कसें तुज? मृगा अंकावरी हा धरी;
कोठें ती मृगलोचना जनकजा प्राणप्रिया सुंदरी !

स्वकृत.

रामचंद्र सीतेच्या विरहानें व्याकुल होऊन तिचा शोध करीत अरण्यांत फिरत असतां एके प्रसंगीं त्याचा व **लक्ष्मणाचा** प्रश्नोत्तररूप संवाद झाला तो या पद्यांत वर्णिला आहे. तिसऱ्या चरणांत **लक्ष्मणाच्या** मुखावाटे ' मृग ' हा शब्द येतांच मृगाच्या नयनासारखे नयन जिचे अशा **जानकीचें** स्मरण **रामचंद्रास** झालें असें यांत वर्णन आहे.

रघुवंशाच्या नवव्या सर्गांत **दशरथमृगयाप्रसंगीं** ही अशीच कल्पना कवीनें व्यक्त केली आहे:—

वसंततिलक.

नेमी शरां इतरही हरिणां वधाया,
दृष्टी भयें चपल पाहुनि तो तदीया;
प्रौढांगनानयन आठवुनी मनांत,
होई ढिला सुदृढमुष्टि तथापि हात;

रघुवंश—भाषान्तर.

हरिणांची भयचकित दृष्टि पाहून **दशरथाला** आपल्या चंचलापांग अंगनांचें स्मरण झालें असें यांत वर्णन आहे.

आणखी उदाहरणें:—

मालिनी.

नृपति निजहयाच्या संनिधानीं मयूरा,
बघुनिहि नचि मारी पाहुनीयां पिसारा;
रतिविगलितबंधा आठवोनि सुवेणी,
निजमनीं वनितेची गुंफिलेली फुलांनीं १

रघुवंश—भाषान्तर—सर्ग ९.

मयूराचा विचित्र कलाप पाहून तत्सदृश कांताकचकलापाचें स्मरण यांत वर्णिलें आहे.

गीति.

अलिपुंज देखतां मज सीतेचे केश लक्ष्मणा स्मरती,
तत्कबरीसम हे शिखिपिच्छकलाप स्वमानसीं भरती १

मोरोपंत–मंत्ररामायण.

गीति.

अरि-हरिपासुनि सुटतां करि करि–भूपति पलायन त्वरित,
स्मरले सुरांसि तेव्हां काल्यवनभीतशौरिचें चरित १

मोरोपंत–कर्णपर्व.

गीति.

मातें कमलमृणालें विलोकितां स्मरति युवतिच्या सुभुजा,
प्रणयक्रोधें मजला बद्ध करायासि सर्वथा विभु जा १

मोरोपंत.

कारणमाला.

पूर्वोक्त वस्तु तिच्यापुढें येण्याऱ्या वस्तूचें कारण म्हणून सांगितली असून अशा कारणांची माला वर्णिली असते तेथें **कारणमाला** अलंकार होतो.

गीति.

न्यायानें श्री, श्रीनें दान, यशःप्राप्ति होय त्या दानें,
यास्तव भूमिपते ! त्वां पाळावी भूमि सकल विनयानें १

स्वकृत.

येथें न्याय ही पूर्व वस्तु आहे. ती श्रीचें कारण म्हणून वर्णिली आहे. श्री दानाचें कारण व दान यशाचें कारण वर्णिलें आहे. यास्तव येथें **कारणमाला** अलंकार झाला.

पुढें सांगितलेली वस्तु तत्पूर्वोक्त वस्तूला कारण होत गेली तरीही हाच अलंकार होतो.

गीति.

होती नरक अघानें, अघ दारिद्र्यांत संभवे भारी,
दारिद्र्य तें अदानें, म्हणुनि करीं दान, तें सदा तारी १

अ. वि.

येथें अदान ही शेवटीं सांगितलेली वस्तु आहे. ती तत्पूर्वोक्त दारिद्र्याचें कारण आहे. तें दारिद्र्य तत्पूर्वोक्त अघाचें कारण आहे; आणि तें अघ तत्पूर्वोक्त नरकाचें कारण म्हणून सांगितलें आहे.

आणखी उदाहरणः—

गीति.

विद्या विद्वत्संगें, विद्येपासोनि विनय तो जोडे,
लोकप्रीती विनयें, लोकप्रीतीमुळेंहि सर्व जडे १

अ. द.

एकावली.

पुढील वस्तु मागील वस्तूचें विशेषणरूपानें स्थापन किंवा निषेध करीत चालली आहे असें वर्णन असतां **एकावली** अलंकार जाणावा.

गीति.

त्यां मेदिनीवरांची कर्णान्तविशाल शोभतीं नयनें,
कर्णहि बाहुस्तंभावरि शोभा पावताति संचलनें १

अ. वि.

येथें 'नयन' या 'मागील वस्तूचें' 'कर्ण' ही 'पुढील वस्तु' कर्णान्तविशालत्व या विशेषणानें, व 'कर्ण' या 'मागील वस्तूचे' 'बाहु'ही पुढील वस्तु बाहुस्तंभसंचलनानें शोभाशालित्व या विशेषणानें स्थापन करितें आहे असें वर्णन आहे.

धर्मी युधिष्ठिर निरत, युधिष्ठिरीं सबळ वृष्णिवर शौरी,
त्या शौरिच्याहि ठायीं विजयश्री, जेविं शंकरीं गौरी १

मोरोपंत—आदिपर्व.

येथें 'निरतत्व' या अभिन्न धर्मानें अनेक पदार्थ मालेंत ओंविले आहेत.

वसंत तेथें वनें, वन तेथें सुमनें, सुमनीं पालिंगनें सारंगांचीं १
गुरु तेथ ज्ञान, ज्ञानीं आत्मदर्शन, दर्शनीं समाधान आथि जैसें २

ज्ञानेश्वरी, १८वा अध्याय.

येथें वसंताचें वनयुक्तत्वानें, वनाचें सुमनोयुक्तत्वानें व सुमनांचें सारंग-सांनिध्यानें स्थापन केलें आहे.

उपजाति.

धर्में नृपा बुद्धि तुझी विशुद्धा, लक्ष्मी तिच्यांशीं सहसा निबद्धा;
लक्ष्मी करी सर्व जनास तुष्ट, कीर्ती करीती जन सर्व पुष्ट १

स्वकृत.

येथें धर्मबुद्धीचें लक्ष्मीयुक्ततेनें, लक्ष्मीचें जनतोषकरत्वानें व जनाचें कीर्तिकरत्वानें स्थापन केलें आहे.

वंशस्थ.

न वारि तें ज्यांत न चारु पंकजें, न पंकजें तीं नच भृंग ज्यां भजे,
न भृंग गुंजारव जो न चालवी, न तो हि गुंजारव जो न रंजवी १

स्वकृत.

येथें मागील वस्तूचा पुढील वस्तूनें विशेषणानें निषेध केला आहे, असें वर्णिलें आहे.

सार.

एकाद्या वस्तूचा उत्कर्ष क्रमाक्रमानें शेवट पर्यंत वर्णिला असतो तेथें **सार** अलंकार होतो.

पृथ्वी.

पटुत्व सकलेंद्रियीं, मनुजता सुवंशीं जनी,
द्विजत्वहि दिलें भलें बहु अलभ्य जें कीं जनीं;
यशःश्रवणकीर्तनीं रुचि दिली तरी हा वरा
म्हणे अधिक याच कीं, अखिल-याचकीं हावरा ! १

केकावली.

यांत पंतांनीं परमेश्वरानें आपणांवर केलेल्या प्रसादाच्या उत्कर्षाचें क्रमाक्रमानें शेवटपर्यंत वर्णन केलें आहे.

गीति.

ऐसें असतां भ्राता, तोही स्वज्येष्ठ, त्यांतही राजा,
तत्रापि धर्मकोविद, बहु मानी ज्यासि शांतनव आजा १

"पांडुसमातें त्यातें धर्मज्ञा मारितोसि पामरसा,
रोदन करील येणें विसरविला आठवोनि राम रसा १
मोरोपंत—कर्णपर्व.

यांत पायरी पायरीनें गुणोत्कर्ष सांगण्याला आरंभ करून शेवटीं पांडुसमत्व म्हणजे पितृसमत्व या गुणानें तो कळसाला नेऊन पोंचविला आहे.

आणखी उदाहरणें:—

गीत्यर्ध.

' मधु मधुर, सुधा त्याहूनि, कविवरवच तीहूनीहि बहुसार. '
अ. वि.

स्रग्धरा.

राहे त्रैलोक्य विष्णूदरिं हरिहि निजे सर्पराजावरी, तो
सिंधूच्या एकदेशीं कलशजनि मुनी चूळ त्याची करीतो;
तो ही खद्योतसाम्या गगनिं धरितसे श्रीनृसिंहक्षितींद्रा !
कीर्तीचें कर्णनीलोत्पलहि नभ तुझ्या शोभतें भूपचंद्रा ! १
अ. वि.

हीं सर्व श्लाघ्यगुणोत्कर्षाचीं उदाहरणें झालीं. अश्लाघ्य गुणाच्या उत्कर्षाचें उदाहरण:—

गीत्यर्ध.

कापूस लघु तृणाहुनि याचक लघुतरहि कापुसापेक्षां;

येथें लघुत्वरूप अश्लाघ्य गुणाचा याचकाच्या ठिकाणीं परम उत्कर्ष वर्णिला आहे.

गीति.

पर्वत महान् गिरिहुनि अंबुधि मोठे तयाहूनी गगन;
ब्रह्म विशाल नभाहुनि, आशा ब्रह्माहुनीहि अति गहन १
अ. वि.

येथें ब्रह्मापर्यंत महत्वरूप श्लाघ्यगुणाचा उत्कर्ष, व प्रकृत पदार्थ जी आशा तिच्या संबंधाचा महत्वरूप अश्लाघ्यगुणाचा उत्कर्ष वर्णिला आहे.

या अलंकारांत शेवटीं उत्कर्षाचें सार सांगितलें असतें यास्तव याला **सारालंकार** असें नांव आहे. **परिसंख्या अलंकारांत** अन्य सदृश वस्तूचें निवारण हेंच शोभादायक असतें. येथें वस्तूच्या उत्कर्षाचें क्रमानें आधिक्य विवक्षित असतें. **कारणमाला, एकावली, मालादीपक,** व **सार** या अलंकारांना **प्रतापरुद्रकारांनीं** शृंखलान्यायमूल अलंकार असें म्हटलें आहे.

काव्यलिंग.

वाक्यार्थ किंवा पदार्थ हेतु असून जेथें समर्थनीय अर्थाचें समर्थन होतें तेथें **काव्यलिंग** अलंकार होतो.

गीति.

हे दुष्टा कंदर्पा ! मजशीं तूं चालवूं नको नखरे;
माझ्या चित्तीं वसतो तो श्रीशिव जाण हें मनांत खरें १

साहित्यशास्त्र.

ही एका **शिवभक्ताची मदनाप्रत** उक्ति आहे. इच्यांत प्रथमार्धांतील अर्थाच्या समर्थनार्थ उत्तरार्धांतील **वाक्यार्थ** हेतु झाला आहे.

ओवी.

अनेक श्वापदांचिया थाटीं, भयें कोणी न येती निकटीं,
म्हणती पतिव्रता दृष्टी, भस्म करील आमुतें १

मुक्तेश्वर–वनपर्व.

येथें पहिल्या दोन चरणांतील अर्थाचें शेवटच्या दोन चरणांतील वाक्यार्थानें समर्थन झालें आहे. यास्तव येथेंही **वाक्यार्थहेतुक काव्यलिंग** झाला.

गीति.

संशप्तकमथर्मी करि, पार्थ महारथसहस्रसम कर्म
धर्मप्रसाद माथां, अंगीं भगवत्प्रसाद दृढ वर्म १

मोरोपंत–कर्णपर्व.

येथें प्रथमार्धांतील अर्थाला द्वितीयार्धांतील वाक्यार्थ हेतुभूत आहेत

द्रुतविलंबित.

खचित मी बुडतों भवसागरीं, धरुनियां वरती मज सांवरीं,
तुजसि अर्पितसें नमुनी पदें, सकरुणा! करुणालहरीपदें १

पद्यमंजरी.

येथें पदवंदनाचें कारण परमेश्वराचें सकरुणत्व होय. असें 'सकरुणा!' या संबोधनपदानें सुचविलें आहे. वास्तव येथें पदार्थहेतुक **काव्यलिंग** होय.

अनुमान.

साध्यसाधनरूप वचन असतें तेथें **अनुमान** अलंकार होतो. यालाच **अर्थापत्ति** असें नांव आहे.

साध्य व साधन हे तर्कशास्त्रांतील परिभाषिक शब्द आहेत. साधन म्हणजे हेतु. हेतूनें जें सिद्ध होतें तें साध्य.

गीति.

लपती विहंग नदीं, मिटतीं कमळें जळांतहि समस्त,
हीं मालतीहि विलसे, तेणें झाला गमोंच रव्यस्त १

स्वकृत.

येथें मालतीचा विकास वगैरे हेतु आहे. त्यावरून रवीचा अस्त सिद्ध होत आहे.

शार्दूलविक्रीडित.

वृक्षाच्या तळिं, लक्ष्मणा! चल वसूं, चण्डांशु हा जाळितो!
चंडांशु प्रकटे कसा निशिं? शशी हा अंबरीं राजतो;
वत्सा! हें कळलं कसें तुज? मृगा अंकावरी हा धरी;
कोठें ती मृगलोचना जनकजा प्राणप्रिया सुंदरी! १

यांत 'मृगा अंकावरी धरी,' हा हेतु असून त्यानें सिद्ध होणारें शशिज्ञान हें साध्य आहे.

स्रग्धरा.

ज्या अर्थी व्योमरंध्रान्तरिं अजि भरला वारिदाकार धूर,
ज्या अर्थी विस्फुलिंगाप्रति धरिति जवें काजवे जाति दूर;

विद्युज्ज्वाला विशाला विलसुनि करिती पीतवर्णा दिशाला,
त्या अर्थी सत्य, पांथा! मदनदव गमे लागला या वनाला! १

अ. वि.

या पद्यांत पहिल्या तीन चरणांत हेतु उक्त आहे. त्यानें वनाला मदनदव लागला हें सिद्ध झालें. आणखी उदाहरणः—

गीति.

आर्धी विप्रमुखश्री कळवी येतांचि माधवागमन,
मग मुनि सांगे मज तो, ऊठ म्हणे गुरुपदास लाग मन १

मोरोपंत—रुक्मिणीहरण.

अर्थान्तरन्यास.

सामान्य अर्थाचें विशेष अर्थानें किंवा विशेष अर्थाचें सामान्य अर्थानें समर्थन केलें असतें तेथें **अर्थान्तरन्यास** अलंकार होतो.

गीति.

गुणवत्संबंधानें नीचहि पावे सदा महत्वास,
माळेच्या संबंधें सूत्रालाही घडे शिरीं वास १

अ. वि.

येथें प्रथमार्धांत ' गुणी मनुष्याच्या संगतीनें लहानही मोठ्या पदवीस चढतो, ' असा **सामान्य** अर्थ सांगितला आहे; आणि त्याचें समर्थन करण्याकरितां द्वितीयार्धांत ' माळेच्या अनुषंगानें सूत्रालाही शिरीं वास घडे, ' या **विशेष** अर्थाचें कथन केलें आहे.

साकी.

हळू हळू मग तारामंडळ चमकायाला लागे,
ठीकचि तेजा क्षुद्रहि चढती अधिराजाच्या मागें १

कृष्णाकुमारी.

या पद्यांत [चंद्र आकाशांत नसतां] ' तारीमंडळ चमकणें ' ही **विशेष** गोष्ट सांगितली आहे. द्वितीयार्धांत ' क्षुद्रहि अधिराजाच्या मागें तेजा चढती, ' या **सामान्य** अर्थानें तिचें समर्थन केलें आहे.

आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

तदितर खग भेणें वेगळाले पळाले,
उपवनजलकेली जे कराया मिळाले;
स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो,
कठिण समय येतां कोण कामास येतो? १

• रघुनाथपंडित.

वरील उदाहरणांत अर्थांतर **साधर्म्यानें** झालें आहे. कोठें कोठें तें **वैधर्म्यानेंही** होतें. जसें:—

उपजाति.

आधीं परीक्षा पुरती करावी, मागोनि मैत्री कुशलें धरावी,
न जाणतां चित्त परस्परांचें, जें सख्य तें दुःखद होय साचें १

शाकुन्तल-अंक ५ वा.

ही **शार्ङ्गरवाची शकुंतलेप्रत** उक्ति आहे. येथें प्रथमार्धांत **विशेष** गोष्ट सांगितली आहे; तिचें उत्तरार्धांत **वैधर्म्यरूप सामान्य अर्थानें** समर्थन केलें आहे. ' परस्परांचें चित्त जाणतां जें सख्य तें सुखद होतें, ' असें वर्णन असतें तर तें **साधर्म्यानें** झालें असतें.

आणखी उदाहरणें:—

शालिनी.

सिंहाचा जो बाल तोही चपेटा, मारी त्याला जो करी मत्त मोठा;
तेजस्वी जे वृत्ति ऐशी तयांची, तेथें कांहीं चाड नाहीं वयाची. १

मराठी चवथें पुस्तक.

शिखरिणी.

पदार्थाच्यां योगाप्रति किमपि अभ्यंतरिं बसे,
निमित्त प्रीतीला उघड उपधी कारण नसे;
प्रकाशीं भानूच्या कमल उमले वासहि सुटे,
झिंबूच्यां पाषाणा उदयिं विधुच्या पाझर फुटे!

उत्तररामचरित्र.

शिखरिणी.

न तेजस्वी साहे प्रकटपरतेजोबलमदा,
जयाचा जो आहे प्रकृतिगुण लोपे नच कदा;
मयूखांनीं जेव्हां प्रखरतर चंडांशु तपतो,
रविग्रावा तेव्हां अनलसम तेजास वमतो १

उत्तररामचरित्र.

उपजाति.

रक्षी रवीपासुनि जो तमाला, जसा गुहेमाजि उलूकमाला;
मोठ्याकडे जो शरणार्थि आला, विसंबती ते न कधीं तयाला १

कु. सं.

गीति.

कृष्ण म्हणे राधेया! भला बरा स्मरसि आजि धर्मातें,
नीच व्यसनीं बुडतां, निंदिति दैवास, न स्वकर्मातें १
मागेंचि तुम्ही भजता धर्माला तरि तुम्हांस वांचविता,
आतां मरा, न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचविता २
मागेंचि धर्म करिता जरि देता राज्य धर्म वांचविता,
न जगे तो दुर्भिक्षव्यसनापूर्वी न धान्य सांचविता ३

मोरोपंत कर्णपर्व.

शार्दूलविक्रीडित.

नक्षत्रें परिवार ज्यास पतिही जो ओषधींचा असे,
ज्यातें पाहुनि हर्षती जनसुधा ज्याच्या शरीरीं वसे;
होई तेज कमी तयाहि विधुचें, येतां रवीच्या गृहीं,
ज्या येई लघुता न अन्यसदनीं, ऐसा न कोणीचही १

पद्यरत्नावली.

शार्दूलविक्रीडित.

देखोनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी,
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी;
देशी ताप परी जसा वरिवरि येशी नभीं भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा १

पद्यरत्नावली.

काव्यलिंग अलंकारांत सामान्यविशेषभाव नसतो; तो प्रस्तुत अलंकारांत अवश्य आहे. **प्रतिवस्तूपमे**मध्यें सादृश्य विवक्षित असतें. यांत सादृश्य विवक्षित असून शिवाय समर्थन विवक्षित असतें. **दृष्टांतालंकारा**मध्यें सामान्यानें सामान्याचें व विशेषानें विशेषाचें समर्थन असतें. **काव्यलिंग, अनुमान** आणि **अर्थान्तरन्यास** या तीन अलंकारांना **प्रतापरुद्रकारांनीं तर्कन्याय**मूल अलंकार असें नांव दिलें आहे.

श्लेष.

वाक्यामध्यें एकाच शब्दांचे अनेक अर्थ विवक्षित असतात तेथें **श्लेष** नामक अलंकार होतो.

श्लिष्ट शब्दाचा पर्याय शब्द योजूनही जेथें श्लेषचमत्कार कायम राहतो तेथेंच प्रस्तुत **अर्थश्लेष** हा अलंकार होतो. **शब्दश्लेष शब्दालंकार**प्रकरणांत दिला आहे.

पृथ्वी.

तुम्हांसमचि हे गुणें, अणु उणें नसे नाम, हा
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा;
सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका,
छळीन न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ! १

केकावली.

यांत अधोगति हा शब्द **श्लिष्ट** आहे. याच्या बद्दल ' दुर्गति ' असा पर्यायशब्द घातला तरी अर्थहानि होत नाहीं.

स्रग्धरा.

गेला लोकान्तरातें दिनकर सकला द्योतवी जो जगातें,
अस्तातें जाय तोही हिमकिरण जया सौख्यदा विश्व गातें;
मेघांनीं व्याप्त ऐशा गगनिं नच दिसे एक ताराहि कोठें,
रे खद्योता ! अतां तूं चमक बहु, तुझें दैव बा फार मोठें १

पद्यरत्नावली.

यांत ' लोकान्तर ' हा शब्द श्लिष्ट आहे. याबद्दल ' भुवनान्तर ' असा पर्याय योजला तरी अर्थहानि होत नाहीं.

गीति.

तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भवपणेंहि कच साचं,
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि नाम कच सांच १

मोरोपंत-कचोपाख्यान.

या पद्यांत ' कुटिल ' या शब्दाबद्दल ' वक्र ' हा शब्द योजला तरी अर्थहानि होत नाहीं. यास्तव एवढ्या विशेषणापुरता येथें **अर्थश्लेष** आहे. दुसरीं बहुतेक विशेषणें परिवृत्त्यसह असल्यामुळें **शब्दश्लेषालंकार** उत्पन्न करणारीं आहेत. यास्तव प्रस्तुत पद्य **उभयश्लेषात्मकाचें** उदाहरण होय.

व्याजस्तुति.

वरून स्तुति परंतु आंतून निंदा; किंवा वरून निंदा परंतु आंतून स्तुति अशा प्रकारचें वर्णन असतां **व्याजस्तुति** अलंकार होतो.

दिंडी.

बघुनि माझी हे कनकरूप काया,
कटकमुकुटादिक भूषणें कराया;
कशी आशा उपजली तुला राया?
थोर औदार्थ फार दया माया! १

रघुनाथपंडित.

ही हंसाची **नलराजाप्रत** उक्ति आहे. या दिंडींत शेवटल्या चरणांत वरून स्तुति परंतु आंतून निन्दा आहे. ' तूं फार अनुदार असून निष्ठुर आहेस, ' अशा अर्थामध्यें त्या चरणाचें पर्यवसान झालें आहे.

पृथ्वी.

पितामह वदे तदा प्रबळ तूं पृथानंदना!
रमेश रथि सारथी चतुर वागवी स्यंदना;
स्वयें गतवयस्क मी सरस वीर तूं रे नवा,
भिडे रणधुरंधरा! जय घडो सुखें वा न वा १

वामन.

ही **भीमाची अर्जुनाप्रत** उक्ति आहे. हिच्यांत वरून स्तुति पण आंतून निंदा आहे.

गीति

हो म्हणसी सुताचा, सूत, भला गा भला मला पदवी,
देसी, हे सीमा तव सुज्ञपणाचीच ! हें असें वदवी ?

गीति.

जातों गृहासि, झालों कृतकृत्य, प्राप्त मोक्षसमयज्ञ,
प्रेक्षुनि घालों कीं तूं धृतराष्ट्रसुता, गुणज्ञ समयज्ञ ?

मोरोपंत.

ही **शल्या**ची **दुर्योधना**प्रत उक्ति आहे. येथेंही वरून स्तुति पण आंतून निंदा आहे.

आणखी उदाहरणें:—

गीति.

सुतयौवराज्यवर मज देउनि गांधर्वविधि करून मला,
वरुनि न जाणें म्हणशी पुरुकुलीं तूंच सुज्ञ साधु भला ?

मोरोपंत-कर्णपर्व.

'बाळ्या ! आज एवढया पहांटेस उठून धडा पाठ करावयास बसलास ही अवदशा तुला कोठून आठवली !'

साहित्यशास्त्र.

गीति.

युद्धार्थ एक अश्वावरि बसतां तूं तुझे रिपुहि राया,
सप्ताश्वावरि चढती काय तुझा शौर्यगर्व मग वाया ?

अ. विं.

या पद्यांत **सप्ताश्व** हें पद श्लिष्ट आहे. **सात घोडे** आणि **सूर्यमंडल** असे याचे दोन अर्थ आहेत. तुझे रिपु सात घोड्यांवर आरूढ होतात, अशा अर्थानें बहिरून राजाची निंदा झाली. पण **सप्ताश्व** याचा 'सूर्यमंडल' हा अर्थ येथें विवक्षित आहे. यास्तव वस्तुतः राजाची स्तुति झाली. समरांत पतन पावणारे योद्धे सूर्यमंडलाचा भेद करून जातात या पुराण प्रसिद्धीकडे येथें कवीचें लक्ष आहे.

परिवृत्ति.

सम आणि सम, अधिक आणि ऊन, आणि ऊन आणि अधिक अशा पदार्थांचा विनिमय [अदलाबदल] वर्णिला असतां तेथें परिवृत्ति अलंकार होतो. याला विनिमय असेंही नांव आहे.

शिखरिणी

सुनृत्या देऊनी कुसुमित लतांना पवन हा,
हरी त्यांच्या चेतोहरपरिमलप्रौढिस पहा;
कटाक्षां पांथाच्या कुसुमित लता त्याच हरिती,
तया आधिव्याधि व्यतिकर अहाहा वितरती ! १

प्रथमार्धांत ' नृत्य ' आणि ' परिमल ' या **समान** वस्तूंची अदला-बदल वर्णिली आहे. द्वितीयार्धांत ' कटाक्ष ' आणि ' आधिव्याधि ' या **विषम** वस्तूंचा विनिमय कल्पिला आहे. येथें अधिकानें न्यूनाचा विनिमय आहे.

गीति.

घेउनिया भूपाला अमित तुझे खरतर प्रहार रणीं,
गर्वित अरिवीरनिकर अर्पिति तुज रत्नखाणि ही धरणी १

स्वकृत.

येथें न्यून घेऊन अधिक दिलें असा विनिमय वर्णिला आहे. प्रस्तुत अलंकारांत विनिमय कविप्रतिभानिर्मित असला म्हणजे तो सौंदर्यावह होतो. अन्यथा त्याला अलंकारत्व येत नाहीं.

आणखी उदाहरणें:—

गीति.

देवत्व मला देउनि आपण घे श्रीनिवास दासत्व,
जिव्हाश्रुतिहो, त्याचें गाउनि ऐकुनि निवा सदा सत्व १

कृ. वि.

देउनि सुतरत्न करीं, घेउनि पतिचित्तवित्त ती गेली,
नेत्रोदकें तिघांच्या गंगा गंगातटी नवी केली १

जाय पुरीप्रति जोडी अपकीर्ति, सुकीर्ति हातिची दवडी,
मातेप्रति पोर जसें मुद्रा हरवूनि मेळवुनी कवडी १

वि. प.

तें दानपात्र उत्तम जो जन यांच्या पदावरी लोळे,
निजपदपूजन घेउनि देती सर्वस्वदान हे भोळे १

कृ. वि.

आर्यार्ध.

तो एक बाण सोडुनि घेइ कटाक्षेंचि शत्रुसंपत्ति;

अ. वि.

प्रहर्षिणी.

स्वर्गामी प्रगतवया जटायु त्याचें नाहीं कीं किमपिहि शोचनीय साचें;
कीं लोकीं शशिकरकांतकीर्ति ज्यानें अर्जीली जरठकलेवरव्ययानें १

अ. वि.

भाविक.

मागें झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या गोष्टी प्रत्यक्ष होत आहेत असें वर्णिलें असतां तेथें **भाविक** अलंकार होतो.

स्रग्धरा.

तो राजा, सौख्यही तें, सुखद दिवस ते, तीं मुलें, तींहि बाळें,
आलें सारें स्मृतींतें प्रिय सुहृदजना पाहतां दीर्घकाळें;
ऐशा दुःखांत तूझ्या सहजचि सखिचें नष्टलें सर्व भान,
प्राया चित्त स्त्रियांचें मृदुलचि असतें जातिपुष्पासमान १

उ. रा. च.

यांत **अरुंधती** मागील गोष्टी हल्लीं डोळ्यासमोर दिसत आहेत असें म्हणते आहे, असें वर्णन आहे.

शार्दूलविक्रीडित.

गेलें कुंकुम भाळिचें न कळतां घर्माबुनें ही जरी,
शोभे फार ललाट अंकरहिता त्या चंद्रखंडापरी;

भूषाहीनहि कर्ण रम्य सुरुची गालावरी ज्यास तें,
गे माझ्या नयनांपुढें मुख तुझें प्राणप्रिये दीसतें १

उ. रां. च.

ही रामाची जानकीसंबंधानें उक्ति आहे. हिच्यांत जानकीच्या गतकालीन स्थितीचें रामचंद्र प्रत्यक्षासारखें वर्णन करीत आहे, असें दर्शविलें आहे.

गीति.

स्मरतें कीं तें जें श्रीगुरुदारांहींच इंधनानयना
पाठविलें विपिनाला, माझ्या दिसतें तपोधना ! नयना १
तें रज, ती वृष्टि तशी, त्या करका, तें तमिस्त्र, तो पवन,
लोप वनस्थलमार्गज्ञानाचा, काय तें सकोप वन २
हिंडों धरुनि परस्पर कर खरकर तिळहि न करि अनुकंपा,
शंपा दे भय तमही न मही पथ, पावल्या स्वतनु कंपा ३

मोरोपंत-कृ. वि.

ही श्रीकृष्णाची आपला परमप्रिय मित्र सुदामजी याजप्रत उक्ति आहे. गुरुगृहींच्या गोष्टींचें, त्या प्रत्यक्ष होत आहेत असें, येथें श्रीकृष्ण वर्णन करीत आहे. आणखी उदाहरणः—

इंद्रवज्रा.

तें हें जनस्थान खरादिकांचें, जें जाहलें स्थानचि राहण्याचें;
जें जें इथें वृत्त घडोनि आलें, प्रत्यक्षसें तें तें मज आज झालें १

अ. द.

अनपत्यत्वामुळें खिन्न झालेल्या विलासवती राणीप्रत तारापीड राजाची कादंबरीमध्यें उक्ति आहे ती खाली देतों. या उक्तींत पुढें होणाऱ्या गोष्टी आतांच होत आहेत, असें वर्णन आहे.

'प्रिये ! जसें तुला दुःख वाटतें तसें मलाही अनपत्यत्वाचें दुःख वाटतें. आपणांस पुत्र झाला असें आनंदाचें वर्तमान सांगून सेवकजन मजपासून बक्षीस कधीं घेईल; मुलास मांडीवर घेणारी व जीचें वस्त्र हळदीनें पिंवळें

झालें आहे अशा प्रकारची तूं माझ्या दृष्टीस पडून मला कधीं आनंदविशील; ज्यांच्या कपाळीं दृष्टीचा अंगारा लावला आहे, ज्याच्या गळ्यांत गोरोचना लावून पिंवळें केलेलें व गांठी दिलेलें सूत बांधलें आहे, आणि ज्याचें मुख दंतरहित असून हास्यानें सुशोभित दिसत आहे असा बालक माझ्या चित्तास कधीं आनंद देईल; मंगलदीपाप्रमाणें ज्या बालकास हातीं घेऊन स्त्रिया इकडे तिकडे फिरवीत आहेत व ज्यास पाहून सर्व लोकांस आनंद हात आहे असा बालक माझा शोकरूप अंधकार कधीं नाहींसा करील; ज्याचें शरीर धुळीनें मलिन झालें आहे व माझ्या दृष्टीस व मनास घेऊन इकडे तिकडे रांगत फिरत आहे असा बालक माझ्या घराचें अंगण कधीं शोभवील; घरीं बाळगलेले मृग, हंस, सारस यांस धरावयाला त्यांच्या मागें लागलेला, हत्तीच्या छाव्याप्रमाणें नानाविध लीला करणारा, अनेक प्रकारच्या खोड्या करणारा, आणि मणिमय भूमितलावर आपलें पडलेलें प्रतिबिंब मोठ्या कौतुकानें पाहून अडखळत चालणारा असा बालक मी कधीं पाहीन; ज्याला उचलून घ्यावयासाठीं हजारों राजे आपले हात पुढें करीत आहेत व ज्याची दृष्टि भूषणांच्या मण्यांच्या कांतीनें दिपून चंचल झाली आहे असा माझा बालक माझ्यापुढें सभेंत फिरतांना मी कधीं पाहीन; असें आणि अशा प्रकारचे शेकडों मनोरथांचें चिंतन करीत व अंतःकरणांत दुःख मानीत माझ्या रात्री दुःखांत जात आहेत.

परशुरामपंत-कादंबरीसार.

प्रस्तुत अलंकारांत मागें झालेल्या व पुढें होणाऱ्या गोष्टी त्या त्या काळांत झाल्या किंवा होणाऱ्या आहेत याविषयीं शंका नसते.

पर्यायोक्त.

एखाद्या वस्तूचे वाच्यवाचक शब्द न योजतां पर्यायानें वर्णन असलें म्हणजे **पर्यायोक्त** अलंकार होतो.

गीति.

ऐसें ऐकुनि साध्वी 'मध्यमपतिच्या मुखाकडे पाहे,
जिष्णु म्हणे ' या प्रभुच्या वचनीं विश्वास आमुचा आहे' १

मोरोपंत—वनपर्व.

येथें ' मध्यमपति ' या पदानें **अर्जुन** व्यंजित आहे. ' मध्यमपति ' हा शब्द **अर्जुनाचा** वाचक नाहीं; किंवा **अर्जुन** हा शब्द त्याचा **वांच्यार्थ** नाहीं; यास्तव येथें **पर्यायोक्त** अलंकार झाला.

गीति

पाहोनि पांडवांचीं रूपें तो विश्वभावन वनीं तीं,
पावे त्या भावातें जो तपिं होय भाव नवनीतीं ! १

. मोरोपंत वनपर्व.

येथें प्रथमार्धात ' विश्वभावन ' या पदानें **कृष्ण** सुचविला आहे; आणि दुसऱ्या अर्धात ' लोण्यासारखा द्रवला ' असें न म्हणतां तो अर्थ पर्यायानें वर्णिला आहे.

साकी.

जन्मुनि कवण्या राजर्षींचा वंश अलंकृत केला;
आत्मवियोगें देश कोणता पावविला दुःखाला ? १

शाकुन्तल.

ही **अनसूयेची दुष्यंताप्रत** उक्ति आहे. यांत 'आपलें नांव गांव काय'? असें प्रत्यक्ष न विचारतां तेंच पर्यायानें तिनें राजाला विचारिलें आहे.

' प्रियंवदा--(पलीकडे दृष्टी लावून) **अनसूये** ! हें पहा आमच्या हरिणीचें पाडस घोंटाळल्यासारखें होऊन इकडे तिकडे पहात आहे आणि आपल्या आईला शोधीत आहे. चल त्याला तिजकडे पोंचवूं. '

शाकुंतल.

येथें **दुष्यंताची** व **शकुंन्तलेची** गांठ घालून देण्याकरितां **प्रियंवदेनें** आम्हीं आतां येतों, असें प्रत्यक्ष न म्हणतां चातुर्यानें हरिणाला त्याच्या आईकडे पोंचविण्याचा बहाणा करून निघून जाण्याची युक्ति योजिली आहे !

उदात्त.

एकाद्या वस्तूची संपत्ति, समृद्धि किंवा ऐश्वर्य वर्णिलें असतें तेथें **उदात्त** अलंकार होतो.

साकी.

हिरे अमोलिक, रत्नें सुंदर रम्य शिलांचे खंड,
मंडित करिती गिरिराजाला ओषधि तोंवि उदंड १

प. मं.

येथें हिमालयाचें ऐश्वर्य वर्णिलें आहे.

पृथ्वी.

सुवर्णरजतादिकीं विमलधातुंनीं रंजिता,
महार्घमणिमंडिता विपुलसस्यशोभान्विता;
म्हणोनिच वसुंधरापद ज़री मही सुंदर,
प्रभो ! कृति तुझीच ही वदति मान्य विद्वद्वर १

हें पृथ्वीच्या समृद्धीचें वर्णन आहे.

जो रत्नस्तंभपतित प्रतिबिंबशतांत ओळखींत न ये,
ओळखिला तो लंकापति मग यत्नेंचि अंजनीतनयें १

अ. वि.

येथें रावणाच्या मंदिराची संपन्नता वर्णिली आहे.

आणखी उदाहरणें:—

पृथ्वी.

जगद्गुरुमहेश्वरप्रभुशिरीं जिचें नांदणें,
जिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें;
प्रजा हरिहरा अशा यदुदरीं अनेका कवी,
भिऊनि म्हणतील कीं जशि सुधा तशी काकवी १

केका.

'राजा उठतांच सर्व राजे उठले. त्या वेळेस इतकी गर्दी झाली कीं एकमेकांच्या बाहुभूषणांच्या टोंकांनीं एकमेकांचीं वस्त्रें फाटलीं. कित्येकांच्या गळ्यांतील फुलांचे हार तुटले. अंगास अंग घासल्यामुळें अंगास लावलेल्या अरगजाचा धुरळा उडून दिशा पिवळ्या दिसूं लागल्या. गमनकाळीं राजास आधीं आपण नमस्कार करावा अशी इच्छा करून खालीं लवणाऱ्या राजांच्या गळ्यांतील मोत्यांचे हार रत्नभूमीवर लोळूं लागले, व त्यांच्या कानावरील कमळें गालावर लोंबूं लागलीं. मस्तकावरील जाईच्या फुलांचे तुरे हालल्यामुळें जो सुवास पसरला त्याच्या लोभानें भ्रमरांचे थवे मंडपांत उडूं लागले. त्या काळीं चवऱ्या खांद्यावर घेऊन

इकडे तिकडे फिरणाऱ्या दासींच्या मणिमय पादभूषणांच्या शब्दांनीं संचार करणाऱ्या वारविलासिनींच्या रत्नमय मेखलांच्या मनोहर शब्दांनीं, वेगानें उठलेल्या हजारों मांडलिक राजांच्या पादाघातांनीं हदरलेल्या सभामंडपांत जो मेघगर्जनेसारखा शब्द उठला त्या शब्दाच्या योगानें; राजमंदिरांतील हंस, सारस यांच्या शब्दांनीं; चोपदारांनीं ज्या वारंवार केलेल्या ललकारा त्यांच्या शब्दांनीं; मंगलपाठ करणाऱ्या भाटांच्या जयजयकारशब्दांनीं; मांडलिक राजांचीं मणिमय भूषणें दाटीमुळें मणिमय स्तंभांवर आपटल्यामुळें व मुकुटांला मुकुट घांसल्यामुळें जे खणखण शब्द झाले त्यांच्या योगानें; तो सभामंडप दणाणून गेला.'

परशुरामपंत–कादंबरीसार.

समुच्चय.

कार्यसिद्धीला एकच हेतु पुरेसा असतां तो सांगून दुसरेही हेतु सांगितले असतात तेथें **समुच्चय** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित.

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें ये कामिनीला जरा,
पद्मावीण जलें, निरक्षर मुखीं जो नेटका गोजिरा;
दात्याला धनलोभ नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं;
दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं, हीं सात शल्यें मनीं. १

वामन.

येथें ' चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ' हा एकच हेतु मनाला शल्यवत् पीडा देण्यास समर्थ आहे, तथापि त्याच्या बरोबर इतर हेतूंचें या पद्यांत कथन केलें आहे.

प्रहर्षिणी.

दुर्वार स्मरशर, कान्त दूर, चित्तीं
उत्कण्ठा, नव वय, वंश शुद्धकीर्ति;
आली या अचतुर, कालही वसंत,
मेला हा विरह न देतसे उसंत ! १

स्वकृत.

ही एका विरहिणीची उक्ति आहे. विरह सहन न होण्याला 'स्मरशर' हा एकच हेतु पुरेसा असून इतरही हेतूंचें येथें कथन केलें आहे.

पृथ्वी.

मुनीतपथ सेवणें, मलिन कर्म मानोचि ना,
घडो मरण नावडे खलजनाप्रति प्रार्थना;
विपत्तिसमयांतही प्रकटवीच ना दीनता,
भल्याविण असिव्रतें करुं शकेल हो कोणता ?

वामन.

येथें 'न्यायानें चालणें' हा एवढाच हेतु भलेपणा सिद्ध करण्याला पुरेसा असतां इतरही हेतूंचें कथन केलें आहे.

स्रग्धरा.

दान प्रच्छन्न कोणी जरिहि सदनीं ये आदरातिथ्य त्याचें,
लक्ष्मीमाजी न माजे, करिहि परकथालेशनिंदा न वाचे;
लोकांच्या अत्यभीष्टा करि परि न वदे वर्णि जें तत्कृतातें,
शास्त्रीं अत्यंत सक्ति प्रकट कथितसे सत्कुलीना नरातें ?

अ. बि.

'प्रच्छन्न (गुप्त) दान' हा एकच हेतु 'सत्कुलीनत्व' सिद्ध करण्यास पुरेसा असून अन्य हेतूंचेंही येथें उपादान केलें आहे.

गुण आणि **क्रिया** हीं एकाकाळीं अविरोधानें घडून आलीं असतांही **समुच्चय** अलंकार होतो.

गीति.

तव संततिच न केवळ बुडविलि निखिला महीहि या पापें,
निर्दय, निर्भय, निस्त्रप, भस्म करावाचि हा तुवां शापें ?

मोरोपंत-स्त्रीपर्व.

यांत निर्दयपणा, निर्भयपणा, आणि निर्लज्जपणा या गुणांचा एकाकालींच अविरोधानें योग इष्ट आहे.

स्रग्धरा.

तूं जें प्रेमाभिधानें अभिनव हृदयीं रोंविलें नायका तें,
ठेवोनी शल्य चित्तीं परिस करितसे काय जें नायिका ते;

निद्रा घे शुष्क होई स्तिमित बरळते म्लानही होय कांपे,
श्रांता लोळेहि नाशे गळुनि पडतसे मूर्च्छिता क्षीण तापें १.

अ. वि.

ही नायकांप्रत नायिकाविषयक कोणाची उक्ति आहे. येथें क्रियांचा एका काळीं अविरोधानें योग वर्णिला आहे. यांतील कांहीं क्रियांचा वस्तुतः कालभेद आहे; तथापि विरहव्यथातिशय सुचविण्याकरितां त्यांचें समकालत्व गृहीत आहे. आणखी उदाहरणः—

शार्दूलविक्रीडित.

म्यां हे क्षत्रियपुत्रकंठ चिरतां वाहूंच जी लागली
रक्ताची तटिनी तिच्याच मग मी स्नानास गेलों तळीं,
केले केंसच दर्भ मत्पितृगणां रक्तांजळी अर्पितां
तोषे, निंदितसे, कृपायुत दिसे, त्रासे हंसे तो स्वतां १

प्रसन्नराघव–अं. ४.

समाधिनामक अलंकारांत कारणें समबल नसतात. त्यांत कार्य एकाच कारणबलानें व्हावयाचें असतें. तें एकाएकीं अन्यकारणांचा योग होऊन सुकर होतें, इतकेंच. प्रस्तुत अलंकारांत सर्व कारणें समबल असतात; व सर्व मिळून कार्योत्पत्ति करितात; अन्यकारणांनीं कार्यसुकरता यांत नसते. **काव्यलिंगांत** केवळ हेतूचीच विवक्षा असते. हेतूंची संख्या किंवा प्रधानाप्रधानता यांचा त्यांत विचार नसतो. प्रस्तुत अलंकारांत एक हेतु कार्योत्पत्ति करीत असतां त्याला इतर हेतूंची जोड मिळते. **दीपकालंकारांत** क्रिया क्रमानें वर्णिल्या असतात. **समुच्चयामध्यें** त्या एका काळींच घडल्या असें कथन असतें.

यथासंख्य.

क्रमानें उक्त असलेल्या पदार्थांचा क्रमानेंच दुसऱ्या पदांशीं अन्वय केला म्हणजे तेथें यथासंख्य अलंकार होतो.

उपजाति.

तृणें मृगाला सलिलें झषाला, संतोष हे वृत्ति महाजनाला;
तयास निष्कारण तीन वैरी, किरात कैवर्तक दुष्ट भारी १.

वामन.

यांत मृग, झष (मासा), महाजन (थोरलोक), या क्रमानें उक्त अशा पदार्थांचा किरात (पारधी), कैवर्तक (धीवर), आणि दुष्ट (दुर्जन) यांच्याशीं क्रमानेंच अन्वय केला आहे. आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

मानी मनोजशर हार तुरें फुलांचे,
कंदर्पकोपवचनें ध्वनि कोकिलांचे;
राकाशशी मदनदर्पण भाविलाहे,
नेघेचि तो न परिसे न तयासि पाहे १

रघुनाथपंडित.

गीति.

निवर्वी मज मातासी श्रीमत्त्र्यंबकजटोद्भवा गंगा,
स्मरणें, स्तवनें, स्नानें शुचि करिती विश्वचित्तवागंगा १

मोरोपंत—सीतारामायण.

गीति.

जयभीमवधविषयीं कर्णसुयोधन करोत बकबक रे,
कैसे करितील तिमिग्रास दहनमेषभंग बक बकरे ? १

मोरोपंत- द्रोणपर्व.

गीति.

देवत्व मला देउनि आपण घे श्रीनिवास दासत्व,
जिव्हाश्रुति हो ! त्यांचें गाउनि ऐकुनि निवा सदा सत्व १

मोरोपंत-ह. वि.

अभंग

घरां येतां वधूवर शेला पागोटें आहेर.

सा. शा.

पर्याय.

एकाच वस्तूला क्रमाक्रमानें अनेक आश्रय वर्णिले असतां पर्याय अलंकार होतो.

शिखरिणी.

तुझी वसति जाहली प्रथम अर्णवा भीतरीं,
नियोनि निघुनी पुढें वसति ईशकंठान्तरीं;

असाधुमुखिं संप्रति प्रकट होशि; ही लाभली.
स्थलान्तरकला कुठें ? वद, हलाहला ! बा भली.

स्वकृत.

यांत **हालाहल**ाला प्रथम 'अर्णव' (समुद्र) हा आश्रय सांगितला आहे; पुढें '**शिवाचा** कंठ' हा आश्रय कथन केला आहे; नंतर 'दुर्जनाचें मुख' हा आश्रय दर्शविला आहे. याप्रमाणें **हालाहल** या एकाच विषविशेषाला क्रमानें वेगळा वेगळा आश्रय सांगितला आहे.

अन्य उदाहरणें:—

गीति.

या दुष्टाप्रति आलें सोडुनि मेल्या दशानना शील,
ती कोणा धीराच्या धृतिला माझी दशा न नाशील ?

मोरोपंत–वनपर्व.

येथें शीलाला अनेक आश्रय सांगितले आहेत.

एकाच ठिकाणीं अनेक वस्तूंची स्थिति क्रमानें वर्णिली असतां तेथेंही कोणी हाच अलंकार मानतात. जसें:—

शार्दूलविक्रीडित.

धाता निर्दय काय हो पसरला अंधार त्या सागरीं,
गेलें विश्व बुडोनि अन्य युग हें आलें कसें अंतरीं;
जेथें नीलपयोजहारच वसे त्या जानकीच्या अहा !
कंठीं रावणखड्ग हा पडतसे आश्चर्य मोठें पहा ! १.

प्रसन्नराघव.

येथें **जानकीकंठ** या एका वस्तूच्या ठिकाणीं 'नीलकमलहार' व 'रावणखड्ग' यांची क्रमानें स्थिति वर्णन केली आहे.

स्रग्धरा.

भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें,
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें;
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला त्या गुहेमाजि आतां
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां ?

प. र.

येथें " गुहा ' या एका वस्तूच्या टिकाणीं ' सिंह ' व ' कोल्हे ' यांची स्थिति क्रमानें वर्णिली आहे.

आश्रयाचा उत्तरोत्तर संकोच वर्णिला असतो तो तेथें **संकोचपर्याय** अलंकार होतो.

वसंततिलक.

आधीं फिरोनि बहुधा वसुधाहि सारी,
छायेंत येइ तरुच्याहि उसंत भारी;
हा प्रौढ चंडकर मध्यदिनास येतां,
तें शैत्य जाय उदकांत हळूच आतां १

अ वि.

यांत शैत्याच्या आश्रयाचा उत्तरोत्तर संकोच वर्णिला आहे; म्हणजे तें प्रथम सगळ्या पृथ्वीवर पसरलें होतें, पुढें तें तरूच्या छायेंत येऊन बसलें, तेथून तें पुढें मध्यान्हीं उदकांत प्रविष्ट झालें असें येथें वर्णन आहे.

एक आधार कायम असून दुसऱ्या आधारांची ही विद्यमानता वर्णिली असते तेथें **विकासपर्याय** अलंकार होतो.

गीति.

बिंबाधरींच पूर्वी राग तुझ्या सुतनु जो दिसत होता,
तो हरिणशावनयने ! हा तव हृदयींहि दिसतसे आतां १

अ. वि.

येथें ' राग ' शब्द श्लिष्ट आहे. ओंठाकडे लाली व हृदयाकडे अनुराग म्हणजे प्रेम असा अर्थ घ्यावयाचा. येथें रागाचा मूळचा आश्रय बिंबाधर. तो कायम राहून शिवाय हृदय हा दुसराही आश्रय वर्णिला आहे; यास्तव येथें **विकास**पर्याय.

परिकर.

विशेषणें सहेतुक असलीं म्हणजे **परिकर** अलंकार जाणावा.

द्रुतविलंबित.

कुसुमबाण असोनि अनंगही; मदन जिंकितसे अखिला मही;

या श्लोकार्धांत ' कुसुमबाण ' आणि ' अनंग ' ही विशेषणें सहेतुक

आहेत. ' ज्याचे बाण अत्यंतमृदु कुसुमें आणि जो अंगविहीन त्या मदनाला मही जिंकणें शक्य नव्हे, ' असा या श्लोकाचा भावार्थ आहे.

गीत्यर्ध.

' शिव तुमचा ताप हरो जा शिरिं धरि इन्दुमय अलंकार. '

अ. बि.

येथें ' शिरिं धरिं इन्दुमय अलंकार ' या विशेषणांत ताप हरण करण्याचें सामर्थ्य गर्भित आहे, म्हणून हें सहेतुक विशेषण होय; आणि विशेषण सहेतुक असल्यामुळें **परिकरालंकार** होय.

स्रग्धरा.

आम्हीं आहों तपस्वी शमधन, कुळही श्रेष्ठ तूझें जगांत;
हीची प्रीती असे जी तुजवरि सहसा आणुनि हें मनांत;
ठेवी सन्मान हीचा त्वदितरललनातुल्य याहून कांहीं,
दैवें होणार होवो, स्वजनीं अणिक तें सांगणें योग्य नाहीं १

राजवाडे-शाकुन्तल-अंक ४.

यांत ' शमधन, ' ' तपस्वी ' इत्यादि विशेषणें सहेतुक आहेत. ' **शकुंतले**चा अनादर करशील तर तुला शापून भस्म करण्याचें सामर्थ्य आमच्यामध्यें आहे, ' असा या **कण्वोक्तींत** गर्भित अर्थ आहे.

अहेतुक विशेषणें योजलीं असतां **अपुष्टार्थत्व** नामक दोष उत्पन्न होतो. तेव्हां विशेषण साभिप्राय असणें हा दोषाचा अभाव मात्र आहे; तेथें कांहीं अलंकार संभवत नाहीं; अशी शंका येईल. तथापि साभिप्राय विशेषणें विशेष चमत्कार उत्पन्न करणारीं असतात; यास्तव त्यांची अलंकारांत गणना केली आहे. विशेषणें अनेकच पाहिजेत असेंही नाहीं. प्रस्तुत अलंकारांत **व्यंग्यार्थ वाच्यार्थाचा परिकर** (अंगभूत) मानतात म्हणून त्याला **परिकर** असें नांव दिलें आहे.

आक्षेप.

प्रथम केलेल्या विधानाचा निष्फलपणा मनांत आणून त्याचा निषेध केला असतो तेथें **आक्षेप** अलंकार होतो.

वसंततिलक.

माझा भुज स्फुरतसे परि आश्रमाचें,
हें स्थान शांत फळ कोठुनि येथ याचें !
किंवा असेल भवितव्यचि जें जयाचें,
सर्वत्रही घडतसेचि सुचिन्ह त्याचें १

राजवाडेकृत–शाकुंतल–अंक १

ही दुष्यंताची कण्वाश्रमांत शिरतांना उक्ति आहे. प्रथमार्धांतील विधानाचें वैफल्य राजाच्या मनांत येऊन त्यानें उत्तरार्धांतील विधानानें तें विचारपूर्वक खोडून टाकलें आहे.

पृथ्वी.

तसाच उरलों कसा पतित मीं नसें काय ? कीं
कृपाचि सरली ? असें हि न घडे जगन्नायकीं;
नसेन दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवी,
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विष, क्षीर वी १

केकावली.

यांत ईश्वराच्या कृपालुत्वादिकांविषयीं आक्षेप घेऊन त्यांचें निराकरण केलें आहे.

गीति.

इतुक्या वृद्धपणीं कां निजशी निःशंक ? पातला काळ!
अथवा सुखें निजावें जननी भागीरथी उभी जवळ ! १

म. भा. वि.

या आर्येत प्रथमार्धांतील विधान द्वितीयार्धांतील विधानानें विचारपूर्वक खोडून टाकलें आहे.

ज्या वस्तूविषयीं बोलणें इष्ट असतें तिचा निषेध केल्या सारखें दाखवून अन्य गोष्टींचें कथन केलें असतांही हाच अलंकार होतो.

गीति.

ज्योत्स्ना मौक्तिकमाला चंदनरस चंद्रकांतनिष्यन्द,
कदली कर्पूर तशीं मृणालवलयें नवे कमलकंद १

सखया! तव विरहानें तिज हे शीतल पदार्थ तापविती,
अथवा कथा कशाला ही सांगूं! मौन हेंच योग्य अति २

स्वकृत.

यांत नायिकेचा विरहसंतापाविषयीं बोलणें इष्ट आहे. पण त्याचा निषेध केल्यासारखें दाखविलें आहे.

वरील सर्व उदाहरणांत **उक्तार्थाचा निषेध** दाखविला आहे. कोठें कोठें **वक्ष्यमाण अर्थाचा निषेध** दाखविल्यासारखें केलें असतें. जसें:—

गीति.

रे निष्करुणा मित्रा! तुजला वृत्तांत सांगतों त्याचा,
अथवा नको, मरो तो! भोगुनि परिणाम निज कुकर्माचा. १

स्वकृत.

यांत कोणी एकाला आपल्यां मित्राजवळ दुसऱ्या एका मित्राची अत्यंत अनुकंपनीय स्थिति निवेदन करावयाची आहे. तथापि तिचा निषेध केल्यासारखें दाखविलें आहे.

अर्थान्तरावर पर्यवसित होणाऱ्या निषेधाच्या आभासालाही कोणी कोणी **आक्षेप** म्हणतात.

गीत्यर्ध.

'दूती न मी परि तिचा प्रलयानलसाच साच तनुताप.'.

अ वि.

हें एका दूतीचें भाषण आहे. त्यांत 'दूती न मी,' असा निषेध आहे, तो केवळ भासमान असून 'मी दूती म्हणून हें सांगत नाहीं' इ० अर्थान्तरावर पर्यवसित झाला आहे.

विधि व्यक्त असून निषेध गुप्त असतो तेथेंही **आक्षेप**च समजतात.

गीति.

प्राणप्रिया! गमन तव चिरकाळ शके न ताप द्यायाला,
जरि जाशिल तरि जावें शंकाहि नको मनांत यायाला १

स्वकृत.

या पद्यांत ' चिरकाळ शके न ताप घायाला, ' अशा रीतीनें आपलें मरण सुचवून गमनाचा निषेध गुप्तपणें सांगितला आहे. उत्तरार्धांत विधि व्यक्त आहे.

व्याजोक्ति.

एकाद्या वस्तूचें स्वरूप व्यक्त असून कोणत्या तरी निमित्तानें त्याचें गोपन केलें असतां **व्याजोक्ति** अलंकार होतो.

वसंततिलक.

मार्गी विलोकुनि हरीप्रति सत्यभामा, आलींसमक्षहि धरी अनुरागसीमा;
रोमांचकंप जंव सूचविती तयांतें, तें ते प्रणाम करुनी लपवीच त्यांतें १

येथें **श्रीकृष्णाला** पाहून **सत्यभामे**च्या अंगावर प्रेमानें रोमांच व कंप उत्पन्न झाले आहेत हें स्पष्ट आहे. पण प्रणामरूप निमित्तानें, ते प्रेममूलक नसून भक्तिमूलक आहेत, असें तिनें भासविलें आहे; असें येथें वर्णन आहे.

आणखी उदाहरणः—

साकी.

कथाप्रसंगें गोपसमाजीं कर्णीवरती आली
कृष्णकथा; तें पुलक थरारे धर्मबिंदुयुत गालीं १
अशी कुलवधू आश्चर्यानें कालियमर्दन वानी
फार भयंकर गरलज्वाला निघति यदास्यांतूनी २

म. भा. वि.

अपन्हुति अलंकारांत प्रस्तुत व अप्रस्तुत यांतील साम्य विवक्षित असतें. प्रस्तुत अलङ्कारांत साम्य विवक्षित असलें तरी ज्यांमध्यें साम्य त्या वस्तु प्रस्तुतच असतात. वरील उदाहरणांत अनुराग आणि प्रणाम, व अनुराग व आश्चर्य हीं अनुक्रमें प्रस्तुत आहेत. **अपन्हुती**मध्यें उपमेयाचा निषेध करून उपमानाची सिद्धि केलेली असते. प्रस्तुत अलंकारांत निषेध कशाचाच नसतो. अन्यनिमित्तामुळें वस्तुस्वरूप आच्छादिलें असतें इतकेंच. ' **छेकापन्हुतींत** भाषणाच्या फिरवाफिरवीनें सत्य

अर्थाचें आच्छादन केलें असतें; व्याजोक्तींत अन्यकारण सांगून त्याचें आच्छादन केलें असतें.' अ. वि.

समाधि.

आरंभिलेल्या कार्याला अन्य कारणामुळें सौकर्य उत्पन्न झालें असें वर्णिलें असतां **समाधि** अलंकार होतो.

गीति.

दूर कराया सखिचा मान तिच्या पदिं विलीन होणार,
तों घनगर्जित झालें मजवरति करावयास उपकार १

यांत, ' पदिं लीन होणें, ' हें, मान दूर करण्याचें, पहिलें कारण आहे. त्याला 'घनगर्जित' या अन्य कारणाची सहज जोड मिळाल्यामुळें सखीची समजूत घालण्याचें काम अधिक सोपें झालें आहे असें वर्णन आहे. मेघ-दर्शन व मेघगर्जित ही विरहिजनाला प्रियसंगमाविषयीं उत्कंठित करितात अशी कवींची समजूत आहे. तिला अनुलक्षून येथें वर्णन आहे.

गीति.

अवलोकितांचि आधीं भुलला लावण्यकल्पलतिकेला,
त्यांत तिणें उचितादर सस्मितमधुरोदितेंहि अति केला १

मोरोपंत–आदिपर्व.

शकुन्तलेचें लावण्य हें मोह उत्पन्न करण्याला पहिलें कारण आहे. त्याला **शकुन्तले**नें केलेला आदर हें अन्यकारण जोडीला मिळालें आहे, त्यामुळें राजाचा **शकुन्तले**विषयीं अनायासें अधिक अनुकूल ग्रह झाला आहे असें येथें वर्णन आहे.

प्रत्यनीक.

बलवान् शत्रूचा सूड घेण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्याचा प्रतिपक्षी शत्रुकडील कोणाचा तरी सूड घेतो असें वर्णन असलें म्हणजे **प्रत्यनीक** अलंकार होतो.

गीति.

जे आपणांस जिंकिति त्या नयनांचेच मित्र हे कर्ण
हें आणुनि मनिं त्यांच्या शिरिं बसति पंकजें असितवर्ण ! १

सुंदर नयन नीलकमलांचा गर्व हरण करतात; आणि सुंदर नयन हे कर्णापर्यंत जाऊन भिडलेले असतात. यास्तव कर्णाचा व नयनांचा मित्रभाव स्थापित झाला. निळ्या कमळांचे जेव्हां नयनांपुढें कांहीं चालेना तेव्हां त्यांनीं त्यांचे मित्र जे कर्ण त्यांवर स्वारी केली ! असें या श्लोकांत वर्णन आहे. नीलकमलें हीं कर्णभूषणें असतात. या वस्तुस्थितीवर ही चमत्कारिक कल्पना बसविली आहे.

स्वागता

छेदि जो स्वशिर त्या यदुराया, राहु शक्त नव्हताचि बधाया;
तन्मुखच्छवि विधुमाधें राहे, त्यासि राहु म्हणुनी छळिताहे ! १

स्वकृत.

राहूचें शिर कृष्णानें छेदिलें. कृष्णाचा सूड राहूच्यानें घेववला नाहीं. तेव्हां कृष्णाच्या मुखाची कांति ज्यामध्यें त्या चंद्राच्या राशीस तो लागला ! असा या श्लोकाचा अर्थ आहे. पहिल्या उदाहरणांत नेत्रांचा व प्रस्तुत उदाहरणांत श्रीकृष्णाचा, उत्कर्ष द्योतित केला आहे.

आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

रे रे मना ! बघ मनोभवशासनाचें,
मीं वंदितों सतत अंध्रिसरोज साचें;
कां लोटिशी मज भवार्णविं हाय हाय !
तेणें तुझा तनयशोक निवेल काय !

महाराष्ट्रभामिनीविलास.

तद्गुण.

एकादी वस्तु आपला गुण टाकून जवळ असणाऱ्या विशेष उज्ज्वल अशा दुसऱ्या वस्तूच्या गुणाचा स्वीकार करते असें वर्णन असल्यास तेथें तद्गुण अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'अधरच्छाविनें तुझिया नासामौक्तिक गमेचि माणिकसें.'

येथें नासामौक्तिक ही वस्तु प्रस्तुत आहे. तिचा वर्ण स्वभावतः शुभ्र आहे. तिच्या जवळ असणारी विशेष उज्ज्वल अप्रस्तुत वस्तु अधर होय. याची छवि ('कांति) अत्यंत रक्त आहे. अधरच्छवीचा आणि नासामौक्तिकांचा संयोग होऊन मौक्तिकांनीं आपला श्वेतपणा सोडून अधराचा रक्तिमा स्वीकारला असें या आर्यार्धांत वर्णन आहे.

आणखी उदाहरणें:—

भुजंगप्रयात.

तुझ्या वीरशत्रुस्त्रिया पल्लवांतें
शिवांनी न घेतात नेसावयातें;
पडोनी नखाची रुची त्यावरी ते,
तया भासती पांडुपत्रापरी ते ! १

अ. द.

साकी.

'धवलपणा दंतांचा लोपे अरुणाधरसंयोगें.'

म. भा वि.

तद्गुण म्हणजे अप्रस्तुताचा गुण. अप्रस्तुत या शब्दाबद्दल व्याख्येंत 'दुसरा' हा शब्द योजला आहे; आणि प्रस्तुताबद्दल '**एक**' हा शब्द लिहिला आहे. **अतद्गुण** अलंकाराच्या व्याख्येंतही अशीच शब्दयोजना केली आहे. **मीलित** अलंकारांत एक वस्तु दुसरीला आच्छादून टाकते किंवा तिच्यावर आपला पगडा बसविते असें वर्णन असतें. **तद्गुणा**मध्यें एक वस्तु आपला गुण टाकून दुसऱ्याचा गुण घेते असें वर्णिलें असतें. यांत वस्तु अगदीं स्पष्टपणें भिन्न असतात. **सामान्य** अलंकारांत वस्तु स्वगुण सोडीत नाहींत तथापि त्या परस्परांहून भिन्न दिसत नाहींत, असें वर्णन असतें.

स्वभावोक्ति.

वस्तूच्या स्वभावसिद्ध क्रिया, रूप इत्यादिकांचें हुबेहुब वर्णन असतां तेथें **स्वभावोक्ति** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित.

चारा सोडुनि झोंप घेत बसती छायेंत हीं गोकुलें,
तृष्णेनें बहु पीडिले मृग पिती हे तापलेलीं जलें;
संतापास भिऊनि कोणि नगरीं मार्गीं न दे पावलें,
तप्ता भूमिस यान सोडुनि गमे कोठें उभें राहिलें १

मृच्छकटिक.

यांत मध्यान्हाचें वर्णन असून त्यांत गाई, हरिण व माणसें यांचे व्यापार हुबेहूब वर्णिले आहेत.

शार्दूलविक्रीडित.

धाराजर्जर दर्दुर प्रसरती पंकीं उडया घालिती,
झाले मोर विमुक्तकंठ फुललीं झाडें पहा डोलतीं;
साधूला खळमंडळी तशिच हीं चंद्रास मेघावली,
झांकी ती कुलटेसमान चपळा राहे न एके स्थलीं १

वसंततिलक.

हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा
शंखाकृती धरि करांत बलाकमाळा;
विद्युत्प्रभावसन पाति कसोनि हातें,
वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें ! १

ओंवी.

मेघोदरांतून जलाचिया धारा, भूमीवरी पडती झरारा,
जैशा शुद्धरजताच्या तारा, विद्युत्प्रकाशें झळकती १
होतां विद्युल्लतेचें स्फुरण, दिसती न दिसती क्षणक्षण;
जीर्णा अंबरपटाच्या दशा जीर्ण, झडोनि खालीं पडताती ! २

शार्दूलविक्रीडित.

कांहीं हंसमयूरकोकबकसे वेगें उडों पाहती,
कांहीं कासव मीन चक्र सुसरी पाण्यामध्यें पोहती;
कांहीं पर्वतवृक्षतुंगशिखरप्रासादसे दीसती,
वातें हालवितां नभीं घन असे नानाकृती शोभती. १

 मृच्छकटिक.

हें वर्षाकालाचें किती हुबेहुब चित्र आहे!

शार्दूलविक्रीडित.

चाले श्वास समान दीर्घ दिसती या पापण्या निश्चला,
आहे दृष्टि निमीलिता नच दिसे अभ्यंतरीं चंचला;
अस्ताव्यस्त शरीरही पसरलें बाहेर शय्येहुनी,
आली झोंप खरीच ग्रास गमतें हीं लक्षणें पाहुनी १

मृच्छकटिक.

हें **शर्विलक**नांवाचा चोर **मैत्रेयाच्या** झोंपेचें वर्णन करीत आहे. अथवा **कण्वाच्या** आश्रमाचें **शाकुन्तल**नाटकांतलें वर्णन पहाः—

शार्दूलविक्रीडित.

कोठ्यांतूनि गळोनि धान्य तरुचीं प्रच्छन्न झालीं तळें,
झाले चिक्कण फोडितां दगड हे हीं इंगुदीचीं फळें;
भीती सोडुनि पाहुनी मृग अम्हां शब्दास न त्रासती,
जातां घेउनि वल्कलें गळति त्या धारा पथीं दीसती १
पाटांतील जळें बहूत चपळें धूतीं तरूचीं मुळें,
झालीं पिंगट वृक्षपल्लवफळें होमाज्यधूम्रामुळें;
स्कंधीं वाळति वल्कलें तरुतळीं केलीं स्थलें निर्मलें,
दूर्वादर्भतृणांकुरांत चरती हीं पाडसें सोज्वळें २

अथवा त्याच नाटकांत आपल्यापुढें पळणाऱ्या हरिणाचें **दुष्यंत** वर्णन करीत आहे तें पहाः—

स्रग्धरा.

हा वारंवार मागें बघुनि उडतसे स्यंदनीं देत दृष्टी,
बाणाच्या भीतिनें हा अटपुनि धरितो आपुली देहयष्टि;
आयासें हा मुखातें पसरुनि कवला टाकितो जागजागीं,
जातो आकाशमार्गीं उडुनि बहु पहा थोडका भूमिभागीं १

सीतेचें बालपणचें ‘ चिमणें तोंड ’ आठवून **जनक** राजा **उत्तररामचरित्रांत** सकरुणोद्गार काढीत आहे ते पहाः—

दिंडी.

बाइ माझे लाडके सिताबाई !
बाळपणचें कौतूक वदूं काई !
बाळपणीं पाहतां तुझें मुख,
होय मजला तें काय वदूं सुख १
विनाकारण रोदन हांस्य यावें,
तिहीं वदनातें फार शोभवावें,
थोडथोडया कोंवळ्या दंतपंक्ति,
जयामाजी उगवल्या शुभ्रकांति ! २
जया पासुनि बोबडे बोल गोड
निघुनि माझे पुरविती तिहीं कोड !

चक्रव्यूहामध्यें **अभिमन्युबाळ** शिरला त्या वेळेस **कौरवपांडवीय** सेना एकदम भिडल्या आणि एकच गर्दी उडाली त्या प्रसंगाचें चित्र **पंत** एकाच पद्यांत रेखाटतातः—

गीति.

रथ धडकले, भडकले हय, शस्त्रजवन्हि धडकले वरते,
अन्योन्य द्व्यंगुलही राहों देती न धड कलेवर ते ! १

यशोदेचा दधिमंथनप्रसंग पुढील पद्यांत **वामनपंडितांनीं** वर्णिला आहे.

द्रुतविलंबित.

पृथु नितंब नितंबिनिचा वरी, कटितटीं कटिसूत्राचि सांवरी,
कनककंकणवृंदहि वाजती, मुखिं सुखश्रमबिंदु विराजती १
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती, गळति गुंफिलिया शिरिं माल्ती,
घुसळितां कुचकुंभहि कांपती, अमृत ज्यांतिल घे कमळापती २
फिरविते रवि ते दधिभीतरी, मिरविते रवितेज नगांवरी.
स्वकरिंते करि चंचळताऽऽननीं, उपरमे परमेश्वरगायनीं ३

कृष्ण यमुनेच्या डोहांत उडी टाकीत आहे त्याचें वर्णन **पंडित** करतातः—

द्रुतविलंबित.

हरि चढोनि तयाच तरूवरी, स्मरशना वसनासह सांवरी,
कसुनि कास कसी कनकांबरें, दृढ करी कटिसूत्र कटीं बरें १

उपजाति.

प्रचंड डावा भुजदंड भारी, सव्यें करें वाजवि कैटभारी,
गर्जोनि वृक्षाच वरी तटाकीं उडी विषाच्या सलिलांत टाकी २

यापुढें **कालियमर्दनाचा** प्रसंग पहाः—

स्वागता.

नाच नाचत असोनि नटाचा, हाणितो सरसिजानन टांचा,
हानि यास्तव भुजंगबळाची, दृष्टि त्यावरि पडे अबळांची १

द्रुतविलंबित.

पतिभयें अतिविव्हळ झालियां, शरण कृष्णपदाप्रति आलिया,
स्मृति नुरे कबरांबरभूषणीं, मन समर्पियलें व्रजभूषणीं १
स्तन मुखीं धरुनी पिति लेंकरें, हरिस दाविति तें युवती करें,
हृदयिं भाविति कीं "व्रजपाळकें, न वधिजे फणि देखुनि बाळकें" २
पसरिती युवती वसनांचळां, करतळीं अबळा अतिचंचळा,
हरिस काकुळती करिती जळीं, किति अशा, कितिएक कृतांजळीं ३

हंसाला धरणाऱ्या **नलाचें** व **नलानें** धरलेल्या हंसाचें **रघुनाथपंडित** वर्णन करितातः—

वसंततिलक.

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला,
जो भागला जळविहार विशेष केला;
पोटींच एक पद लांबविला दुजा तो,
पक्षी तनू लपवि भूप तया पहातो १
टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी,
केली विजार वरि डौरहि मौन सेवी;
सारी करीं वलय उंच अशा उपायीं,
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं २

मालिनी.

कलकल कलहंसें फार केला सुटाया,
फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया;
नृपातिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू,
धरि सुदृढ जया त्यां कनय सोडीलें. पंचू १

वक्रोक्ति.

श्लेषानें किंवा ध्वनिविकारानें अर्थान्तराची कल्पना केली असतां तेथें **वक्रोक्ति** अलंकार होतो.

शब्दश्लेषमूलक वक्रोक्ति मागें **शब्दालंकारप्रकरणीं** सांगितली आहे. येथें **अर्थश्लेषमूलक** व **ध्वनिविकारमूलक वक्रोक्तीचाच** विचार कर्तव्य आहे.

स्रग्धरा.

भिक्षार्थी तो कुठें गे सुतनु ? बलिमुखीं. नृत्य कोठं अपर्णे?
वाटे वृंदावनान्तीं. मृगतनय कुठें? सूकरा मी न जाणें.
बाले! तूं पाहिलास स्थविर वृषपती? गोप जाणे तयाला.
लीलासंलाप रक्षो जलनिधिहिमवत्कन्यकांचा अम्हांला! १

हा **लक्ष्मी** व **पार्वती** यांचा प्रश्नोत्तररूप संवाद आहे. यांत **अर्थश्लेष** आहे व तो स्पष्ट आहे.

ध्वनिविकारमूलक वक्रोक्तीचें उदाहरणः—

गीति.

'कोप तुझा अनुचित हा विचार केल्याविना सुगुणसरिते!'
'नाहींच उचित!' बोलुनि ताडन कुसुमस्रजें तया करि ते १

अ. दर्श.

येथें 'नाहींच उचित!' हें शब्द नायिकेनें अशा रीतीनें उच्चारले आहेत कीं तिच्या ध्वनिविकारावरून त्या शब्दांचा अन्य म्हणजे 'योग्यच आहे!' असा अर्थ होतो.

गीति

या दृढ मदभिप्रायापासुनि वारूं शके न शक्र मला,
मर्त्यांची काय कथा! प्राकृतसा कर्ण काय हा गमला १
मोरोपंत–कर्णपर्व.

' प्राकृतसा कर्ण काय हा गमला ' हे शब्द ध्वनिकारानें उच्चारल्या- मुळें ' कर्ण हा प्राकृत (सामान्य) नव्हे,' अशा अन्य अर्थाची प्रतिति होते.

भाग दुसरा.

अत्युक्ति.

शौर्य, औदार्य, इत्यादि गुणांचें अद्भुत किंवा अवास्तव वर्णन केलें तर तेथें **अत्युक्ति** अलंकार होतो.

गीति.

राया ! सातहि सागर शुष्क तुझ्या विक्रमानलें असती,
त्वद्रिपुवनितालोचनजलपूरीं पूर्ण ते पुन्हां दिसती. ! १
अ. वि.

मागें **उदात्त** अलंकारांत ' वस्तु ' शब्द वापरला आहे. तेथें ' वस्तु ' शब्दानें औदार्यादि गुणांचेंही ग्रहण होतें असें मानलें तर **उदात्तालं-कारांत**च या अलंकाराचा अंतर्भाव होतो.

असम.

उपमाच नाहीं असें वर्णिलें असतें तेथें **असम** अलंकार होतो. जसें:—

शिखरिणी.

' तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तिजशीं. '
प. र.

गीति.

' गुणवदपत्यवियोगक्लेशासि जगत्त्रयीं नसेचि तुला.' !
मोरोपंत–मंत्ररामायण.

' परि सादृश्य तुझें बा आम्रा ! मधुपा न लाभलें भुवनीं.'
म. भा. वि.

प्रस्तुत अलंकार **अनन्वयध्वनि** आहे. तथापि ' उपमाच नाहीं, ' असें म्हणणें हा उपमेयाचा अनन्यसाधारण उत्कर्ष व्यक्त करणारा वाक्यार्थरचनेचा विशेष प्रकार आहे अशा समजुतीनें **रसगंगाधरकारांनीं** वेगळा अलंकार मानिला आहे.

व्याजनिंदा.

एकाच्या निंदेनें दुसऱ्याची निंदा होते तेथें **व्याजनिंदा** अलंकार होतो.

गीति.

सर्व श्रुतिशास्त्रांतें पढलों परि मी पहा महामुग्ध,
तक्रासि दोष कैचा ? शुभ्रपणें म्यांचि मानिलें दुग्ध ! १

मोरो. बृहद्दशम.

दिंडी.

अगा काका तूं शब्द करित राहीं,
नसे त्याचा तुजकडे बोल कांहीं;
आम्रवृक्षीं त्या सरळ कोकिलाशीं
तुझी संगति घडवि जो दोष त्याशी १

स्वकृत.

पहिल्या पद्यांत ' मी ' (कोणी विद्वान्) व दुसऱ्या पद्यांत ' विधि ' यांच्या निंदेनें अनुक्रमें ' विधि ' व ' काक ' यांची निंदा व्यक्त झाली.

आणखी उदाहरणः—

' मीच मूर्ख म्हणून हें काम तुला सांगितलें ! '

साहित्यशास्त्र.

व्याजस्तुति हा अलंकार मागें सांगितला. **व्याजस्तुति** या पदांतील ' स्तुति ' या शब्दाचा अर्थ ' बोधन ' असा केला तर प्रस्तुत अलंकाराचा **व्याजस्तुति** या पूर्वोक्त अलंकारांतच समावेश होतो असें **उद्योत**-मत आहे.

परिकरांकुर.

विशेष्य साभिप्राय असलें म्हणजे **परिकरांकुर** अलंकार होतो.

गीति.

यमदूतशतक्रूर स्वमुखें अक्रूर म्हणवितो मेला !
आला गांव वधाया परि बाई ! हा न लेश कोमेला ! १

मोरोपंत-कंसवध.

यांत **अक्रूर** हें विशेष्य साभिप्राय आहे हें स्पष्ट आहे. आणखी उदाहरणें:—

गीत्यर्ध.

'चाऱ्ही पुरुषार्थांचा दाता मज देव अजि चतुर्भुज हो.'

अ. वि.

वसंततिलक.

वर्णावया पटु फणीश तुझ्या गुणांशी,
तो हैहयाधिप शिकेल लिहावयासी;
पाहावया बळ तयाचि सहस्रनेत्रा,
कोठें तुझे सुगुण मीहि कुठें पवित्रा ! १

गीत्यर्ध

'जिष्णुपुढें असुरजनीं कोणी वैरा टिके सरी करितां.'

गीत्यर्ध.

'थोरपण अनंताचें अनंत वर्णील काय कविहीर ?'

पंत.

या पद्यांत 'चतुर्भुज,' 'फणीश,' 'हैहयाधिप,' 'सहस्रनेत्र,' 'जिष्णु' आणि 'अनंत' या विशेष्यांची योजना सहेतुक आहे. हा अलंकार **परिकर**कोटींत येतो असें **उद्योत**मत आहे.

आवृत्तिदीपक.

दीपक असें जें पद, अर्थ किंवा पदार्थ त्याची आवृत्ति आल्यास तेथें **आवृत्तिदीपक** अलंकार होतो.

पद, अर्थ, व पदार्थ यांचीं अनुक्रमें उदाहरणें:—

गीत्यर्ध

'वर्षतसे घनमाला, वर्षे तसें रात्रिमान युवचित्तीं.'

गीति

'विकसति कदंबकुसुमें कुटजांकुरही प्रफुल्ल होति रसें,'
'माजति सुतृप्त चातक माजति मेघामुळें मयूर तसे' १

पहिल्या अर्धांत 'वर्षतसे' या पदाची, दुसऱ्या अर्धांत 'विकास पावणें' या अर्थाची आणि तिसऱ्या अर्धांत 'माजति' या पदार्थाची आवृत्ति आली आहे. सामान्यधर्म अनेकवार उक्त असल्यामुळें हा वस्तुतः दीपकच नव्हे, वास्तव मम्मटानुयायी या अलंकाराला वाचकलुप्तोपमा मानतात, असा उद्योताभिप्राय आहे.

परिणाम.

उपमान स्वतां कार्याच्या उपयोगीं पडण्याचा संभव नसल्यामुळें उपमेयाशीं त्याचें ऐक्य अपेक्षित असतें तेथें **परिणाम** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' मदिरेक्षणा प्रफुल्लें दृक्कमलें पाहते अविश्राम. '

येथें कमल हें उपमान पाहण्याची क्रिया करण्याला स्वतां असमर्थ आहे; म्हणून उपमेय जें दृक् [दृष्टि] त्याशीं तें एकरूप झालें आहे. कमल स्वतां पाहण्याला समर्थ नसल्यामुळें तें नेत्ररूपानें पाहते असा फलितार्थ झाला. **रूपकामध्यें** उपमानाला अशा प्रकारची अंगभूतता नसते.

उल्लेख.

एकच वस्तु अनेकांनीं अनेक प्रकारांनीं मानली असें वर्णन असल्यास तेथें **उल्लेख** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित

सतिला स्मरसा, धनूसि हरसा, राजां दिसे वीरसा,
मूढांला नरसा, जना नृवरसा, भक्तांसि माहेरसा;
देवां ईश्वरसा, रिपूंस गरसा, ज्ञात्यांस कीसारसा,
ऐसा सर्वरसांसि हेतु परिसा जो सूर्य हंसारसा १

आनंदतनय.

शिवधनुष्याचा भंग करणारा **रामचंद्र** अनेकांना अनेक प्रकारांनीं दिसला असें या पद्यांत वर्णिलें आहे. आणखी उदाहरणें:—

गीति.

तो भूप सुरूपपणें काम ह्मणुनि कामिनीजन विलोकी,
याचकजन कल्पतरू अरि म्हणती काल साच हा लोकीं १
वृद्धांनीं गंजतारक कमलापति म्हणुनि तरुण नारींनीं;
हरि कौतुकें निरखिला होतां जैसा तसा कुमारींनीं २

अ. वि.

शार्दूलविक्रीडित.

मल्लां वज्र गमे, नरां नृप गमे, काम स्वयें स्त्रीजना,
गोपां आप्त, खलां नृप प्रभु, शिशू मातापित्यांच्या मना;
कंसा मृत्यु, अशक्त पामरजना, संतास तत्वामृत,
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित. १

वामन.

एकानें एकावर अनेकरूपांनीं कल्पना केली असतांही हाच अलंकार मानतात.

गीति.

संभाषणीं गुरुचि हा, सुयशीं अर्जुन, शरासनीं भीष्म,
भासे प्रताप तपनीं प्रतिपक्षिजनाप्रति प्रतिग्रीष्म १

अ. वि.

येथें कवीनें एका राजाचें अनेक रूपांनीं वर्णन केलें आहे. प्रस्तुताचें अन्यत्वानें वर्णन केलें म्हणजे तेथंही **अतिशयोक्ति** होते असें मागें **अतिशयोक्तिप्रकरणीं** सांगितलें.

प्रस्तुताचें अन्यत्वानें वर्णन याचा अर्थ प्रस्तुताचें व अप्रस्तुताचें ऐक्य असा केला तर **उल्लेख** त्या अतिशयोक्तीमध्येंच मोडेल असें उद्योतमत आहे.

अनुगुण.

सिद्ध गुणाचा दुसऱ्याच्या सान्निध्यामुळें उत्कर्ष वर्णिला असतो तेथें **अनुगुण** अलंकार होतो.

शिखरिणी.

'कटाक्षांनीं शोभा अधिकचि दिसे नीलकमला.'

यांत कमलाचा निळेपणा सिद्धच आहे. तथापि कटाक्षांमुळें त्यांना अधिक निळेपणा आला आहे असें येथें वर्णन आहे.

आणखी उदाहरणें:—

वसंततिलक.

आधींच मर्कट, तशांतहि मद्य प्याला,
झाला तशांत जरि वृश्चिकदंश त्याला;
झाली तयास तदनंतर भूतबाधा,
चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा! १

म. क. पु.

याचा तद्गुणामध्यें अंतर्भाव करावा असें उद्योतमत आहे.

प्रस्तुतांकुर.

प्रस्तुत अर्थाच्या वर्णनानें इष्ट अशा अन्य प्रस्तुत अर्थाचें प्रकाशन होतें तेथें **प्रस्तुतांकुर** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'भ्रमरा! मालति असतां कंटकयुत केतकी तुज कशास?'

येथें 'वाच्यार्थ' प्रस्तुत आहे. त्याच्यावरून 'अनर्थोत्पादक परवनिताभिलाप कशाला?' हा प्रस्तुत अर्थही प्रकाशमान झाला. ध्वनित होणारा अर्थ अप्रस्तुत होय असेंही कोणी म्हणतात. येथें **अन्योक्ति** आणि **समासोक्तिं**हीं संभवतात.

असंभव.

घडलेल्या गोष्टीची अशक्यता वर्णिली असतां तेथें **असंभव** हा अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'कोणास हें विदित कीं उचलिल नग बालगोपसंभव हा!'

शिखरिणी.

असे हें तोयाचें निलय जगीं रत्नामृतनिधि,
तृषार्तीं आम्हीं हा म्हणुनि वरिला कीं जलनिधि;

असें कोणा ठावें निजकरपुटामाजि धरुनी
क्षणें दीना मीनां. सहितहि तया प्राशिल मुनी ! १

तरू लावी बागेमधिं चतुर माळी निजकरीं,
तयामध्यें कोठें तरि बकुल तो स्थापित करी;
असें कोणा ठावें बसुनि तरु कोणान्तरिं असा,
भरोनी टाकील प्रचुरनिजगंधें दशदिशा १

म. भा. वि.

लक्षणसमन्वय स्पष्ट आहे. याची गणना कोणी **विरोधालंकारांत** करतात.

विचित्र.

फलाच्या इच्छेच्या विरुद्ध प्रयत्न झाला असें वर्णन असलें तर तेथें **विचित्र** अलंकार होतो. उदाहरणें:—

गीत्यर्ध.

' संत नमति संतत कीं मिळवाया उन्नती जनांत खरी.'

अ. वि.

गीति.

खलमुख मलिन कराया विमल करी तव सुकीर्ति सकल मही
मित्राल्हाद कराया मित्रांशीं द्रोह करि पराक्रमही १

अ. वि.

या उदाहरणांत 'उन्नति,' 'नमति,' आणि 'मित्र,' हे शब्द श्लिष्ट आहेत. फलेच्छेविरुद्ध प्रयत्न स्पष्ट आहे.

मंदाक्रांता.

' मुक्तीसाठीं मनुज करिती कर्मपाश प्रयत्नें ! '

म. भा. वि.

याचा **विषमालंकारांत** अंतर्भाव होतो असें **उद्योतमत** आहे.

अल्प.

अल्प आधेयावरून आधाराचें लघुत्व वर्णिलें असतां **अल्प**-हा अलंकार होतो. जसें:—

गीत्यर्ध.

'मणिमुद्रिका तुझ्या करिं वाटे जपमाळ आज विरहिणि ती.'

येथें मुद्रिका हें आधेय वस्तुतः करांगुलींत राहणारें असल्यामुळें अल्प आहे. ती मुद्रिका आधारभूत कराला जपमाळेसारखी दिसते असें वर्णिल्यामुळें कराचें (आधाराचें) अतिलघुत्व द्योतित झालें. या अलंकाराची गणना **अधिकालंकारांत** होते असें उद्योतमत आहे.

विकल्प.

दोन विरुद्ध गोष्टी समानबल असल्यामुळें त्यांची वैकल्पिक प्राप्ति वर्णिली असते तेथें **विकल्प** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'निजमस्तकांस आतां भूपति नमवोत कीं स्वचापांस.'

येथें 'मस्तक नमविणें, व ' चाप नमविणें, ' या परस्परविरुद्ध गोष्टी एका कालीं प्राप्त झाल्या असून दोन्ही एकदम करण्यास अशक्य आहेत; यास्तव त्यांच्या संबंधानें विकल्पाची प्राप्ति आली. आणखी उदाहरणः—

गीति.

पडते वारि निरंतर नाचति अति मुदित हे मयूर तसे,
अजि कांत कीं कृतान्तचि माझा दुःखान्त करिल वाटतसे १

अ. दर्श.

वैचित्र्याभावामुळें हा अलंकार नव्हे असें उद्योतमत आहे. कोणी याची **ससंदेहांत** गणना करितात.

काव्यार्थापत्ति.

असें आहे तर मग असें होईल हें सांगणें कशाला ? अशा रीतीनें वर्णन असतें तेथें **काव्यार्थापत्ति** अलंकार जाणावा.

साकी.

सुखिताचेंही व्याकुळ होतें मन पाहुनि मेघास,
काय नवल मग दुःख झालिया तेणें विरहिजनास ? १

प. र.

लक्षणसमन्वय स्पष्ट आहे. आणखी उदाहरणें:—

गीति.

तव सेवक मर्यादाविलंघनीं मात्र आन हे संकती,
प्लवग तवांघ्रिप्लवगत तरले भवसिंधु हा समुद्र किती ? १
या दृढं मदभिप्रायापासुनि वारूं शके न शक्र मला,
मर्त्यांची काय कथा प्राकृतसा काय कर्ण हा गमला ! १

पंत.

गीत्यर्ध.

'कमलांची काय कथा तो इन्दुहि जिंकिसीं सखे स्वमुखें.'

अ. वि.

'तो बापास बाप म्हणत नाहीं, मग चुलत्यास काका कोठून म्हणणार?'
'वरमाय शीतळ मग वऱ्हाडणीस काय बोल?'

सा. शा.

विकस्वर.

विशेष अर्थाच्या प्रतिपादनार्थ सामान्य अर्थ सांगून तो सामान्य अर्थ विशद व्हावा म्हणून पुन्हां विशेष अर्थाचा उपन्यास केला असतो तेथें **विकस्वर** अलंकार होतो.

दिंडी.

विविध रत्नांचा प्रभव जो तयाचें,
शीत लोपवि सौंदर्य कावें न साचें;
लपे एकचि जरि दोष गुण समूहीं,
जेविं इन्दूच्या किरणीं अंक पाहीं १

येथें प्रथमार्धांत सांगितलेल्या विशेष अर्थाच्या प्रतिपादनार्थ तृतीयचरणगत सामान्य अर्थ सांगितला आहे; आणि हा सामान्य अर्थ विशद व्हावा म्हणून चतुर्थ चरणांत पुन्हां विशेष अर्थाचा उपन्यास केला आहे. आणखी उदाहरणें:—

गीति

आपण शिरे नळीं कलि शिरवी त्या द्वापरास पाशांत,
व्यसनीं भल्यास पाडी खळ हरिणा व्याध जेविं पाशांत १

पंत.

शार्दूलविक्रीडित.

कर्णाला कटु शब्द सोडुनि उगा वा बैससी तूं जरी,
काका आम्रतरूवरी मग तुला कोकील मानूं तरी;
कीं वस्तु स्थलवैभवें करुनिया मोठेपणा पावती;
नेपालेश्वरभाललग्न चिखला कस्तूरिका मानिती १

म. क. पु.

हा अलंकार **अर्थान्तरन्याससंसृष्टि** होय असें उद्योतमत आहे.

प्रौढोक्ति.

उत्कर्षाला कारण नसणाऱ्या पदार्थावर उत्कर्षाच्या कारणत्वाची कल्पना करणें याला **प्रौढोक्ति** म्हणतात.

गत्यर्थ.

'यमुनातीरतमालश्यामल तव कुन्तल प्रिये असती.'

तमालवृक्षाच्या नीलत्वास **यमुनातीर** कारण नसून तें कारण आहे असें येथें वर्णन आहे.

गीति.

इन्दु, सुधा, कमल, तशी घेउनियां चंद्रिकाहि धात्यानें,
तनु निर्मिली प्रियेची, आली तिजला अजेयता त्यानें १

स्वकृत.

येथें 'इन्दु' सुधा,'कमल' आणि 'चंद्रिका' हीं प्रियेच्या मार्दवसौंदर्यादि गुणांच्या उत्कर्षाला वस्तुतः कारण नाहींत; तथापि तीं कारणत्वानें वर्णिलीं आहेत. **मम्मट**मताप्रमाणें ही **असंबंधातिशयोक्ति** होय.

संभावना.

असें झालें तर असें होईल अशी संकेतार्थी कल्पना असल्यास तेथें **संभावना** अलंकार होतो.

गत्यर्थ.

'जरि शेष होय वक्ता वर्णिल तरि तो तुझ्या गुणश्रीतें.'

अ. वि.

गीति.

कस्तूरिकामृगांच्या अंडांतुनि सकळ गंध हरवीन,
जरि होईन विधी मी तरि खलजिव्हेंत त्यास शिरवीन ! १

अ. वि.

लक्षणसमन्वय स्पष्ट आहे **काव्यप्रकाशकारांनीं** 'संकेतार्थी असंभविकल्पना' **अतिशयोक्ति** मानिली आहे.

मिथ्याध्यवसिति.

एकादी दुर्घट किंवा मिथ्या गोष्ट सिद्ध करण्याकरितां दुर्घट किंवा मिथ्याभूत अशा अन्य अर्थाची कल्पना करणें त्यास **मिथ्याध्यवसिति** म्हणतात.

शिखरिणी.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे,
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनींहि वितळे;
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी,
परंतू मूर्खांचें हृदय धरवेना क्षणभरी १

वामन.

या पद्यांत 'मूर्खाचें हृदय धरवणें' ही दुर्घट गोष्ट सिद्ध करण्याला 'वाळूच्या कणांतून तेल काढणें,' वगैरे दुर्घट आणि मिथ्या गोष्टी कल्पिल्या आहेत. आणखी उदाहरणें:—

गीति.

'जिंकिल काय हरा तो जिंकी कुतुकेंचि मन्मथ नरा जा,
करिल हरिमथनशश तरि करिल सुयोधनहि मन्मथन राजा!' १

मोरोपंत.

गीत्यर्ध.

'शृंग असेल शशाला वंध्या प्रसवेल तरिच तनयाला.'

अर्थ स्पष्ट आहे. ही **संबंधातिशयोक्ति** होय असें **उद्योतमत** आहे.

ललित.

प्रस्तुताचें वर्णन न करितां त्याच अर्थी त्याच्या प्रतिबिंबरूप कांहीं अप्रस्तुत गोष्टींचें वर्णन करणें त्याला **ललित** अलंकार म्हणतात.

गीत्यर्ध.

' जळ निघुनि गेलियावरि बांधाया इच्छि सेतु मंदमति. '

' योग्य वेळीं उद्योग न करतां वेळ निघून गेल्यावर मूर्ख मनुष्य उद्योग करण्याची इच्छा करतो ' हा अर्थ येथें प्रस्तुत आहे. परंतु त्याचें वर्णन न करितां प्रतिबिंबभूत अशा अप्रस्तुत अर्थाचें वर्णन केलें म्हणून या आर्यार्धांत **ललित** अलंकार झाला. **निदर्शनेमध्यें** प्रस्तुत व अप्रस्तुत वृत्तांतांचें पर्यवसान उपमेमध्यें होऊन ते वृत्तांत उक्त असतात; **ललिता**मध्यें प्रस्तुत वृत्तांत उक्त नसतो, असें **कुवलयानंदकारांचें** मत आहे. परंतु प्रस्तुत आणि अप्रस्तुत वृत्तांत उक्त असले तरच **निदर्शना** होते असें नाहीं तर ते वृत्तांत प्रतीत झाले तरी सुद्धां **निदर्शना** मानावयाला हरकत नाहीं असें **उद्योतमत** आहे. **साहित्यदर्पणकारांचेंही** हेंच मत आहे. तेव्हां प्रस्तुत अलंकार **उद्योतमतीं आर्थी निदर्शना** आहे. **कुवलयानंदकारांनीं ललिताचें** आणखी एक उदाहरण दिलें आहे:—

दिंडी.

कवण देशा ती दशा दिली साची,
आजि आपण मधुवर्जिता वनाची;
धन्य तुमच्या संकेतवशें सुज्ञा,
श्राव्य नाहीं मज काय भव्य संज्ञा ? १

अ. विकास.

प्रहर्षण.

इष्ट अर्थाची यत्नाशिवाय प्राप्ति वर्णिली असतां **प्रहर्षण** अलंकार होतो.

गीति.

होता मानें दावाया, खेळ करोनी सभेस हो ज्याचा,
दैवें तद्विपयींच हा, नियोग होतो मला समाजाचा १

आ. प. ना.

यांत इष्टार्थाची यत्नाशिवाय सिद्धि वर्णिली आहे.

स्रग्धरा.

मेघांनीं व्यापिलें हें गगन वनमही श्यामही या तमालीं,
राधे ! हा भीरु यातें सदानें झडकरी पोंचवी रात झाली;

नंदाज्ञा होय ऐशी तंवचि निघति त्या राधिकामाधवांच्या,
लीला कालिन्दितीरीं प्रतितरुतरुशीं होति एकान्ति साच्या! १

राधा व माधव यांना परस्परसमागम इष्ट आहे हें प्रसिद्ध असल्यामुळें गृहीत आहे. तो समागम नंदाज्ञेवरून अनायासें घडून आला असें यां श्लोकांत वर्णन आहे.

इच्छिल्यापेक्षां अधिक मिळणें असें वर्णन असतांही प्रहर्षण अलंकार होतो.:—

गीत्यर्ध.

'जंव दीपा सरसावी तंव सविता उगवलाचि आकाशीं.'

'दीपप्रकाशाची इच्छा असतां सर्व जगाला प्रकाशित करणारा सूर्य उदयाला आला,' असें येथें वर्णन आहे. आणखी उदाहरण:—

गीति.

याची चातक जलकण कांहीं, तों अम्बुवाह दातृवर,
सकल धरातल धारासारें, टाकी भरोनि एकसर! १

स्वकृत.

'देवाजवळ मागितला एक डोळा तर देवानें दिले दोन डोळे.'

सा. शा.

फलप्राप्तीच्या उपायाचा प्रयत्न करावयाला जावें तों प्रत्यक्ष फलप्राप्ति व्हावी, असें वर्णन असलें तरी प्रहर्षण अलंकार होतो.

गीति.

कुसुमें काढायाला वरचीं आरोहयत्न करि रमणी,
चरणस्पर्शनमात्रें आमूल अशोक जाय तंव फुलुनी! १

स्वकृत.

अशोकाच्या वरच्या बाजूला फुलें होतीं तीं काढावीं अशा इच्छेनें त्या झाडावर कोणी रमणी चढूं लागली तों मूळासह सगळा अशोक एकदम फुलला असें या पद्यांत वर्णन आहे. अशोकाला तरुणीचा चरणस्पर्श झाला असतां तो फुलतो असा कविसंकेत आहे. त्याला अनुलक्षून ही कल्पना आहे. समाधि अलंकारांत कारणांतरयोगानें कार्य सुकर होतें

असें वर्णिलें असतें. ' कारणान्तरयोगा ' याचा अर्थ अधिक व्यापक करून प्रहर्षणाचे वरील तीनही प्रकार समाधींत प्रविष्ट करतां येतात असें उद्योतमत आहे.

विषादन.

इष्ट अर्थाच्या विरुद्ध अर्थाची प्राप्ति वर्णिली असतां विषादन अलंकार होतो. उदाहरणें:—

वसंततिलक.

येईल भानु उदयाप्रति अल्पकाळें,
होईन मुक्त सुटतां शतपत्रजाळें;
ऐसें अली मुकुलबद्ध मनांत चिंती,
तों पद्मिनीस उपडी मदमत्त हस्ती ! १

नवनीत.

गीत्यर्ध.

' जंव दीपा सरसावी तंव तो आजि पावलाचि निर्वाण ' !

अ. वि.

गीति.

येइल वसंत आतां, करील वाणी खुली बहुदिसानें,
चिंती जों पिक ऐसें हाणिला तों शर उरांत भिल्लानें ! १

अ. द.

'इच्छा करी पुत्राची तों हानी झाली भर्त्याची ! '

सा. शा.

अर्थ व लक्षणसमन्वय स्पष्ट आहेत. या अलंकाराचा विषमालंकारांत समावेश होतो असें उद्योतमत आहे.

उल्लास.

एकाच्या गुणानें दुसऱ्यास गुणप्राप्ति वर्णिली असेते तेंथें उल्लास अलंकार होतो.

गीति.

खडबडला रथ तीच्या स्कंधीं मत्स्कंध लागतां धन्य
आहे एकच केवल, भूमीला भार होय वपु अन्य ! १

विक्रमोर्वशीय.

उर्वशीच्या सुखप्रद स्कंधस्पर्शानें **पुरूरवा** आपल्या स्कंधाला धन्य मानीत आहे असें या पद्यांत वर्णन आहे.

एकाच्या दोषानें दुसऱ्याला दोषप्राप्ति वर्णिली असतांही **उल्लास** अलंकार होतो. जसें:—

शार्दूलविक्रीडित.

लोकानंदन चंदनद्रुम सख्या ! राहूं नको या वनीं,
वेळूंनीं परुषीं असारहृदयीं हे व्यापिली मेदिनी;
यांचें घर्षण झालिया निघतसे दावाग्नि तेथें सदा,
वेळूचींच कुळें न जाळित बसे जाळी वना तो तदा ! १

अ. द.

या पद्यांत वेळूंच्या दोषानें वनाला दोषप्राप्ति वर्णिली आहे.

एकाच्या गुणानें दुसऱ्याला दोषप्राप्ति असतांही **उल्लास** अलंकार होतो. जसें:—

वसंततिलक.

दानार्थि जे मधुप त्या श्रुतिताडनानें,
धिक्कारिलें जरि गजें मदनष्टभानें;
त्याचीच गंडयुगमंडनहानि पाहें,
जातील भृंग फुलल्या कमलांत बा हे १

येथें मधुपांच्या भूषणत्वरूप गुणावरून त्यांना घालवून देणें हा गजांचा दोष सांगितला आहे.

एकाच्या दोषानें दुसऱ्याला गुणप्राप्ति वर्णिली असतांही **उल्लास** अलंकार होतो. जसें:—

शार्दूलविक्रीडित.

डुंगोनी तुज चुंबिलें वरिवरी बा चांटिलें चाविलें,
दुःखा तूं न करीं जरी मर्कटवरी त्या नीरसें टाकिलें;

हे रत्ना ! तव भाग्य हें समज कीं त्या वानरें सौरसें
अन्तःसार पहावयास उपलें त्वच्चूर्ण केलें नसे ! १

अ. वि.

यांत-वानराच्या चांचल्यदोषानें रत्नाचा चूर्णनाभाव हा गुण वर्णिला आहे.

या अलंकाराचे पहिले दोन प्रकार **काव्यलिंग** किंवा **सम** यांत अंतर्भूत होतात व दुसरे दोन **विषमा**खालीं येतात असें **उद्योत**मत आहे.

अवज्ञा.

एकाच्या गुणदोषांमुळें दुसऱ्याला त्यांची अप्राप्ति वर्णिली असतां तेथें **अवज्ञा** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' लाहे स्वल्पाचि जला जरि गेलें माप सागरापाशी ! '

यांत सागराच्या अपरिमितजलसंपत्तिरूप गुणानें मापास त्या गुणाची अप्राप्ति वर्णिली आहे.

गीत्यर्ध.

' मिटतीं जरि कमलकुलें चंद्राची काय हानि ती नकळे ! '

यांत कमलांच्या निमीलनदोषानें चंद्राला त्या दोषाची अप्राप्ति वर्णिली आहे.

विषम, अतद्गुण, किंवा **विशेषोक्ति** यांत प्रस्तुत अलंकाराचा समावेश करावा असें **उद्योत**मत आहे.

अनुज्ञा.

दोषामंध्यें कांहीं गुण दृष्टीस पडल्यास त्या गुणाकरितां त्या दोषाची याचना वर्णिली असते तेथें **अनुज्ञा** हा अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' आम्हां असोत विपदा हरिकीर्तन ज्यांत होय सुज्ञा तें '

विपदोषामध्यें हरिकीर्तनरूप गुण आहे यास्तव विपदोषाची याचना केली आहे असें यांत वर्णन आहे. आणखी उदाहरणः—

पृथ्वी.

पिशाचतनु घेउनी तव समीप येऊं, अशा
अशान्त सुरसंपदा अजि वरूं गिरीशा कशा;

तुझ्या सदनदेहलीनिकट वक्रतुंडाहती,
सुरेंद्रमुख लाहती शिरिं उदंड दंडाहती ! १

विशेषाची व्याप्ति अधिक करून त्यांतच प्रस्तुत अलंकाराचा अंतर्भाव करावा असें **उद्योत**मत आहे.

लेश.

दोषाचें गुणरूपानें किंवा गुणाचें दोषरूपानें वर्णन असतें तेथें **लेश** अलंकार जाणावा.

मालिनी.

उडाति अखिल पक्षी अंतरिक्षीं भरारा,
मधुनि वसति वृक्षीं, लक्षितो लोक सारा;
नवफलसुमनांचा लाभ होतो तयांस,
तुजशि मधुर वाणी दे शुका ! बंदिवास १

स्वकृत.

यांत पहिल्या तीन चरणांत **अवक्तृत्व** दोष स्वच्छंदसंचरणास अनुकूल असल्यामुळें गुण मानला आहे; आणि चवथ्या चरणांत मधुरवाणी हा गुण असून तो बंदिवासास कारण झाल्यामुळें दोष मानिला आहे.

आणखी उदाहरणें:—

शिखरिणी.

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुजजवळिं हा दोषचि वसे;
शुका ! तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी,
गडया स्वातंत्र्याचीं अनुपम सुखें सर्व मुकशी !

प. र.

गीति.

भीम म्हणे दादाजी केली दुर्योधनें दया वाटे,
हे पाय पाहतों मी कैसें जरि लागतों न या वाटें १

मोरोपंत–वनपर्व.

या अलंकाराला **लव** हें दुसरें नांव आहे. हा **विशेषाहून** भिन्न नाहीं

असें उद्योतमत आहे. दंडीनं लेश म्हणून अलंकार सांगितला आहे तो मम्मटमतानें व्याजोक्ति होय.

मुद्रा.

प्रकृत पदार्थानें अप्रकृत सूचनीय अर्थ सूचित होतो तेथें मुद्रा अलंकार जाणावा.

जराविमुक्त राहसी, लघुप्रियेहि लंघिसी;
गुरुप्रतीहि सेविसी, प्रमाणिका न तूं कशी ? १

'जराविमुक्त' याचा प्रियापक्षीं तरुण व वृत्तपक्षीं 'ज' व 'र' या गणांनीं मुक्त असा अर्थ आहे; 'लघु' याचा प्रियापक्षीं नीच व वृत्तपक्षीं ऱ्हस्व असा अर्थ आहे; 'गुरु' याचा प्रियापक्षीं श्रेष्ठ व वृत्तपक्षीं दीर्घ असा अर्थ आहे; आणि 'प्रमाणिका' याचा प्रियापक्षीं विश्वसनीय व वृत्तपक्षीं प्रमाणिका ही संज्ञा असा अर्थ आहे. या श्लोकांत नायिकावर्णनपर 'प्रमाणिका' या पदानें प्रमाणिका या नांवाचें वृत्त आहे अशी सूचनीय अर्थाची सूचना केली आहे, यास्तव येथें मुद्रालंकार होय.

नाटकांत पुढें होणाऱ्या अर्थाची सूचना असते तेथेंही मुद्रा हाच अलंकार मानतात:---

गीति.

न्यायें वागे त्याचे होती पशुपक्षिही सहाकारी,
अन्यायें वागे त्या बंधूही होतसे अहितकारी १

अ. रा.

ही अनर्घराघव नाटकाच्या आरंभीं सूत्रधाराची उक्ति आहे. इच्यांत प्रकृतपदार्थानें रामरावणकथानक सुचविलें आहे.

गीति.

सत्पक्ष मधुरवाणी प्रसाधिताशाहि मदोत्कटाचार,
पडतात् धार्तराष्ट्रचि कालवशें करुनिया धरित्रिवर १

अ. द.

ही वेणीसंहारनाटकांत सूत्रधाराची उक्ति आहे. या पद्यांत शर-

द्यूतचें वर्णन प्रस्तुत आहे. त्यावरून धृतराष्ट्राच्या सुतांचा भाविनाश सूचित झाला आहे.

वर्ण्य अर्थाचा पोष प्रस्तुत अलंकारांत होत नाहीं यास्तव यांत सौंदर्य नाहीं म्हणून हा अलंकारच नाहीं असें उद्योतमत आहे.

रत्नावली.

सुप्रसिद्ध अर्थाचें क्रमानें वर्णन असतां तेथें **रत्नावली** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' असिस चतुर्मुख, लक्ष्मीपति, सर्वज्ञहि तसाचि तूं भूपा ! '

येथें ' चतुर्मुख ' इत्यादि पदांनीं प्रस्तुत राजाचें ब्रह्मविष्णुमहेश्वररूपानें वर्णन प्रतीत होतें. ब्रह्मविष्णुमहेश हा क्रम तंत्रोक्त आहे. आणखी उदाहरणः—

मन्दाक्रान्ता.

लीलाब्जांना नयनकमलें पत्र वादार्थ देतीं,
कुंदाशीं हे दशनहि तिचे पूर्वपक्षा करीती;
भ्रूचेष्टांचा मदनधनुशीं जें अनुवाद झाला,
वक्त्रज्योत्स्नाहिमकररुचीलागिं दे दूषणाला १

या पद्यांत पत्रदान, पूर्वपक्षाचा उपन्यास, अनुवाद आणि दूषण हीं चारी पंडितलोकांत प्रसिद्ध अशा क्रमानें वर्णिलीं आहेत.

' ज्यांचा पाठ सहतंत्रत्वानें प्रसिद्ध आहे त्यांच्या प्रसिद्ध क्रमाचें अनुसरण केलें नाहीं तरीही हाच अलंकार होतो. जसें:—

' हृदयांत अग्निरूप (तप्त), नेत्रांच्या ठायीं जल- (अश्रु-) रूप, श्वासांचे ठायीं वायुरूप, अवयवांच्या ठायीं पृथ्वीरूप (जड), आणि अंतःकरणामध्यें आकाशरूप (शून्य), असा ज्याचा प्रताप मारलेल्या राजांच्या अंतःपुराच्या ठिकाणीं (जनानखान्यांत) मूर्तिमन्त पंचमहाभूतमय दिसूं लागला ! '

अ. वि.

येथें **प्रस्तुत** अर्थाला **रूपकानें** उपकृत केलें आहे **क्रमानें** नव्हे; म्हणून **रत्नावली** हा स्वतंत्र अलंकार नाहीं असें **उद्योतमत** आहे.

पूर्वरूप.

पुन्हां स्वगुणाची प्राप्ति वर्णिली असते तेथें **पूर्वरूप** अलंकार होतो. जसें:—

गीत्यर्ध.

'शिवकण्ठकिरणलिप्तहि शेष तुझ्या कीर्तिनें धवल आहे.'

अ. वि.

उपजाति.

'विभिन्नवर्णी गरुडाग्रजाचे, तेजें जहाले हय जे रवीचे;
वंशांकुराचेपरि नीलरत्नीं, पूर्वद्युती त्या दिधली प्रयत्नीं ॥'

अ. द.

पहिल्या उदाहरणांत शेषाला व दुसऱ्या उदाहरणांत रविहयांना आपल्या कान्तिरूप गुणाची पुन्हां प्राप्ति झाल्याचें वर्णन आहे.

वस्तु एकदा विकृत होऊन पुन्हां पहिल्यासारखी झाली असें वर्णन असतांही **पूर्वरूप** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'मालविला दीप तरी कांचीमणिसुप्रकाश बहुत पडे.'

अ. वि.

येथें दीपतेजाला विकृति झाली असतां कांचीमण्यांच्या प्रकाशानें गृहाला पूर्वावस्था कल्पिली आहे.

पूर्वरूपाचा पहिला प्रकार **तद्गुण** व दुसरा **समाधि** होय असें उद्योतमत आहे.

उन्मीलित.

कांहीं विशेष कारणानें दोन वस्तूंमधील भेदाचें ज्ञान वर्णिलें असतां **उन्मीलित** अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'त्वद्यशमग्न हिमालय शीतावरुनीच जाणती सुर ते.'

मीलित अलंकाराच्या दृष्टीनें यांत यश व हिमालय यांच्यांतील भेद

अनिश्चित आहे. परंतु शैत्य या विशेष कारणानें **हिमालय** हा यशापासून वेगळा ओळखतां आला असें वर्णन आहे; यास्तव येथें **उन्मीलित** अलंकार प्राप्त झाला.

स्रग्धरा.

नृत्यत्सांबाट्टहासासदृश धवल जीं त्या तुझ्या सद्यशांहीं
भूपाला श्रीनृसिंहा ! त्रिभुवन सगळें शुभ्र जें होय पाहीं;
तें देवांना कधींही परिचय कमलानायकाचा न होता,
जें श्रीकान्त स्वनाभीकमळिं परिमलप्रौढितें तो न घेता. १

अ. वि.

परिमलप्रौढीनें भगवान् **शेषशायी** राजयशाहून भिन्न आहे असा निश्चय झाल्याचें यांत वर्णन आहे.

उद्योतमत असें आहे कीं, विशेष कारणानें भेदज्ञान होणें ही गोष्ट पूर्वीच्या भेदाच्या अनिश्चयालाच पोषक असल्यामुळें येथें **मीलित**च मानला पाहिजे.

विशेषक.

दोन पदार्थांतील भेद विशेष कारणानें व्यक्त होतो असें वर्णन असतां **विशेषक** अलंकार जाणावा.

गीत्यर्ध.

' चंद्रोदयीं विशेषें हीं कमलें हीं मुखें असें स्फुरतें. '

अ. वि.

यांत **सामान्य** अलंकारांतल्याप्रमाणें कमलें व मुखें यांतलि भेद सादृश्यामुळें अनिश्चित आहे. परंतु चंद्रोदय या विशेष कारणानें तो भेद निश्चित झाला आहे असें वर्णिलें आहे.

गीति.

' कोकिल काकहि काळा, भेद असे काककोकिलीं काय,
येतां वसंत मग तो काकचि जो काक पिकहि पिक होय ! '

अ. वि.

येथें वसंत या विशेष कारणानें काक व पिक यांच्यांतील भेद व्यक्त केला आहे.

भेदज्ञानानें अभेदज्ञानाला गौणपणा येत नसल्यामुळें **सामान्यालंकारा**-चाच चमत्कार येथें आहे असें **उद्योत**मत आहे.

गूढ.

ज्यास कांहीं सांगावयाचें आहे तें जवळच्या कोणास समजूं नये म्हणून त्याहून दुसऱ्या कोणास उद्देशून तेंच अर्थान्तरानें सांगणें याला **गूढ** अलंकार मानतात.

' पडशांत-चक्रवाकस्त्रिये ! सख्यापाशीं गुजगोष्टी करावयाच्या त्या लवकर आटोप; रात्र येऊन ठेपली. '

शाकुन्तल-अंक ३.

ही **शकुन्तलेला** सूचना आहे हें सांगणें नको. **प्रस्तुत** अलंकाराला ध्वनीचें स्वरूप आहे यास्तव तो अलंकारकोटींत प्रविष्ट होत नाहीं असें **उद्योत**मत आहे.

विवृतोक्ति.

गूढ असलेला अर्थ कवीनें स्पष्ट केला असतां **विवृतोक्ति** हा अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित.

येतें गा प्रिय अच्युता ! बघुनिया तृप्ती तुला कोठुनी ?
एकान्तीं बसतां कुतर्क रचिती हे लोक भारी मनीं;
हें गूढार्थ वदोनिया वच बहू खिन्ना दिसे राधिका,
आलिंगी रसिकाग्रणी हरि तिला जी होय जीवाधिका १

स्वकृत.

या पद्यांत ' गा प्रिय अच्युता ! (मी) येतें, ' इत्यादि उक्तीवरून जो अर्थ गर्भित राहिला तो कवीनें तृतीयचरणांत उघड केला आहे. येथें अर्थशक्तिमूलक गूढार्थ आहे.

वसंततिलक.

' इच्छीतसे मन महानल जाण माझें; '

ही नैषधकाव्यांत दमयंतीची उक्ति आहे. हिच्यांत 'महानल' या श्लिष्टपदसामर्थ्यानें अर्थाचें गोपन झालें आहे.

युक्ति.

गुह्यगोपनार्थ कांहीं क्रियेनें दुसऱ्याची वंचना केली असें वर्णन असतां **युक्ति** हा अलंकार होतो.

गीत्यर्ध.

' चित्रीं तुज लिहितां ती बघुनि दुज्या पुष्पधनु करांत लिही. '

ही एका मित्राची नायकाजवळ नायिकाविषयक उक्ति आहे. ' नायिका तुझें चित्र काढीत असतां दुसरा कोणी तेथें आला. तेव्हां तुझ्या विषयींचा अनुराग त्याला समजूं नये म्हणून तिनें चित्रांत काढिलेल्या तुझ्या मूर्तीच्या हातांत फुलाचें धनुष्य दिलें आणि चित्रगत मूर्ति मदनाची आहे असें त्या तिऱ्हाईत मनुष्यास भासवून त्याची वंचना केली. ' असा मित्राचा अभिप्राय या पद्यांत वर्णिला आहे. येथें अनुरागगोपनार्थ पुष्पलेखनाक्रियेनें नायकेतरपुरुषाची वंचना वर्णिली आहे.

आणखी उदाहरणें:—

शार्दूलविक्रीडित.

रात्रीं दंपतिचीं रहस्यवचनें सारीं शुकें ऐकिलीं,
तीं तेणें गुरुसन्निधींच वदण्या निःशेष आरंभिलीं;
कर्णींच्या मग पद्मरागशकला चंचूपुटीं घालुनी,
तद्वाग्बंधनकार्य दाडिमफलव्याजें करी कामिनी !

येथें शुकाची वाणी बंद करून आपलें रहस्य ऐकणारांचें वंचन नायिकेनें केलें असें वर्णन आहे. **व्याजोक्ति**मध्यें भाषणानें व या अलंकारांत क्रियेनें गोपन असतें असें **कुवलयानंदकारां**चें मत आहे. उद्योतमतें या अलंकाराचा **व्याजोक्तीं**तच अंतर्भाव होतो.

लोकोक्ति.

लोकप्रवादाचें अनुकरण वर्णिलें असतां **लोकोक्ति** अलंकार होतो.

साकी.

कार्तिकमासीं शाप संपतो माझा तुज हें ठावें,
चार मास हे मिटोनि डोळे कैसे तरी कंठावे !

प. र.

'डोळे मिटून दिवस कंठणें,' या लोकोक्तीचें येथें अनुकरण आहे. आणखी उदाहरणें:—

गीति.

चिंताज्वरांत रात्रीं माझा नाहींच लागला डोळा,
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा! १
मोडिति अक्रूरावरि, कंसावरि, सत्यपतिवरिहि बोटें,
पहिल्यास वृथा निंदिति, दोघांतें तें न कविमतें खोटें! २
भीम तयासि पुसें तूं कोण बळी करिशि काय हा कवळ
मद्वंति हें अन्यांचें येथें मारील काय हाक बळ ३

पंत.

या अलंकारांत वाच्यार्थ किंवा प्रतीतार्थ याचा पोष होत नाहीं यास्तव हा अलंकारच नव्हे असें उद्योतमत आहे.

छेकोक्ति.

लोकोक्ति अर्थांतरगर्भित असली म्हणजे ती छेकोक्ति होय.

गीत्यर्ध.

'जाणे भुजंगचरणा एक भुजंगचि दुजा न सखये कीं.'

यांत 'सापाचीं पावलें सापच जाणतो,' या लोकप्रवादाचें अनुकरण केलें असून त्यानें भुजंगपदांतील श्लेषावरून 'अति गोप्य अशा मदनव्यापारांतेंही हा त्याचा मित्र आहे,' असा मार्मिक अभिप्राय प्रकट झाला आहे. उद्योतमतीं ही उक्ति गुणीभूतव्यंग्य होय. या अलंकाराला स्तोकोक्ति असेंही नांव आहे.

निरुक्ति.

अवयवार्थानें नामाचा अन्य अर्थ कल्पिला असतां निरुक्ति अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'यां परिच्या चरितांहीं तूं द्रोपाकर असे गमे उघडं.'

उपजाति.

'पूर्वी कवींच्या गणनाप्रकाशीं, कनिष्ठिका घालिति कालिदासीं;
अद्यापि तत्तुल्य कवीच नाहीं, अनामिका यास्तव सार्थ पाहीं'
अ. वि.

पहिल्या उदाहरणांत दोषाकर (दोषांची खाण, पक्षीं रात्रीं प्रकाशमान) आणि दुसऱ्यांत अनामिका. (करंगळीशेजारचें बोट, पक्षीं जिला नांव नाहीं ती) या दोन नामांचा अवयवार्थानें अन्य अर्थ कल्पिला आहे. हा श्लेषाचाच एक प्रकार होय असें उद्योतमत आहे.

प्रतिषेध.

प्रसिद्ध निषेधाचें कथन झालें असतां प्रतिषेध अलंकार होतो.

'नोहे द्यूत, शठा! हें, तीक्ष्णशरांनीं विहार हा साच.'

रणभूमीवर उभा असलेल्या एका द्यूतकारास हें कवीचें वचन आहे. युद्ध हें द्यूत नव्हे हें सिद्ध आहे. असें असतां त्याचा निषेध वर्णून 'अरे! तुझें पांडित्य द्यूतामध्येंच; युद्धकर्माची व्युत्पत्ति तुला नाहीं!' असा उपहासात्मक अर्थ येथें व्यक्त झाला आहे; व तो 'शठा!' या संबोधनानें सुव्यक्त झाला आहे. आणखी उदाहरण:—

गीति.

पार्थ म्हणे रे कर्णा, बहु भट मजशीं भिडोनि गडबडती,
ही आजि आजि आहे, नोहे केली सभेंत बडबड ती!
मो. विराटपर्व.

प्रतिषेध गुणीभूतव्यंग होय असें उद्योतमत आहे.

विधि.

सिद्ध वस्तूचें विधान केलें असतां विधि हा अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'पंचमसमुदयसमयीं कोकिल तो कोकिल प्रकट लोकीं.'

शार्दूलविक्रीडित.

राम:—

रे माझ्या उजव्या करा! द्विजशिशू वांचावया सत्वरी,
टाकीं खड्ग विशंक होउनिच त्या शूद्रा तपस्व्यावरी;

टाकाया पट्ट जो वनीं प्रियसखी जी गर्भखिन्ना तशी,
रामाचें निजगात्र तूं असलि त्या तूतें दया कादशी ! १

उ. रा. च.

गीति.

ढकली मणि पायानें कांच जरी आदरें धरी स्वशिरीं,
क्रयविक्रयप्रसंगीं मणि तो मणि कांच तीहि कांच तरी १

येथें 'कोकिल,' 'राम,' 'मणि,' इत्यादि सिद्ध वस्तूंचें विधान केलें आहे.

शार्दूलविक्रीडित.

अभ्राच्छादित जी नसे पुनव हो ती यामिनी यामिनी,
जी सौंदर्यगुणान्विता पतिरता ती कामिनी कामिनी;
जी गोविंदरसप्रमोदमधुरा ती माधुरी माधुरी,
जी लोकद्वय साधिते मज गमे ती चातुरी चातुरी १

'माथुरः—अरे लुच्चा ठका, अशा ठकबाजीनें लुटून जाऊं पहातोस काय ! मी माथुर आहें.'

मृ.क.

हा अलंकारही गुणीभूतव्यंगरूप होय असें उद्योतमत आहे.

हेतु.

कार्यासह कारणाचें कथन केलें असतां हेतु अलंकार होतो.

गीत्यर्ध.

'अभिमान सुंदरीचा छेदाया इंदु हा नभीं उगवे'

अ. वि.

येथें इंदु उगवणें हें कार्य अभिमानच्छेदन या कारणासह उक्त आहे.

हेतु व कार्य हीं कोठं एकरूप असतांही हाच अलंकार होतो.

गीति.

त्या दीनवत्सलाची करुणा झाली पुरी बरी मोठी,
होय प्रसाद तोचि प्रासाद जयांत कौतुकें कोटी ! १

मो. बृहद्दशम.

येथें प्रसाद हा हेतु व प्रासाद हें कार्य हीं एकरूप मानिलीं आहेत.

हेतूच्या पहिल्या प्रकारांत चारुता नाहीं यास्तव तो अलंकार नव्हे; व दुसरा प्रकार **अतिशयोक्ती**च्या पहिल्या प्रकाराहून भिन्न नसल्या कारणानें स्वतंत्र अलंकार नाहीं असें **उद्योत**मत आहे.

अनुकूल.

प्रतिकूलता अनुकूलत्वानें वर्णिली असतां **अनुकूल** अलंकार होतो.

गीति.

श्रीकृष्ण म्हणे मजला बांधावें चित्त याचि जरि कामीं,
तरि बांध या भुजांहीं पाहें राहें रुसोनि न रिकामीं ?

मोरोपंत.

ही **कृष्णाची राधे**प्रत उक्ति आहे. येथें बंधन या प्रतिकूल व्यापाराचें अनुकूलत्वानें वर्णन आहे. हा एक प्रकारचा **व्याघात** आहे असें **उद्योत**मत आहे

आशीः

इष्टार्थप्राप्ति होवो अशा अर्थाची उक्ति असतां **आशीरलंकार** होतो.

शार्दूलविक्रीडित.

देऊ तो सविता तुला जय रणीं जो त्वत्कुलाचा पिता
आनंदास वसिष्ठही कुलगुरू जो धर्मसंगोपिता;
इंद्राग्न्यधिक देवताहि अपुलीं देऊत तेजें तुला,
आशी देतिल रामलक्ष्मण निजानंदाचिया हेतुला १.

उ. रा. च.

येथें चारुता नाहीं यास्तव अलंकार नाहीं असें **उद्योत**मत आहे.

चतुर्थ उल्लास.

रसवदादि अलंकार.

रसवान्.

एक रस दुसऱ्या रसाचें किंवा भावाचें अंग होतो तेथें **रसवान्** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित

वाटे देउनियां हिला स्वरुचितें निर्मी शशी, कीं स्मर
शृंगारैकवपू हिला उपजवी, कीं रम्य पुष्पाकर,
कां कीं वेदजडास व्यास विषयीं गोडी कशाची, असा
निर्मायास शकेल वृद्ध मुनि तो ऐशा स्वरूपा कसा ! १

विक्रमोर्वशीय.

राजा **पुरूरवा** याची ही उर्वशीसंबंधानें उक्ति आहे. येथें **शृंगार अद्भुत**-रसाचें अंग आहे. आणखी उदाहरण:—

शार्दूलविक्रीडित.

भूलोका बघण्यास नागदुहिता आली म्हणूं ही जरी,
पाताळीं कधिं पाहिली न असली लावण्यखाणी तरी;
ज्योत्स्ना मूर्तिमती म्हणूं तरि दिवा नेदे कधीं दर्शना,
लक्ष्मीशी करपंकजें दिसतसे ही कोण दिव्यांगना ! १

प्रियदर्शिका.

येथेंही **अद्भुतरसाचें शृंगार** अंग आहे.

गीति.

तो योगिराड् महात्मा अगस्तिमुनि धन्य धन्य धन्यचि हो,
एका चुळींत ज्यानें देखियलें दिव्य मत्स्यकूर्म अहो ! १

अ. द.

येथें **मुनिविषयक रति** या भावाचें **अद्भुतरस** अंग होय. आणखी उदाहरण:—

गीति.

वल्कलरुद्राक्षधर ब्राह्मण अकृतान्ययत्न हा रानीं,
बळ पूजिलें कसें हो बहुमूल्यदुकूलरत्नहारांनीं १

वेनुहरण.

प्रेयान.

भाव रसाचें किंवा अन्य भावाचें अंग होतो तेथें **प्रेयान** अलंकार होतो.

शार्दूलविक्रीडित.

ईर्ष्येनें बघते नभीं जलधरा सौदामिनीसंगता,
केकारावहि ऐकुनी तनु हिची होते सुरोमांचिता;
कांपे कोमलचंपकोपम वपु स्वेदार्द्रही होतसे,
वाटे मन्मथकोटिसुंदरतनु श्रीकृष्ण ही ध्यातसे १

वृषभानुजा–ना.

ही **राधेविषयीं** तिची सखी **तमा**लिका हिची उक्ति आहे. येथें **चिंतादि भाव विप्रलंभशृंगाराचें** अंगभूत आहेत.

वसंततिलका.

कोमेजली वनलता जशि आतपांत,
स्वामीविणें तशिच मी झुरतें मनांत;
काळीज हें करपतें विरहाग्नितापें,
केली तरी कितिक मीं नकळेचि पापें १

र. प्र.

येथें **दैन्य** हा **भाव. विप्रलंभशृंगाराच्या** अंगत्वानें आला आहे.

शिखरिणी.

कधीं काशीमध्यें बसुनि शुभभागीरथिवरी,
धरोनी कौपीना कटितटिं तसा अंजलि शिरीं;
'अये गौरीनाथ त्रिपुरहर शंभो त्रिनयन!
प्रसीद त्वं,' ऐसें म्हणत पळवत् काढिन दिन १

सा. शा.

येथें **चिंता** हा **व्यभिचारिभाव शांतरसाचें** अंग आहे.

शिखरिणी.

शिरीं गंगा, अंकीं हिमनगसुता, तत्पदरत
उभे आंझिमाजी असति गुहहेरंब सतत;
अशी मूर्ती तूझी कधिं नयानें मी पाहिन असें
सदा माझ्या चित्तीं, विनतभयनाशा! वसतसे १

र. प्र.

येथें चिंता हा भाव शिवविषयक रतिभावाच्या अंगत्वानें आला आहे.

शार्दूलविक्रीडित.

अत्युच्चाकृति शैल हे पसरले, विस्तीर्ण सिंधू तसे,
तूं यांतें धरिशी, परी न शिणसी मी तूज बन्दीतसें;
आश्चर्यें वरिचेवरी स्तुति करीं जों मी महीची खरी,
तों तीतें धरि तो स्मरे भुज तुझा, तैं खुंटली वैखरी ! १

अ. वि.

येथें पृथ्वीविषयक रति राजविषयक रतिभावाचें अंग आहे.

ऊर्जस्वित्.

रसाभास किंवा भावाभास हा दुसऱ्याच्या अंगत्वानें आला म्हणजे ऊर्जस्वित अलंकार होतो.

स्रग्धरा.

राया ! जाती भयानें तव रिपुतरुणी सत्वरीं काननातें,
त्यांच्या मार्गे लुटाया तंव निघति जवें भिल्ल उत्फुल्लचित्तें;
नारींच्या सुंदरीं ते वदनशशधरीं तेविं ठेला अपांगीं
होऊनी स्तब्ध कृत्या विसरुनि बसती घेति रोमांच अंगीं ! १

येथें भिल्लांचा रिपुस्त्रीविषयक रतिभाव अनुचित होय यास्तव तो शृंगाररसरूपानें परिणत होत नाहीं तो शृंगाराचा आभास आहे हा शृंगाररसाभास राजविषयक रतिभावाचें अंगभूत आहे.

वियोगिनी.

तुज पाहुनि शत्रुसंघ तो, तनुचें सार्थक नित्य मानितो,
नृपते तुजलागि आदरें, रणरंगीं विनवी असेंच रे १

अ द.

येथें शत्रूचा राजाविषयीं रतिभाव मिथ्या आहे. यास्तव तो भावाभास आहे; आणि तो कवीच्या राजविषयक रतीचें अंग आहे.

समाहित.

भावशांति दुसऱ्याच्या अंगत्वानें आली असतां समाहित अलंकार जाणावा.

स्रग्धरा.

डोळे लाली वरीती, अधर फुरफुरे भोंवया वांकुडया गे,
चंद्राच्या कांतिला गे सुतनु तव मुखें काळिमा आणिली गे;
वाढो वाढी कसा तो तवहि हृदयिंचा मानिनी कोप राहो,
बोले तों दे मिठी ज्या-झटितिच गिरिजा तो तुम्हां भद्र देवो. १

येथें **कोपरूप भावाची शांति शिवविषयक रतिभावाचें** अंग आहे.

शार्दूलविक्रीडित.

पाहूं काय करील तें म्हणवुनी मी मौन तें स्वीकरीं,
तों हा कां न मशीं वदे शठ म्हणे कोपासि ते आदरी;
ऐसें लक्ष्यविहीन दर्शन जिथें दोघांसि त्या काननीं,
मी व्याजें हंसलों, तयींच तिचिया अश्रु स्रवे लोचनीं ! १

येथें **कोपशांति शृंगाररसाचें** अंग आहे.

भावोदय.

एका भावाची उत्पत्ति दुसऱ्याच्या अंगभूत असतां **भावोदय** होतो.

वसंततिलक.

नीलोत्पलासदृश कांति, शिखंड साजे,
हा मंडळींत वटुंच्या स्वयशें विराजे;
वाटे पुन्हां शिशुच होउनि राम आला,
कीं पाहतांच नयनीं निववी मनाला १

उ. रा. च.

येथें **हर्ष** नामक **भावाचा उदय** आहे आणि तो राजा **रामचंद्र**विषयक **रतिभावाचें** अंग आहे.

दिंडी.

तरी होईं तूं सदय येथ राहीं,
बघुनि तुजला दिन घालवीन पाहीं;
मला चरणें दाविला लिहुनि हंसें,
कांत रूपें तो तुझ्या समचि भासे १

ही नलाप्रत **दमयंतीची** उक्ति आहे. येथें **दमयंतीचा उत्कंठारूप**-**भाव शृंगाररसाचें** अंग आहे.

भावसंधि.

अनेक भावांचा संयोग होऊन तो दुसऱ्याचें अंग होतो तेथें **भावसंधि** होतो.

गीति.

रे सहदेवा सत्वर पुष्कळसा अग्नि आण जाच कसा;
जाळूं याचे हे कर आम्हां हा सोसुवेल जाच कसा ! १

मोरो–सभापर्व.

येथें **विषाद** आणि **अमर्ष** या दोन् भावांचा संधि झाला आहे आणि तो **द्रौपदी**विषयक **रती**च्या अंगभूत आहे.

स्रग्धरा.

लोलाक्षीच्या मुखाच्या फिरफिरुनि पुढें येशि गुंगोनि कानीं
जैसा कां, सांगशी तूं गुज, अधरसुधा पीशि, एकान्तदानीं;
भृंगा ! आहेस तूं तों अतिचतुर पहा मी कसा भाग्यहीन !
या तत्वाच्या विचारा करकरुनि फुका जाहलों फार दीन! १

राजवाडेकृत–शाकुन्तल–अंक १

येथें **दुष्यंता**ची **शकुंतला**विषयक **रति** आणि भ्रमरविषयक **मत्सर** हे परस्परविरुद्ध **भाव** संयुक्त होऊन **शृंगाररसाचें** अंगभूत झाले आहेत.

भावशबलता.

एकाचा उपमर्द करून दुसरा, दुसऱ्याचा उपमर्द करून तिसरा असे एकामागून एक भाव उत्पन्न होऊन अन्याचे अंगभूत होतात तेथें **भावशबलता** जाणावी.

स्रग्धरा.

चंद्राचा वंश कोठें ! दुरितकृति कुठें ! काय भेटे पुन्हां ती !
दोषाच्या शांतिला तें श्रुत वदति ! कशी कोप येतांहि कांति !
ज्ञाते ते काय मातें वदतिल सुकृती ! स्वप्निं ही दुर्लभा ते !
चित्ता ! तूं स्वस्थ होईं, कवण तरुण त्या प्राशि बिंबाधरातें ! १

अ. वि.

या उदाहरणांत **तर्क, उत्कंठा, विचार, स्मरण, भय, दैन्य, धैर्य,** आणि **चिंता** या भावांचा एकामागून एक उपमर्दपूर्वक उदय होऊन ते भाव **विप्रलंभशृंगाराचे** अंगभूत झाले आहेत.

गीति.

केव्हां मारिन रिपु तो? परि शरणागत कसा वधावा हो!
ह्मणतिल कीं हतबळ मज! अस्तु; न अनयांत मन्मती वाहो ॥ १
ऐशा करी विचारा राजा! भट हा तुझा सुनीतिज्ञ,
कां त्यावरुनी न तुला स्तवितिल सप्रेम सतत बा प्राज्ञ ? २

र. प्र.

येथें **औत्सुक्य विचार, वितर्क,** आणि **मति** या **भावांची शबलता** (मिश्रण) असून ती राजविषयक **रतिभावाचें** अंग आहे.

पंचम उल्लास.

अलंकारसंमेलन.

दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या उल्लासांत सर्व प्रकारच्या अलंकारांचें विवेचन झालें. कधीं कधीं एकाच पद्यांत कवि अनेक अलंकारांची योजना करितात. एकाद्या अलंकारानें देखील काव्याला सौंदर्य येतें तर अनेक अलंकारांच्या संमेलनानें त्याला कांहीं विलक्षण सौंदर्य आलें पाहिजे हें उघड आहे. यास्तव या उल्लासांत **अलंकारांच्या संमेलनासंबंधानें** थोडासा विचार करण्याचें योजलें आहे.

अलंकारसंमेलनाचे दोन प्रकार आहेत. एकाचें नांव **संसृष्टि** व दुसऱ्याचें नांव **संकर.**

संसृष्टि.

एका पद्यांत अनेक अलंकारांचें परस्परनिरपेक्ष असें संमेलन झालें म्हणजे त्याला **संसृष्टि** म्हणतात.

स्रग्धरा.

आला हो नाग आला पळताचि सुटला हा तया विघ्न झाला,
दंतें मोडी तरूला उपटुनि अवघ्या मोडितो वल्लिजाला;
भ्याला जो स्यंदनाला संकट मृगकुलें नेतसे हा लयाला,
धर्मारण्यांत घाला खचित पडतसे कोण वारील याला ? १

शाकुन्तल–अंक-१.

या पद्यांत 'ल' काराची अनेकवार आवृत्ति आल्यामुळें वृत्त्यनुप्रास, व 'लयाला' या वर्णांची चरणान्तीं यथाक्रम आवृत्ति आल्यामुळें **अन्त्ययमक**, अशा दोन **शब्दालंकारांचा** परस्परनिरपेक्ष असा संयोग झाला आहे, म्हणून येथें **संसृष्ट**.

गीति

रक्षो शितिकंठाचा कंठ तुम्हां तो घनांबुदश्याम,
गौरीभुजा जयावरि शोभे विद्युल्लतेपरि ललाम १

मृ क.

यांत भिन्नान्वय 'कंठ' शब्दाची अर्थसहित आवृत्ति आल्यामुळें **लाटानुप्रास**; 'ज,' 'र,' आणि 'ल,' यांची एकवार आवृत्ति आल्यानें **छेकानुप्रास**; 'घनांबुदश्याम' या पदांत वाचकपद लुप्त असल्यामुळें **वाचकलुप्तोपमा**; आणि उत्तरार्धांत **पूर्णोपमा**. इतक्या **शब्दार्थालंकारांचें** परस्पर निरपेक्ष असें संमलन होऊन येथें **संसृष्टि** झाली.

शार्दूलविक्रीडित.

आल्या कृष्णकृपासुधाघन घनानंदप्रद प्रेक्षणें,
स्वीयादर्शनजातदुःसहमहाताप क्षणा ने क्षणें;
ते पौरातमयूरचातक सुखें अत्युत्सवें नाचती
त्यांची भाग्यसमृद्धि हर्षविवशा या बोलवेनाच ती २

स्यमंतकोपाख्यान.

या पद्यांत 'घन' शब्दाच्या आवृत्तीनें **पुनरुक्तवदाभास**; 'प्रप्र' 'क्षक्ष' या संयुक्त व्यंजनांच्या आवृत्तीनें **छेकानुप्रास**; 'क्षणें, क्षणें' 'वेनाचती, वेनाचती' या यथाक्रम वर्णावृत्तीनें **अंत्ययमक**; ऋ, र, ष या

मूर्धन्य वर्णांच्या श्रुतिमधुर संयोगानें श्रुत्यनुप्रास; 'कृपाघुधा' व 'पौरांत-मयूरचातकं,' येथें **रूपक**; इतक्या **शब्दार्थालंकारांचें** या पद्यांत परस्पर-निरपेक्ष संमेलन होऊन **संसृष्टि** झाली.

गीति.

चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा,
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा १

रुक्मिणीहरण.

येथें 'चिंताज्वर' या पदानें **रूपक** आणि 'डोळा लागला नाहींच' यानें **लोकोक्ति** अशा दोन **अर्थालंकारांचें** परस्परनिरपेक्ष संमलन झालें.

पृथ्वी.

म्हणा मज उताविळा; गुणचि घेतला; घाबरें
असो मन असेंचि, बा भजकबर्हिमेघा! बरें;
दिसे क्षणिक सर्व हें; भरंवसा घडीचा कसें
धरील मन? आधिनें बहु परिश्रमे चाकसें!

केकावली.

उतावळेपणा हा दोषरूप असून त्याचें गुणत्वानें ग्रहण केल्यामुळें **लेश** अलंकार; 'मन असेंच घाबरें असो' या दोषाचें, त्यांत परमेश्वर-प्राप्तिरूप गुण आहे या करितां, ग्रहण केलें असें मानलें तर **अनुज्ञालंकार**; 'भजकबर्हि' यानें **रूपक**; 'भजकबर्हिमेघ' हें पद सहेतुक असल्यामुळें **परिकर**; 'घडीचा भरंवसा' यानें **लोकोक्ति**; 'मन भरंवसा कसें धरील' इत्यादिकानें **प्रश्नालंकार** आणि 'आधिनें चाकसें परिश्रमे' यानें **पूर्णोपमा**. 'घाबरें' व 'चाकसें' या क्रमोक्त वर्णावृत्तींनीं **अंत्ययमक**; 'घ, स, ध' या वर्णांच्या आवृत्तीनें **छेकानुप्रास**. असे **अर्थालंकार** व **शब्दालंकार** प्रस्तुत पद्यांत परस्परनिरपेक्ष संयोग पावले आहेत.

गीति.

तो खड्गचर्म घेउनि अवलंबी वीरनायक विहाय,
संकट पडतां सोडुनि धैर्यास ह्मणेल काय कवि हाय १

मोरोपंत-अभिमन्युवध.

या पद्यांत 'ब, स,' आणि 'क' या वर्णांच्या आवृत्तीनें छेकानुप्रास; यकविहाय या क्रमोक्त वर्णावृत्तीनें अंत्ययमक;व उत्तरार्धांत अर्थान्तरन्यास; या अलंकारांचें स्वतंत्रपणानें मेलन झालें आहे. येथें प्रश्नालंकार अर्थान्तरन्यासांत मिसळून थोडासा उपकारक झाला आहे हें मात्र विशेष आहे.

संकर.

एका पद्यांत अनेक अलंकार परस्परसापेक्ष योजेले असतां **संकर** होतो. हा **संकर** तीन प्रकारचा आहे. एक **अंगागिभावसंकर** दुसरा **संदेहसंकर** आणि तिसरा **समप्राधान्यसंकर.**

अंगांगिभावसंकर.

एका अलंकारापासून दुसरा अलंकार उत्पन्न होतो, किंवा एक अलंकार दुसऱ्या अलंकाराचा अंगभूत असतो, अथवा अलंकार परस्पर उपकारक होतात तेथें **अंगागिभावसंकर** होतो.

साकी.

रुचिर कंकणें शिरोभूषणें, रत्नमंडिता कांची,
राजा! हरिती विपिनीं शबर त्वद्रिपुच्या वनिता चीं १
गुंजामाला समजुनि परि ते हरिति न त्यांचे हार;
अधरोष्ठाची प्रभा पडुनि जे रक्त जाहले फार २

स्वकृत.

शुभ्र मुक्ताहारांनीं अधरोष्ठाचा रक्तिमा हा गुण स्वीकारल्या मुळें येथें **तद्गुण** हा अलंकार झाला. या अलंकाराच्या सामर्थ्यानें मुक्ताहारावर गुंजाहाराची भ्रांति कल्पित झाली व **भ्रांतिमान्** अलंकार उत्पन्न झाला. या पद्यांत राजाचा शौर्यातिरेक व्यंजित झाला आहे; व तेणेंकरून राजविषयक रति सुव्यक्त झाली आहे.

गीति.

संध्या अनुरागवती दिवस उभा तिजपुढें सदा राहे,
परि न समागम त्यांचा! दैवगति अहो विचित्र बहु आहे! १

स्वकृत.

येथें विशेषणसाम्यबलानें **समासोक्ति** झाली आणि ती **विशेषोक्तीची** अंगभूत झाली.

साकी.

येतां गुरुत्व तुजला वायू शकेल नच तोळाया,
जो गुरु त्यासचि मान लाभतो, हलका तुच्छ कराया १
पृ. र.

येथें **श्लेष** व **अर्थान्तरन्यास** हे परस्पर उपकारक आहेत.

संदेहसंकर.

अमुकच अलंकार करावा असा निर्णय होत नाहीं तेथें **संदेहसंकर** जाणावा.

' मी मुखचंद्र पाहतों. ' असें वाक्य आहे. यांत **उपमा** करावी किंवा **रूपक** स्वीकारावें याविषयीं संदेह उत्पन्न होतो. साधक आणि बाधक हीं दोन्हीं असतील किंवा यांपैकीं कोणतेंही एक असलें म्हणजे संदेह रहात नाहीं. जसें:—' नरमणि मुखचन्द्र चुंबितो, ' या चरणांत चुंबनव्यापार मुखाला अनुकूल असल्यामुळें उपमितसमासाचें ग्रहण होऊन **उपमालंकार** निश्चित झाला. चंद्राला चुंबनव्यापार प्रतिकूल असल्यामुळें तो **रूपकास** बाधक झाला. ' मुखचंद्र प्रकाशतो. ' या वाक्यांत प्रकाशनधर्म **रूपकाचा** साधक आहे; आणि उपचारानें **उपमेचा** बाधक नाहीं.

वसंततिलक.

मित्रा धरीं हृदयिं धैर्य; कशासि चिंता ?
कां तूं अकारणचि तापवितोसि चित्ता ?
जेणें अखंडतिमिरव्रज खंडियेलें,
तें मोददायि विधुबिंब नभीं उदेलें ! १

येथें ' मुख ' हें उपमेय ' विधुबिंब ' या उपमानांत विलीन होऊन गेलें यास्तव **अतिशयोक्ति** समजावी; किंवा ' तें ' या पदानें मुख हें उपमान उक्त होऊन त्याच्यावर विधुबिंबाची अभेदरूपानें कल्पना सिद्ध झाली म्हणून **रूपक** मानावें; **अथवा** मुख व विधुबिंब या प्रस्तुत पदार्थांचा ' मोददा-

बिम्ब ' या एकधर्मामध्यें अन्वय झाला यामुळें तुल्ययोगिता पतकरावी; कां विधुबिंब अप्रस्तुत मानून दीपक स्वीकारावा; किंवा विशेषणसाम्यबलानें अप्रस्तुत जें ' मुख ' त्याची प्रतीति होते या करितां समासोक्ति अंगीकारावी; अथवा अप्रस्तुत विधुबिंबवर्णनानें प्रस्तुत पदार्थ जें मुख त्याचें ज्ञान झालें यास्तव अप्रस्तुतप्रशंसा करावी; किंवा विधुबिंबोदयानें मदनोद्दीपक काल पर्यायानें उक्त झाला म्हणून पर्यायोक्त आदरावा; असा अनेक अलंकारांचा संदेह प्रस्तुत स्थलीं उत्पन्न होतो यास्तव येथें संदेहसंकर जाणावा.

समप्राधान्यसंकर.

एकाच पदामध्यें शब्द व अर्थ यांचे अलंकार स्पष्टपणें प्रविष्ट झाले असतां समप्राधान्यसंकर होतो.

द्रुतविलंबित.

हृदयमन्दिरिं तूं वसशी सदा,
परि न ओळखितां स्थल तें कदा;
तव पदांबुज धुंडिति मावरा!
जन वनीं नवनीरदसुंदरा! १

पद्यमंजरी.

या पद्यांत ' नवनीरदसुंदरा ' या एकाच पदांत अनुप्रास व वाचकलुप्तोपमा हे दोन्ही अलंकार स्पष्ट व्यक्त झाले आहेत.

शिखरिणी

न पाही स्वप्नींही पतिविण कधींही नर दुजा,
स्पृहायुक्तें चित्तें जितकमलनालोत्तमभुजा;
सुशीला तूं ऐशी परपुरुष जो निर्गुण तया,
कशी पाहूं जाशी, हरिणनयने! सत्वरतया १

प. र.

यांत ' जितकमलनालोत्तमभुजा ' या पदांत व्यतिरेक व अनुप्रास हे अलंकार स्पष्ट व्यक्त झाले आहेत.

एका पदांत दोन शब्दालंकार किंवा दोन **अर्थालंकार** आले तरी कोणी **समप्राधान्यसंकर** मानतात. जसें:—

शिखरिणी.

जयाच्या साम्यातें वरिति नवनीलोत्पलवनें,
जयाच्या सौगंध्यीं स्तविति बहु मंदारसुमनें;
, तुझा ऐसा जो कां, जननि ! कवरीभार रुचिर,
हरो तो माझें हें हृदयगत अज्ञानतिमिर ! १

पद्यमंजरी.

येथें ' नवनीलोत्पलवनें ' या एका पदांत **वृत्यनुप्रास** व **यमक** यांचा स्पष्ट उदय आहे.

इंद्रवज्रा.

" वक्त्राब्जलुब्धभ्रमरावली ही
कुंजांत गुंजारवि लीन पाहीं !

या श्लोकार्धांत ' वक्त्राब्जलुब्धभ्रमरावली ' एवढें एक पद आहे. या पदांत 'वक्त्राब्ज' हें रूपक असून ' भ्रमर ' या उपमानपदामध्यें उपमेयाचें निगरण झालें यामुळें **अतिशयोक्ति** अलंकार झाला. **रूपक** व **अतिशयोक्ति** हे दोन्ही अलंकार येथें स्वतंत्र असून सारखीच चारुता उत्पन्न करणारे आहेत. यास्तव याठिकाणीं **समप्राधान्यसंकर** जाणावा.

शुद्धिपत्रक.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१	१७	वाक्यार्थाशीं	तात्पर्यार्थाशीं
२	२१	वावयां	वाक्या
५	१३	स्वार्थां	स्वार्थी
७	३	हातात	होतात
३१	१९	प्रभुकंठजीची	प्रभुकृष्णजीची
,,	,,	कृंष्णजीची	कृष्ण जीची
३६	१९	सुभारति	सुभारती
३८	२२	खवळेनिया	खवळोनियां
४२	४	कांहीं	कांहीं,
४६	२	पह्यावयाला	पाहावयाला
४७	१७	सुचतुरें	सुचतुरे
५६	२४	छाया नायकसा	छायानायकसा
५८	१८	विभादिकांनीं	विभावादिकांनीं
६०	१६	नायिक	नायिके
६२	१०	निर्वंद	निर्वेद
,,	२२	गांशृराचा	शृंगाराचा
६६	४	हयतळीं	हय तळीं
,,	५	मृतिसमर्थी	मृतिसमर्थि
,,	१७	धागतीर्थी	धारातीर्थी
,,	२४	तातें,	ततें
,,	२६	कीं,	कीं
६७	१७	युद्धंवीर	युद्धवीर
७२	९	फिरूनि भेटती	फिरूनि भेटतीं
७३	१३	पुरविलें	पुरविले
७४	६	घर्म	धर्म
७५	१८	ह्मणज	म्हणजे
७७	१६	आरडोनि	आरडोनी
७८	२०	ऐकोनि	ऐकोनी
८३	३	महा चिंतांबुधीं	महाचिंतांबुधीं
,,	२६	स्थायिभा	स्थायि-

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
८४	७	उदाहरणें	उदाहरण
८६	१९	जर्न संगती	जनसंगती.
८७	१५	भांमिनाविलास	भामिनीविलास
,,	१८	रगे	रंगे
८९	९	भक्तिरसांची	भक्तिरसाञ्चीं
९५	१	अग-	अंग-
,,	२८	पुष्कर पत्रही	पुष्करपत्रही
९६	१६	वंणन	वर्णन
९८	२३	मनोविदीद्न	मनोविनोदनें
,,	२५	भाळिचें	भाळिंच
९९	२१	असते आद्र	असतें आर्द्र
१००	२२	चक्रपाणी	चक्रपाणि
१०३	५	मंदमंद पदसुंदर	मंदमंदपद सुंदर
,,	७	धरु	धरू
,,	,,	कृशो दरी	कृशोदरी
,,	१३	उदरंबर	उदरंभर
,,	१८	वतांशींच	स्वतांशींच
,,	२३	दखोनी	देखोनी
१०७	१०	शृगाराला	शृंगाराला
१०८	८	क्षब्दाची	शब्दाची
,,	९	रच ना	रचना
११४	१८	सुजन वाक्य	सुजनवाक्य
११५	१०	शकेची	शकेंचि
११८	५	लिहिलें	लिहिले
१२६	१३	पांडु-रमणींतें	पांडु रमणींतें
,,	२७	नतर	नंतर
१३०	२२	रतिपतीच,	'रतिपतीच,'
१३१	१८	जननी	असथी
१३३	३९	पायरीला	पंक्तीला
१३४	१३	विध	विंधु
१३५	२९	त्वत्सम वस्तुविनोदाहि	त्वत्समवस्तुविनोदाहि
१३७	१२	असतो	असतो.
,,	१५	स्पष्ट ज्ञान	ज्ञान स्पष्ट

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१३८	२३	द्वितीर्धांत	द्वितीयार्धांत
१३९	२२	रमणीय सादृश्यमूलक	रमणीयसादृश्यमूलक
१४१	१२	वण्य	वर्ण्य
,,	२३	होत	होते
,,	२८	कला	केला
१४२	२३	दिसे	दिसे
१४३	२४	शद्बांनी	शब्दांनी
१४४	१२	उत्प्रेक्षेत	उत्प्रेक्षेत
१४५	२३	पवन धूलिस	पवनधूलिस
१४६	१८	वर्णवस्तु	वर्ण्यवस्तु
,,	२४	होय, व	होय व
१४७	६	श्रमुनी '	' श्रमुनी '
१४८	५	सुधेची व	सुधेची (चुन्याची) व
१४९	३	तरी	तथापि
,,	२७	दया,	दया
१५०	२६	' अंतःपुरा 'चा	' अंतःपुरा 'चा
१५३	३	पूर्णेन्दूचा	पूर्णेन्दूचा
,,	१०	अतिशयोक्तीला	या अतिशयोक्तीला
,,	११	असही	असेंही
,,	१९	अनुक्रम	अनुक्रमें
१५७	१३	शरकर्ण	शर कर्ण
,,	२०	त्वरित शरसंधानकरणी	त्वरितशरसंधानकरणी
१५८	३	अक्रमातिशयोक्ति	अक्रमातिशयोक्ति
,,	२२	स्वयवर	स्वयंवर
१६०	६	मालती शशिकला कदलींची	मालतीशशिकलाकंदलींची
,,	१५	अशा	या
१६८	२६	धरी	धरों
१९०	१५	दृष्ट	दृष्टि
१९१	१४	च्छविजरि	च्छवि जरि
१९२	२४	येतें असें	असें
१९३	१०	इष्टप्राति	इष्टप्राप्ति
१९४	९	तेथें त्या	त्या
२००	९	सबध	संबंध

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध	शुद्ध.
२०२	१२	वाचून	वांचून
२०९	२३	आठवोनि	आठवोनी
२१२	१४	पत्तुव	पटुत्व
२१८	२१	जनसुधा	जन सुधा
,,	२८	वरिवरि	वरिवरी
२१९	१३	हे	हें
,,	१६	छळ्ळीन	छळ्ळी न,
२२०	११	निंदा;	निंदा,
,,	२८	भीमाची	भीष्माची
२२२	२	आणि ऊन	किंवा ऊन
,,	९	आतिव्याधि व्यतिकर	आधिव्याधिव्यतिकर
२२३	२६	कुंकुम	कुंकुम
२२४	१२	तिळहिन	तिळहि न
२२५	१९	आंहेत.	आहेत.'
२२७	३	सुंवर्णरंजतांदिकीं	सुवर्णरजतांदिकीं
,,	१५	तुळें	तुळे
२२८	२२	या पद्यांत कथन	कथन
२३३	६	आघीं	आधीं
,,	१४	आधारांची ही	आधारांचीही
२३४	४	जा	जो
२३६	४	नायिकेचा	नायिकेच्या
२३९	११	घेववल	घेववला
२४६	१२	वीनता	वनिता
,,	१४	वापरला	योजला।
२५०	१७	प्रताप तपनीं	प्रताप[illegible]नीं
२५४	१९	गुण समूहीं	गुणसमूहीं
२६३	६	लघुप्रियेहि	लघु प्रियेहि
२७४	१३	केली	केलीं
२७६	१९	नययीं	नयनीं.
,,	२६	हसें	हंसें

☞ यांशिवाय मात्रा, अनुस्वार वगैरे उडून गेल्याच्या, मेळल्या ठिकाणीं मळता टाइप पडल्याच्या व दुसऱ्याही अनेक प्रकारच्या चुका राहिल्या आहेत त्यांची वाचकांनीं क्षमा करावी.